# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

## नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

## POSITIVE STORIES

### दिनांक ०१.०६.२०२१ ते दिनांक ३०.०६.२०२१

#### दिनांक ०१.०६.२०२१ मंगळवार

**१) पो.स्टे. कळमना पोलीसांची कामगीरी — घरफोडी व वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणून आरोपीतांना अटक केल्याबाबत :**

दिनांक २२.०५.२०२१ चे ०३.०० वा चे सुमारास फिर्यादी मनिष हरीश सावलानी वय ३८ वर्ष रा. जरीपटका, ईरोज वाईनशॉपचे बाजुला, प्लॉट नं. २१०, नागपूर हे पो.स्टे. कळमना हद्दीत कळमना चिखली देवस्थान दयालु दालमिलच्या समोर, प्लॉट नं. ११४, येथील गोडावुन ला लॉक लावुन गेले असता दिनांक २६.०५.२०२१ चे १६.२० वा चे सुमारास गोडावुन साफसफाईसाठी गोडावुन वर आले असता त्यांना गोडावुन चे शर्टरचे लॉक तुटलेले दिसुन आले त्यांनी गोडावुन चे आत प्रवेश करून पाहीले असता गोडावुन मधुन साई सुपारीची १० बॅग ज्या मध्ये कतरंन (कापलेली बारीक) सुपारी प्रत्येकी बॅग मध्ये २५ किलो कतरंन (कापलेली बारीक) सुपारी प्रति बॅग रु ६,०००/— प्रमाणे १० बॅग ची किमंती अंदाजे रू ६०,०००/— चा माल कोणीतरी अज्ञात चोरटयांनी चोरून नेला. अश्या फिर्यादिचे रिपोर्टवरून पो.स्टे. कळमना येथे कलम ४५४,४५७,३८० भादंविचा गुन्हा दाखल केला.

सदर गुन्हयाचे तपासा दरम्यान यातील आरोपी १) सौरंभ प्रमोद पाल वय २९ वर्ष रा इंदोरा, जयभीम चौकचे बाजुला, रामटेकेचे घरी किरायाने, बौध्दविहाराचे लाईन मध्ये, पो स्टे जरीपटका नागपुर, २) दिपक चंदु बघेल वय १९ वर्ष रा प्लॉट १६२, विजय नगर बाजार चौक, पुराना शितला माता मंदिर जवळ, पो स्टे कळमना नागपुर, ३) इश्वरी सिताराम शाहु वय २२ वर्ष रा विजय नगर बाजार चौक, पुराना शितला माता मंदिर जवळ, दिपक ज्वेलर्स चे समोर, पो स्टे कळमना, नागपुर यांना दिनांक २७/०५/२०२१ रोजी अटक करण्यात आले होते व सदर गुन्हयातील पाहीजे आरोपी नामे पिलु काशिराम शाहु वय २३ वर्ष रा आदिवासी प्रकाश नगर, चिखली ले आउट, पो स्टे कळमना, नागपुर हयास दिनांक २९/०५/२०२१ रोजी अटक करण्यात आली. यातील आरोपी क्रं १ ते ३ यांचा मा. हुजुर कोर्टातुन दिनांक ३१/०५/२०२१ पर्यंत पी.सी.आर मंजुर करण्यात आला आहे. तसेच यातील आरोपी क्रं ४ याचा सुध्दा मा हुजुर कोर्टातुन दिनांक ३१/०५/२०२१ पर्यंत पी.सी.आर मंजुर करण्यात आला आहे. पी.सी.आर दरम्यान यातील आरोपी क्रं ४ नामे पिलु काशिराम शाहु वय २३ वर्ष रा आदिवासी प्रकाश नगर, चिखली ले आउट, पो स्टे कळमना, नागपुर याने पंचासमक्ष स्वत:चे मर्जीने दिलेल्या कबुली निवेदन वरून गुन्हयातील व गुन्हयाचे व्यक्तीरिक्त आरोपीने दिलेल्या कबुली निवेदन वरून मेमोरंडम जप्ती पंचनामा व आरोपीने दाखवुन दिलेल्या घटनास्थळाचा पंचनामा कारवाई दरम्यान जप्त करून ताब्यात घेतले.

सदरहु गुन्हयाचे तपासा दरम्यान ३ घरफोडया व २ वाहन चोरी असे पो स्टे कळमना चे एकुण ५ गुन्हे उघडकीस आणले आहेत. गुन्हयात एकुण रू ३,६२,०००/— चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कामगीरी मा.पोलीस उपायुक्त (परीमंडळ क्र.०५) श्री. निलोत्पल, मा. सहायक पोलीस आयुक्त (कामठी विभाग) श्री.रोशन पंडीत नागपूर शहर यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विश्वनाथ चव्हाण, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री नरेन्द्र निस्वादे, पोलीस उपनिरीक्षक श्री अनिल इंगोले, पो.हवा दिलीप जाधव, चंदशेखर यादव, ना.पो.शि.प्रशांत गभने, प्रफुल ढवळे, धनराज सिंगुवार, अजय शुक्ला, पो.शि. प्रशांत लांजेवार सर्व पो.स्टे कळमना, नागपूर शहर, पो.शि उपेंन्द आकोटकर, कार्यलय परिमंडळ—०५ नागपूर शहर यांनी केली आहे.

२) मा. पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्रमांक ०५, नागपुर शहर यांनी गुन्हेगार नामे पिंटु लखन सेलोकर, यास ०१ (एक) वर्षाकरीता हद्यपार केल्याबाबत :

मा. पोलीस उपायुक्त परिमंडळ क्रमांक ०५ श्री. नीलोत्पल नागपुर शहर यांनी गुन्हेगार ईसम नामे पिंटु लखन सेलोकर, वय ३३ वर्षे, राह. डिप्टी सिग्नल, बाजार चौक, गोपाल नगर, पो.स्टे. कळमना, नागपूर शहर याने पो.स्टे. कळमनाचे हद्दीत लोकांना दमदाटी व मारहाण करणे, अवैद्यरित्या दारू विक्रीकरीता जवळ बाळगणे व विक्री करणे, अवैद्यरित्या सट्टापट्टीचा जुगार चालविणे, बेकायदेशिर जमाव गोळा करून प्राणघातक हत्यारानिशी ईच्छा पुर्वक जबर दुखापत करणे, शांतताभंग घडवुन आणण्याचे उद्देशाने अपमान करणे, अवैद्यरित्या प्राणघातक शस्त्रे जवळ बाळगणे, मनाई आदेशाचे उल्लघंन करणे, दरोडा घालण्याची पुर्व तयारी करणे, दरोडा घालण्यासाठी एकत्र येणे, अशा प्रकारे गंभीर गुन्हे केलेले असुन त्याचे या कृत्यामुळे परिसरातील लोकांच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण झालेली आहे. सदर ईसमावर वारंवार प्रतिबंधक कारवाई करून देखील त्याचे प्रवुत्तीत कुठलीही सुधारणा झाली नाही. त्याचे गुन्हयांना आळा बसावा व परिसरात शांतता व सुव्यवस्था रहावी या हेतुने मा. पोलीस उपायुक्त परिमडंळ क्रमांक ०५ नागपुर शहर यांनी गुन्हेगार ईसमाविरूध्द हद्यपार आदेश क्रमांक ०६/२०२१ दिनांक २९/०५/२०२१ अन्वये पारीत केला असता सदरचा हद्यपार आदेश त्यास दिनांक ०१/०६/२०२१ रोजी बजावणी करण्यात आलेला असुन त्यास नागपूर शहर पोलीस आयुक्तालय व पोलीस स्टेशन कळमना हद्यीला लागुन असलेल्या नागपूर ग्रामीण हद्यीतील पोलीस स्टेशन कन्हान, मौदा व खापरखेडा हद्यीतुन ०१ (एक) वर्षाकरिता हद्दपार करण्यात आलेले आहे. तसेच तो त्याचे हद्दपारीचा कालीवधी त्याचे परिचीत नामे फिरोज ईब्राहिम बाघाडे, वय ३२ वर्ष, राह. वार्ड नं. ०२, प्रभाग क्रं. १५, बाजार चौक, पेंन्च रोड, पारशिवणी, पो.स्टे. पारशिवणी, जिल्हा नागपुर, या ठिकाणी राहुण पुर्ण करेल.

सदरची कामगीरी नागपूर शहराचे मा. पोलीस उपायुक्त परिमंडळ क्र. ०५ श्री नीलोत्पल नागपुर शहर, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त(कामठी विभाग) श्री रोशन पंडीत नागपुर शहर यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. विश्वनाथ चव्हाण, सपोउपनि धर्मेंद्र, नापोशि प्रविण लांडे, पोशि सचिन दुबे, अशोक, मपोशि ललीता, गिता यांनी केली.



दिनांक ०२.०६.२०२१ बुधवार

१) पो.स्टे. पाचपावली पोलीसांची कामगीरी — चोरीचा गुन्हा उघडकीस आणून आरोपीस अटक केल्याबाबत :

दिनांक ३०/०५/२१ चे एक महिण्या पूर्वी पासुन ते आजपावेतो फिर्यादी नामे संदीप शंकर समुद्रे वय ३४, रा. वैशालीनगर, सागर बियर बार मागे जी—२९/३० पो.स्टे. पाचपावली नागपुर यांनी पोस्टेला येवुन फिर्याद दिली की, पोस्टेला लागुन असलेले शासकीय नवीन इमारतीमधील पोलीस क्वार्टर सध्या कोविड—१९ महामारीमुळे खाली असल्याने त्यांचा उपयोग क्वारंटाईन सेंटर म्हणुन करण्यात येत असुन सदर क्वार्टर मधील ईलेक्ट्रीक साहीत्य ज्यामध्ये सी विंग इमारती मधील सिलींग फॅन स्मॉल—०७, डी विंग—०८ सिलींग फॅन स्मॉल, एफ विंग मधील किचन सिलींग फॅन—०१ असे एकुण १६ बजाज कंपनीचे सिलींग पंखे ई विंग इमारतीमधील —०१, सी विंग—०२ एक्झॉस्ट फॅन असे एकुण ०३ एक्झॉस्ट फॅन, जगवार कंपनीचे ०४ नळ असा एकुण अंदाजे रुपये ४४,०००/— किंमतीचा माल दिनांक ३०/०५/२१ चे एक महिणा पूर्वीपासून कोणीतरी अज्ञात चारेटयाने चोरुन नेला आहे अशा फिर्यादीच्या रिपोर्टवरुन कलम ३८० भादंवीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर गुन्हयाचे तपास दरम्यान गुन्हयाचा आरोपीचा शोध व्हावा याकरिता सदर भागात गुप्त बातमीदार नेमण्यात आले. घटनास्थळाचे आजु—बाजुचे परिसरातील सीसीटीव्ही फुटेजची सुध्दा पाहणी करण्यात आली आरोपीचा शोध व्हावा याकरिता तपास पथकांनी अथक परिश्रम घेतले. दिनांक ३१/०५/२१ रोजी मिळालेल्या गुप्त बातमीवरुन आरोपीनी गुन्हा करतेवेळी वापरलेल्या दुचाकी बाबत माहिती काढुन आरोपी विक्की राजीन उंदीरवाडे वय ३२ वर्ष रा. ठवरे यांचे घरी किरायाने, चव्हाण

क्लिनीक जवळ, मॉडेल टाऊन, बेझनबाग पोस्टे जरीपटका, नागपूर यास मोठया शिताफीने ताब्यात घेवुन गुन्हयासंबंधी बारकाईने विचारपुस करुन त्याने बजाज मॅक्सीमा कंपनीचे ६०० एमएम पांढ—या रंगाचे चार पात्याच्या २३ पंखे प्रत्येकी किंमत अंदाजे रुपये १,४००/— याप्रमाणे एकुण रु. ३२२००/—तसेच गुन्हयात वापरण्यात आलेली दुचाकी वाहन एमएच—३१ एफएम—४११३ किं. रु. ७०,०००/— असा एकुण रु. १,०२,२००/— चा मुद्देमाल आरोपीकडुन जप्त करुन आरोपीस गुन्हयात अटक करुन गुन्हा उघडकीस आणला.

सदरची कारवाई नागपूर शहराचे मा. पोलीस उपायुक्त श्री लोहीत मतानी परिमंडळ क्र.३ नागपूर शहर, मा. सहायक पोलीस आयुक्त, श्री सचिन थोरबोले(लकडगंज विभाग) यांचे मार्गदर्शनात वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री संजय मेंढे, पोलीस निरीक्षक गुन्हे, श्री मुकुंद ठाकरे, पोउपनि.प्रमोद खंडार, पोहवा शत्रुघ्न यादव, छगन सिंगणे, शंकर दिक्षीत, नापोशि विनोद बरडे, बाळकृष्ण राठोड, पोशि नितीन धकाते, पोशि सचिन जयपुकर, पोशि. आशिष लाडके यांनी केलेली आहे.

## दिनांक ०३.०६.२०२१ गुरूवार

### १) पो.स्टे. अजनी पोलीसांची कामगिरी :

१) चि. आरव कृष्णकुमार सेन वय ७ वर्ष रा. के/ऑफ ब्रिजेश यादव, वसंतनगर, गल्ली क्रं. १२, पोलीस ठाणे अजनी, नागपूर शहर हा मुलगा दिनांक ०३/०६/२०२१ चे दुपारी ०१:३० वा. चे सुमारास घरुन मोबाईल फुटल्याचे कारणावरुन घरुन निघुन गेला आहे अशी माहीती मिळताच सदरचे प्रकरण हे गांभीर्याने नोंद घेवुन तात्काळ नातेवाईकासह त्याचे रहाते वस्तीत, आजुबाजुचे वस्तीत, मित्रांकडे, ईतरत्र जावुन विचारपुस करुन हरविलेल्या मुलाचा कसोशीने शोध घेण्यात आला, सदर मुलाचा शोध घेण्याचे दृष्टीने राहते वस्तीतील शेजारील सर्व घर चेक केले असता सदरहु मुलगा हा शेजारचे घरी लपुन बसलेला सुस्थितीत मिळुन आल्याने त्यास ताब्यात घेण्यात आले. सदर मुलाचे समुपदेशन करुन त्यास त्याचे आई—वडिलाचे ताब्यात देण्यात आले आहे.

२) आनंद कृष्ण सोनवणे वय २८ वर्ष रा. के/ऑफ वालदे, न्यु बाबुलखेडा, धोबी मोहल्ला जवळ, पोलीस ठाणे अजनी, नागपूर शहर हा दिनांक ०३/०६/२०२१ चे दुपारी ०२:३० वा. पासुन रहाते घरुन कर्जाच्या बोजामुळे सुसाईड नोट लिहुन घरुन निघुन गेला आहे अशी माहीती मिळताच सदरचे प्रकरण गांभीर्याने नोंद घेवुन तात्काळ हरविलेल्या इसमाचा त्याचे रहाते वस्तीत, आजुबाजुचे वस्तीत, मित्रांकडे, ईतरत्र जावुन विचारपुस करुन कसोशीने शोध घेण्यात आला. नमुद इसमाचा रेल्वे स्टेशन, रेल्वे क्रासींग, बस स्टॉण्ड परिसरात कसोशिने शोध घेतला असता नमुद इसम हा मनिषनगर वस्तीत सुस्थितीत मिळुन आला आहे. सदर इसमाचे समुपदेशन करुन त्यास त्याचे परिवाराचे ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी नागपूर शहराचे मा. पोलीस उपायुक्त(परि.क्र.४) श्री अक्षय शिंदे व मा. सपोआ(अजनी विभाग) श्री एन. एस. पालवे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. व्हि.एम. चौधरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक पोस्टे अजनी नागपूर शहर यांचे नेतृत्वात मपोउपनि संदीया सोमनकर, पोहवा रतन, नापोशि हेमंत रेवतकर, पोशि रूपेश साबळकर, मनोहर, चालक नापोशि मंगेश यांनी केली आहे.

## दिनांक ०४.०६.२०२१ शुक्रवार

### १) गुन्हेशाखा युनिट क्रमांक ०४, नागपूर शहर व पोलीस स्टेशन हुडकेश्वर यांनी संयुक्तपणे राजू वैद्य रा. पिपळा फाटा हुडकेश्वर नागपूर शहर याचे परीवारास शस्त्राचे धाकावर वेठीस धरून खंडणी मागणारा ईसम नामे जितेंद्र तुळशीराम भिसेन, वय १९ वर्षे रा. हुडकेश्वर खुर्द, नागपूर यास घातक शस्त्रासह मोठया शिताफीने ताब्यात घेतल्याबाबत.

दिनांक ०४/०६/२०२१ रोजी गुन्हेशाखा, युनिट क्रमांक ०४, नागपूर शहर चे पथक कर्तव्यावर हजर असता पथकातील सपोनि ओ. एस. सोनटक्के यांना १५/१५ वा चे सुमारास माहीती मिळाली की, पोस्टे हुडकेश्वर हददीत पिपळा फाटा, चौधरी मंगल कार्यालयाचे जवळ प्लॉट क्रमांक ०१ मध्ये एका ईसमाने अग्नीशस्त्र व चाकूचा धाक दाखवून तीन महिलांना वेठीस धरले असून ५०,००,००० रू ची खंडणी मागत आहे.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेवून गुन्हेशाखा, युनिट क्रमांक ०४, नागपूर शहर पथक वरीष्ठांचे आदेशाने तात्काळ घटनास्थळ गाठले. घटनास्थळी राजू वैद्य याचे घरासमोर पो.स्टे हुडकेश्वर येथील पोलीस स्टाफ व वरीष्ठ अधिकारी हजर होते. नागपूर शहराचे मा. पोलीस उपायुक्त, गुन्हेशाखा (डिटेक्शन) श्री गजानन राजमाने हे सुध्दा त्वरीत घटनास्थळावर हजर आले. मा. पोलीस उपायुक्त(डिटेक्शन), गुन्हेशाखा, नागपूर शहर यांनी घटनास्थळाचे अवलोकन केले तसेच पोलीस निरीक्षक श्री भोसले, पोस्टे हुडकेश्वर, सपोनि स्वप्नील भुजबळ, यांचेकडून घरामध्ये बंदी असलेले ईसम तसेच आरोपी ईसम व त्याचेकडे असलेले हत्यारा संबंधाने व त्याचे मागणी संबंधाने माहीती घेतली. मा. डॉ. अक्षय शिंदे, पोलीस उपायुक्त, परीमंडळ क्रमांक ०४, नागपूर शहर तसेच डॉ. निलेश पालवे, सहायक पोलीस आयुक्त, सक्करदरा विभाग, नागपूर शहर हे सुध्दा घटनास्थळी हजर होते व घटनेची माहीती घेवून मार्गदर्शन करीत होते.

पोलीस निरीक्षक श्री भोसले यांनी वेठीस धरलेले आरोपी ५०,००,०००/— रू ची खंडणी मागत असून आरोपी बददल माहती मिळविणेकरीता व आतील परीस्थीती जाणून घेणेकरीता रू. २ लाख २ वेळा या प्रमाणे रू. ४ लाख दिल्याचे सांगीतले. तसेच तळ माळयावर दोन महीला व एक मुलगी बेठीस धरली असून पहीले माळयावर एक महीला व दोन मुले वेठीस धरण्यात आली आहे असे हजर असलेले वरीष्ठ अधिकारी यांना सांगीतले. तीन महीला व मुलीस दक्षीणमुखी मुख्य दरवाजा असलेल्या हॉलमध्ये वेठीस धरून मुख्य दरवाजाचे बाजूस असलेले पुर्वकडील खिडकीतून पैसे घेत असून तेथे असलेले मुलीचे गळयावर चाकू लावत असल्याचे सांगीतले. परीसरात लागलेले कॅमेऱ्यातून बाहेरील परीस्थीतीवर लक्ष ठेवून आहे असे सांगीतले. त्यानूसार मा. डॉ. अक्षय शिंदे, पोलीस उपायुक्त, परीमंडळ क्रमांक ०४, नागपूर शहर तसेच डॉ. निलेश पालवे, सहायक पोलीस आयुक्त, सक्करदरा विभाग, नागपूर शहर यांचेसोबत श्री गजानन राजमाने, गुन्हेशाखा, नागपूर यांनी चर्चा करून पोनि श्री भोसले याना मार्गदर्शन करून पोस्टे हुडकेश्वर येथील कर्मचारी तसेच साध्या कपड्यातील कर्मचारी व गुन्हेशाखा येथील पथकांनी घटनास्थळाला घेराव टाकला

तसेच योजना करून राजु वैद्य याचे घराचे आत असलेल्या आरोपीस परत २ लाख रूपये देवून आतील आरोपीस गाफील करून ताब्यात घेण्याचे ठरविले. परंतू आरोपी गाफील न होता त्याने २ लाख रू स्वीकारले .

त्यानंतर अंगणातील पश्चीमेकडील मुख्य गेट समोरील कॅमेरा निकामी केला व पोउपआयुक्त श्री गजानन राजमाने यांचे नेतृत्व व मार्गदर्शनात सपोनि ओमप्रकाश सोनटक्के, गुन्हेशाखा नागपूर सपोनि स्वप्नील भुजबळ, पोस्टे हुडकेश्वर, सपोनि सत्यवान कदम पोस्टे हुडकेश्वर, पोहवा बबन राउत, गुन्हेशाखा, नापोशी प्रशांत कोडापे गुन्हेशाखा पोस्टे हुडकेश्वर येथील पोहवा शैलेष ठवरे, नापोशी अश्वीन बडगे, नापोशी आशिष तितरमारे, पोशी प्रदिप बदाडे, पोहवा मनोज नेवारे, नापोशी ललीत तितरमारे, नापोशी चंद्रशेखर भारती असे अंगणात शिरून घराचे पश्चीमेस असलेले मागील भागात प्रवेश केला. घराचे पश्चीमेकडील मागील बाजूस असलेला संडासाजवळील कॅमेरा निकामी केला. तसेच वरील माळयावर असलेले महीला नामे हर्षल राजू वैदय वय ३७ वर्षे या मागील गॅलरीत आल्या असता संडासावर चढून त्यांचेकडून आतील परीस्थीतीची माहीती घेण्यात आली.

आतील आरोपीस कोणत्याही प्रकारचा सुगावा लागू न देता व योजना आखून पहील्या माळयावर असलेल्या १) सौ. हर्षल राजू वैद्य वय ३७ वर्षे २) चिउ बंडुजी वैद्य वय २० वर्षे, विहान राजू वैद्य वय ६ वर्षे रा. सर्व प्लॉट क्रमांक ०१, पिपळा फाटा हुडकेश्वर रोड, नागपूर यांची सुटका करून सुखरूप बाहेर काढण्यात आले.

त्यानंतर मा. पोलीस उपायुक्त श्री गजानन राजमाने यांनी आखलेल्या योजनेनुसार संडासावरून मागील गॅलरीतील उघडया असलेले दरवाज्यातून पोउपआयुक्त श्री गजानन राजमाने यांचेसह सपोनि ओमप्रकाश सोनटक्के, गुन्हेशाखा नागपूर सपोनि स्वप्नील भुजबळ, पोस्टे हुडकेश्वर, सपोनि सत्यवान कदम पोस्टे हुडकेश्वर, पोहवा बबन राउत, नापोशी प्रशांत कोडापे, गुन्हेशाखा नागपूर यांनी घराचे आत प्रवेश केला. घराचे आत प्रवेश करून पहील्या माळयावर बारईकाईने पाहणी केली. त्यानंतर तळमजल्यावर खाली उतरणाऱ्या पायऱ्याकडील दरवाजा हळूच उघडून खाली उतरून खालील परीस्थीतीचा अंदाजा घेतला असता आरोपी याने समोरील हॉलमध्ये महीलांना वेठीस धरून तेथे सतर्क असल्याचे त्याचे बोलने व हालचालीवरून तसेच बाजुच्या इमारतीवर असलेल्या साध्या पोषाखातील

कर्मचारी यांनी इशारा करून कळविल्याने समजले. त्यामुळे वर पहीले माळयावर जावून आरोपीस गाफील करण्याची योजना आखण्यात आली.

आतमध्ये हॉल लहान असल्याने व पिस्टलने आरोपीवर फायर केल्यास बुलेट भिंतीवर आदळून परावर्तीत होवून वेठीस धरलेले महीलांना किंवा पोलीस पथकास लगण्याची शक्यता असल्याने शक्यतोवर पिस्टलचा वापर न करता आरोपी गाफील असतांना त्याला जेरबंद करण्याची योजना आखली. त्यानुसार मागील पश्चीमेकडील भागातून आरोपीचा आवाज ऐकू आल्याने व सदर घटनास्थळाला घेरून असलेल्या बाजूचे इमारतीवरील साध्या पोशाखातील पोलीसांनी इशारा करून कळविल्याने आरोपी गाफील असल्याचे खात्री झाल्याने याच संधीचा फायदा घेवून पोलीस उपायुक्त श्री गजानन राजमाने, सपोनि ओमप्रकाश सोनटक्के, सपोनि स्वप्नील भुजबळ, नापोशी प्रशांत कोडापे असे पायऱ्यातून खाली उतरून वेठीस धरलेले महीला हॉलमध्ये असल्याचे कानोसा घेवून बाहेरून बंद असलेले दक्षीण मुखी द्वार हळूच उघडले व लपून पाहणी केली असता वेठीस धरलेल्या तीन महिला हॉलमध्ये बसले असल्याची खात्री करून लपूनच आत प्रवेश करत असतांना आरोपी हा हॉलमध्ये आला असता योजनाबध्द रित्या मोठया शिताफीने त्याचेवर झडप घालून आरोपी नामे जितेंद्र तुळशीराम बिसेन वय १९ वर्षे रा. हुडकेश्वर खुर्द गाव, मानोरकर याचे घराजवळ, पोस्टे हुडकेश्वर नागपूर शहर त्यास १६/१० वा चे सुमारास जेरबंद केले. त्यास निशस्त्र करून त्याचे हातातील शस्त्र एक लोखंडी चाकू व माउजर पोस्टे हुडकेश्वर येथील अधिकारी यांनी रितसर जप्ती पंचनाम्याप्रमाणे जप्त केले तसेच आरोपीने खंडणी म्हणून घेतलेली रक्कम ५ लाख रूपये देखील पंचनाम्याप्रमाणे जप्त केले तसेच तळमजल्यावर वेठीस धरलेल्या १) सौ वैशाली बंडूजी वैद्य २) श्वेता बंडूजी वैद्य ३) वच्छलाबाई रघूनाथजी वैद्य यांना मुक्त करून बाहेर सुरक्षीतपणे काढण्यात आले.

आरोपीस सविस्तर विचारणा केली असता त्याने राजू वैद्य याचे हुडकेश्वर रोडवरील मोठे घर तसेच त्याचेकडे असलेले महागडया ४ चाकी गाडया पाहून व राजू वैद्य हा लॅड डेव्हलपर्स व बिल्डर असल्याचे माहीती असल्याने त्याचेकडून त्वरीत मोठी रक्कम प्राप्त करता येईल म्हणून आरोपीने योजनाबध्द पध्दतीने राजू वैद्य याचे घरी १२/०० वा चे सुमारास प्रवेश करून त्याचे घरात हजर असलेले महीला व मुलींना अग्नीशस्त्र व प्राणघातक चाकूने धाक दाखवून ५० लाख रू उकळणार होता असे सांगीतले.

सदरची कामगिरी नागपूर शहराचे मा. अपर पोलीस आयुक्त(गुन्हे) श्री सुनिल फुलारी यांचे निर्देशान्वये मा. पोलीस उपायुक्त, परीमंडळ क्रमांक ०४, नागपूर शहर डॉ. अक्षय शिंदे यांचे मार्गदर्शनात तसेच मा. पोलीस उपायुक्त (डिटेक्शन) श्री गजानन शिवलींग राजमाने यांचे उपस्थीतीत व नेतृत्वात मा. सहायक पोलीस आयुक्त(सक्करदरा विभाग) डॉ. निलेश पालवे, मा. सहायक पोलीस आयुक्त(गुन्हे) श्री बी. एन. नलावडे यांचे उपस्थीतीत वरीष्ठ पोलीस निरीक्षक, पोस्टे हुडकेश्वर श्री प्रतापराव भोसले, सपोनि ओमप्रकाश सोनटक्के, गुन्हेशाखा नागपूर, सपोनि स्वप्नील भुजबळ, पोस्टे हुडकेश्वर, सपोनि सत्यवान कदम पोस्टे हुडकेश्वर, पोहवा बबन राउत, गुन्हेशाखा, नापोशी प्रशांत कोडापे गुन्हेशाखा पोस्टे हुडकेश्वर येथील पोहवा शैलेष ठवरे, नापोशी अश्वीन बडगे, नापोशी आशिष तितरमारे, पोशी प्रदिप बदाडे, पोहवा मनोज नेवारे, नापोशी ललीत तितरमारे, नापोशी चंद्रशेखर भारती यांनी केली.

**<u>२) पो.स्टे. पाचपावली पोलीसांची कारवाई :</u>**

मा. पोलीस आयुक्त नागपूर शहर यांनी पोलीस स्टेशन पाचपावली चे हद्दीत शरीराविरूध्द गुन्हे करणारा कुख्यात गुंड सैय्यद आरीफ ऊर्फ सोनू सरप्या वल्द सैय्यद शराफत वय २३ वर्ष रा. बंगाली पंजा लाल दरवाज्या जवळ पो.स्टे. पाचपावली नागपूर याचे विरूध्द महाराष्ट्र झोपडपट्टीदादा, हातभट्टीवाले, औषध विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, व्हीडीओ पायरेट्स, वाळु तस्कर आणी अत्यावश्यक वस्तुंचा काळा बाजार करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यानां आळा घालणे संबधी अधिनियम सन १९८१ (सुधारणा २०१५ चे) (महा.एल.व्ही.१९८१) अंतर्गत स्थानबध्द आदेश क्र. स्थान/एमपीडीए/परि.क्र.३/गुप्रशा/१७/२०२१ दि. ३१/०३/२०२१ रोजी स्थानबध्द आदेश पारीत केला होता.

कुख्यात गुंड सैय्यद आरीफ ऊर्फ सोनू सरप्या वल्द सैय्यद शराफत पो.स्टे.रेकार्ड वरील शरीराविरूध्द गुन्हेगार असुन त्याचे विरूध्द खूनाचा प्रयत्न करने, दरोडा टाकणे, मारपीट करून जबरी चोरी करने, गंभीर दुखापत करने, दुखापत करने, गैरकायद्याची मंडळी जमवुन अशिलील शिवीगाळ करून दुखापत करने या सारखे गंभीर गुन्हे दाखल असुन तो गंभीर स्वरूपाचे गुन्हे करतो.

कुख्यात गुंड सैय्यद आरीफ ऊर्फ सोनू सरप्या वल्द सैय्यद शराफत हा वर नमूद स्थानबध्द् आदेश पारीत झाल्यापासुन तो स्वत:स लपवुन स्थानबध्द् आदेशापासुन पळत होता. नमूद आरोपी चे ठाव—ठिकाण्या बाबत माहीती काढुन त्याचा वारंवार शोध घेण्यात आला. परंतु तो मिळुन येत नव्हता. दिनांक ०४/०६/२०२१ रोजी नमूद आरोपीबाबत गुप्त बातमीदाराकडुन मिळालेल्या खात्रीशीर बातमीवरून योजनाबध्द् पध्दतीने सापळा रचून त्यास ताब्यात घेवुन गुन्हे शाखा कार्यालयात हजर करून त्यास स्थानबध्द्तेचा आदेशाची बजावनी करण्यात आली असुन मध्यवर्ती कारागृह नागपूर शहर येथे दाखल करण्यात आले आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त श्री. लोहीत मतानी, परिमंडळ क्र.३ नागपूर शहर, मा. सहा. पोलीस आयुक्त, लकडगंज विभाग, श्री.सचीन थोरबोले यांचे मार्गदर्शनात, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.संजय मेंढें, पोउपनि.प्रमोद खंडार, पोहवा. संतोषसिंग ठाकूर, नंदकिशोर वालदे, सगीर शेख, छगण सिंगणे, नापोशि.सुनिल ठाकुर, अमित सातपूते, रोशन फुकट, संजय मिश्रा, संजय बरेले, विकास सिंग, पोशि.नितीन वर्मा, प्रकाश राजपल्लीवार, राकेश सिंग, अनिल धुले, कमलकिशोर चव्हान,संतोष शिवनकर यांनी केलेली आहे.

## दिनांक ०५.०६.२०२१ शनिवार

### १) पो.स्टे. अंबाझरी पोलीसांची कारवाई —

हद्दपार इसम नामे सूरज अजय हावरे वय २४ वर्ष रा जयनगर, पांढराबोडी, पो.स्टे. अंबाझरी, नागपूर याने सन २०१७ पासून त्याच्या कृती व हालचालीमूळे पो.स्टे. अंबाझरी अंतर्गत वस्त्या मध्ये व त्यालगतच्या परिसरातील रहिवासी लोकांचे मालमत्तेस, जिवितास धोका व भय निर्माण होवून त्याच्या मनात असुरक्षितेची भावना निर्माण केली होती. भविष्यात सुद्धा परिसरातील रहिवासी लोकांचे मालमत्तेस, जिवितास धोका, भय, इजा अशी असुरक्षिततेची भावना निर्माण होण्याची दाट शक्यता होती.

त्यामूळे उपरोक्त इसम हा वर निर्दिष्ट केलेल्या परिसरातील लोकांना गुंडप्रवृत्तीचे साथीदारासोबत राहून जसे विनयभंग करणे, दूखापत करणे, गैरकायद्याची मंडळी जमवून अश्लील शिवीगाळ करून दुखापत करणे, गैरकायदेशिररित्या शस्त्र बाळगणे, जिवे मारण्याची धमकी देणे, संगणमत करून साथीदारासह प्राणघातक शस्त्रासह दरोडा घालण्याचा प्रयत्न करणे अशाप्रकारे पो.स्टे.अंबाझरी नागपूर शहर येथे सन २०१७ पासून सन २०२१ पर्यंत एकूण ०८ दखलपात्र गुन्हे, ०५ अदखलपात्र गुन्हे व ०२ सि.आर.पि.सि. ११० (ई)(ग) प्रमाणे प्रतिबंधक कारवाई करण्यात आलेली आहे.

सदर इसमाच्या गुन्हेगारी प्रवृत्तीवर आळा बसावा म्हणून त्यांचेवर अंबाझरी पोलीसांकडुन हद्दपार प्रस्ताव तयार करून मा. पोलीस उपायुक्त कार्यालय, परि. क्र. २, नागपुर यांना पाठविण्यात आला होता. त्याप्रमाणे सदर कार्यालयातुन दिनांक २५/०५/२०२१ रोजी नमुद प्रस्तावित इसमाचा एक (१) वर्ष कालावधीकरीताचा हद्दपारी आदेश निर्गमित करण्यात आला. त्याप्रमाणे कार्यवाही करून अंबाझरी पोलीसांनी प्रस्तावित हद्दपार इसमास नागपुर शहर हद्दीतुन रितसर हद्दपार केल्याने प्रस्तावित इसमाच्या त्रासाने कंटाळलेल्या लोकांनी सुटकेचा नि:श्वास सोडला.

सदरची कारवाई मा. पोलीस उपायुक्त (परि. क्र. २) श्रीमती विनिता साहु, मा. सहायक पोलीस आयुक्त (सिताबर्डी विभाग) श्रीमती तृप्ती जाधव, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री नरेंन्द्र हिवरे, यांचे मार्गदर्शनात सपोनि श्री अचल कपुर, सपोउपनि श्री आशिष कोहळे, पोशि दिनेश जुमनाके, अंकुश, अमित, रोमित यांनी केली आहे.

### २) पो.स्टे. गिट्टीखदान पोलीसांची कामगीरी — वाहन चोरीचे दोन गुन्हे उघडकीस आणून आरोपीस अटक केल्याबाबत :

मिळालेल्या माहीतीवरून नमुद आरोपी अमर अरूण शेडामे २७ वर्ष रा. दाभा वस्ती, हनुमान मंदीर जवळ, पो.स्टे. गिटटीखदान, नागपूर यास पो.स्टे. हद्दीतील हजारी पहाड नाल्याजवळुन ताब्यात घेवुन त्यांचे ताब्यात मिळालेली दुचाकी अॅक्टीवा ४ जी. मोपेड पांढऱ्या रंगाची क्रंमाक एम. एच/३१/एफ.एच/४६९२ किं. रू ३५,०००/— बाबत विचारपुस करून पडताळणी केली असता आरोपीने दिनांक २८.०५.२०२१ रोजी निर्मल गंगा अपार्टमेंन्ट जवळुन अॅक्टीवा मोपेड चोरी केल्याचे सांगीतले. वरून सदर मोपेड बाबत पोस्टे. गिट्टीखदान येथे अप.क्रं. ३५९/२०२१ कलम ३७९ भादवी

अन्वये गुन्हा नोद असुन त्यास गुन्हयात रितसर अटक करण्यात आले. तसेच नमुद आरोपी गुन्हयाचे तपासादरम्यान आसुली सावंगी बुटटीबोरी येथील शेतासमोर उभी असलेली हिरो होन्डा मोटर सायकल सिडी मोटर सायकल एम.एच/३१/बि.टि/९०१६ किं. रू २००००/— चोरी केल्याची माहीती देवुन काढुण दिल्याने ती सुध्दा तपासकामी जप्त करण्यात आली. नमुद आरोपीकडुन एकुण दोन मोटर सायकल एकुण किं. रू ५५,०००/— चा मुददेमाल जप्त करण्यात आला असुन गुन्हयाचा तपास सुरू आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस उपायुक्त (परि.क्रं. ०२) श्रीमती विनिता साहु, नागपूर शहर, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त (सदर विभाग) सुधिर नंदनवार, प्रभारी पोलीस निरिक्षक श्री. सुहास चौधरी पो.स्टे. गिटटीखदान, नागपूर याचे मार्गदर्शनाखाली पोउपनि दत्ता पेंडकर, पोहवा दिपक रिठे, नापोशि बलजित ठाकुर, निलेश इंगोले, इंशाक आटे, पोशि कुणाल कोरचे, वैभव कुलसंगे यांनी केलेली आहे.

## दिनांक ०६.०६.२०२१ रविवार

### १) पो.स्टे. एमआयडीसी पोलीसांची कामगिरी :

दिनांक २१.१२.२०१९ रोजी १७ वर्षीय अल्पवयीन मुलगा दिनेश उर्फ मलिंगा शंकर पासवान रा. आय.सी. चौक, तकीयावाले बाबा दर्गा जवळ, हिंगणा रोड, नागपूर हा बाजारात जातो असे सागुन घरून निघुन गेला होता. परत आला नाही. शोध घेतला असता मिळून आला नाही. फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून दिनांक ०९.०१.२०२० रोजी कलम ३६३ भादवि अन्वये गुन्हा नोदविला होता.

दिनांक ११.११.२०२० रोजी वरिष्ठ पोलीस निरिक्षक, पो.स्टे. एमआयडीसी श्री युवराज हांडे यांनी पो. स्टे. एमआयडीसी नागपुर शहर चा कार्यभार पोनि. श्री राजेश पुकळे यांचे कडुन घेतल्या वर सदर गुन्हयाची डायरी पोनि. पुकळे यांनी तपासावर दिली. त्यानंतर सदर गुन्हयात झालेले तपासाचे कागदपत्रांचे अवलोकन केले असता सदर गुन्हयात अपहृत मुलगा हा दिनांक २१.१२.२०१९ रोजी रात्री २०.०० पासुन मिसींग आहे. आणि गुन्हा दिनांक ०९.०१.२०२० रोजी दाखल आहे. अपहृत बालक हा गुन्हेगार प्रवृत्तीचा असून त्याचे विरूध्द एकुण ११ गुन्हे दाखल होते. तसेच सदर गुन्हयात दिनांक १६.०१.२०२० व दि. १७.०१.२०२० रोजी मेट्रो स्टेशनचे मागील पहाडी वर कवटीचे तुकडे, हाडाचे तुकडे, चार दात, काही कापडाचे तुकडे मिळालेले होते. दोन्ही दिवशी मिळालेला मुददेमाल वेगवेगळया पत्रानुसार ॲनाटॉमी विभागाला पाठविण्यात आला. सदर प्रकरणात ॲनॉटॉमी विभागाकडुन अहवाल प्राप्त करून सदर हाडाचे तुकडे, कवटीचे तुकडे, चार दात हे सदर गुन्हयात अपहृत मुलगा याचे असावेत अशी शंका वाटु लागल्याने सदर प्रकरणात अपहृत मुलगा यांचे आई व वडील यांचे डी.एन.ए. करीता रित सर सॅम्पल घेवुन सदरचा मुददेमाल हाडाचे तुकडे, कवटीचे तुकडे, चार दात दिनांक ११.०१.२०२१ रोजी सि.ए. कार्यालय येथे डी.एन.ए. तपासणी करीता दाखल करण्यात आले होते. सि.ए. कार्यालयाकडुन दिनांक ०५.०५.२०२१ रोजी डी.एन.ए. अहवाल प्राप्त झाला. यावरून सदर गुन्हयातील अपहृत मुलगा हा मयत झाला आहे. त्याचा कोणीतरी अज्ञात ईसमाने अज्ञात कारणावरून दिनांक २१.१२.२०२० रोजी रात्री २०.०० वा. नंतर खुन करून पुरावा नष्ट करण्याचे हेतुने मेट्रो स्टेशनचे मागील पहाडी वर त्याचे शरीराचे तुकडे करून विल्हेवाट लावली. असे प्रथम दर्शनी दिसुन येत असल्याने सदर गुन्हयात कलम ३०२, २०१ भादवि वाढ करण्यात आले.

सदर गुन्हयाचा तपास मा. पोलीस उपायुक्त(परि.क्र. १) श्री नूरूल हसन यांचे मार्गदर्शनाखाली करण्यात आला. मार्गदर्शनाप्रमाणे दोन तपास पथक तयार करून मृतकाचा वावर असलेल्या भागात गुप्त बातमीदार लावण्यात आले. अथक परिश्रम घेतल्यानंतर गुप्त बातमीदारकडुन माहीती मिळाली की, सदरचा गुन्हा मोठा घी, छोटा घी आणि कॉकरोज यांनी केला आहे. मृतकाचे कुठुन अपहरण केले. कोणत्या मार्गाने पहाडीवर गेले. याबाबत साक्षीदारांचा शोध घेण्यात आला. योग्य ती खात्री पटल्यावर आरोपीचे बाबत माहीती घेतली असता आरोपी नामे १) चंदन उर्फ छोटा घी शिवपुजन शाह वय १९ वर्ष रा. कार्तीक नगर झोपडपटटी झोन चौक नागपुर २) कुणाल उर्फ कॉकरोच राजगिरी प्रसाद वय १९ वर्ष रा. भिमनगर हेमा किराणा जवळ नागपुर हे बिहार राज्य येथे गेले असल्याचे समजले. लागलीच सपोनि हत्तीगोटे यांचे पथक योग्य ती माहीती काढुन बिहार येथे रवाना केले. आरोपी कुणाल उर्फ कॉकरोच राजगिरी प्रसाद यास त्याचे मुळ गाव आरा पोस्टे. आरानगर जिल्हा भोजपुर, राज्य बिहार येथुन ताब्यात घेतले. व आरोपी चंदन उर्फ छोटा घी शिवपुजन शहा वय १९ वर्षे याला गांव सातपुर, जि. सारन, राज्य बिहार येथुन ताब्यात घेवुन ट्रांझीस्ट वॉरंटवर पो.स्टे. एम.आय.डी.सी. नागपूर येथे

आणले दोन्ही आरोपीतांकडे सखोल विचारपुस करण्यात आली. त्यांनी गुन्हा केले बाबत कबुल केल्याने त्यांना सदर गुन्हयात अटक करुन मा. न्यायालयातुन दिनांक ११.०६.२०२१ पावेतो पोलीस कस्टडी रिमांड प्राप्त केला आहे. पुढील तपास सुरु आहे.

सदर गुन्हयाचा तपास मा. अपर पोलीस आयुक्त(दक्षिण प्रभाग) डॉ दिलीप झलके, मा. पोलीस उपायुक्त(परि.क्र. १), श्री नूरुल हसन, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त(एम.आय.डी.सी. विभाग) श्री पी.एम.कार्यकर्ते यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि युवराज हांडे, स.पो.नि. रमेश हत्तीगोटे, पोउपनि विजय नेमाडे, सपोउपनि सुरेंद्र तिवारी, पो.ना. विजय काढे, पो.शि. देवेंद्र सुर्यवंशी यांनी केला आहे.

## दिनांक ०७.०६.२०२१ सोमवार

**१) पो.स्टे. कपीलनगर पोलीसांची कामगीरी — ४ घरफोडी व १ चोरीचा गुन्हा उघडकीस आणल्याबाबत :**

फिर्यादी अनिल केशवराव सोमकुवर रा. कपीलनगर वस्ती, नागपूर हे आपले पत्नी व मुलांसह आईला भेटण्याकरीता घराला लॉक लावून दिनांक २६/०९/२०२० रोजीचे ०३:०० वा. चे दरम्यान खापा जोगनी गाव ता. सौंसर, जि—छिंदवाडा (मध्यप्रदेश) येथे गेले व दिनांक ३०/०९/२०२० चे ०८:३० वा. चे दरम्यान घरी परत आले असता त्याचे घराचे लॉक तुटलेले दिसले. घराचे आत जावून पाहिले असता किचन मध्ये ठेवलेली लाकडी आलमारी ची पाहणी केली असता त्यामध्ये ठेवलेले कपडे अस्थव्यस्त पडून दिसले व त्यामध्ये ठेवलेले १) एक सोन्याची अंगठी वजनी अं. ५ ग्रम कि.अं. रू १५,०००/— २) दोन नग चांदीचे पायल वजनी अं. ४० ग्रम कि.अं. रू ४,०००/— ३) दोन नग चांदीचे जोडवे वजनी अं. २० ग्रम कि.अं. रू २,०००/— ४) नगदी रू ५०००/— असा एकुण कि. अं. रू २६,०००/— चा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेला अशा फिर्यादीच्या रिपोर्ट वरून पो.स्टे. कपीलनगर येथे कलम ४५४,४५७,३८० भादंवि चा गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर गुन्हयाचे तपासादरम्यान मिळालेल्या माहिती वरून आरोपी बबलु उर्फ डागा राजाराम मोहनीया वय ३२ वर्ष रा. इटाभट्टी चौक, पो.स्टे. यशोधरानगर, नागपूर यास ताब्यात घेवून त्याचे कडून सखोल विचारपूस करून त्याचे कडून अप. क्र. ४१७/२० कलम ३८०,४५४,४५७ भादवी मधील एक पिवळया धातुची सोन्यासारखी दिसनारी अंगठी वजनी अं. ५ ग्रॅम. किं. अं. १५,०००/— रूपये, दोन पाढ—या धातुचे चांदीसारखे दिसणारे जोडवे कि.अं. २०००/—रू, दोन पाढ—या धातुचे चांदीसारखे दिसणारे पायपट्या कि.अं. ४०००/—रू. असा एकुण २१,०००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला त्यास सदर गुन्हयात अटक करून पि.सी.आर वर असताना त्यास विश्वासात घेवून अधिक विचारपूस केली असता त्याने आणखी तिन घरफोडी केल्याची कबुली दिली व त्याचे कडून पुढील प्रमाणे गुन्हयातील मुद्देमाल जप्त करण्यात आला.

२) अप. क्र. ०६/२० कलम ३८०,४५७ भादवी मधील १) पिवळया धातुचे सोन्या सारखे मंगळसुत्र कि. अ. रू ९,०००/—, २) एक पाढ—या धातुचे चांदीसारखे दिसणारे आकडा कि.अं. रू १५००/— असा एकुण रू १०,५००/— रूपयाचा मुद्देमाल जप्त केला.

३) अप. क्र. १४१/२१ कलम ३८०,४५४, भादवी मधील १) नगदी रू ७०००/— जप्त केले.

४) अप. क्र. ७६/२१ कलम ३८०,४५७, भादवी मधील १) नगदी रू २,५००/— . जप्त केले.

५) अप क्रं. २१८/२०२१ कलम ३७९ भादवी मधील ४ नग ई— रिक्षा च्या बॅटऱ्या एकुण किं. अं रू २०,०००/— चे जप्त करण्यात आल्या.

असा एकुण रू ६१,०००/— मुद्देमाल वर नमुद आरोपी व दोन विधीसंघर्ष बालकांकडून जप्त करण्यात आला. व पो.स्टे. कपिलनगर येथील एकुण ४ घरफोडीचे व १ चोरीचा गुन्हा असे एकुण ५ गुन्हे उघडकीस आणले.

पोस्टे.कपिलनगर नागपूर येथे दाखल वर नमुद गुन्हयांन बाबत कपिलनगर पोलीसांनी अतिशय अचुक माहीती काढुन नमुद आरोपीस मोठया शिताफीने ताब्यात घेवुन त्यांचे कडून वर नमुद प्रमाणे एकुण रू ६१,०००/— चोरीस गेलेला मुद्देमाल हस्तगत केला.

सदरची कामगिरी ही मा. पोलीस उपायुक्त (परि क्रं. ५) श्री. निलोत्पल नागपूर शहर व मा. सहाय्यक पोलीस आयुक्त(जरीपटका विभाग) श्री. रोशन पंडीत यांचे निर्देशाप्रमाणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक वपोनि. श्री अमोल आ. देशमुख, पोउपनिरी. श्री भारत आर जाधव, पोहवा. गणेश बरडे, नापोशि आसीफ शेख, पोशि राहुल नागदेवे, विजय वायदुडे, अश्वीन जाधव, गजानन गेडाम यांनी केली आहे.

## दिनांक ०८.०६.२०२१ मंगळवार

**१) मा. पोलीस उपायुक्त डिटेक्शन श्री गजानन शिवलींग राजमाने यांनी सपोउपनि श्री संदीप शर्मा यांचे वाढदिवसानिमीत्त शुभेच्छा पत्र व पुष्पगुच्छ देवून सन्मानीत केल्याबाबत :**

गुन्हे डिटेक्शन शाखा नागपूर शहर येथे नेमणूकीस असलेले सहायक पोलीस उपनिरीक्षक श्री संदीप मनोहरलाल शर्मा हे एक अत्यंत शांत, संयमी, मृदुभाषी, दिलखुलास व अष्टपैलु व्यक्तीमत्व. पोलीस सेवेतील ४० वर्षाची प्रदीर्घ यशस्वी कारकिर्द पूर्ण करुन ते या महिण्याचे अखेरीस म्हणजेच दिनांक ३० जुलै २०२१ रोजी नियत वयोमानाने सेवानिवृत्त होत आहेत.

आज दिनांक ०७/०६/२०२१ रोजी त्यांच्या अठ्ठावन व्या वाढदिवसाचे निमित्याने गुन्हे शाखा कार्यालयामध्ये कोव्हीड–१९ चे संतोतंत पालन करुन त्यांचा वाढदिवस हर्षोउल्हासात साजरा करण्यात आला. श्री संदीप शर्मा यांना वाढदिवसाचे शुभेच्छा पत्र व पुष्पगुच्छ देवून सन्मानीत करण्यात आले.

संदीप शर्मा यांचे वाढदिवसाचे औचित्य साधुन श्री गजानन शिवलींग राजमाने पोलीस उपायुक्त (डिटेक्शन) गुन्हे शाखा यांचे उपस्थितीत पोलीस स्टेशन अजनी हद्दीतील रामटेके नगर येथील टोळी वस्तीतील गरीब व गरजु १२ मुलींना गुन्हे शाखा कार्यालयात आमंत्रीत करुन त्यांना श्री संदिप शर्मा यांचे हस्ते जिवनोपयागी भेट वस्तु किटचे वाटप करण्यात आले. तसेच त्यांना सकारात्मक राहून भविष्यात जिवनामध्ये यशस्वी होण्याकरीता योग्य मार्गदर्शन करुन व प्रेरीत करुन त्यांचे मनोबल वाढविण्यात आले.

श्री संदीप मनोहरलाल शर्मा हे पोलीस सेवेमध्ये सन १९८२ मध्ये रुजू झाले. त्यांनी सुरुवातीला नागपूर जिल्हा ग्रामिण येथील पोलीस स्टेशन पारशिवनी येथे ५ वर्ष कर्तव्य बजावून नंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभाग येथे देखील कर्तव्य पार पाडून नागपूर शहर पोलीस आयुक्तालय येथे बदलीवर हजर झाले. त्यांनी पोलीस स्टेशन धंतोली, जरीपटका, परिमंडळ कार्यालय इत्यादी ठिकाणी कर्तव्य चोखपणे बजावले असून सद्या गुन्हे वाचक शाखा येथे नेमणुकीस आहे. त्यांचेकडे संपूर्ण नागपूर शहरातील गुन्हे सांख्यिकी चे महत्वाचे काम असून त्या व्यतिरीक्त गुन्हे आढावा बैठक, विधीमंडळ अधिवेशन संदर्भातील कामकाज आणि वेळोवेळी त्यांना सोपविलेली सर्व कामे वरिष्ठ व सहकाऱ्यांशी योग्य तो समन्वय ठेवून अतिशय जबाबदारीने यशस्वीरीत्या पार पाडलेली आहे.

कोराना (कोव्हीड–१९) चे लॉकडाउनचे काळात गुन्हे शाखेचे वतीने बेघर व गरजू इसमांची भुक भागविण्यासाठी 'कम्युनिटी किचन' सुरु करण्यात आले असतांना दररोज ४५० ते ५०० फुड पॅकेटस् तयार करुन गरजूंना वाटप करण्यास त्यांनी फार परिश्रम करुन मोलाचे सहकार्य केले. नागपूर शहर पोलीस आयुक्तालयाचे वतीने दिनांक ३०/०८/२०२० रोजी पोलीस जिमखाना येथे आयोजित केलेल्या रक्तदान शिबीरात उत्स्फूर्तपणे सहभाग घेवून रक्तदान शिबीर यशस्वीरित्या पार पाडण्यास महत्वाची भुमीका बजाविली. तसेच ब्रह्माकुमारीज संस्थेच्या माध्यमातून पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे मनोबल वाढविणे करीता 'राजयोग सेशन' आठवडी सत्राचे आयोजन करण्यास स्वत: पुढाकार घेवून राजयोग सेशन यशस्विरीत्या पार पाडले.

श्री संदीप मनोहरलाल शर्मा यांचे सेवेतील अतिउत्कृष्ट वैशिष्टपूर्ण कामगिरीमुळे व गुणवत्तापूर्वक सेवेबद्यल त्यांना दिनाक ०१ मे २०१८ रोजी माननीय पोलीस महासंचालक म.रा. मुंबई यांचे सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देवून सन्मानित करण्यात आले. त्याचप्रमाणे १५ ऑगस्ट २०२० रोजी पोलीस पदकाने सन्मानीत करण्यात आले आहे. त्यांचे सेवाकाळात त्यांना वरिष्ठांकडून २६५ चे वर बक्षीसे व प्रशस्तीपत्रे प्राप्त झालेली आहे.

श्री संदीप मनोहरलाल शर्मा यांनी सर्व संबंधीत शासकीय यंत्रणातील वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी यांचेशी सौर्हादपूर्वक व सलोख्याचे संबंध जोपासले असून त्यांची सहकार्याची भावना, काम करण्याची जिद्द व चिकाटी वाखाणण्याजोगी आहे. त्यांनी नागपूर शहर पोलीस दलासाठी, सामाजिक सुरक्षिततेचे भान ठेवून अविरतपणे मेहनतीने आपले कर्तव्य निष्कलंक व चोखपणे बजाविलेले आहे. पोलीस विभागात काम करीत असतांना त्यांनी प्रत्येक क्षणी दाखविलेली कार्यतत्परता ही गौरवास्पद व अभिमान वाटावा अशीच आहे.



**२) पो.स्टे. पाचपावली पोलीसांची कामगीरी — दुखापत करून जबरी चोरीचा गुन्हा उघडकीस आणल्याबाबत :**

दिनांक ०५.०६.२०२१ चे २१.०० वा चे सुमारास फिर्यादी रोहीत विनोदप्रसाद मिश्रा वय २३ वर्ष रा. प्लॉट नं. ३, न्यु बिडीपेठ, आर्शिवाद नगर रोड, सक्करदरा, नागपूर हे घरी जात असतांना अंदाजे २० ते २५ वर्ष वयोगटातील दोन आरोपी इसमांनी पो.स्टे. पाचपावली हद्दीत शितला माता मंदीर जवळ, ठक्करग्राम, नागपूर येथे फिर्यादीस अडवून लाकडी दंडक्याने व फरशीने मारहाण करुन जबरदस्तीने फिर्यादीचे खिशातील मोबाईल व मोटारसायकल असा एकुण रू ६०,०००/— चा मुद्देमाल चोरी करुन घेवुन गेले. अशा फिर्यादीच्या रिपोर्टवरुन कलम ३९४, ३४ भादंवीचा गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर गुन्हयाचे तपास दरम्यान गुन्हयाचा आरोपीचा शोध व्हावा या करिता सदर भागात गुप्त बातमीदार नेमण्यात आले. आरोपीचा शोध व्हावा याकरिता तपास पथकांनी अथक परिश्रम घेतले. दिनांक ०६/०६/२१ रोजी मिळालेल्या गुप्त बातमीवरुन आरोपी हे स्वामीनगर, ठक्करग्राम, पोस्टे पाचपावली परिसरात बसेलेले आहे. अश्या माहितीवरुन सदर ठिकाणी जावुन पाहीले असता आरोपी पोलीसांना पाहुन ते पळु लागले त्यांना सापळा रचुन त्यांना मोठया शिताफीने ताब्यात घेतले. त्यांना त्यांचे नाव विचारले असता त्यांनी आपले नाव १) अंकीत तुळशीराम निमजे वय २५ वर्ष्ज्ञ रा. स्वामीनगर, ठक्करग्राम, नागपूर, २) प्रफुल उर्फ चिंटु चंदुजी वानखेडे वय २३ वर्ष रा. खाटीकपुरा, शितला माता मंदीर जवळ, पाचपावली, नागपूर असे सांगीतले. त्यांना गुन्हयासंबंधी बारकाईने विचारपुस केली असता त्यांनी सदरचा गुन्हा केल्याचे कबुल केले आणि आरोपीकडुन १) एक ॲक्टीव्हा गाडी क्र. एमएच/४९/बीएफ/१४३७ किं. रु ४०,०००/—, २) एक सॅमसंग कंपनीचा ए—७ मोबाईल किंमत अंदाजे रु २०,०००/— असा एकुण रू ६०,०००/— चा मुद्द्देमाल आरोपीकडुन जप्त करुन आरोपीस गुन्हयात अटक करुन गुन्हा उघडकीस आणला. गुन्हयाचा तपास पोउपनि.प्रमोद खंडार हे करीत आहे.

सदरची कामगीरी मा.पोलीस उपायुक्त (परिमंडळ क्र.३) श्री लोहीत मतानी नागपूर शहर, मा.सहायक पोलीस आयुक्त(लकडगंज विभाग) श्री सचिन थोरबोले नागपूर शहर यांचे मार्गदर्शनात वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री संजय मेंढे, पोउपनि श्री प्रमोद खंडार, पोहवा शत्रुघ्न यादव, छगन सिंगणे, नापोशि विनोद बरडे, बाळकृष्ण राठोड, पोशि नितीन धकाते, सचिन जयपुकर, आशिष लाडके यांनी केलेली आहे.

**३) पो.स्टे. पाचपावली पोलीसांची कामगीरी — चोरीचे गुन्हे उघडकीस आनल्याबाबत :**

मिळालेल्या गुप्त माहीतीवरून दिनांक ०६.०६.२०२१ चे २१.३० वा चे सुमारास आरोपी अंकीत उर्फ कालु सुरेश सुरपाम वय २३ वर्ष रा. पाचपावली, मोचीपुरा, महादेव मंदीरजवळ, नागपूर यास पाचपावली रेल्वेलाईन जवळील शास्त्री गार्डनचे बाजुला असलेले खंडहर मध्ये एक फायर हीट कंपनीची पांढऱ्या रंगाची मोठे टायर असलेली सायकल कि. रू १५,०००/— सह मिळून आल्याने त्यास विश्वासात घेवून सदर सायकल बाबत विचारपुस केली असता त्याने ती सायकल ही दिनांक ०६.०६.२०२१ रोजी बारसे नगर मधून चोरी केल्याचे सांगीतले. तसेच नमुद आरोपीने तपासादरम्यान पो.स्टे. पाचपावली येथे दाखल कलम ३७९ भादंवि मधील चोरी गेलेली स्प्लेंडर मोटारसायकल सुध्दा चोरी केल्याचे कबुल केल्याने त्याचे जवळून कबुली मेमोरंडम जप्ती पंचनाम्याप्रमाणे स्प्लेंडर गाडी क्र.

एमएच/४९/बी.सी/९८७२ कि. रू ७०,०००/— ची जप्त करण्यात आली. आरोपीकडून दोन्ही गुन्हयातील एकुण रू ८५,०००/— चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदरची कामगीरी मा.पोलीस उपायुक्त (परिमंडळ क्र.३) श्री लोहीत मतानी नागपूर शहर, मा.सहायक पोलीस आयुक्त(लकडगंज विभाग) श्री सचिन थोरबोले नागपूर शहर यांचे मार्गदर्शनात वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री संजय मेंढे, पोलीस निरीक्षक(गुन्हे) श्री मुकुंद ठाकरे, पोहवा रविशंकर मिश्रा, संतोषसिंग ठाकुर, नापोशि सुनिल वानखेडे, अमित सातपुते, विनोद बरडे, पोशि शेषराव रेवतकर, प्रकाश राजपल्लीवार, नितीन वर्मा, राकेश सिंग यांनी केलेली आहे.

**<u>४) कुख्यात गुंड व धोकादायक व्यक्ती कुणाल वल्द भिमराव वाघमारे, महाराष्ट्र झोपडपट्टीदादा, हातभट्टीवाले, औषधी द्रव्य विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, व्हीडीयो पायरेटस्, वाळु तस्कर आणि अत्यावश्यक वस्तुंचा काळा बाजार करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालणे संबंधी अधिनियम सन् १९८१ (सुधारणा २०१५ चे) (महा. एल.व्ही. १९८१) अंतर्गत स्थानबध्द :</u>**

नागपुर शहराचे पोलीस आयुक्त यांनी दिनांक ०८/०६/२०२१ रोजी जारी केलेल्या आदेशान्वये पोलीस ठाणे बेलतरोडी, नागपूर चे हद्दीत शरीराविरूध्द व मालमत्तेविरूध्द गुन्हे करणारा कुख्यात गुंड नामे कुणाल वल्द भिमराव वाघमारे वय २६ वर्षे रा. सेक्टर नं. २८, खापरी पुनर्वसन, हनुमान मंदीरजवळ, वर्धा रोड, पो.स्टे. बेलतरोडी, नागपूर शहर यास महाराष्ट्र झोपडपट्टीदादा, हातभट्टीवाले, औषधी द्रव्य विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, व्हीडीयो पायरेटस्, वाळु तस्कर आणि अत्यावश्यक वस्तुंचा काळा बाजार करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालणे संबंधी अधिनियम सन् १९८१ (सुधारणा २०१५ चे) महा. एल.व्ही. १९८१) अंतर्गत दिनांक ०८/०६/२०२१ रोजी स्थानबध्द आदेश पारीत केला. त्यास दिनांक ०८/०६/२०२१ रोजी आदेशाची बजावणी करून नागपूर मध्यवर्ती कारागृहात ठेवण्यात आले आहे.

कुणाल वल्द भिमराव वाघमारे, याचेविरूध्द पोलीस स्टेशन बेलतरोडी येथे खुनाचा प्रयत्न करणे, दरोडयाची पुर्व तयारी करणे, दरोडा टाकणे करीता एकत्र जमणे, घातक हत्यारांनी व साधनांनी इच्छापूर्वक जबर दुखापत पोहचविणे, आपखुशीने घातक शस्त्राने किंवा साहित्याने दुखापत करणे, सरकारी नोकराने जारी केलेल्या आदेशाची अवहेलना करणे, निष्काळजीपणाने केलेल्या कृतीमुळे जिवनासाठी धोकादायक रोगाचा संसर्ग पसरविणे, नुकसान करणे, शांतता भंग घडवून आणण्याच्या उद्देशाने अपमान करणे, अपराधीक जिवे मारण्याची धमकी देणे, अश्लील भाषेत शिवीगाळ करणे, बेकायदेशीर जमावाचा सदस्य असणे, दंगा करण्याबद्दल शिक्षेची तरतुद, समान उद्दीष्ठ साधण्यासाठी केलेल्या अपराधाबद्दल बेकायदेशीर जमावाचा प्रत्येक सभासद दोषी असतो, घातक हत्यार जवळ बाळगणे, मनाई आदेशाचे उल्लंघन करणे, इत्यादी मालमत्तेविरूध्दचे तसेच शरीराविरूध्दचे गंभीर स्वरूपाचे अनेक गुन्हे दाखल आहेत.

सदर स्थानबध्द इसमाविरूध्द सन २०१९ व २०२० मध्ये बेलतरोडी पोलीसांकडून त्याच्याविरूध्द ११० (ई),(ग) फौ.द.प्र.सं अन्वये प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती. तरीही त्याने प्रतिबंधक कारवाई उल्लंघन करून गैरकायदेशीर व धोकादायक गुन्हे करण्याची प्रवृत्ती निरंतर सुरूच ठेवली आहे. अलीकडील काळात त्याने पोलीस स्टेशन बेलतरोडी हद्दीत खुनाचा प्रयत्न करणे, नुकसान करणे, शांतता भंग घडवून आणण्याच्या उद्देशाने अपमान करणे, घातक हत्यार जवळ बाळगणे, मनाई आदेशाचे उल्लंघन करणे, इत्यादी अशा स्वरूपाचे गुन्हे केलेले आहेत.

अशाप्रकारे धोकादायक व्यक्ती नामे कुणाल वल्द भिमराव वाघमारे, याची अपराधीक कृत्ये निरंतर वाढत असल्याने आणि त्यामुळे सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण होत असल्याने मा. पोलीस उपायुक्त (परिमंडळ क्रं. ४) डॉ. अक्षय शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली व.पो.नि. विजय आकोत, पोलीस स्टेशन बेलतरोडी, नागपूर शहर यांनी नमुद आरोपीतास स्थानबध्द करण्याकरिता गुन्हे शाखेस अहवाल सादर केला होता. मा. अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रादेशीक विभाग) दिलीप कृ. झळके नागपूर शहर यांचे मार्फतीने सादर केला असता मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री. सुनिल फुलारी यांचे निर्देशान्वये व मा. पोलीस उपायुक्त(डिटेक्शन) श्री. गजानन शिवलींग राजमाने यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हेशाखेतील एम.पी.डी.ए. विभागाने नमुद आरोपीला स्थानबध्द करण्याकरीता प्रस्ताव सादर केला त्याअन्वये स्थानबध्द प्राधिकारी नागपूर शहराचे मा. पोलीस आयुक्त श्री. अमितेश कुमार यांचे समक्ष सादर केले असता त्यांनी वर नमुद गुंडाविरूध्द स्थानबध्दतेचा आदेश पारित करून त्यास अकोला जिल्हा कारागृह, अकोला येथे

ठेवण्याबाबत आदेश दिलेत. त्याअन्वये स्थानबध्द प्राधिकारी नागपूर शहराचे मा. पोलीस आयुक्त श्री. अमितेश कुमार यांनी वर नमुद इसमाविरूध्द स्थानबध्दतेची महत्वपुर्ण कारवाई करून त्यास सध्या नागपूर मध्यवर्ती कारागृहात ठेवण्यात आले आहे.

**५) पो.स्टे. गिट्टीखदान पोलीसांची कामगीरी — घरफोडी व चोरीचे गुन्हे उघडकीस आणल्याबाबत :**

फिर्यादी आलोक राममोहन अग्रवाल वय ४१ वर्ष रा. प्लॉट नं. २२, मानवसेवा नगर, नागपूर हे पो.स्टे. गिट्टीखदान हद्दीत सी.पी.डब्लु.डी कॉलनी, नागपूर येथील स्टेअर रूमला कुलूप लावून जेवन करण्याकरीता घरी गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने रूमचा कडी कोंडा तोडून आत प्रवेश करून स्टोअर रूममध्ये ठेवलेले कॉपर वायर, लोखंडी ऍंगल, असा एकुण रू २,२०,०००/— चा मुद्देमाल चोरून नेला. याप्रकरणी कलम ४६१,३८०,३७९,४११ भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला होता.

सदर गुन्हा दाखल होतात घटनास्थळी भेट देवून फिर्यादीस बारकाईने विचारपुस करून त्याचा कंपनीमार्फत कामावर ठेवलेले कर्मचारी यांचे बयान नोंदविण्यात आले असून घटनास्थळावरील सी. सी.टी.व्ही फुटेच तसेच गुप्त बातमीदाराचे मार्फत मिळालेल्या माहीतीनुसार आरोपी क्र. १) योगेश उर्फ लक्की रमेश शाहु वय २५ वर्ष रा. प्लॉट नं. ३६८, साईबाबा नगर, खरबी वाठोडा, नागपूर यास ताब्यात घेवून पो.स्टे ला आणून आरोपी हा रेकॉर्डवरील गुन्हेगार असून अशाचप्रकारचे गुन्हे करण्याचे सवयीचा असल्याने त्यास नमुद गुन्हयाचे संबंधाने विश्वासात घेवून विचारपुस केली असता त्याने गुन्हा केला असल्याचे कबुल केल्याने त्यास सदर गुन्हयात रितसर अटक करण्यात आली असून अटकेची माहीती त्याचे नातेवाईकांना देण्यात आली होती. नमुद आरोपीचा पोलीस कस्टडी रिमांड प्राप्त करून चोरी गेलेला मुद्येमाल मेमोरंडम पंचनाम्याप्रमाणे मुख्य आरोपी कडून नमुद गुन्हया व्यतीरीक्त पोलीस स्टेशन गिट्टीखदान हद्दीतील इतर दोन गुन्हे कलम ३८० भादंवि व कलम ४५४,४५७,३८० भादंवि तसेच नागपूर शहरातील इतर पोलीस स्टेशन हद्दीतील दाखल असलेले पोलीस स्टेशन हुडकेश्वर येथील घरफोडी व चोरीचा गुन्हा, तसेच पो.स्टे. नंदनवन येथील घरफोडी चा गुन्हा, पो.स्टे सिताबर्डी येथील घरफोडीचा गुन्हा अशा गुन्हयात चोरी गेलेला मुद्देमाल रिकवर करण्यात आलेले असून नमुद आरोपी हा पोलीस स्टेशन सक्करदरा नागपूर येथील कलम ३९२,३४ भादंवि येथील गुन्हयात नमुद आरोपी हा अंदाजे मागील दिड वर्षापासून फरार असल्याचे तपासदरम्यान दिसून आले आहे.

तसेच पो.स्टे. गिट्टीखदान नागपूर येथील कलम ४६१,३८०,३७९,४११ भादंवि गुन्हयाचा मुद्येमाल कबाडी व्यवसाय करणारे आरोपी क्र. २) राजु अंताराम भवरे वय २२ वर्ष रा. गल्ली नं. ३, रामटेके नगर झोपडपट्टी, अजनी, नागपूर कडून जळालेला तांबा जप्त करण्यात आला आहे. तरी यातील मुख्य आरोपीचा साथीदार नामे नितीन रेवडीया हा फरार असून त्यास शोध घेणे सुरू आहे.

सदरची कामगीरी मा. पोलीस उपायुक्त परि क्र. २ श्रीमती विनीता साहु, मा. सहा. पोलीस आयुक्त (सदर विभाग) श्री सुधीर नंदनवार यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि श्री गजानन कल्याणकर, पोउपनि दत्ता पेंडकर, पोहवा प्रशांत देशमुख, अनील त्रिपाठी, नापोशि मंजीतसिंग, दयाशंकर बिसद्रे, राकेश यादव, दिनेश घुगे, पोशि विवेक बोटरे, धर्मेद्र मिश्रा, नागनाथ कोकरे यांनी केली आहे.

**६) पो.स्टे. अजनी पोलीसांची कामगीरी — जबरी चोरीचा गुन्हा उघडकीस आणल्याबाबत :**

दिनांक ०२.०६.२०२१ चे २०.४५ वा चे सुमारास फिर्यादी मिलींद दत्तात्रय पाटनकर वय ५७ वर्ष रा. रसिका अपार्टमेंट, गल्ली नं. ५, विश्वकर्मा नगर, नागपूर हे त्यांचे आईला भेटून पायदळ त्यांचे घराकडे जात असताना पो.स्टे. अजनी हद्दीत राजकमल चौक ते जादुमहल चौक दरम्यान, जीत स्टेशनरी समोरील रोडवर, नागपूर येथे बाईक वरील दोन अनोळखी ईसमांनी त्यांना थांबवून, त्यापैकी एकाने ‘ये ही है ना वो’ असे बोलून फिर्यादीस शस्त्राचा धाक दाखवून, त्यांचे शर्टाचे खिशातून मोबाईल फोन जबरीने हिसकावून नेला. अशा फिर्यादीचे रिपोर्टवरून कलम ३९२, ३४ भादंवि नुसार गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर गंभीर गुन्हयाचा लवकरात लवकर छडा लावून आरोपीतांना ताब्यात घ्यावे असे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी आदेशीत केल्याने गुन्हा घडला त्या दिवसापासून पो.स्टे. चे तपास पथक कसोशीने प्राप्त सीसीटीव्ही फुटेजमधील अनोळखी आरोपीतांचा शोध घेत होते तसेच तांत्रीक तपासाचे मदतीने गुन्हयाचा तपास करीत असताना दिनांक ०७/०६/२०२१ रोजी तपास पथकातील सपोनि भोसले व वरील डी.बी.स्टॉफ यांनी पो.स्टे. हद्यीतील चंद्रमणी नगर गार्डन जवळून यातील आरोपीतांना संशयावरून ताब्यात घेतले. त्यांनी त्यांचे नाव आरोपी क्र. १) आकाश नरेंद्र रामटेके वय १९ वर्ष रा. चंद्रमणी नगर,

गल्ली नं. १एल, सुरेंद्र किराणा दुकानाजवळ, अजनी, नागपूर २) शुभम सुरज बालगुहेर वय १९ वर्ष रा. चद्रमणी नगर, गल्ली नं. २ एल, तक्षशीला बौध्दविहाराजवळ, अजनी, नागपूर असे सांगीतले त्यांचेकडे सखोल तपास करता आरोपी क्र. १ याचेकडून गुन्हयात जबरीने हिसकावून नेलेला फिर्यादीचा मोबाईल कि. रू ६,०००/— चा जप्तीपत्रकाप्रमाणे जप्त करण्यात आला. दोन्ही आरोपीतांनी संगनमताने सदरहु गुन्हा केल्याचे सांगीतल्याने व त्यांचा गुन्हयातील सहभाग स्पष्ट झाल्याने त्यांना अटक करण्यात आली. आरोपीचा पीसीआर घेवून त्यांचेकडून गुन्हयात वापरलेली हिरो होंडा सीडी डॉन गाडी व एक हत्तीमार चाकू असा एकुण रू २६,५००/— मुद्येमाल हस्तगत करण्यात आले आहे. पुढील तपास सपोनि एम.टी. भोसले हे करीत आहेत.

सदरची कामगीरी मा. पोलीस उपायुक्त (परि.क्र ०४) डॉ. अक्षय शिंदे नागपूर शहर व मा. सहाय्यक पोलीस आयुक्त (अजनी विभाग) डॉ. निलेश पालवे नागपूर शहर यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विनोद चौधरी, सपोनि श्री एम.टी भोसले, पोहवा खेमराज पाटील, नापोशि अतुल दवंडे, मनोज नेवारे, दिपक तऱ्हेकर, पोशि हंसराज पाउलझगडे यांनी केली आहे.

<u>७) पो.स्टे. यशोधरानगर पोलीसांची कामगीरी — वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणल्याबाबत :</u>

पो.स्टे.यशोधरानगर हद्दीत दिनांक ०८.०६.२०२१ रोजी गुन्हे प्रतिबधंक गस्त करीत असता इटाभटटा चौक ते वनदेवीनगर चौकाकडे जाणाऱ्या मार्गाने एक इसम त्याच्या ताब्यातील वाहण भरधाव वेगाने चालवितांना तसेच वाहणास नंबर प्लेट दिसुन न आल्याने त्याचेबाबत शंका आल्याने त्यास विनोबाभावेनगर येथील शिव मंदीराजवळ थांबवून त्याला त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव मो. रेहान अख्तर उर्फ भुरु अब्दुल रफीक वय २१ वर्ष रा.पप्पुभाई कटींगवाले कडे किरायाने, मतीन किराणा दुकानाजवळ, संघर्षनगर, पो.स्टे.यशोधरानगर, नागपूर असे सांगीतले. तदनंतर त्याच्या ताब्यातील मोटरसायकल; हीरो होण्डा सी डी डिलक्स मालकी हक्काबाबत व नंबरप्लेटबाबत विचारणा केली असता तो उडवाउडवीची उत्तरे देवू लागला त्याचेबाबत अधिक शंका निर्माण झाल्याने त्यास विश्वासात घेवून विचारणा केली असता दि.०६/०६/२०२१ रोजी संध्याकाळी स्मॉल फॅक्टरी एरीया येथील नितीका केमीकल्स कंपणी समोरुन गाडी चोरी केल्याचे कबुल केल्याने तात्काळ पो.ठाणे येथे दुरध्वनीवरती संपर्क साधुन पडताळणी केली असता नमुद मो/सा ही चारीस गेल्याबाबत पो .ठाणे अप.क्र.३८५/२०२१ कलम ३७९ भादवी अन्वये गुन्हा दाखल असल्याचे निदर्शनास आल्याने त्याच्या ताब्यातील वाहण पंचासमक्ष घटनास्थळ जप्ती पंचनाम्याप्रमाणे जप्त करुन त्यास ताब्यात घेवून नमुद गुन्हयात जेरबंद करण्यात आले.

नमुद गुन्हयाच्या तपासादरम्यान अटक आरोपीस त्याने आणखीन गुन्हे केले किवा कसे याबाबत त्यास विश्वासात घेवून विचारणा केली असता त्याने गेल्या वर्षात सागर बीयर बार समोर पो.स्टे. पाचपावली येथुन मोपेड होण्डा अॅक्टीव्हा, यावर्षी मार्च महिन्यात मध्यरात्री गंगाबाग, पार्डी येथुन स्प्लेंडर तसेच मोपेड अॅक्टीव्हा आणी कोतवाली हददीतून दुपारी हीरो होण्डा स्प्लेंडर या गाडयांच्या चोरी केल्या तसेच चोरी केलेल्या सर्व गाडया मेहबुबपुरा येथील इंडस्ट्रीयल एरीयातील झुडुपात लपवून ठेवल्याबाबत कबुली निवेदण दिल्याने वर नमुद विविध पो.स्टे .दाखल गुन्हयातील एकुण ०४ वाहण मेमारंडेम पंचनाम्याअंतर्गत जप्त करण्यात आल्या.

गुन्हा दाखल झाल्यानंतर अवघ्या काही तासातच आरोपीस पकडुन त्याचेकडुन विविध पो.स्टे. चे गुन्हे उघडकीस आणून त्याचेकडुन एकुण ०५ वाहण असा एकुण रू १,८०,०००/— चा मुददेमाल जप्त करण्यात आला.

सदरची कारवाई मा. पोलीस उपायुक्त परि क्र. ५ श्री निलोत्पल, मा. सहा. पोलीस आयुक्त जरीपटका विभाग श्री.रोशन पंडीत, वरीष्ठ पोलीस निरीक्षक अशोक मेश्राम यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि जितेंद्र भार्गव, पोहवा दिपक धानोरकर, नापोशि गजानन गोसावी, संतोष यादव, निलेश घायवट, पोशि प्रफुल चितंले यांनी केली आहे.

<u>दिनांक ०९.०६.२०२१ बुधवार</u>

<u>१) अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा, नागपूर शहर यांनी पो.स्टे मानकापुर हद्दीत ३५ किलो ३९० गॅम गांजा कि. ५,३०,८५० रू तसेच पोस्टे. कळमणा हद्दीत ६२ किलो ५९८ ग्रॅम गांजा कि. ९,३८,९७० रू., दोन कार व ३ मोबाईल सह दोन्ही गुन्हयातील एकुण किं. रू. २६,९९,८२०/— चा</u>

**<u>मुद्येमाल जप्त केलेबाबत:</u>**

<u>अ)</u> दिनांक ०७.०६.२०२१ रोजी अंमली पदार्थ विरोधी पथक, गुन्हे शाखा नागपूर शहर यांना गुप्त माहिती मिळाली होती की, सुनिल मालवी व सोहेल खान हे दोन इसम त्यांचे कडील स्विफ्ट डिझायर कार क्र. एम.पी./२८/सी.ए./२३८७ ने छिंदवाडा येथे गांजा घेवून जात आहे. त्याप्रमाणे आम्ही पथकासह मानकापुर पोलीस स्टेशन हद्दीत फरस कोराडी रोड, रेमेडिया हॉस्पिटल समोर सापळा रचून स्विफ्ट डिझायर कंपनीची क्र. एम.पी/२८/सी.ए./२३८७ या गाडीला रोखून आरोपी नामे १) सोहेल खान वल्द शमीम खान वय २२ वर्ष, रा. वार्ड नं. २६ पातालेश्वर वार्ड झीलपुरा छिंदवाडा ठाणे सिटी कोतवाली छिंदवाडा राज्य मध्यप्रदेश २) सुनिल बसंत मालवी, वय ३१ वर्ष, रा. वार्ड नं. २०, जुना पावरहाउस जवळ, झिलपुरा छिंदवाडा, (मध्यप्रदेश) यांना ताब्यात घेवून गाडीची झडती घेतली असता गाडीचे पाठीमागील भागात २ पोत्यामध्ये एकुण ३५ किलो ३९० ग्रॅम गांजा मिळून आल्याने नमुद आरोपीवर पोस्टे मानकापुर येथे गुन्हा दाखल करण्यात आला असुन आरोपीकडुन वर नमुद गांजासह एक चारचाकी वाहन व २ मोबाईल असा एकुण रू १२,५०,८५०/— चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील पाहीजे आरोपी नामे नरेश उर्फ पप्पु जगदिशप्रसाद श्रीवास्तव रा. ओम नगर भरतवाडा नागपूर याने अटक आरोपींतांना विक्री करीता गांजा दिला आहे.

<u>ब)</u> दिनांक ०८.०६.२०२१ रोजी अंमली पदार्थ विरोधी पथक गुन्हे शाखा नागपूर शहर यांना गुप्त माहिती मिळाली होती की अजीत सिंग नावाचा इसम नागपूर आउटर रिंग रोड वरील धारगाव शिवार उडानपुलावरून एक चारचाकी वाहन Chevrolet क्र. यु.पी./७६/एम./३०७१ गाडी मध्ये गांजा घेवन जात आहे. त्याप्रमाणे आम्ही पथकासह कळमणा पोलीस स्टेशन हद्दीत आउटर रिंग रोडवरील धारगाव शिवार, महामार्ग सर्विस रोडवर सापळा रचुन Chevrolet गाडीला रोखून आरोपी क्र. १) अजित सिंग राकेश सिंग, वय २९ वर्ष रा. सेक्टर १६ नोयडा जेजे कॉलनी काली मंदीर जवळ नोयडा, राज्य — उत्तरप्रदेश २) दिलिपकुमार शाहा रामबहादुरशाहा, वय ३५ वर्ष, रा. वार्ड ०७, जि. सहरसा राज्य बिहार यांना ताब्यात घेवून गाडीची झडती घेतली असता गाडीचे पाठीमागील भागात २ पोत्यामध्ये एकुण ६२ किलो ५९८ ग्रॅम गांजा मिळून आल्याने नमुद आरोपीतवर पोस्टे कळमणा येथे गुन्हा दाखल करण्यात आला असुन आरोपीकडुन गांजासह एक Chevrolet चारचाकी वाहन व एक मोबाईल असा एकुण १४,४८,९७० रू चा मुद्येमाल जप्त करण्यात आला आहे.

वरील दोन्ही कारवाई मध्ये ९७ किलो ९८८ ग्रॅम गांज तसेच इतर मुद्येमालासह एकुण २६. ९९.८२० रू चा मुद्येमाल जप्त करण्यात आला असून ४ आरोपी अटक आहे.

## <u>दिनांक १०.०६.२०२१ गुरूवार</u>

### <u>१) पो.स्टे. शांतीनगर पोलीसांची कामगीरी —</u>

दिनांक १०.०६.२०२१ रोजी पोलीस स्टेशन शांतीनगर येथे दाखल मिसींग नोंद असलेले मोबाईल वेगवेगळया वर्षाचे ट्रेस करून मोबाईल धारकास देण्यात आले. मा. पोलीस उपायुक्त परि क्र. ३ श्री लोहीत मतानी यांचे आदेशाने ट्रेस केलेले मोबाईल हे १) गोपाल मुरलीधर तलवारे यांचा रियलमी कंपनीचा मोबाईल कि. रू १०,०००/—, २) सेवकराम रीनायकत यांचा विवो कं. मोबाईल कि. रू १०,०००/—, ३) प्रितम रविंद्र खापेकर यांचा ओपो कं. मोबाईल कि. रू १०,०००/—, ४) पंकज ज्ञानेश्वर सरोदे यांचा रेडमी नोट ८ मोबाईल कि. रू १०,०००/—, ५) भारती लक्ष्मण चापरे यांचा विवो कं. मोबाईल कि. रू १२,०००/—, ६) अलंकार सुकलाल थापे यांचा सॅमसंग कं. मोबाईल कि. रू १०,०००/—, ७) कल्पना लक्ष्मीनारायण रंगाई याचा विवो कं. मोबाईल कि. रू १०,०००/—, ८) राजु पुरूषोत्तम बावणे यांचा ओपो कं. मोबाईल कि. रू २२,०००/—, ९) दिनेश सिताराम परतेती यांचा रेडमी कं. मोबाईल कि. रू १५,०००/—, १०) नितेश दिवाकर चचाने यांचा ओपो कं. मोबाईल कि. रू १०,०००/— असे एकुण १० मोबाईल एकुण कि. रू १,२४,०००/— चा मुद्देमाल तक्रारदार यांना मा. पोलीस उपायुक्त परि क्र. ३ श्री लोतीत मतानी यांचे आदेशाने प्रभारी वपोनि प्रभावती एकुर्के यांचे मार्गदर्शनात तक्रारदारास देण्यात आले.




दिनांक ११.०६.२०२१ शुक्रवार

१) पो.स्टे. मानकापूर पोलीसांची कामगीरी — सहा वर्षापासून पाहीजे असलेल्या आरोपीस अटक केल्याबाबत :

दिनांक ०४.१२.२०१५ रोजी फिर्यादी प्रल्हाद चुन्नीलाल फळपुरे वय ३१ वर्ष रा. प्लॅट नं. १४, बाबा फरीद नगर, मोठया टावरजवळ, पो.स्टे. मानकापूर, नागपूर शहर यांनी पो.स्टे ला येवून तक्रार दिली की त्यांनी आपली बजाज डिस्कव्हर दुचाकी गाडी क्र. एम.पी/५०/एम.ए/९२२६ कि. अं. रू २०,०००/— ही घरासमोर उभी करून ठेवून घरी गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने सदरची गाडी चोरून नेली. अशा फिर्यादीचे रिपोर्टवरून गुन्हा कलम ३७९ भादंवि चा गुन्हा दाखल केला.

सदर गुन्हयाचे तपासादरम्यान आरोपी महेश वसंतराव खांडेकर वय २४ वर्ष रा. नंदनवन झोपडपट्टी, पो.स्टे. नंदनवन, नागपूर शहर याचे विरूध्द सदर गुन्हयात कलम २९९ सि.आर.पी.सी अन्वये मा. न्यायालयमध्ये दोषारोप पत्र पाठविण्यात आले असून तो सन २०१५ पासून नमुद गुन्हयात फरार असल्याने त्याचा शोध घेणे सुरू होता.

दिनांक १०.०६.२०२१ रोजी पाहीजे आरोपीचा शोध घेत असतांना मिळालेल्या गुप्त बातमीदार यांचेकडील माहीतीवरून प्लॉट नं. ७, वैष्णोदेवी नगर, स्वामी नारायण मंदीरचे मागे, पो.स्टे. वाठोडा, नागपूर शहर येथे गेले असता सदर ईसम मिळून आल्याने त्यास त्याचे नाव व पत्ता विचारला असता त्याने आपले नाव महेश वसंतराव खांडेकर वय ३० वर्ष रा. प्लॉट नं. ७, वैष्णोदेवी नगर, स्वामी नारायण मंदीरचे मागे, नागपूर असे सांगीतल्याने त्यास पो.स्टे. ला आणून अटक करण्यात आली.

सदरची कामगीरी मा. पोलीस उपायुक्त परि क्र. २ श्रीमती विनीता साहु, मा. सहा. पोलीस आयुक्त सदर विभाग श्री सुधीर नंदनवार, यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि श्रीमती वैजयंती मंडवधरे, मसपोनि श्रीमती मंगला मोकाशे, पोहवा रविंद्र भुजाडे, नापोशि अंकुश राठोड, पोशि रोशन वाडीभस्मे, प्रविण भोयर, मनापोशि कलावती भुजाडे, चापोहवा विजय बोंडे यांनी केली आहे.

२) पो.स्टे. पाचपावली पोलीसांची कारवाई :

पोस्टे पाचपावली हद्दीत राहणार कुख्यात गुन्हेगार नामे सिताराम मुलचंद शाहु, वय ३० वर्षे, रा. महात्मा फुले शाळेजवळ, नाईक तलाव, पोस्टे पाचपावली, नागपुर शहर हा गुंड प्रवृत्तीचा असुन याचेवर शरिराविरूध्दचे खुनासारखे गुन्हे दाखल असुन त्याची वस्तीत फार मोठी दहशत निर्माण झाली होती. त्याच्या गुन्हेगारी कृत्यांवर आळा बसविणे गरजेचे झाले होते, करिता श्री संजय मेंढे, वरिष्ठ पोलीस निरिक्षक, पोस्टे पाचपावली, नागपुर शहर, यांनी नमुद गुन्हेगाराचा हद्दपार प्रस्ताव तयार करून मा. वरिष्ठांना सादर केला होता, सदर हद्दपार प्रस्तावाची दखल घेवुन मा. पोलीस उपायुक्त(परि क्र. ३) नागपूर शहर यांनी आरोपी नामे सिताराम मुलचंद शाहु, यास त्यांचे स्थानबध्द आदेश ०६/२१ दि. ०७/०६/२०२१ रोजी अन्वये नागपुर शहर व नागपुर जिल्हा ग्रामीण हद्दितुन ०२ वर्षाकरिता हद्दपार आदेश पारीत केला आहे.

नमुद इसमास आज रोजी मा. पोलीस उप आयुक्त, परि. क्रमांक ०३, नागपुर शहर यांचे उपरोक्त आदेश तामील करून त्यास नागपुर शहर व नागपुर ग्रामीण हद्दितुन अमरावती येते सोडण्यात आले आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस उपायुक्त श्री लोहीत मतानी, परिमंडळ क्र. ३ नागपूर शहर, मा. सहा. पोलीस आयुक्त, लकडगंज विभाग, श्री. सचिन थोरबोले यांचे मार्गदर्शनात, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. संजय मेंढें, पोहवा गणपती कनिरे, पोहवा शत्रुगण यादव, पोहवा रवि मिश्रा, नापोशि विनोद

बरडे, नापोशि नितीन धकाते, नापोशि बाळकृष्ण राठोड, पोशि नितीन लोखंडे, पोशि आशिष लाडके, मपोशि भारती बांते यांनी केलेली आहे.

३) पो.स्टे. वाडी पोलीसांची कारवाई :

अ) दिनांक ०३.०५.२०२१ चे ०४.०० वा ते दिनांक ०४.०६.२०२१ चे ०८.३० वा दरम्यान फिर्यादी किसन हिरामन कडु, वय ६५ वर्ष रा. प्लॉट नं. २, सत्य साई कृपा ले आउट, खडगाव रोड, नागपूर यांनी जनता रोड लाईन ट्रान्सपोर्ट गोडावुन बंद करून घरी गेले होते. त्यानंतर नागपूर शहरात लॉकडाउन लागल्यामुळे गोडावून बंद होते त्यादरम्यान गोडावूनचे मागील बाजुचे लोखंडी ग्रील असलेली खिडकी तोडुन आत प्रवेश करून एकुण किमती २५,०१०/— रूपयेचा माल कोणीतरी अज्ञात चोराने स्वत:चे आर्थीक फायदयाकरीता चोरी करून नेला आहे. अशा फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून कलम ४६१,३८० भादवि भा.द.वि अन्वये गून्हा दाखल केला.

तपासी अंमलदार हे स्टाफसह नमुद गुन्हयातील आरोपीचा शोध घेत असताना आंबेडकर नगर परीसरात कंट्रोलवाडी येथील ड्रम्प यार्ड जवळ एक इसम संशयास्पद स्थितीत मिळून आला. त्याला आवाज दिला असता तो पळायला लागल्याने त्याला स्टाफच्या मदतीने ताब्यात घेवून त्याचे नाव व पत्ता विचारले असता त्याने आपले नाव किरण कैलास गणविर वय २२, रा. सिद्धार्थ चौक आंबेडकर नगर पो.स्टे. वाडी नागपूर शहर असे सांगीतले वरून त्यास पोलीस स्टेशनला आणून नमुद गुन्ह्याची माहिती देवुन वपोनि. समक्ष विश्वासात घेवून विचारपूस केली असता त्याने नमूद गुन्हा त्याचे साथीदारसह केल्याचे कबुल केल्याने त्याला कायदेशिर रित्या अटक करण्यात आली. व गुन्हयात चोरी केलेला मुद्देमाल १) STYLOGY कंपनीच्या व इतर विविध रंगाच्या टि शर्ट ५२ नग प्रत्येकी किंमती अ. १८०/— रूपयेप्रमाणे एकूण ९,३६०/— रूपये २) प्रिया कंपनीच्या बनीयान १५ नग प्रत्येकी किंमती अ. ४०/—रूपये प्रमाणे एकूण ६००/— रूपये ३) सॅन्ट्रो कंपनीच्या अंडरवियर ४३ नग प्रत्येकी किंमती अ. ४०/— रूपये प्रमाणे एकूण १,७२०/— रूपये ४) रबरी बॉल ३० नग प्रत्येकी किंमती अ. १०/— रूपये प्रमाणे एकूण ३००/— रूपये ५) गमछे पांढ—या रंगाचे ०३ नग प्रत्येकी किंमती अ. ७५/— रूपये प्रमाणे एकूण २२५/— रूपये ६) विविध रंगाचे टॉवेल २७ नग प्रत्येकी किंमती अ. १२०/—रूपये प्रमाणे एकूण ३,२४०/— रूपये असा एकुण १५,४४५/— रूपये किमतीचा माल जप्त करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा सुनिल मस्के पोस्टे वाडी नागपूर शहर करीत आहे

सदरची कामगिरी नागपूर शहराचे मा. पोलीस उपायुक्त(परि.क्र.१) नुरूल हसन, मा. सपोआ(एमआयडीसी विभाग) श्री कार्यकर्ते यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि श्री पी.बी. सुर्यवंशी, पोनि भरत कऱ्हाडे, पोउपनि साजिद अहमद, पोहवा सुनिल मस्के, नापोशि प्रदीप ढोके, पोशि हेमराज, प्रमोद, सतिश यांनी केली आहे.

ब) दिनांक ०५.०६.२०२१ चे ०८.२५ वा चे सुमारास फिर्यादी सरतर्फे पोशि सतिश येसनकर, वय ३५ वर्ष, नेमणुक पोस्टे वाडी नागपूर शहर हे स्टाफ सह पोस्टे हददीत अवैद्यरितया गौणखनिज वाळुची वाहतुक करणाऱ्या वाहनावर संयुक्तीक कारवाई करण्याकरीता गस्त करीत असतांना गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहीतीवरून टाटा कंपनीचा ट्रक क्रं. एम एच ४० ए के ४९६८, चा चालक नामे श्रिकांत शंकरराव हिवरे, वय ३४ वर्ष रा. मु. सातनुर ता. सौंसर जि. छिंदवाडा मध्यप्रदेश यांने त्यांचा मालक नामे समीर समीम खान, वय ३५ वर्ष, रा.सावनेर सटवा माता मंदीर जवळ, त. सावनेर जि. नागपूर याचे सांगण्यावरून रोहना घाट वलनी (खदान) ता. सावनेर जि. नागपुर येथून गौणखनिज रेती माल अंदाजे २२,००० कि.ग्र ट्रक सहीत (वजन ३२,४७० कि.ग्र) किंमत अंदाजे ५५,००० रू ट्रक क्रं. एम एच ४० ए के ४९६८, मध्ये शासनाचे परवानगी शिवाय स्वत:चे आर्थीक फायदयाकरीता संगनमत करून चोरून आणल्याने ट्रक किमती अंदाजे २५,००,०००/रू. असा एकुण २५,५५,०००/रू चा माल घटनास्थळ पंचनामा प्रमाणे जप्त करून त्यांचे विरूद्व कलम ३७९,३४ भादवी चा गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा सुनिल मस्के पोस्टे वाडी नागपूर शहर करीत आहे

सदरची कामगिरी नागपूर शहराचे मा. पोलीस उपायुक्त(परि.क्र.१) नुरूल हसन, मा. सपोआ(एमआयडीसी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि श्री पी.बी. सुर्यवंशी, पोनि भरत कऱ्हाडे, पोउपनि अविनाश जायभाये, पोहवा सुनिल मस्के, नापोशि प्रदीप ढोके, पोशि हेमराज, प्रमोद, सतिश यांनी केली आहे.

क) फिर्यादी ना.पो.शि. प्रदिप सुभाषराव ढोके, वय ३९ वर्ष नेमणुक पो.स्टे. वाडी नागपूर हे स्टॉफसह खाजगी वाहनाने पेट्रोलींग करीत असतांना दिनांक ०७/०६/२०२१ चे १४:२५ वा दरम्यान आरोपी क्र १) मनोज विश्वनाथ गणवीर वय ३० वर्ष रा. लहान बौध्द विहाराजवळा, खडगाव रोड, नागपूर २) आनंद श्रीप्रसाद बर्मन वय ४३ वर्ष रा. खडगाव फेटरी कळमेश्वर, नागपूर यांना थांबवुन चेक केले असता इसमाच्या ताब्यातुन देशी दारू भिंगरी संत्रा नं. १ असे लेबल लागलेले १८० एम एल च्या दारूच्या काचेच्या बॉटल एकुण २० नग प्रत्येकी कि.६०/—रू प्रमाणे एकुण १,२००/— रूपयाचा मुदद्देमाल व होन्डा शाईन क्र एम. एच. ४० बि.वाय. ६४६६ किमती ५०,०००/— रूपये असा दोन्ही मिळून एकुण ५१,२००/— रूपयाचा मुदद्देमाल मिळून आल्याने नमूद आरोपी विरूध्द कलम ६५ (ई) मु. दा.का. प्रमाणे गुन्हा दाखल केला. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोहवा सुनिल मस्के पोस्टे वाडी नागपूर शहर करीत आहे.

सदरची कामगिरी नागपूर शहराचे मा. पोलीस उपायुक्त(परि.क्र.१) नुरूल हसन, मा. सपोआ(एमआयडीसी विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि श्री पी.बी. सुर्यवंशी, पोनि भरत कऱ्हाडे, पोउपनि साजिद अहमद, पोहवा सुनिल मस्के, नापोशि प्रदीप ढोके, पोशि हेमराज, प्रमोद, सतिश यांनी केली आहे.

ड) दिनांक २७.१२.२०२० चे २११५ वा ते २१२५ वा दरम्यान फिर्यादी गौरव प्रतापराव पाटणकर वय २९ वर्ष रा. गजानन सोसायटी, प्लॉट नं २२९, वाडी नागपूर यांनी आपले वाहन क्र. स्पेलंडर प्लस वाहन क्र. एमएच/४०/बीएम/८९८० काळया पांढऱ्या रंगाची आशा हॉस्पिटल समोर पार्क करून औषधी घेणे करीता गेले व औषधी घेवून परत आले असता ठेवलेल्या ठिकाणी आपले वाहन दिसुन आले नाही सदर वाहन कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले अशा फिर्यादीचे तक्रारीवरून कलम ३७९ भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला होता.

चोरीस गेलेल्या वाहनाबाबत गुप्त बातमीदारामार्फत माहिती वरून तीन आरोपींना अटक करून त्यांनी नमुद गुन्हयातील वाहनासह अन्य चोरीच्या गुन्हयातील वाहन नागपूर ग्रामीण व मध्यप्रदेश येथे पांढुर्णा व मुलताई येथून चोरी केल्याचे कबुली दिल्याने दोन पंच समक्ष मेमोरंडम जप्ती पंचनामाप्रमाणे नागपूर ग्रामीण तसेच पांढुर्णा मध्यप्रदेश येथून वेगवेगळया ठिकाणाहुन चोरी करून आणलेले एकुण १९ मोटर सायकल वाहन किं. ५,५५,००० रू जप्त करण्यत आली असुन अन्य दोन आरोपीनां अटक करण्यत आली असुन आरोपी क्र. १) भोजराज नामदेव गजभिये, वय ३० वर्ष रा. आजगाव मध्यप्रदेश, २) निखिल पन्नालाल गोयते, वय २० वर्ष रा. ता. नरखेड, जि. नागपूर ३) सौरभ दिलीप चनकापुरे वय २१ वर्ष रा. ता. नरखेड, जि. नागपूर ४) अंकीत आनंद पाटील वय २३ वर्ष रा. इसापुर, काटोल, नागपूर ५) शुभम बंडुजी राउत वय २१ वर्ष रा. नरखेड, नागपूर यांना गुन्हयात अटकेत आहे नमुद आरोपी हे आपसात संगणत करून टोळी बनवुन नागपूर, अमरावती, सावनेर, नरखेड, मध्यप्रदेश येथील सैसंर, पांढुर्णा, मुलताई अशा ठिकाणाहुन वाहन चोरी करून त्यांचे नंबर प्लेट बदली केल्याचे तपासात निषन्न झाले आहे सदर आरोपी हे सध्या पीसीआरवर असुन पुढील तपास मा. वपोनि यांचे मार्गदर्शनात पोहवा प्रमोद गिरी हे आपल्या पथकासह करीत आहे.

सदरची कामगिरी नागपूर शहराचे मा. पोलीस उपायुक्त(परि.क्र१) श्री नुरूल हसन, मा. सपोआ(एमआयडीसी विभाग) श्री कार्यकर्ते यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि पी.बी. सुर्यवंशी, दुपोनि भारत कऱ्हाळे, पोउपनि साजिद अहमद, पोहवा प्रमोद गिरी, नापोशि संतोश उपाध्याय, मुनिद्र इवनाते, पोशि शिवशंकर रोठे, पोशि ईश्वर राठोड, पोहवा राजेश धाकडे यांनी केली आहे.

४) पो.स्टे. गिट्टीखदान पोलीसांची कामगिरी — घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणल्याबाबत :

पोलीस स्टेशन गिटटीखदान, नागपूर शहर हददीत दिनांक ०८.०६.२०२१ रोजी ते दिनांक १०.०६.२०२१ रोजी वेगवेगळया भागात मंदीर चोरी, तसेच वायुसेना कॅम्प मधील दुकान व टि.व्ही.टॉवर चौकातील डेली निड्स दुकानात वेगवेगळया आरोपीतांनी चोरी करून मुददेमाल चोरून नेला वरून फिर्यादीनी दिलेल्या तक्रारीवरून गुन्हे नोंद करून तपास सुरू करण्यात आला.

पो.स्टे. ला दाखल तिन्ही गुन्हयाचे उलगडा होणेकरीता मा. वरिष्ठाचे मागदर्शनात तपास पथकातील अधिकारी/कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेवुन तांत्रीक पुरावे तसेच माहीतीगाराकडुन मिळालेल्या माहीतीवरून प्रत्येक गुन्हा दाखल झाल्याचे १२ तासाचे आत उघडकिस आणुन तिन्ही गुन्हयातील वेगवेगळे आरोपीतांना नागपूर शहरातील विविध भागातुन ताब्यात घेवुन आरोपी क्र. १) राहुल

सुधाकर भलावी वय १९ वर्ष, रा. वायुसेना नगर, २) प्रतिक दिनराज आमले वय २० वर्ष, रा. वायुसेना नगर ३) उमेश नंदकिशोर राउत वय २४ वर्ष, रा. राज नगर, झोपडपट्टी, नागपूर ४) सुरज चतुर कटौते वय ३० वर्ष, राजनगर झोपडपट्टी, नागपूर ५) किशन रामबहादुर थापा, वय २७ वर्ष रा. वॉक्स कुलर वस्ती, लेडीज चुडी दुकान जवळ, कोराडी रोड, पो.स्टे. कोराडी, नागपूर व २ विधी संघर्ष ग्रस्त बालकाकडुन एकुण ८०,५००/— रू. चा मुददेमाल जप्त करण्यात आला. यातील आरोपीतांपैकी तिन आरोपीतांवर चोरी, घरफोडी चे गुन्हे नोंद असुन आरोपीतांचा इतर गुन्हयात सहभाग आहे काय? याबाबत अधिक तपास सुरू आहे.

सदरची कारवाई नागपूर शहराचे मा. पोलीस उपायुक्त(परि.क्र २) श्रीमती विनिता साहु, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त(सदर विभाग) श्री सुधिर नंदनवार, मा. वरिष्ठ पोलीस निरिक्षक गजानन कल्याणकर, पो.स्टे. गिटटीखदान, नागपूर याचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरिक्षक सुहास चौधरी (गुन्हे), पोउपनि दत्ता पेंडकर, पोउपनि देवेन्द्र पटले, नापोशि बलजित ठाकुर, नापोशि निलेश इंगोले, नापोशि इंशाक आटे, नापोशि इम्रान गलाकाटु, पोशि कुणाल कोरचे, पोशि वैभव कुलसंगे, पोहवा अनिल त्रिपाठी, नापोशि मंजीत सिंह, नापोशि राकेश यादव, नापोशि राकेश गोतमारे, पोशि विवेक बोटरे, पोशि आशिष यांनी केली आहे.

**५) नागपूर शहराचे मा. पोलीस आयुक्त यांनी डिस्ट्रीक्ट केमीस्ट अॅन्ड ड्रगीस्ट असोशीएशन यांचे अध्यक्ष व इतर औषधी वितरक यांचे सोबत बैठक घेतलेबाबत :**

मा. पोलीस आयुक्त, नागपूर शहर श्री अमितेश कुमार यांना गंभीर गुन्हयांच्या आढाव्यात असे निदर्शनास आले कि, नागपूर शहरात घडलेले काही गंभीर गुन्हे हे आरोपींनी अप्राझोलम, कोडीन, नायट्रोझेपॉम असे घटक असलेले गुंगीकारक औषधांचे सेवन करून केलेले आहेत, तसेच काही मेडीकल स्टोअर्स मधून डॉक्टरांचे प्रिस्क्रिप्षन शिवाय गुन्हेगारांना अशा गुंगीकारक औषधांची विक्री केलेली आहे.

त्या अंनुषंगाने आज दिनांक ११/०६/२०२१ रोजी पोलीस जिमखाना, सिव्हील लाईन नागपूर येथे नागपूर शहरातील डिस्ट्रीक्ट केमीस्ट अॅन्ड ड्रगीस्ट असोशीएशन यांचे अध्यक्ष व इतर औषधी वितरक यांची बैठक आयोजीत केली. नमुद बैठकीमध्ये मा. पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांनी गुन्हेगार हे नशे करीता अप्राझोलम, कोडीन, नायट्रोझेपॉम अशा प्रकारचे घटक असणारे औषधी चा वापर करून गुन्हेगारी कृत्य करत असल्याबाबत अवगत केले. त्यामुळे सर्व प्रकारचे वितरक यांना बैठकीमध्ये वरील प्रकारचे घटक असलेले औषधी वैदयकीय सल्ल्याशिवाय व प्रिस्क्रिप्षन शिवाय विक्री न करण्याच्या सुचना दिल्या आहेत. तसेच औषधी विक्री करतांना शासनाव्दारे निर्गमित केलेल्या नियमांचे पालन करण्याच्या सुचना दिल्या.

नागपूर डिस्ट्रीक्ट केमीस्ट अॅन्ड ड्रगीस्ट अशोसीएशन यांचे अध्यक्ष व उपाध्यक्ष तसेच इतर ६० ते ७० औषधी वितरक बैठकीमध्ये उपस्थित राहुन मा. पोलीस आयुक्त यांचे सुचनांचे पालन करून नागपूर शहरातील अंमली पदार्थ युक्त औषधीमुळे घडणाऱ्या गुन्हेगारी घटनांना आळा बसेल या करीता पोलीसांना मदत करण्याचे आश्वासन दिले आहे.

सदरहु बैठकीमध्ये नागपूर शहराचे मा. पोलीस आयुक्त श्री अमीतेश कुमार, मा. अपर पोलीस आयुक्त(गुन्हे) श्री सुनिल फुलारी, मा. पोलीस उपायुक्त(डिटेक्शन) श्री गजानन शिवलिंग राजमाने तसेच अंमली पदार्थ विरोधी पथकाचे पोलीस निरीक्षक विशाल काळे, सपोनि सुरज सुरोशे तसेच पथकातील अंमलदार उपस्थित होते.




**दिनांक १२.०६.२०२१ शनिवार**

**१) सायबर पोलीस स्टेशन नागपूर शहर च्या वतीने नागरीकांना आवाहन —**

वाढत्या सायबर गुन्हेगारी स्वरूप लक्षात घेता, सायबर फसवणुक करणारे गुन्हेगार वेगवेगळया पद्धतीचे अवलंब करतांना दिसुन येत आहे. ज्यामध्ये नागरीकांचे लक्ष केंद्रीत करण्यात येत आहे. म्हणुन एकमेव महत्वाचा उपाय म्हणजे जनजागृती करणे होय. प्राप्त माहीती नुसार पो.स्टे.बेलतरोडी हद्दीतील मनीषनगर येथे दिनांक ०७/०६/२०२१ रोजी काही नागरिकांना एक/दोन अनओळखी व्यक्ती हे स्थानिक बॅकेच्या ए.टी.एम. कार्नर जवळ उभे राहुन ए.टी.एम. चा वापर करणाऱ्या नागरिकांना थांबवुन त्यांना रोख रकमेची मागणी करून व सदर रक्कम ऑनलाईन इंटरनेटच्या माध्यमाने विविध वॉलेटचा वापर करून परत पाठवितो अशी बतावणी करून विश्वास संपादन करणे व फसवणूक करण्याचा प्रयत्न करीत होता.

तरी नागरिकांनी वर्दळीचे ठिकाण बॅक ए.टी.एम, सिक्युरिटी गार्ड मॉल, बस स्टॅड, व्यावसायिक केंद्र येथे नागरिकांनी जागरूकता ठेवावी विशेष करून ज्येष्ठ नागरीक, महीला यांनी अशा भामट्यांपासुन जागरूक राहावे, असे सायबर पोलीस स्टेशन नागपूर शहर च्या वतीने आवाहन करण्यात येत आहे.

**२) मा. पोलीस उपायुक्त (आर्थिक गुन्हे) श्री.विवेक मासाळ यांचे अध्यक्षतेखाली स्थानिक बॅक नोडल अधिकारी यांच्यात झालेल्या बैठकीबाबत :**

वाढत्या सायबर गुन्हयाचे अनुषंगाने दिनांक ११.०६.२०२१ रोजी १६.०० ते १८.०० वाजेपर्यंत स्थानिक बॅक नोडल अधिकारी यांची बैठक मा. पोलीस उपायुक्त (आर्थिक गुन्हे) श्री.विवेक मासाळ यांचे अध्यक्षतेखाली त्यांच्या कार्यालयात आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीमध्ये डॉ. अशोक बागुल, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सायबर पो.स्टे. व सायबर पो.स्टे.चे इतर अधिकारी व अंमलदार हजर होते. तसेच नागपूर शहरातील युको बॅक, युनियन बॅक, बॅक ऑफ इंडीया, एच.डी.एफ.सी बॅक, अॅक्सीस बॅक, आय.सी.आय.सी.आय. बॅक, कौश्यल वैश्य बॅक, पंजाब व सिंध बॅक, बंधन बॅकचे नोडल अधिकारी उपस्थित होते. बैठकीमध्ये मध्ये खालील विषयांवर चर्चा करण्यात आली आहे.

- ➢ पिडीतांची फसवणूकीची रक्कम परत मिळवून देण्याबाबत बॅक व पोलीस यांचात महत्वाची भुमिका,
- ➢ पो.स्टे. सायबर कडुन पाठविण्यात येणाऱ्या ई—मेल ला त्वरीत प्रतिसाद देणे,
- ➢ शासकीय सुटीचा दिवशी बॅक अधिकारी व नोडल यांचाकडुन प्रतिसाद मिळणे,
- ➢ जनरिक ई—मेल आयडी प्रत्येक बॅकेनी सायबरला देणे. त्यामुळे सर्व बॅक अधिकारी यांना एकाच वेळी ई—मेल प्राप्त होवून त्वरीत प्रतिसाद मिळावा.
- ➢ बॅक अधिकारी यांचा स्थानिक वॉट्सअॅप ग्रुप तयार करणे व अडीअडचणी सोडविणे.
- ➢ बॅक अधिकारी यांनी पो.स्टे. सायबर येथील अधिकारी व अंमलदार यांचाकरीता तांत्रीक प्रशिक्षण आयोजित करणे.
- ➢ सायबर पो.स्टे. कडुन पाठविण्यात येणाऱ्या प्रत्येक ई—मेलचा बॅक अधिकारी यांनी वेळ न गमावता त्वरीत प्रतिसाद देणे,
- ➢ बॅक अधिकारी यांना येणाऱ्या अडचणी व त्यावर उपाययोजना इत्यादी याप्रमाणे व इतर ? तत्सम मुद्दे यावर चर्चा करण्यात आली.

## दिनांक १३.०६.२०२१ रविवार

**१) पो.स्टे. बेलतरोडी पोलीसांची कामगीरी –**

पोलिस स्टेशन हद्दीत दाखल गुन्हयातील आरोपीतांचा शोध होणेस अधिकारी व कर्मचारी पेट्रोलिंग करीत असतांना गुप्त बातमीदार यांनी दिलेल्या माहीती वरुन आरोपी १) सागर कैलाश जैस्वाल वय २५ वर्ष रा. गौडखैरी, चांदणी चौक, देशमुख याचे घराजवळ, धनावटेचा घरी किरायणे, अमरावती रोड, नागपुर ह.मु. माय टाउन, बुटटीबोरी, एम.आय.डी.सी. नागपुर, २) श्रेयस शेखर बोरकर वय २३ वर्ष रा. सुभाषनगर, कामगार कॉलनी, प्रज्ञाशिल बौध्द विहाराजवळ, प्रतापनगर, नागपुर हे हद्दीत रॉयल इनफिल्ड. क्र.एम.एच./४९/वाय/२२२९ वर सशईतरित्या फिरतांना दिसुन आले. त्यांची एकुण हालचाल ही संशयास्पद दिसुन आल्याने दोन पंचासमक्ष त्याची अंगझडती घेतली असता आरोपी क्र. ०१ याने

परीधान केलेल्या फुलपॅन्ट चे मागील बाजुस कमरेत एक लोखंडी चाकु प्राणघातक शस्त्र मिळुण आल्याने आणि सदरबाबत तो उडवाउडवीचे असमाधानकारक उत्तरे देत असल्याने त्यांना पोलिस स्टेशन ला आणुन अधिक विचारपुस करुन त्याचे कृत्य कलम हे कलम ४,२५ भाहका सहकलम १३५ मपोका प्रमाणे होत असल्याने गुन्हा नोंद करुन त्यास अटक करण्यात आलेली आहे.

सदर गुन्हयातील नमुद आरोपीबाबत गुन्हे अभिलेखावर माहीती घेतली असता त्याचेवर शरीराविरूध्दचे आणि मालमत्तेविरूध्दचे गुन्हे दिसुन आले.

सदरची कामगीरी मा. पोलिस उपायुक्त परी. क्रं. ०४ श्री. अक्षय शिंदे, मा. सहा पोलिस आयुक्त(अजनी विभाग) श्री निलेश पालवे यांचे मार्गदर्शनामध्ये वरीष्ठ पोलिस निरिक्षक श्री विजय पी. आकोत, पोउपनि विकास अ. मनपिया, पोहवा रणधिर दिक्षीत, नापोशि गोपाल देशमुख बजरंग जुनघरे, पोशि नितिन बावणे, कुणाल लांडगे यांनी केली.

## दिनांक १४.०६.२०२१ सोमवार

### १) आर्थीक गुन्हे शाखा पोलीसांची जनतेस आवाहन —

आरोपी सुदत्ता रामटेके, लोकेश वाघमारे यांनी ई गेम एशिया ऑनलाईन या नावाची कंपनी ३०१,३०२ एस, प्रिस कॅसल अपार्टमेंटस, प्लॉट नं. १०५, गजानन नगर, टि पॉईट, नागपूर ४४००१५ या ठिकाणी सुरू केली. नमुद कंपनीमार्फत राबविण्यात येणाऱ्या सर्व प्रकारचे प्लॅन बाबत कंपनीची http://egamesasia.in हे संकेतस्थळ तयार केले. सदर संकेतस्थळावरून लुडो, क्रिकेट, फुटबॉल, टेबल पुल, कॅरम, तीन पत्ती असे विविध १८ खेळ असून यामध्ये ई गेम एशिया ऑनलाईन कंपनीकडून लोकांकडून खेळल्या जातो व त्यांनी गेम खेळल्यानंतर त्यांची १० टक्के रक्कम कंपनीला मिळणार व त्या रक्कमेतुन सर्व गुंतवणुकदारांना गुंतवणुकी प्रमाणे रक्कम वाटप केली जाणार, तसेच नमुद कंपनीमध्ये रू ३,३००/— ते ५ लाखापर्यंतची गुंतवणुक केल्यास १० महिने, १ वर्षात गुंतवणुकीवरील रक्कम दुप्पट करण्याचे प्रलोभन देवून गुंतवणुकदारांनाचा विश्वास संपादन केला व त्यांचे कडून रक्कम स्विकारून देय प्रमाणे गुंतवणुकदारांची मुळ देय असलेल्या रक्कमवरील लाभांश अगर मुल गुंतवणुकीची रक्कम परत न करता फसवणुक केल्याने पो.स्टे. धंतोली येथे अप क्र. ११७/२०२१ कलम ४०६,४०९,४२०,४१९,१२०(ब) भादंवि सहकलम ३ एम.पी.आय.डी. ॲक्ट १९९९, सहकलम ६६(क) माहिती तंत्रज्ञान कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला असून गुन्हयांचा तपास नागपूर शहराचे मा. पोलीस आयुक्त श्री अमितेशकुमार, मा. अपर पोलीस आयुक्त(गुन्हे) श्री सुनील फुलारी यांचे निर्देशान्वये मा. पोलीस उपायुक्त(आर्थिक गुन्हे) श्री विवेक मासाळ यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक (आर्थिक गुन्हे) श्री महेंद्र आंभोरे हे करित आहेत.

तरी याव्दारे आम जनतेला आवाहन करण्यात येते की, ई गेम एशिया ऑनलाईन या कंपनीचे संचालक सुदत्ता रामटेके, लोकेश जनार्धन वाघमारे तसेच कंपनीचे एंजट यांचे विरूध्द तक्रार असल्यास त्यांनी गुंतवणुकीचे संपुर्ण उपलब्ध कागदपत्रासह आर्थिक गुन्हे शाखा, कार्यालय प्रशासकीय इमारात क्रं. १, चौथा माळा, उद्योग भवनचे बाजुला, सिव्हील लाईन, नागपूर येथे तपासी अधिकारी पोलीस निरीक्षक श्री महेद्र आंभारे यांचा संपर्क क्र. ९८९२६७५५६३ वर संपर्क साधावा.

### २) पो.स्टे. पाचपावली पोलीसांची कामगीरी — वाहन चोरीचा गुन्हा उघडकीस आणल्याबाबत :

फिर्यादी संदीप बाबराव घुगे वय ३६ वर्ष रा.मु.पो. किन्ही ता.मालगाव, जि.वाशिम, ह.मु. बगदादीनगर, पोस्टे मानकापूर, नागपूर यांनी पोस्टेला येवुन फिर्याद दिली की, ते आपल्या हिंरो होंडा पॅशन प्लस क्र. एमएच/३७/डी/१०२ या दुचाकी वाहनाने डयुटीवर व्हीनस हॉस्पीटल, १० नंबर पुलीया येथे येवुन दिनांक ०५/०३/२०२१ रोजी वाहन पार्कीग मध्ये वाहन लॉक करुन ठेवुन डयुटीवर गेले होते. दुसऱ्या दिवशी दिनांक ०६/०३/२०२१ रोजी डयुटी संपल्यावर गाडी ठेवलेल्या ठिकाणी आले असता गाडी दिसुन आली नाही ती कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली आहे. अशा फिर्यादीच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. पाचपावली येथे कलम ३७९ भादंवीचा गुन्हा दाखल करण्यात आला

सदर गुन्हयाचे तपास दरम्यान गुन्हयाचा आरोपीचा शोध व्हावा या करिता सदर भागात गुप्त बातमीदार नेमण्यात आले. घटनास्थळाचे आजु—बाजुचे परिसरातील सुध्दा पाहणी करण्यात आली. आरोपीचा शोध व्हावा याकरिता तपास पथकांनी अथक परिश्रम घेतले. दिनांक १२/०६/२०२१ रोजी

मिळालेल्या गुप्त बातमीवरुन आरोपीनी गुन्हा करतेवेळी वापरलेल्या दुचाकी बाबत माहिती काढुन मोठया शिताफीने आरोपी सुमित मुकेश गौर वय १९ वर्ष रा. सुशिल बारापात्रे यांचे घरी किरायाने, शोभाखेत, पोस्टे पाचपावली, नागपूर यास ताब्यात घेवुन गुन्हयासंबंधी बारकाईने विचारपुस करुन त्याचे जवळुन एक दुचाकी वाहन हिरो होंडा पॅशन प्लस क्र. एमएच/३७/डी/१०२ भगव्या रंगाची किंमत रु २०,०००/— चा मुद्देमाल आरोपीकडुन जप्त करुन आरोपीस गुन्हयात अटक करुन गुन्हा उघडकीस आणला. गुन्हयाचा तपास सुरु आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस उपायुक्त परिमंडळ क्र.३ श्री लोहीत मतानी नागपूर शहर, मा. सहायक पोलीस आयुक्त (लकडगंज विभाग) श्री सचिन थोरबोले नागपूर शहर यांचे मार्गदर्शनात वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री संजय मेंढे, पोउपनि.प्रमोद खंडार, पोहवा शत्रुघ्न यादव, नापोशि विनोद बरडे, नापोशि बाळकृष्ण राठोड, पोशि नितीन धकाते, सचिन जयपुकर, आशिष लाडके, नितीन लोखंडे यांनी केलेली आहे.

**३) पो.स्टे. पाचपावली पोलीसांची कामगीरी — चोरीचा गुन्हा उघडकीस आणून आरोपीस अटक केल्याबाबत :**

फिर्यादी मोहसीन अब्दुल सत्तार खान वय ३७ रा. प्लॉट न.३३, छोटी मशिद जवळ, बंदे नवाजनगर, पो.स्टे. यशोधरानगर, नागपुर यांनी पोस्टेला येवुन फिर्याद दिली की त्यांच्या मालकीचे रिदा चिकन बिर्यानी नावाचे दुकान, चारखंबा चौक, पोस्टे पाचपावली, नागपूर आहे. दिनांक ११/०६/२०२१ चे २१:३० वा. चे सुमारास दुकानातील काऊंटरला लोखंडी चैन बांधुन दोन सिलेंडर ठेवुन दुकान बंद केले होते. दिनांक १२/०६/२०२१ चे ०८:०० वा. चे सुमारास दुकानासमोरील इसमाने फोन करुन माहिती दिली की, त्यांचे दुकानातील दोन सिलेंडर चोरी झाले आहे अशा माहितीवरुन दुकानात येवुन पाहीले असता दोन सिलेंडर ज्यांची किं.अंदाजे रू ७,४००/— आहे ते कोणीतरी अज्ञात चोरटयाने दुकानातुन चोरुन नेले आहे. अशा फिर्यादीच्या रिपोर्टवरुन पोस्टेला कलम ३७९ भादवीचा गुन्हा दाखल करण्यात आला

सदर गुन्हयाचे तपास दरम्यान गुन्हयाचा आरोपीचा शोध व्हावा या करिता सदर भागात गुप्त बातमीदार नेमण्यात आले. घटनास्थळाचे आजु—बाजुचे परिसरातील सुध्दा पाहणी करण्यात आली आरोपीचा शोध व्हावा याकरिता तपास पथकांनी अथक परिश्रम घेतले. दिनांक १२/०६/२१ रोजी मिळालेल्या गुप्त बातमीवरुन आरोपीनी गुन्हा करतेवेळी वापरलेल्या दुचाकी बाबत माहिती काढुन मोठया शिताफीने आरोपी नितेश यशवंतराव सोमकुंवर वय २३ वर्ष रा.नवीन नांदा, आदर्शनगर झोपडपट्टी, पोस्टे कोराडी, नागपूर यास ताब्यात घेवुन गुन्हयासंबंधी बारकाईने विचारपुस करुन त्याचे जवळुन १) एक हिंदुस्थान पेट्रोलियम कंपनीचे कर्मशियल सिलेंडर बी—२८ लिहलेले १९.४ कि.ग्रॅ.वजनाचे लाल निळया रंगाचे किंमती अंदाजे रू ४,१२५/—, २) एक गो गॅस कंपनीचे कर्मशियल सिलेंडर डी—२४ लिहलेले १७.४ कि.ग्रॅ वजनाचे हिरव्या लाल रंगाचे किंमती अंदाजे रू ३,२७५/—, ३) एक हिरो स्पलेंडर दुचाकी गाडी क्र.एमएच/४९/ए.ए/५३८३ काळया रंगाची अंदाजे किंमती रू ६०,०००/— असा एकुण रू ६७,४००/— चा मुद्देमाल आरोपीकडुन जप्त करुन आरोपीस गुन्हयात अटक करुन गुन्हा उघडकीस आणला. गुन्हयाचा तपास सुरु आहे.

सदरची कारवाई मा.पोलीस उपायुक्त परिमंडळ क्र.३ श्री लोहीत मतानी नागपूर शहर, मा. सहायक पोलीस आयुक्त (लकडगंज विभाग) श्री सचिन थोरबोले नागपूर शहर यांचे मार्गदर्शनात वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री संजय मेंढे, पोउपनि.प्रमोद खंडार, पोहवा शत्रुघ्न यादव, नापोशि विनोद बरडे, नापोशि बाळकृष्ण राठोड, रामेश मेनेवार, पोशि नितीन धकाते, सचिन जयपुकर, आशिष लाडके, नितीन लोखंडे यांनी केलेली आहे.

**४) पो.स्टे. पारडी पांलीसांची कामगीरी — चोरीचा गुन्हा उघडकीस आणल्याबाबत :**

फिर्यादी प्रशांत जगदीशनारायण दिक्षीत वय ५३ वर्ष रा. पुजा ट्रव्हल, गिजांजली स्कॉयलार हॉटेलचे बाजुला, नागपूर यांच्या भडारा रोड सुरुची मसाला कंम्पनी च्या मागे छोटी उमीया वसाहत येथे खाली प्लाट असुन लॉकडावुन च्या दरम्यान नमुद फिर्यादी यांची पुजा ट्रव्हल्सची ३० ते ३५ बसेस त्या ठिकाणी उभ्या होत्या. दिनांक ०१.०५.२०२१ चे १०.०० वा ते दिनांक ३०.०५.२०२१ चे ०९.०० वा चे दरम्यान कोणीतरी अज्ञात ईसामाने आत प्रवेश करुन पार्कीगच्या जागेत उभ्या असलेल्या बसेस मधुन १० नग पितळी साईबाबची मुर्ती, केबल वायर कि.अ. रू ५,०००/— तसेच ०१ नग एल.जी. कंम्पनीचा एल.ए.डी टिव्ही असा एकुण रू ६०,०००/— चा मुददेमाल चोरी करुन घेवुन गेल्याने अश्या फिर्यादीच्या

रिपोर्ट वरुन पो.स्टे. पारडी येथे अप.क्रं ३२२/२०२१ कलम ३७९ भा.दं.वि. प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.याबाबत ची माहीती पोलीस नियंत्रण कक्षा मार्फत प्रसारित करण्यात आली होती.

पो.स्टे. पारडी येथील नमुद कर्मचारी यांनी वरिष्ठाच्या मार्गदर्शनाखाली सदर गुन्हाचे तपासात दोन विधीसंघर्ष बालक यांना ताब्यात घेवुन त्यांच्या जवळुन १) १० नग साईबाबाची पितळी मुर्ती प्रत्येकी रू ३,५००/— प्रमाणे .एकुण रू ३५,०००/—, २) ०१ नग एल.जी कंम्पनीचा एल.ए.डी टि.व्ही कि.अ. रू २०,०००/— असा एकुण रू ५५,०००/— चा मुददेमाल जप्त केला आहे.

सदरची कामगीरी मा. पोलीस उपायुक्त परि क्र. ५ श्री निलोत्पल नागपूर शहर, मा. सहा. पोलीस आयुक्त कामठी विभाग श्री रोशन पंडीत यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि श्री सुनिल गांगुर्डे, सपोउपनि श्री सुरेंद्र तिवारी, नापोशि नरेंद्र तिडके, विश्वनाथ कुथे, रूपम टेंभेकर, पोशि शरद राघोर्ते, रूपेश थुल यांनी केली आहे.

**५) पो.स्टे. बजाजनगर पोलीसांची कामगीरी — देशीकट्टा जवळ बाळगणाऱ्या आरोपीस अटक केल्याबाबत :**

दिनांक १३.०६.२०२१ रोजी पोस्टे चे तपास पथकातील स्टाफ पेट्रोलिंग करीत असताना गुप्त बातमीदारामार्फत २३:४५ वा. दरम्यान माहिती मिळाली की, प्लॉट नं. ४, तात्या टोपे नगर, अत्रे ले आउट समोर, पो.स्टे.बजाज नगर, नागपूर शहर या ठिकाणी एक पिवळ्या रंगाचा हाफ बाह्याचा टी शर्ट व काळ्या रंगाचा पॅन्ट घातलेला इसम वय अंदाजे २५ वर्ष हा त्याचे कडील अवैध देशी कट्टा ग्राहकाला विकण्याकरीता येणार आहे. या माहितीवरून सपोनि रिजवान शेख, पोशि सुभाष गजभिये, नितेश वाकडे व दोन पंचांसह ००:१५ वा. मिळालेल्या खबरेप्रमाणे खाजगी वाहनाने रवाना झाले त्यानंतर प्लॉट नं. ४, तात्या टोपे नगर, अत्रे ले आउट समोर या ठिकाणी आले असता त्या ठिकाणी एक इसम सडपातळ बांध्याचा ज्याने अंगात एक पिवळ्या रंगाचा हाफ बाह्याचा टी शर्ट व काळ्या रंगाचा पॅन्ट घातलेला इसम मिळालेल्या खबरे प्रमाणे लाल रंगाच्या टू व्हीलर वर कोणाची तरी प्रतिक्षा करतांना आढळून आला. त्यास घेराव करून पकडून त्याला परिचय दिला व त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने आपले नाव सुगत उर्फ डीजे मधुकर सावरकर वय २५ वर्ष रा. प्लॉट नं. १४, आंबेडकर नगर, गायत्री मंदिर जवळ, लोखंडे नगर, पो.स्टे.प्रताप नगर, नागपूर शहर असे सांगितले. त्यास मिळालेल्या खबरीची माहिती देवून त्याची झडती घेणे बाबत सांगितले असता त्याने त्याची झडती घेण्यास हरकत नसल्याचे सांगितले. त्यामुळे त्याची अंगझडती घेतली असता त्याच्याकडे एक देशी कट्टा मिळून आला.

सदर गुन्हयात आरोपीकडे असलेला एक देसी कट्टा कि.अं. रू २०,०००/—, व एक टु व्हीलर बाईक कि.अं रू १००००/— असे एकुण रू ३०,०००/— चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कामगीरी मा. पोलीस उपायुक्त परिमंडळ क्र. १ श्री. नूरूल हसन नागपूर शहर, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त(सोनेगाव विभाग) श्री. पी.एम. कार्यकर्ते नागपूर शहर यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीमती शुभांगी देशमुख, सहायक पोलीस निरीक्षक श्री रिजवान शेख, पोउपनि श्री पराग फुलझेले, सफौ श्री राजेश बोंडे, योगेश तिवारी, पोहवा विजय मानापुरे, नापोशि सतीष ठाकुर, पोशि सुभाष गजभिये, नितेश वाकडे, नितीन राऊत, चालक सफौ अजय राठोड, पोशि अमित मुन यांनी पार पाडली आहे.

**६) जिल्हा नियोजन समिती निधीअंतर्गत प्राप्त वाहने व नविन पेट्रोलींग योजनेचा प्रारंभ मा. नामदार श्री नितीन राऊत, मंत्री, उर्जा, महाराष्ट्र राज्य, मुंबई तथा पालकमंत्री, जिल्हा नागपूर यांचे हस्ते झालेबाबत —**

आज दिनांक १४.०६.२०२१ रोजी सायंकाळी १६.३० वा जिल्हा नियोजन समिती निधीअंतर्गत प्राप्त वाहने व नविन पेट्रोलींग योजनेचा प्रारंभ मा. नामदार श्री नितीन राऊत, मंत्री, उर्जा, महाराष्ट्र राज्य, मुंबई तथा पालकमंत्री, जिल्हा नागपूर यांचे शुभहस्ते पोलीस मुख्यालय नागपूर शहर येथे पार पाडण्यात आला. सदर कार्यक्रमामध्ये मा. पोलीस आयुक्त, नागपूर शहर श्री. अमितेश कुमार यांनी मा. पालकमंत्री श्री नितीन राऊत व मा. आमदार श्री राजु पारवे(उमरेड मतदार संघ) यांचा पुष्पगुच्छ देवून स्वागत केले.

सदर कार्यक्रमामध्ये नागपूर शहराचे पोलीस आयुक्त श्री अमितेश कुमार यांनी कार्यक्रमामध्ये प्रस्तावीका मांडतांनी असे सांगीतले कि, जिल्हा नियोजन समिती, जिल्हा नागपूर यांचे

कडून नागपूर शहर पोलीस आयुक्तालयाला प्राप्त ७२ होंडा शाईन दुचाकी वाहने व १४ महिंद्रा बुलेरो चारचाकी वाहने खरेदी करण्यात आलेले आहे. सदर वाहनाचा वापर चार्ली पेट्रोलींग व पोलीस ठाणे दैनंदीन कामाकरीता वापर करण्यात येणार आहे. शहरातील दुचाकी पेट्रोलींगच्या स्वरूपामध्ये अमुलाग्र बदल करून नव्याने चार्ली पेट्रोलींग योजना आज पासून सुरू झाली आहे. सदर नविन पेट्रोलींग योजनेमध्ये ३३ पोलीस स्टेशन मधील एकुण ११६ बिट करीता ११६ चार्ली कार्यरत असणार आहे. प्रत्येक दुचाकी वाहनावर दिवसपाळी व रात्रपाळी करीता प्रत्येकी दोन पोलीस अंमलदार कार्यरत असणार आहे. तसेच नविन पेट्रोलींग वाहन हे फ्लॅश लाईट, सायरन, पी.ए. सिस्टमने सुसज्ज आहेत. नागपूर शहर पोलीस दलाचे आधुनिकीकरणासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येत आहे. सदर चार्ली अंमलदारांचे हे शहरातील अभिलेखावरील गुन्हेगार, हिस्ट्रीशिटर, हद्पार इसमांची वेळोवेळी तपासणी करणे, गर्दीचे ठिकाणी सतत पेट्रोलींग करणे, नागरीकांनी दिलेल्या तक्रारीबाबत योग्य दक्षता घेवून वेळीच कारवाई करणे, हद्दीतील ज्येष्ठ नागरीकांना वेळोवेळी भेटी देणे संवाद साधणे, पोलीस नियंत्रण कक्ष व वरिष्ठ अधिकारी यांनी बिनतारी संदेश द्वारे माहिती दिलेल्या घटनास्थळावर विनाविलंब पोहचून तक्रारीची दखल घेणे अश्या प्रकारचे कर्तव्य बजावीतील.

सदर कार्यक्रमामध्ये मा. नामदार श्री नितीन राऊत, मंत्री, उर्जा, महाराष्ट्र राज्य, मुंबई तथा पालकमंत्री, जिल्हा नागपूर यांनी आपल्या भाषणात असे सांगीतले कि, पालकमंत्री म्हणुन नागपूर शहराची व जिल्हयाची जबाबदारी माझी आहे. वर्ष २०२०—२०२१ मध्ये जिल्हा नियोजन समिती यांचेकडून रू १,६४,४९,०००/— चा निधी उपलब्ध करून दिला आहे. सदर दुचाकी वाहनावरील चार्ली यांना वेगळयाप्रकारचे गणवेश दिले असल्याने त्यांची ओळख वेगळया पध्दतीने होईल. बाजारपेठ, आमरस्त्यावर किंवा इतरत्र ठिकाणी महिलां विरूध्द होत असलेले अपराध व इतर अपराधाला आळा घालण्याच्या कामात सदर चार्ली उपयोगी पडतील.

सदर कार्यक्रमाचे संचालन मा. पोलीस उपायुक्त(मुख्यालय) श्री संदीप पखाले यांनी केले. सदर कार्यक्रमामध्ये नागपूर शहराचे मा. पोलीस आयुक्त श्री अमितेश कुमार यांचे सोबत मा. अपर पोलीस आयुक्त(गुन्हे) श्री सुनिल फुलारी, मा. अपर पोलीस आयुक्त(उत्तर विभाग) श्री नविनचंद्र रेड्डी, मा. अपर पोलीस आयुक्त(दक्षिण विभाग) डॉ. दिलीप झलके, मा. पोलीस उपायुक्त(विशेष शाखा) श्री बसवराज तेली, मा. पोलीस उपायुक्त(परि क्र. १) श्री नुरूल हसन, मा. पोलीस उपायुक्त(परि क्र. २) श्रीमती विनती साहु, मा. पोलीस उपायुक्त(परि क्र. ३) श्री लोहीत मतानी, मा. पोलीस उपायुक्त(परि क्र. ४) डॉ. अक्षय शिंदे, मा. पोलीस उपायुक्त(परि क्र. ५) श्री निलोत्पल, मा. पोलीस उपायुक्त(वाहतुक व प्रभारी डिटेक्शन) श्री सारंग आव्हाड तसेच नागपूर शहरातील सर्व सहायक पोलीस आयुक्त, पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार उपस्थीत होते.










**७) सायबर पोलीस स्टेशन यांनी सायबर गुन्हे व ऑनलाईन गेम्स या विषयावर वेबिनार घेतल्याबाबत :**

सायबर पोलीस स्टेशन, नागपूर शहर यांचे कडून **सायबर गुन्हे व ऑनलाईन गेम्स** या विषयावर पोद्दार वर्ल्ड स्कुल (**PODAR WORLD SCHOOL**) कोराडी रोड नागपूर शहर यांनी दि. १४/०६/२०२१ रोजी १०.३० वा ते १२:४५ वा पर्यंत ऑनलाईन गुगल मिट ॲपच्या व युटयुब लाईव्ह च्या साहाय्याने वेबीनार घेण्यात आला. सदरचे वेबिनार हे खालील महत्वाच्या विषयावर घेण्यात आलेला आहे

1) Importance of cyber Crime
2) Identity Theft (fake facebook ,insta id )
3) Psychological Tricks
4) SocialMediaFrauds (facebook,instagram,whatsapp,online friendship )
5) Mobile Application Frauds (small loan app, phone pe, paytm etc)
6) Online Banking frauds
7) Virus Attack on Personal Computer
8) General Tips to Keep you safe
9) Incident Reporting

सदर ऑनलाईन जनजागृती कार्यक्रमात ८०० ते ९०० विद्यार्थी व शिक्षक गुगल मिट ॲपच्या द्वारे यांनी ऑनलाईन उपस्थित राहुन वेबीनार चा लाभ घेतला. तसेच फेसबुक व युटयुब लाईव्ह च्या माध्यमाने १५०० च्या पेक्षा जास्त नागरीकांनी सदर जनजागृती कार्यक्रमाचे लाभ घेतला. यापुढेही लाखो लोक लाभ घेउ शकतील. यापूर्वी सायबर पोलीस स्टेशन नागपूर शहर तर्फे वरीष्ठ पोलीस निरीक्षक डॉ. अशोक बागुल पोलीस स्टेशन नागपूर शहर यांनी आता पर्यंत **६८ वेबिनार** तसेच प्रत्यक्ष जाऊन सेमिनार घेऊन नागरीकांमध्ये सायबर गुन्हयाविषयी जनजागृती केली आहे व नागरीकांना या सायबर गुन्हयापासून कशा प्रकारे सुरक्षित राहता येईल याची सुध्दा माहिती दिली आहे. तसेच आतापर्यंत लाखो नागरीकांना सदर आनलाईन जनजागृती कार्यक्रमाचा लाभ घेतला आहे.

सदरचे वेबिनार हे नागपूर शहराचे मा. पोलीस आयुक्त श्री अमितेशकुमार, मा. अपर पोलीस आयुक्त(गुन्हे) श्री सुनिल फुलारी यांचे आदेशान्वये मा. पोलीस उपायुक्त (आर्थिक/सायबर गुन्हे शाखा) श्री विवेक मासाळ यांचे मार्गदर्शनाखाली डॉ. अशोक बागुल, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, सायबर पोलीस स्टेशन, नागपूर शहर यांनी घेतले असून याकामी मनापोशि रिता ठाकुर, व पोशि महेंद्र सेलुकर यांनी या कामात मदत केली आहे.

## दिनांक १५.०६.२०२१ मंगळवार

**१) कुख्यात गुंड व धोकादायक व्यक्ती प्रणय उर्फ भडया वल्द सुरज चव्हाण, महाराष्ट्र झोपडपट्टीदादा, हातभट्टीवाले, औषधी द्रव्य विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, व्हीडीयो पायरेटस्, वाळु तस्कर आणि अत्यावश्यक वस्तुंचा काळा बाजार करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालणे संबंधी अधिनियम सन् १९८१ (सुधारणा २०१५ चे) (महा. एल.व्ही. १९८१) अंतर्गत स्थानबध्द् :**

नागपुर शहराचे पोलीस आयुक्त यांनी दिनांक १५/०६/२०२१ रोजी जारी केलेल्या आदेशान्वये पोलीस ठाणे इमामवाडा, नागपूर चे हद्दीत शरीराविरूध्द व मालमत्तेविरूध्द गुन्हे करणारा कुख्यात गुंड नामे प्रणय उर्फ भडया वल्द सुरज चव्हाण, वय २२ वर्ष, रा. रामबाग कॉलोनी, अरूणबाबा मठाजवळ, पोलीस स्टेशन इमामवाडा, नागपूर शहर यास महाराष्ट्र झोपडपट्टीदादा, हातभट्टीवाले, औषधी

द्रव्य विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, व्हीडीयो पायरेटस्, वाळु तस्कर आणि अत्यावश्यक वस्तुंचा काळा बाजार करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालणे संबंधी अधिनियम सन् १९८१ (सुधारणा २०१५ चे) महा. एल.व्ही. १९८१) अंतर्गत दिनांक १५/०६/२०२१ रोजी स्थानबध्द आदेश पारीत केला. त्यास दिनांक १५/०६/२०२१ रोजी आदेशाची बजावणी करून नागपूर मध्यवर्ती कारागृहात ठेवण्यात आले आहे.

प्रणय उर्फ भडया वल्द सुरज चव्हाण, याचेविरूध्द पोलीस स्टेशन इमामवाडा येथे खुनाचा प्रयत्न करणे, दरोडयाची पुर्व तयारी करणे, दरोडा टाकणे करीता एकत्र जमणे, जबरी चोरी करणे, लोकसेवकाला त्याचे कर्तव्य पार पाडण्यापासून धाकाने परावृत्त करण्यासाठी हमला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग करणे, लोकसेवकाला त्याच्या कर्तव्यापासून धाकाने परावृत्त करण्यासाठी इच्छापूर्वक दुखापत पोचवणे, मालमत्ता नष्ट करण्याच्या उद्देशान विस्तव किंवा स्फोटक पदार्थ याद्वारे आगळीक करणे, आपखुशीने घातक शस्त्राने किंवा साहित्याने दुखापत करणे, मारपीट करणे, शांतता भंग घडवून आणण्याच्या उद्देशाने अपमान करणे, अपराधीक जिवे मारण्याची धमकी देणे, नुकसान करणे, अपराध्याला वाचविण्यासाठी गुन्हयाचा पुरावा नाहीसा करण्याची तजवीज करणे किंवा खोटी माहीती देणे, बेकायदेशीर जमावाचा सदस्य असणे, जमावामध्ये सशस्त्र असणे, दंगा करण्याबद्दल शिक्षेची तरतुद, प्राणघातक हत्यारांसह सज्ज होऊन दंगा करणे, समान उद्दीष्ठ साधण्यासाठी केलेल्या अपराधाबद्दल बेकायदेशीर जमावाचा प्रत्येक सभासद दोषी असतो, निष्काळजीपणाने केलेल्या कृतीमुळे जिवनासाठी धोकादायक रोगाचा संसर्ग पसरविणे, सरकारी नोकराने जारी केलेल्या आदेशाची अवहेलना करणे, घातक हत्यार जवळ बाळगणे, मनाई आदेशाचे उल्लंघन करणे, इत्यादी मालमत्तेविरूध्दचे तसेच षरीराविरूध्दचे गंभीर स्वरूपाचे अनेक गुन्हे दाखल आहेत.

सदर स्थानबध्द इसमाविरूध्द सन २०२० मध्ये इमामवाडा पोलीसांकडून त्याच्याविरूध्द ११० (ई),(ग) फौ.द.प्र.सं अन्वये प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती. परंतु त्याचेवर केलेल्या प्रतिबंधक कारवाईचा कोणताही परिणाम झाला नाही. त्याने गैरकायदेशीर व धोकादायक गुन्हे करण्याची प्रवृत्ती निरंतर सुरूच ठेवली आहे. अलीकडील काळात त्याने पोलीस स्टेशन इमामवाडा हद्दीत जबरी चोरी करणे, अपराधीक जिवे मारण्याची धमकी देणे, घातक हत्यार जवळ बाळगणे, मनाई आदेषाचे उल्लंघन करणे इत्यादी अशा स्वरूपाचे गुन्हे केलेले आहेत.

अशाप्रकारे धोकादायक व्यक्ती नामे प्रणय उर्फ भडया वल्द सुरज चव्हाण, याची अपराधीक कृत्ये निरंतर वाढत असल्याने आणि त्यामुळे सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण होत असल्याने मा. पोलीस उपायुक्त परिमंडळ क्रं. ४ डॉ. अक्षय शिंदे यांचे मार्गदर्शनाखाली, व.पो.नि., मुकुंदा एम. साळुंखे, वरिष्ठ पोलीस स्टेशन इमामवाडा, नागपूर शहर यांनी नमुद आरोपीतास स्थानबध्द करण्याकरिता गुन्हे शाखेस अहवाल सादर केला होता. मा. अपर पोलीस आयुक्त, दक्षिण प्रादेशीक विभाग, श्री दिलीप कृ. झळके नागपूर शहर यांचे मार्फतीने सादर केला असता मा. अपर पोलीस आयुक्त(गुन्हे) श्री सुनिल फुलारी नागपूर शहर यांचे निर्देशान्वये व मा. पोलीस उपायुक्त श्री. गजानन शिवलींग राजमाने यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हेशाखेतील एम.पी.डी.ए. विभागाने नमुद आरोपीला स्थानबध्द करण्याकरीता प्रस्ताव सादर केला त्याअन्वये स्थानबध्द प्राधिकारी नागपूर शहराचे मा. पोलीस आयुक्त श्री. अमितेश कुमार यांचे समक्ष सादर केले असता त्यांनी वर नमुद गुंडाविरूध्द स्थानबध्दतेचा आदेश पारित करून त्यास येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे येथे ठेवण्याबाबत आदेश दिलेत. त्याअन्वये स्थानबध्द प्राधिकारी नागपूर शहराचे मा. पोलीस आयुक्त श्री. अमितेश कुमार यांनी वर नमुद इसमाविरूध्द स्थानबध्दतेची महत्वपुर्ण कारवाई करून त्यास सध्या नागपूर मध्यवर्ती कारागृहात ठेवण्यात आले आहे.

**२) पो.स्टे. पारडी पोलीसांची कामगीरी — वाहन चोरीचे दोन गुन्हे उघडकीस आणल्याबाबत :**

दिनांक १४.०६.२०२१ चे ११.३० वा चे सुमारास पो.स्टे दिवसपाळी स्टॉफ हा आरोपीतांच्या शोधात पो.स्टे हददीत पेट्रोलिग करीत असतांना नागेश्वर नगर, पाण्याच्या टाकी जवळ दोन ईसम दुचाकीवर संशयास्पद स्थितीत जातांनी दिसले. त्यास थांबण्यास सांगितले असता त्यातील एक ईसम हा दुचाकी गाडी सोडुन पळुन गेला व एका ईसमास स्टॉफच्या मदतीने ताब्यात घेण्यात आले. त्यास येण्याचे कारण व वाहनाबाबत विचारले असता उडवाउडविचे उत्तर देवुन लागले त्यास वाहनासोबत ताब्यात घेवुन पोलीस स्टेशन ला आणुन सखोल विचारपुस केली असता त्यांनी दुचाकी वाहन हे दिनांक १०/०६/२०२१ रोजी पोलीस स्टेशन हुडकेश्वर हददीतुन आपला एक बंटी नावाचा मित्र सोबत चोरी केल्याचे सांगितले. याबाबत ची माहीती पोलीस नियंत्रण कक्षा मार्फत प्रसारित करण्यात आली होती.

पोलीस स्टेशन हुडकेश्वर येथे विचारपुस केली असता नमुद वाहन चोरी बाबत गुन्हे दाखल असल्याची माहीती मिळाली. पो.स्टे. पारडी येथील नमुद कर्मचारी यांनी वरिष्ठाच्या मार्गदर्शनाखाली सदर गुन्हाचे तपासात एक विधीसंघर्ष बालक यांना ताब्यात घेवुन त्यांच्या जवळुन १) स्पेंन्डर मोटारसायकल क्र एम.एच./३१/बी.झेड./१५६९ कि.अ. रू २०,०००/—, २) स्पेंन्डर मोटारसायकल क्र एम.एच/३१/सी.झेड/३०७८ कि.अ. रू २०,०००/— चा मुददेमाल जप्त केला आहे.

सदरची कामगीरी मा. पोलीस उपायुक्त परि क्र. ५ श्री निलोत्पल नागपूर शहर, मा. सहा. पोलीस आयुक्त कामठी विभाग श्री रोशन पंडीत यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री सुनील गांगुर्डे, पोउपनि श्री मुकेश ढोबळे, नापोशि विजय लांडे, रूपेश टेंभेकर, पोशि मनोज रेहपांडे, रूपेश थुल, विप्लव नाग यांनी केली आहे.

<u>३) पो.स्टे. कळमना पोलीसांची कामगीरी — वाहन चोरीचे दोन गुन्हे उघडकीस आणल्याबाबत :</u>

दिनांक १४/०६/२०२१ रोजी पोउपनिरी अनिल इंगाले पो स्टे कळमना नागपुर सोबत स्टॉफ चे सह पो स्टे हद्दित सर्तक पेट्रोलिंग दरम्यान दुर्गा नगर, भवनी नगर कडे जाणाऱ्या रोडवर एक लाल रंगाचे शर्ट फुलपॅन्ट घातलेला १५ वर्षीय अल्पवयीन बालक एका पांढऱ्या रंगाचे गाडी चालवितांना अंदाजे १५/०० वाजता दिसुन आला. त्यास संशयावरून सोबत स्टाफ चे मदतीने ताब्यात घेवुन त्याला पळण्याचे कारण विचारले. त्याने सांगितले की माझे जवळ असलेली पांढऱ्या रंगाची ॲक्टीवा गाडी क्रं एम.एच/४९/ए.जी/४१२१ कि अं रू ५०,०००/— ही चोरीची असुन मी ती गाडी अंदाजे १२, १३ दिवसा अगोदर शहीद चौक, इतवारा येथुन चोरली होती. तसेच मी एक आणखी ॲक्टीवा गाडी क्रं एम.एच/४९/डब्लु/८२४६ ही सुरज नगर, स्वामी नारायण मंदिर चे मागुन चोरली होती व ती गाडी मी माझा मित्र १७ वर्षीय अल्पवयीन बालक हयाचे कडुन रू ४००/— घेवुन त्याचे घरी गाडी ठेवलेली आहे. १७ वर्षीय बालकाचे घरी गेले असता तो घरी हजर मिळुन आला व त्याचे घरी त्याचे ताब्यात असलेली चोरीची पांढऱ्या रंगाची ॲक्टीवा गाडी क्रं एम.एच/४९/डब्लु/८२४६ कि अं. रू ५०,०००/— ची लागलीच दोन पंचासमक्ष जप्ती फॉर्म प्रमाणे जप्त करून ताब्यात घेतली. अश्या प्रकारे एकुण दोन ॲक्टीवा गाडया एकुण किमंती रू १,००,०००/— जप्त करण्यात आल्या.

सदरची कामगीरी मा.पोलीस उपायुक्त परीमंडळ क्र.०५ श्री.निलोत्पल, मा. सहायक पोलीस आयुक्त (कामठी विभाग) श्री.रोशन पंडीत नागपूर शहर याचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री नरेंद्र निस्वादे, पोउपनि श्री अनिल इंगोले, पोहवा दिलीप जाधव, चंद्रशेखर यादव, नापोशि प्रशांत गभने, प्रफुल ढवळे, धनराज सिंगुरवार, अजय शुक्ला, पोशि प्रशांत लांजेवार यांनी केली आहे.

<u>४) पो.स्टे. तहसील पोलीसांची कामगीरी — जबरी चोरीचा गुन्हा उघडकीस आणून आरोपींना अटक केल्याबाबत :</u>

दिनांक २४.०५.२०२१ चे २१.०० वा चे सुमारास फिर्यादी नरेंद्र विठ्ठल हिवसे वय ३७ वर्ष रा. तलंगखेडी, तह. पारशिवणी, जि. नागपूर हे आपले सासुरवाडी जात असतांना त्यांना लघुशंका आल्याने ते लघुशंखा करणेकरीता गेले असता १) मो.मुस्तकीन उर्फ मदार वल्द अब्दुल फहीम वय २१ वर्ष रा. नालसाब चौक श्रीराम शाळे समोर, नागपूर, २) शेख अरशद वल्द शेख ईरशाद वय १९ वर्ष रा. नालसाब चौक, जामीया अरबीया शाळे जवळ, नागपूर यांनी संगनमत करून फिर्यादी जवळून जबरीने त्यांच्या खिश्यातील एक विवो कंपनीचा मोबाईल, काळया रंगाचे पॉकेट नगदी पैसे व एक्टीवा गाडी असा एकुण रू २२,७००/— चा मुद्‌देमाल जबरीने हिसकावून पळून गेले. असा फिर्यादीच्या रिपोर्ट वरून पो. स्टे तसहील येथे अप.क्र. ४४४/२०२१ कलम ३९२,३४ भा.द.वि प्रामणे गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर गुन्हयाचा तपासा दरम्यान पो.स्टे. हद्दीत गस्त करीत असतांना गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, यातील नमुद आरोपी क्र. १ हा गार्ड लाईन बगदादी शाह बाबा दर्गा जवळ बसलेला आहे. अशा मिळालेला माहिती वरून स्टॉफसह नमुद ठिकाणी पहोचलो असता त्यातील आरोपी गुन्हयातील जबरीने चोरून नेलेल्या वाहनासह दिसुन आल्याने त्यास स्टॉफच्या मदतीने ताब्यात घेवून पो. स्टे ला आणुन वरील नमुद गुन्हयाबाबत विचारपूस केली असता त्यांने सदरचा गुन्हा त्याचा साथीदार नामे शेख अरशद वल्द शेख इरशाद याच्यासह मिळून केल्याचे सांगितल्याने त्याचा साथीदार शेख अरशद रा. नालसाब चौक, जामिया अरबीया शाळे जावळ येथे जावून त्यास नमुद गुन्हयात अटक करण्यात आली.

व गुन्हयात जबरीने हिसकावून नेलेला मुददेमाल जप्त करण्यात आला. तसेच गुन्हयाचे तपासा दरम्यान यातील आरोपीतांनी पो.स्टे. तहसील दाखल अप.क्र. ४८६/२०२१ क. ३७९ भा.द.वि. चा गुन्हा केल्याची कबुली दिल्याने नमुद आरोपीतां कडूण गुन्हयात चोरीस गेलेले वाहन एक्टीवा गाडी क्र. एम. एच/४९/बी.ए/ ३८९० कि.अं. रू २५,०००/— ची जप्त करण्यात आली असा नमुद आरोपीतां कडूण एकूण रू ४२,०००/— चा मुददेमाल हस्तगत करण्यात आला.

सदरची कामगीरी मा. पोलीस उपायुक्त परि क्र. ३ श्री लोहीत मतानी, मा. सहा. पोलीस आयुक्त कोतवाली विभाग श्री संजय सुर्वे यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि श्री जयेश भांडारकर, पोनि श्री बलीरामसिंग परदेशी, पोउपनि श्री स्वप्नील वाघ, पोहवा लक्ष्मण शेंडे, नापोशि किशोर गरवारे, सचिन टापरे, पोशि नजीर शेख, पंकज डबरे, ईकबाल शेख यांनी केली आहे.

## <u>दिनांक १६.०६.२०२१ बुधवार</u>

### <u>१) पो.स्टे. गणेशपेठ पोलीसांची कामगिरी :</u>

दिनांक ०९.०६.२०२१ चे २०.०० वा चे सुमारास फिर्यादी संजय बनवारीलाल शर्मा वय ५८ वर्ष रा. चांडक ले आउट, प्लॉट नं. २१, नागपूर यांनी आपली एक पांढ—या रंगाची ॲक्टीवा आय गाडी क्र. एम.एच.४९/एन.—३०१८ कि.अ. १५,०००/— रू अशा वर्णनाची आपल्या राहते घरा समोर लॉक करून पार्क करून ठेवली होती दुसऱ्या दिवशी डयूटी वर जाणे करीता गाडी पाहिली असता गाडी पार्क केलेल्या ठिकाणी दिसुन आली नाही. आजुबाजूला शोध घेतला मिळून आली नाही. नमुद पांढ—या रंगाची ॲक्टीवा आय गाडी क्र. एम.एच.४९/एन.—३०१८ ही कोण्यातरी अज्ञात चोरटयाने चोरून नेली. अशा फिर्यादीच्या रिपोर्ट वरून गुन्हा कलम ३७९ भादवी प्रमाणे दाखल करण्यात आला.

नमुद गुन्हयाचे तपासा दरम्यान पो.स्टे. हददीत आरोपी चेंकीग व पेट्रोलींग करीत असताना दरम्यान कॉटन मार्केट कल्पना वाईन शॉप चे मागुन प्रथम नमूद गून्हातील पांढऱ्या रंगाची ॲक्टीव्हा आय गाडी कं. एम. एच ४९ एन ३०१८ दोन पंचासमक्ष जप्ती पत्रकाप्रमाणे जप्त करण्यात आली.

तसेच तपासा दरम्यान नमूद गुन्हातील पिसिआर मधिल अटक आरोपी विक्रम उर्फ विक्की मनोहर नखाते, वय २० वर्ष रा. सौर वार्ड शिव मंदीर जवळ तुमसर जि. भंडारा याचे कडील माहीतीनुसार यातील आरोपी क्र. ०२ सूमित उर्फ सॅनिटायजर मुकेश गौर वय २१ वर्ष रा. पाचपावली पहीला रेल्वे फाटक हनूमान मंदीर मागे पोस्टे पाचपावली नागपूर ला ताब्यात घेण्यात आले.

आरोपी क्र. ०२ याचे कडून ममोरंडम पंचनाम्या प्रमाणे पाचपावली भागातून चोरलेली एक कथ्या रंगाची ॲक्टीवा गाडी जी चोरी केली होती ती १) ॲक्टीवा मोपेड गाडी क्र. एम. एच ४९ ए वाय ६७२४ या प्रमाणे असून कि. अं ४५,०००/— रु जप्त करण्यात आली.

तसेच त्याचे कडूनच एक पाढ—या रंगाची ॲक्टीवा गाडी क्र. एम एच ३१ इ बि २७७९ किं. अ १०,०००/— रु अशी सुध्दा जप्त करण्यात आली आहे.

अप क्र. १९६/२०२१ कलम ३७९ भादवि च्या गून्हातील गाडी सूध्दा त्यानेच चोरी केली असल्याचे निष्पन्न झाली असून ते पोस्टे समूद्रपूर येथून हिरो डिलक्स वाहन क्र. एम एच ३८ आर ३५९८ काळ्या रंगाची कि.अ. १५,०००/—रू अशी जप्त करण्यात आली आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस उपायुक्त(परि.क्र ३) श्री लोहीत मतानी यांचे मार्गदर्शनाखली व.पो.नि. श्री भारत क्षीरसागर, पोउपनि श्री अरंविद कोल्हारे, पोहवा राजेंद्र बनकर, पोहवा राजेश चिमोटे, नापोशि प्रशांत गजभिये, अंकुश चौधरी, प्रविण शेळके, संतोष बंगाळे, योगेश सातपूते, पोशि राकेश कोलते, राजेश यादव यांनी केली आहे.

### <u>२) पो.स्टे. एमआयडीसी पोलीसांची कामगिरी :</u>

दिनांक १४.०६.२०२१ रोजी मा. पोलीस उपायुक्त.(परि. क्र.१) श्री. नुरूल हसन यांचे हस्ते पो.स्टे. एम.आय.डी.सी मधील वेगवेगळया गुन्हयातील आरोपी कडुन जप्त मुद्येमालाचे फिर्यादी यांना हस्तातरण करण्यात आले.

१) अप.क्र. १०३/२०२१ कलम ४५७,३८० भा.दं.वि.मधिल फिर्यादी नामे अरुण महंगु सिंग याना सोन्याची चैन वजनी ६.६० ग्राम

२) अप.क्र.७७/२०२१ कलम ४५७,४५४,३८० भा.दं.वि. मधिल फिर्यादी श्याम चाडगे यांना

१) एक सोन्याची जेंन्टस् अंगठी वनज ४.८० ग्रॅम

२) एक सोन्याची लेडीज अंगठी वजनी ३.९० ग्रॅम
३) एक सोन्याचे मंगळसुत्राचे पदक व पीटीओ मनी वजनी ३.९४० ग्राम
४) सोन्याची नथ वजनी १ ग्रॅम
५) सोन्याचे टॉप्स वजनी २.५९० ग्रॅम असा एकुण १५.४८ ग्रॅम चा मुदेमाल.
३) अप.क्र.७०८/१९ कलम ४५४,४५७,३८० भा.दं.वि. मधिल फिर्यादी वासुदेव जुगनाहाके याना
१) एक तीन सरी सोन्याचे मंगळसुत्र असलेले तसेच सोन्याचे तारे मध्ये काळे मनी लावलेले वजनी २५.६३० ग्रॅम मुदेमाल

असा सर्व मुदेमाल मा. पोलीस उपायुक्त(परि. क्र. १) नागपुर शहर श्री नुरूल हसन यांचे हस्ते फिर्यादी यांना वाटप करण्यात आलेले आहे.




**३) मा. पोलीस उपायुक्त परि क्र. ५ यांचे विशेष पथकाची कामगीरी** –

मा. पोलीस उप–आयुक्त श्री. निलोत्पल परी.क्र.०५ नागपूर शहर यांनी स्थापन केलेल्या विशेष पथकातील सपोनि विजय व्ही. भिसे तसेच स्टाफ– नापोशि सुरज भारती, दिनेश यादव, हरीश इंगळे, चेतन जाधव, पोशि रविंद्र असे मिळुन दि. १५.०६.२०२१ रोजी पो.स्टे कळमना हद्दीत पेट्रोलिंग करीत असतांना गुलशन नगर गुलशन नगर चौक, पोस्टे कळमना, नागपूर शहर या ठिकाणी गुप्त बातमीदारांमार्फत माहिती मिळाली की, मा. पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्रमांक ४, नागपूर शहर यांनी लेखी आदेश क्रं पोउपआ/परि–४/७३०/२०२१, दि. २९/०१/२०२१ अन्वये पोलीस आयुक्तालय नागपूर शहर हद्दीतुन १ वर्षा करीता तडीपार असलेला इसम नामे मयुर जाधव हा गुलशन नगर, पोस्टे कळमना परीसरात फिरत आहे. प्राप्त माहितीचे अनुशंगाने सापळा लावुन लपतछपत नमुद ठिकाणी स्टॉफसह गेलो असता नमुद आरोपी हा त्याचा नातेवाईक यांच्या घरासमोर मिळून आल्याने त्यास ताब्यात घेण्यात आले. सदरच्या आरोपीस पंचासमक्ष त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने त्याचे नाव– मयुर गजु जाधव वय २३ वर्ष रा. साईबाब नगर, प्लॉट नं.१४३, जयसंतोषी किराणा जवळ, खरबी, पोस्टे वाठोडा, नागपूर शहर असे सांगितले. यावरून संबंधीत अभिलेखाची तपासणी केली असता नमुद आरोपी पोस्टे वाठोडा येथुन तडीपार असल्याची खात्री झाली.

नमुद तडीपार आरोपी नामेः– मयुर गजु जाधव वय २३ वर्ष रा. साईबाब नगर, प्लॉट नं.१४३, जयसंतोषी किराणा जवळ, खरबी, पोस्टे वाठोडा, नागपूर शहर याने सक्षम प्राधिकारी– मा. पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्रमांक ४, नागपूर शहर यांचे आदेश क्र. पोउपआ/परि–४/७३०/२०२१, दि. २९/०१/२०२१ अन्वये काढलेल्या तडीपार आदेशाचे उल्लंघन केले असल्याने नमुद आरोपी विरूध्द कलम १४२ महाराष्ट्र पोलीस कायदा अन्वये पोस्टे कळमना येथे गुन्हा नोंद करण्यात आला.

सदरची कारवाई मा. पोलीस उपायुक्त परिमंडळ ५ श्री निलोत्पल नागपूर शहर यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकातील सपोनि विजय व्ही. भिसे, नापोशि सुरज भारती, दिनेश यादव, हरीश इंगळे, चेतन जाधव, पोशि रविंद्र राउत यांनी केलेली आहे.

**४) पो.स्टे. बेलतरोडी पोलीसांची कामगीरी** –

फिर्यादी डॉ. तुशार सदाषिव पांडे, वय ४८ वर्षे रा. प्लॉट नं. ०८ पायोनिअर रेसिडन्सी पार्क, हॉटेल एअर पोर्ट सेंटर पॉईट जवळ,सोमलावाडा,पो.स्टे.सोनेगाव, नागपूर व त्याची पत्नी हे व्यवसायाने डॉक्टर असुन, त्यांचे पोस्टे हददीत उत्कर्ष मॅटर्निटी होम प्लॉट नं. ०३ जयहिंद सोसायटी

काचोरे लॉन जवळ मनिशनगर नागपुर येथे हॉस्पीटल आहे. दि. ११/०६/२०२१ रोजी १७:३० वा चे सुमारास त्यांचे हॉस्पीटल मध्ये एक कुरीअर आले त्यामध्ये फिर्यादी यांचे दोन मुलांचे जीवाचे बदल्यात एक करोड रुपयाची खडंणी आणि पोलिसांना माहीती दिल्यास जीवे ठार मारण्याची धमकी असे खंडणी आणि धमकी चे पत्र प्राप्त झाले अश्या फिर्यादीचे रिपोर्ट वरुन अज्ञात इसमाविरुध्द अप क्रं. २३७/२१ कलम ३८५,३८७,५०६(ब) भादवि प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचे तपासात अनोळखी आरोपीचा शोध घेत असता ज्या कुरीयर मधुन सदरचे लिफाफा पाठविण्यात आला त्या ठिकाणापासुन चौभागातील सिसिटीव्ही कॅमेराची पाहणी करीत असता त्यात एक होन्डा ॲक्टीवा मोपेड गाडीवरील संशईत महिला निष्पन्न झाली सदर महिलेचा तिचे मार्गावरील सिसिटिव्ही कॅमेराचे मार्फतीने शोध घेतला असता सदर महिलेजवळ ९५९३ नंबर ची मोपेड गाडी असल्याचे दिसुन आले सदर महीला ही युको बॅक, मनिष नगर चे समोर शिल्पा सोसायटीकडे जात असल्याचे दिसुन आल्याने सिसिटीव्ही कॅमेराचे तांत्रिक विश्लेषन आणि नमुद क्रमाकाचे वाहनाचा शोध घेत असता. शिल्पा सोसायटी, येथे नमुद क्रमाकाची दुचाकी आढळुन आल्याने त्या दुचाकी वरील महिलेस ताब्यात घेवुन सदर गुन्हयाबाबत तपास केला असता त्यांनी सदर गुन्हयाची माहीती दिल्याने त्यांना गुन्हयात अटक करण्यात आलेली आहे. सदर गुन्हयाचे तपसामध्ये तिने गुन्हयात वापरलेली तिची होन्डा ॲक्टीवा कि.अं. ४०,०००/—रुपये ही मालमत्ता शोध जप्ती नमुना प्रमाणे जप्त करुन तिला सदर गुन्हयात अटक करण्यात आली. असुन गुन्हयाचा तपास सुरु आहे.

सदरची कारवाई नागपूर शहराचे मा. पोलीस आयुक्त श्री. अमितेश कुमार नागपुर शहर, मा. अपर पोलिस आयुक्त(दक्षिण प्रभाग) डॉ श्री. दिलीप झळके, मा. अपर पोलिस आयुक्त(गुन्हे) श्री सुनिल फुलारी नागपुर शहर यांचे निर्देशान्वये मा. पोलिस उपआयुक्त परी. क्रं. ०४ डॉ अक्षय शिंदे, मा. सहा पोलिस आयुक्त(अजनी विभाग) डॉ. निलेश एस. पालवे यांचे मार्गदर्शनामध्ये वरीष्ठ पोलिस निरिक्षक श्री विजय प्र. आकोत, पोउपनि विकास अ. मनपिया, पोहवा तेजराम देवळे, अविनाश ठाकरे, रंणधीर दिक्षीत, शैलेश बडोदेकर, मिलिंद पटले, मपोहवा वंदना लोटे नापोशि गोपाल देशमुख, कमलेश गणेर, बजरंग जुनघरे, नितिन बावणे, प्रशांत सोनुलकर, पोशि राजेन्द्र नागपुरे, कुणाल लाडंगे, सर्व पोस्टे बेलतरोडी नागपुर तकनिकी सहाय्य :— नापोशि दिपक तऱ्हेकर आणि नापोशि मिथुन नाईक सायबर विभाग कार्यालय पोउपआ परी. क्रं. ०४ नागपुर शहर यांनी केली.

## <u>दिनांक १७.०६.२०२१ गुरूवार</u>

**<u>१) अलंकार सभागृह, पोलीस मुख्यालय, नागपूर शहर येथे "विशेष तक्रार निवारण दिन" आयोजन केल्याबाबत :—</u>**

मा. पोलीस आयुक्त, नागपूर शहर श्री अमितेश कुमार यांनी दिनांक १७.०६.२०२१ रोजी १०.०० वा अलंकार सभागृह, पोलीस मुख्यालय, नागपूर शहर येथे **"विशेष तक्रार निवारण दिन"** चे आयोजन केले होते. **विशेष तक्रार निवारण दिनानिमित्त** जनतेस आव्हान करण्यात आले होते की, पोलीस स्टेशन येथे दिलेल्या अर्ज संबंधाने कार्यवाही झाली किंवा नाही. पोलीस स्टेशन येथे सुरू असलेला किंवा झालेला तपास व्यवस्थीत झाला किंवा नाही. कोणताही गुंड किंवा समाजकंटक इसम, कोणत्याही प्रकारचे अवैद्यधंदे करणारे इसम, सायबर गुन्हे, आर्थिक गुन्हे, वाहतूक संबंधाने किंवा इतर कोणतीही तक्रार मा. पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांच्या समक्ष मांडण्याची संधी नागपूर शहरातील नागरीकांना उपलब्ध करून देण्यात आली.

नागपूर शहरातील नागरीकांनी चांगल्या प्रमाणात **"विशेष तक्रार निवारण दिन" ला** प्रतीसाद देवून सदर कार्यक्रमात नागरीकांकडून एकुण १५८ अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी वॉट्सअप व ईमेंलव्दारे १०७ अर्ज प्राप्त झाले होते. काही करणास्तव ज्या नागरिंकानी इ—मेल व्दारे किंवा व्हॉटस्ॲप वर अर्ज पाठविले नव्हते असे ५१ नागरिंकांनी सदर कार्यक्रमात त्यांचे लेखी अर्जा सह उपस्थित राहुन त्यांचे अर्ज दिले व त्यांनी मा. पोलीस आयुक्त यांचे समक्ष आपल्या तक्रारी मांडल्या. मा. पोलीस आयुक्त यांनी सर्व नागरिकांच्या तक्रारी समक्ष ऐकून त्यांचे तक्रारीचे निवारण केले.

सदर कार्यक्रमात मा. पोलीस आयुक्त नागपूर शहर श्री अमीतेश कुमार, मा. अपर पोलीस आयुक्त श्री सुनील फुलारी (गुन्हे), मा. अपर पोलीस आयुक्त श्री नविनचंद्र रेंड्डी (उत्तर विभाग), मा. अपर पोलीस आयुक्त श्री दिलीप झलके (दक्षिण विभाग), मा. पोलीस उपायुक्त श्री. सारंग आवाड

(वाहतुक), मा. पोलीस उपायुक्त श्री बसवराज तेली (विशेष शाखा), मा. पोलीस उपायुक्त परि. क्र. १ श्री. नुरूल हसन, मा. पोलीस उपायुक्त परि. क्र. २ श्रीमती विनीता साहु, मा. पोलीस उपायुक्त परि. क्र. ३ श्री. लोहीत मतानी, मा. पोलीस उपायुक्त परि. क्र. ४ डॉ. श्री. अक्षय शिंदे, मा. पोलीस उपायुक्त परि. क्र. ५ श्री. निलोत्पल, मा. पोलीस उपायुक्त आर्थीक गुन्हे श्री विवेक मासाळ, मा. पोलीस उपायुक्त मुख्यालय डॉ. श्री. संदीप पखाले, सर्व मा. सहा. पोलीस आयुक्त व पोलीस स्टेशनचे सर्व वरिष्ठ पोलीस निरीक्षक तसेच इतर अधिकारी व कर्मचारी सदर कार्यक्रमात उपस्थीत होते.





**२) पो.स्टे. पाचपावली पोलीसांची कामगीरी – २ किलो ९०० ग्रॅम गांजासह आरोपींना अटक केल्याबाबत :**

दिनांक १५.०६.२०२१ चे १४.३० वा ते १७.३० वा दरम्यान फिर्यादी पोहवा नंदकिशोर वालदे नेमणुक पो.स्टे. पाचपावली, नागपूर शहर हे स्टाफसह पोस्टे हददीत पेट्रोलीग करीत असतांना सिध्दार्थनगर लायब्ररी, जयभिम पार्क चौक, भितीलगत सार्वजनिक ठिकाणी टेका, पोस्टे पाचपावली, नागपुर शहर, येथे आरोपी क्र १) अनिलकुमार मोहनलाल चौकसे वय ३७ वर्ष रा.गाव कैकाडा तहसिल छपरा, पोस्टे आदिगाव, जिल्हा शिवनी, मध्यप्रदेश, २) बेनिसिंग मुन्नीलाल गज्जाम वय ५२ वर्ष रा. पहाडीटोला, तहसिल छपरा, पोस्टे आदिगाव, जिल्हा शिवनी, मध्यप्रदेश, ३) पालीयो कार एमएच/३१/ए.एच/५१८३ चा चालक हे एक चार चाकी शेंदरी रंगाची गाडी क्र. एमएच/३१/ए. एच/५१८३ जवळ संशयास्पद उभे असलेले दिसुन आले वरून दोन पंचासमक्ष एन.डी.पी.एस. कायदयाचे अंतर्गत तरतुदींचे तंतोतंत पालन करून त्याची झडती घेतली असता, घटनास्थळी जप्ती पंचनामा प्रमाणे सदर आरोपीचे ताब्यातुन १) एका कापडी पिशवीत २ किलो ९०० ग्रॅम गांजा किं. अं. रू २९,०००/–, २) एक पालीयो कार एमएच/३१/ए.एच/५१८३ किं. अं. रू २,००,०००/–, ३) एक काळया रंगाची स्पेल्डर गाडी एमएच/४९/बि.ई/४१५८ कि. रू ३०,०००/–, ४) रोख रक्कम रू ६५०/– असा एकुण रू २,५९,६५०/– चा मुददेमाल मिळुन आल्याने तो अंमली पदार्थ विरोधी कायदयान्वये जप्त करून त्यास ताब्यात घेवुन त्याचे विरूध्द कलम ८(ब) २०(II)(ब), २९ एन.डी.पी. एस. कायदा अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

सदरची कारवाई मा. पोलीस उपायुक्त परिमंडळ क्र. ३ श्री.लोहीत मतानी, मा. सहा. पोलीस आयुक्त(लकडगंज विभाग) श्री. सचिन थोरबोले नागपूर शहर यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.संजय मेंढे, पोउपनि श्री प्रमोद खंडार, पोहवा नंदकिशोर वालदे, छगन सिंगणे, नापोशि सुनिल ठाकुर, संजय मिश्रा, पोशि रोशन फुकट, संजय बरेले यांनी केलेली आहे.

## दिनांक १८.०६.२०२१ शुक्रवार

### १) गुन्हे शाखा, युनिट क्र. ४ पोलीसांची कामगिरी :

गुंन्हे शाखा, युनिट क्रमांक ०४, नागपूर शहर चे पथक दिनांक १७/०६/२०२१ रोजी पथक प्रमुख वरीष्ठ पोलीस निरीक्षक संजय अढाऊ यांचे मार्गदर्शनात, नागपूर शहरामध्ये अवैध धंदे करणारे, हद्दपार आरोपी तसेच गुन्हेगार यांचे शोधात विशेष पेट्रोंलिग करत असतांना १६.०० वा चे सुमारास माहिती मिळाली की पो.स्टे वाठोडा हद्दीत चांदमारी येथे सरकारी शौचालय जवळ ३९२ चा प्रकार झालेला आहे व फिर्यादी यांचेकडील ७०,०००/— रू नगदी तीन इसमांनी चाकुचा धाक दाखवून जिवाने ठार मारण्याची धमकी देवून जबरीने चोरून नेल्याचे समजले. गुन्हयातील नमुद फिर्यादी यास भेटुन गुन्हयाचे संबंधाने विचारपुस केली. घटनेबाबत माहिती घेत असतांना फिर्यादीच्या सांगण्यात विसंगती व संशय दिसुन आले. अधिक संशय आल्याने त्यास ताब्यात घेवून युनिट कार्यालयात बोलावुन विश्वासात घेवुन सखोल विचारपुस केली.

नमुद फिर्यादीने पंचासमक्ष सांगितले की तो राजेश सेल्स एजेन्सी येथे मार्केटींग सेल्समनचे काम करतो. दुकानदाराकडे असलेले बॅलन्स बिल वसुल करून ते एजेंसी मध्ये दररोज भरतो. दिनांक १३.०६.२०२१ रोजी टिमकी येथील राधेकृष्ण ट्रेडर्स येथुन बिलाचे ५८ हजार रूपये रविवार असल्याने एजेंन्सीमध्ये भरले नाही. फिर्यादीला ऑनलाईन तीन पत्ती जुगार खेळण्याची सवय असल्याने त्याने ते पैसे त्याचा मित्र अतुल वाटकर याचं अकाऊटमध्ये टाकले तो जुगार/गेम हारत गेला आणि त्याचे युको बॅक खाता क्र. ०३६७०११००८५५३० मधुन ऑनलाईन पध्दतीने डेबिट होत गेले. फिर्यादी कडे एजन्सीला देणे करीता पैसे शिल्लक नव्हते. त्यामुळे त्याने दिनांक १७.०६.२०२१ रोजी वाठोडा हद्दीतील चांदमारी रोडवर सरकारी शौचालय जवळ माझे जवळील ७०,०००/— रू. अज्ञात ३ चोरटयांनी चाकुचा धाक दाखवुन जबरीने हिसकावून नेल्याबाबत खोटी माहिती देवुन तक्रार केली होती.

अश्याप्रकारे फिर्यादी याने कबुल केल्याने तसेच त्याचे मोबाईल मध्ये पैशाचा सर्व रेकॉर्ड मिळाल्याने ऑनलाईन जुगार तीन पत्ती खेळण्याची सवय असलेल्या फिर्यादीच्या खोटया रिपोर्टचा गुंता अवघ्या काही तासात सोडविला व जबरी चोरीचा गुन्हा उघडकीस आणला अशी सदर पथकाने प्रशंसनीय कामगीरी केलेली आहे.

सदरची करवाई नागपूर शहराचे मा. अपर पोलीस आयुक्त(गुन्हे) श्री. सुनिल फुलारी, यांचे निर्देशान्वये मा. पोलीस उपायुक्त श्री. सारंग आव्हाड, सहाय्यक पोलीस आयुक्त(डिटेक्शन) श्री भिमानंद नलावडे यांचे मार्गदर्शनाखाली पोनि श्री संजय अढाऊ, सपोनि विजय कसोधन, पोउपनिरी अतुल इंगोले, नाअमंलदार दिपककुमार चोले, युवानंद कडु, सचिन तुमसरे, अविनाश ठाकुर, अंमदलार विलास चिंचुरकर, चालक लिलाधर भेंडारकर, श्रीकांत मारवाडे यांनी केली आहे.

### २) पो.स्टे. पाचपावली पोलीसांची कामगिरी :

पो.स्टे. पाचपावली येथे दिनांक १५/०६/२०२१ रोजी फिर्यादी अक्षय प्रकाश मोरे वय २६ वर्ष रा. आदिवासी गल्ली नं. २ तुकडोजी चौक विश्वकर्मा नगर पो.स्टे. अजनी नागपूर यांनी पो.स्टे. ला येवून तक्रार दिली की, दि.१४/०६/२०२१चे १८:०० वा.ते दि. १५/०६/२०२१ चे ०८:०० वा.दर फिर्यादी काम करीत असलेल्या त्यांचे मामाचे लिकर शॉप के.बी.दंदे कंट्री लिकर शॉप, प्लॉट नं. १०७१ बिनाकी वैशाली नगर पो.स्टे. पाचपावली नागपूर येथील कोणीतरी अज्ञात इसमाने शटरचे एका बाजूचे लॉक तोडुन शटर उचकटुन संमतीशिवाय आत प्रवेश करून ३ दारूच्या पेट्या व ड्रावर मधील रोख रक्कम ७,००० रू. असा एकूण १४,६०० रू. चा मुद्देमाल लबाडीच्या इराद्याने चोरी केला. अशा फिर्यादीने दिलेल्या रिपोर्ट वरून अज्ञात आरोपीविरूध्द गु.क.

सदर गुन्हयाचे तपासादरम्यान गुन्हयातील अज्ञात आरोपीचा शोध व्हावा या करीता सदर भागात गुप्त बातमीदार नेमण्यात आले. घटनास्थळाचे आजूबाजूचे सी.सी.टि.व्ही फुटेजची सुध्दा पाहणी करण्यात आली. आरोपीचा व चोरीस गेलेल्या मालाचा शोध व्हावा या करीता तपास पथकांनी अथक परीश्रम घेतले. सदर गुन्हा दाखल झाल्यानंतर अवघ्या १२ तासाचे आत गुप्त बातमीदाराने दिलेल्या माहीतीच्या आधारे अज्ञात आरोपीबाबत गोपनिय रित्या माहीती काढुन आरोपी लक्की लक्की ऊर्फ गुज्जर पवीत गौरे, वय १९ वर्ष रा. नई बस्ती मंगळवारी बाजार दुर्गा दैवी मंदीर मागे सरकारी संडास जवळ पो.स्टे.सदर नागपूर याचा शोध घेवून त्यास मोठया शिताफीने ताब्यात घेवून गुन्हयासंबधी बारकाईने विचारपूस करून आरोपीकडुन गुन्हयातील चोरीस गेलेल्या मालापैकी ७२ देशी दारूच्या बॉटल एकूण कि.अं.

३,६०० रू. चा तसेच आरोपीने पो.स्टे.सदर हद्दीतुन चोरी केलेली व सदरचा गुन्हा करतेवेळी वापरलेली दुचाकी ॲक्टीवा गाडी क्र. एम.एच.३१/सी.डब्ल्यु.१६०४ कि.अं. ५०,००० रू. ची असा एकूण ५३,६०० रू. चा मुद्देमाल जप्त करून आरोपीस सदर गुन्हयात अटक करून गुन्हा उघडकीस आणला. आरोपीचा एम.सी.आर करण्यात आला असुन गुन्हयाचा पुढील तपास सुरू आहे

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त श्री. लोहीत मतानी, परिमंडळ क्र.३ नागपूर शहर, मा. सहा. पोलीस आयुक्त, लकडगंज विभाग, श्री. सचीन थोरबोले यांचे मार्गदर्शनात, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.संजय मेंढें, क्राईम पोनि. श्री.रवि नागोसे, पोउपनि. प्रमोद खंडार, पोहवा.संतोषसिंग ठाकूर, नापोशि. अमित सातपूते, पोशि.नितीन वर्मा, राकेश सिंग यांनी केलेली आहे.

<u>३) पो.स्टे. कळमणा पोलीसांची कामगिरी :</u>

दिनांक १६.०६.२०२१ चे १११५ वाते ११४५ वा दरम्यान एन डि पी एस ॲक्टचे तरतुतीचे तंतोतंत पालन करून दोन पंचासमक्ष आरोपी मनोज रामाधार चिल्लारे वय ३७ वर्ष रा. डिप्टी सिंग्नल बंजरंग चौक प्लॉटं न. ११७७/१५३ नागपूर ची अंगझडती घेतली असता घटनास्थळ अंगझडती जप्ती पंचनाम्याप्रमाणे त्याचे ताब्यातुन एका पाढऱ्या रंगाचे प्लॅास्टीक पन्नीत ८४ ग्रॅम गांजा किमंती अंदाजे ८,५००/— रु चा मिळुन आल्याने ताब्यात घेण्यात आला व वेळीच २४ ग्रॅम गांजा सी ए परिक्षणासाठी वेगळा काढुन सी ए परिक्षणाकरीता पाठविण्याची तजविज ठेवली आहे. सदरची फिर्याद ही टंकलिखित असुन ती पथम खबर संबोधण्यात येवुन कायदोपत्री सामील करण्यात येते सदर नमुद इसमा कडे नमुद माल मिळुन आल्याने त्याचे हे कृत्य कलम ८(क), २०, एनडीपीएस ॲक्ट १९८५, प्रमाणे होत असल्याने गुन्हा दाखल करण्यात आला.

सदर गुन्हयाचे तपासा दरम्यान यातील आरोपीला आपल्या विश्वासात घेवुन विचारपुस केली असता त्याने गुन्हयाचे व्यतिरिक्त गुन्हा केल्याची कबुली देण्याचे दर्शविल्याचे दोन पंचासमक्ष कबुली नोंदवुन मेमोरंडम जप्ती पंचनाम्याप्रमाणे पो स्टे चे १) अपराध क्रं ४०३/२०२१ कलम ४५४, ४५७, ३८० भादवि, २) अपराध क्रं ४०६/२०२१ कलम ४५४, ४५७, ३८० भादवि, मधील १) दोन सोन्याची अंगठी वजनी अंदाजे ४ ग्रॅम किमंती अंदाजे ३२,०००/— रु २) एक सोन्याची नाकातील नथ वजनी अंदाजे २.० ग्रॅम किमती अंदाजे ८,०००/—रु ३) एक सोन्याची नाकातील नथ वजनी अंदाजे २.५ ग्रॅम किमंती अदाजे १०,०००/—रु ४) एक सोन्याचे लहान मुलाचे हाताचे मनगटि वजनी १.५ ग्रॅम किमंती अंदाजे ४,५००/—रु ५) एक चांदिचा कमरपटा वजनी अंदाजे २ तोडे किमंती अंदाजे १,६००/—रु ६) एक चांदिची पायपट्टी वजनी ४ तोळा किमंती अंदाजे ३,२००/— रु ७) तीन चांदीची ब्रेसलेट प्रत्येकी वजनी ५ ग्रम किमंती अंदाजे ७,०००/—रु असा एकुण ७४,८००/—रु चा माल माल जप्त करण्यात आला.

सदरची कामगीरी मा. पोलीस उपायुक्त श्री. निलोत्पल, परीमंडळ क्र.०५, मा. सहायक पोलीस आयुक्त श्री. रोशन पंडीत, कामठी विभाग नागपूर याच्या मार्गदर्शनाखाली श्री. नरेन्द निस्वादे पोलीस निरीक्षक गुन्हे, अनिल इंगोले पोलीस उपनिरीक्षक, पो.हवा दिलीप जाधव, पो.हवा चंदशेखर यादव, ना.पो.शि.प्रशांत गभने, ना.पो.शि प्रफुल ढवळे, ना.पो.शि धनराज सिंगुवार, ना.पो.शि अजय शुक्ला, मनापोशि ललिता खोब्रागडे, पो.शि. प्रशांत लांजेवार यांनी केली आहे.

<u>.दिनांक १९.०६.२०२१ शनिवार</u>

<u>१) कुख्यात गुंड व धोकादायक व्यक्ती दुर्गेश उर्फ कमल वल्द प्रकाश पसेरकर, महाराष्ट्र झोपडपट्टीदादा, हातभट्टीवाले, औषधी द्रव्य विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, व्हीडीयो पायरेटस्, वाळु तस्कर आणि अत्यावश्यक वस्तुंचा काळा बाजार करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालणे संबंधी अधिनियम सन् १९८१ (सुधारणा २०१५ चे) (महा. एल.व्ही. १९८१) अंतर्गत स्थानबध्द् :</u>

नागपुर शहराचे मा. पोलीस आयुक्त श्री अमितेश कुमार यांनी दिनांक १७/०६/२०२१ रोजी जारी केलेल्या आदेशान्वये पोलीस ठाणे प्रतापनगर, नागपूर चे हद्दीत शरीराविरूध्द व मालमत्तेविरूध्द गुन्हे करणारा कुख्यात गुंड नामे दुर्गेश उर्फ कमल वल्द प्रकाश पसेरकर वय ४५ वर्षे रा. प्लॉट नं. २३, तिवारी ले—आऊट, हिंगणा टी पॉईंट जवळ, हिंगणा रोड, पो.स्टे. राणाप्रतापनगर, नागपूर शहर यास महाराष्ट्र झोपडपट्टीदादा, हातभट्टीवाले, औषधी द्रव्य विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, व्हीडीयो

पायरेटस्, वाळु तस्कर आणि अत्यावश्यक वस्तुंचा काळा बाजार करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालणे संबंधी अधिनियम सन् १९८१ (सुधारणा २०१५ चे) महा. एल.व्ही. १९८१) अंतर्गत दिनांक १७/०६/२०२१ रोजी स्थानबध्द आदेश पारीत केला. त्यास दि. १९/०६/२०२१ रोजी आदेशाची बजावणी करून नागपूर मध्यवर्ती कारागृहात ठेवण्यात आले आहे.

दुर्गेश उर्फ कमल वल्द प्रकाश पसेरकर याचेविरूध्द पोलीस स्टेशन इमामवाडा, अंबाझरी, प्रतापनगर, सोनेगाव, हुडकेश्वर येथे खुनाचा प्रयत्न करणे, मालमत्ता नष्ट करण्याच्या उद्देशाने आग लावणे, संपत्तीचे नुकसान करणे, जबरी चोरी करतांना दुखापत करणे, दिवसाची घरफोडी करणे, रात्रीची घरफोडी करणे, चोरी, मारपीट करणे, अश्लील भाषेत शिवीगाळ करणे, शांतता भंग घडवून आणण्याच्या उद्देशाने अपमान करणे, अपराधीक धमकी देणे, अपराधीक जिवे मारण्याची धमकी देणे, घातक हत्यार जवळ बाळगणे, इत्यादी मालमत्तेविरूध्दचे तसेच शरीराविरूध्दचे गंभीर स्वरूपाचे अनेक गुन्हे दाखल आहेत.

सदर स्थानबध्द इसमाविरूध्द सन २०१८ मध्ये अंबाझरी पोलीसांकडून त्याच्याविरूध्द ११० (ई),(ग) फौ.दं.प्र.सं अन्वये प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती. तरीही त्याने प्रतिबंधक कारवाई उल्लंघन करून गैरकायदेशीर व धोकादायक गुन्हे करण्याची प्रवृत्ती निरंतर सुरूच ठेवली आहे. अलीकडील काळात त्याने पोलीस स्टेशन सोनेगाव व हुडकेश्वर हद्दीत खुनाचा प्रयत्न करणे, घर जाळण्याच्या उद्देशाने आग लावणे, जबरी चोरी करतांना दुखापत करणे, अश्लील भाषेत शिवीगाळ करणे, नुकसान करणे, मारपीट करणे, शांतता भंग घडवून आणण्याच्या उद्देशाने अपमान करणे, अपराधीक धमकी देणे, अपराधीक जिवे मारण्याची धमकी देणे, घातक हत्यार जवळ बाळगणे, इत्यादी अशा स्वरूपाचे गुन्हे केलेले आहेत.

अशाप्रकारे धोकादायक व्यक्ती नामे दुर्गेश उर्फ कमल वल्द प्रकाश पसेरकर याची अपराधीक कृत्ये निरंतर वाढत असल्याने आणि त्यामुळे सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण होत असल्याने मा. पोलीस उपायुक्त (परिमंडळ क्रं. १) श्री नूरूल हसन यांचे मार्गदर्शनाखाली, व.पो.नि. दिनकर ठोसरे, वरिष्ठ पोलीस स्टेशन प्रतापनगर, नागपूर शहर यांनी नमुद आरोपीतास स्थानबध्द करण्याकरिता गुन्हे शाखेस प्रस्ताव सादर केला होता. मा. अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रादेशीक विभाग) श्री दिलीप कृ. झळके नागपूर शहर, यांचे मार्फतीने सादर केला असता नागपूर शहराचे मा. अपर पोलीस आयुक्त(गुन्हे) श्री. सुनिल फुलारी यांचे निर्देशान्वये व मा. पोलीस उपायुक्त (गुन्हे प्रकटीकरण) श्री. सारंग आवाड यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हेशाखेतील एम.पी.डी.ए. विभागाने नमुद आरोपीला स्थानबध्द करण्याकरीता प्रस्ताव सादर केला त्याअन्वये स्थानबध्द प्राधिकारी नागपूर शहराचे मा. पोलीस आयुक्त श्री. अमितेश कुमार यांचे समक्ष सादर केले असता त्यांनी वर नमुद गुंडाविरूध्द स्थानबध्दतेचा आदेश पारित करून त्यास औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह, औरंगाबाद येथे ठेवण्याबाबत आदेश दिलेत. त्याअन्वये स्थानबध्द प्राधिकारी नागपूर शहराचे मा. पोलीस आयुक्त श्री. अमितेश कुमार यांनी वर नमुद इसमाविरूध्द स्थानबध्दतेची महत्वपुर्ण कारवाई करून त्यास सध्या नागपूर मध्यवर्ती कारागृहात ठेवण्यात आले आहे.

**२) पो.स्टे. शांतीनगर पोलीसांची कामगीरी – घरफोडीचा गुन्हा उघडकीस आणून आरोपींना अटक केल्याबाबत :**

दिनांक २०.०४.२०२१ चे २१.३० वा ते २२.१५ वा चे दरम्यान फिर्यादी कृष्णा श्यामसुंदर झा वय ३० वर्ष रा. शांतीनगर, तुलसी नगर, प्लॉट न १९३, काली माता मंदिरचे सामोर, पो. स्टे.शांतीनगर, नागपुर शहर यांनी पो.स्टे.ला रिपोर्ट दिली की ते नमुद पत्यावर त्यांचे मोठे वडील ब्रजकिशोर झा व मोठी आई कृपादेवी झा, वहीनी मिनाक्षी झा आणी त्यांचे दोन लहान मलांसोबत राहतात त्यांचे मम्मी पापा मुदलियार ले आउट मधे त्यांचे जुळा भाउ बलराम झा यांच्या सोबत राहतात. दि. १६/०४/२०२१ ला बिहार सितामणी येथे त्यांचे भाच्याचे लग्न असल्याने ते दि.१०/०४/२०२१ ला त्यांचे मोठे वडील व मोठी आई आणी मुले व मोठा भाउ बलराम असे लग्नाला गेले होते. त्यांची डयुटी असल्याने ते व बलराम आज दि. २०/०४/२०२१ रोजी सकाळी ०९.३० घरी परत आले व बलराम त्यांच्या मम्मी पापा च्या घरी चालला गेला घरी तो एकटाच होता.

दि. २०/०४/२०२१ रोजी संध्याकाळी फिर्यादीचा दोस्त निलेश दिक्षीत, जतीन बंम्बलानी, परिक्षीत म्हैत्रे आणी आकाश संतानी असे सर्व त्यांचे घरी आय.पी.एल क्रिकेट मैच बघत होते. क्रिकेट ची पहली इनिंग संपल्यावर त्यांचे मित्र घरी चालले गेले आणी फिर्यादी रात्री ०९.३० वा. घरच्या दरवाज्याला

आणी कम्पाउन्ड गेट ला ताला लावुन जेवन करण्याकरीता त्यांचे मम्मी पापा चे घरी पैदल गेला जेवन केलयानंतर रात्री १०.१५ वा. च जवळपास तो घरी आला व कंपाउन्ड गेट चा कुलूप उघडुन घरी गेला तेव्हा घराचे मेन दरवाजा ची कुंडी तुटलेली दिसली आणी लॉक खाली पडलेले होते दरवाजा अर्धा उघडा होता ते अंदर गेले असता त्यांना खालचे दोन्ही बेडरुम च्या आलमारी उघडया दिसल्या व सामान विखुरलेले दिसले त्याचप्रमाणे वरच्या मजल्यावरील दोन्ही बेडरुम च्या आलमारी उघडया दिसल्या आणी सामान अस्तव्यस्त होते त्यामुळे त्यांनी पोलीसांना फोन केला तेव्हा पोलीस तेथे आले त्यांचे मोठे वडील व मोठी आई यांना फोन वर विचारपुस केली असता खालच्या दोन्ही आलमारीमधुन सोन्या चांदीचे दागीने व नगदी रू ५०,०००/— असा एकुन रू ५,१०,०००/— चा माल चोरुन नेला फिर्यादीचे रिपोर्ट वरून गुन्हा कलम ४५७,३८० भा.द.वि चा गुन्हा दाखल केला.

सदर गुन्हयामध्ये गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशीर माहीती प्राप्त झाली कि सदरचा गुन्हा हा सराईत गुन्हेगार रूपेश पांडे व अब्दुल रहमान उर्फ रम्मु याने केला आहे. करिता सदर घटनास्थळावर मिळालेले फिंगर प्रिंट हे नमुद संशयीत आरोपीचे फिंगर प्रिन्ट सोबत जुळल्याने आरोपी क्र. ०१ नामे रुपेश नंदकिशोर पांडे वय २७ वर्ष रा. शांतीनगर कॉलनी, पो.स्टे.शांतीनगर, नागपूर यास सदर चा गुन्हयात मध्ये अटक करण्यात आली.

तसेच यातील आरोपी क्र १ सोबत मिळुण घरफोडी करणारा आरोपी क्र २) अब्दुल रहमान उर्फ रम्मु वल्द अब्दुल रज्जाक वय ३० वर्ष रा. शांतीनगर, मुदलीयार ले आउट, नरेश पानठेल्याजवळ, पो. स्टे.शांतीनगर, नागपूर यास गुप्त बातमीदामार्फत माहीती प्राप्त करून त्यास कावरापेठ रेल्वे क्रॉसींग रेल्वे लाईन वरून सापळा रचुन ताब्यात घेण्यात आले

यात नमुद दोन्ही आरोपीतांना सदर गुन्हयात कायदेशिररित्या अटक करून आरोपीने सदरचा गुन्हा केल्याचे कबुली निवेदण दिल्याने मेमोरंडम जप्ती पंचनामा प्रमाणे सदर आरोपीतांनकडुन सदर गुन्हयातील चोरीस गेलेला मुद्देमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला आहे.

तसेच यातील आरोपी क्र २ अब्दुल रहमान उर्फ रम्मु वल्द अब्दुल रज्जाक वय ३० वर्ष रा. शांतीनगर, मुदलीयार ले आउट, नरेश पानठेल्याजवळ, पो.स्टे. शांतीनगर, नागपूर हा पो.स्टे.शांतीनगर येथे दाखल अप.क्र १४१/२०२१ कलम ३९९,४०२ भादवी सहकलम ४+२५ भाहका मध्ये सुध्दा पाहीजे असल्याने त्यास सदर गुन्हयामध्ये सुध्दा अटक करण्याची तजबिज ठेवण्यात आली आहे. तसेच यात नमुद आरोपी क्र २ याने पो.स्टे. नंदनवन परिसरामध्ये दिनांक १८/०५/२०२१ रोजी अंदाजे रात्री ९.०० वा. दरम्यान प्रकाश शाहु नावाचा इसमास शस्त्राने मारून जखमी केले आहे असे कबुल केल्यावरून पो. स्टे.नंदनवन येथे गुन्हे अभिलेख चेक केले असता पो.स्टे. नंदनवन येथे अप.क्र २६७/२०२१ कलम ३०७,३४ भादवी चा गुन्हा दाखल असुन त्यामध्ये तो फरार आहे. तशी माहीती पो.स्टे.नंदनवन यांना देण्यात आली आहे.

सदर ची कामगीरी मा. पोलीस उपायुक्त (परिमडळ क्र ३) श्री लोहीत मताणी नागपुर शहर, मा. सहा. पोलीस आयुक्त (लकडगंज विभाग) श्री सचिन थोरबोले नागपुर शहर यांचा मार्गदर्शणाखाली वपोनि श्री जि.जे. जामदार, पोउपनि श्री अरूण बकाल, पोहवा अब्दुल वकिल शेख, नापोशि विनोद समदुरे, प्रकाश पखान, पोशि प्रविण जाधव यांनी केलेली आहे.

<u>३) मा. पोलीस उपायुक्त परि क्र. ५ यांचे विशेष पथकाची कारवाई —</u>

मा. पोलीस उपायुक्त परी.क्र.०५ श्री. निलोत्पल नागपूर शहर यांनी स्थापन केलेल्या विशेष पथकातील सपोनि विजय व्ही. भिसे तसेच स्टाफ नापोशि सुरज भारती, दिनेश यादव, हरीश इंगळे, चेतन जाधव, पोशि रविंद्र असे मिळुन पो.स्टे यशोधरानगर हद्दीत प्रोव्हीशन, जुगार व अवैद्य धंदयांवर कार्यवाही करीता पेट्रोलिंग करीत असताना दि. १८/०६/२०२१ रोजी विटाभट्टी चौक, नागपूर येथे गुप्त बातमीदारांकडून माहिती मिळाली की धम्मदिप नगर, बिनाकी मंगळवारी पोस्टे यशोधरानगर या ठिकाणी लाला चव्हाण नावाचा इसम हा त्याच्या राहत्या घरी कोणताही परवाना नसतांना अवैद्यरीत्या दारु बाळगुन ग्राहकांना दारु विक्री करत आहे. अशा खात्रीलायक बातमीवरून रेड केली आरोपी शैलेश उर्फ लाला रमेश चव्हाण वय ४७ वर्ष रा. धम्मदिप नगर, नागमंदीर च्या मागे, पोस्टे यशोधरानगर, नागपुर शहर याचे घरातील हॉल मध्ये ठेवलेल्या आलमारी च्या बाजुला वेग—वेगळया प्लास्टीक च्या लाल पिवळया बोरी मध्ये व खाकी रंगाच्या खड्र्यामध्ये खालील प्रमाणे देशी दारूचा माल मिळुन आला.

१) देशी दारू संत्री५०००, च्या १८० एम.एल, प्रत्येकी कि.६०/—रू प्रमाणे ४८ नग काचेची

बॉटल एकुण कि. रू २,८८०/— चा प्रोब्हीशन मुद्येमाल, २) देशी दारू संत्री ५०००, च्या ९० एम. एल, प्रत्येकी कि.३०/—रू प्रमाणे ३३० नग प्लॉस्टीक बॉटल एकुण कि. रू ९,९००/— चा प्रोब्हीशन मुद्येमाल असा एकुण कि. रू १२,७८०/— प्रोब्हीशन मुद्देमाल मिळुन आला.

आरोपी शैलेश उर्फ लाला रमेश चव्हाण वय ४७ वर्ष रा. धम्मदिप नगर, नागमंदीर च्या मागे, पोस्टे यशोधरानगर, नागपुर शहर हा अवैद्यरित्या विनापरवाना उपरोक्त प्रोब्हीशन मुद्येमाल बाळगुन ग्राहकांना विक्री करतांनी मिळुन आल्याने पोस्टे यशोधरानगर येथे कलम ६५(ई) महाराष्ट्र.दारुबंदी कायदा प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला

सदरची कारवाई ही परिमंडळ ५, नागपूर शहर च्या विशेष पथकातील सपोनि विजय व्ही. भिसे व पथक नापोशि सुरज भारती, दिनेश यादव, हरीश इंगळे, चेतन जाधव, पोशि रविंद्र राउत यांनी मा. पोलीस उप आयुक्त श्री. निलोत्पल परिमंडळ ५, नागपूर शहर यांच्या मार्गदर्शनाखाली केलेली आहे.

<u>दिनांक २०.०६.२०२१ रविवार</u>

**<u>१) पोलीस मुख्यालय, नागपूर शहर स्थित अलंकार सभागृह येथे INTEGRATED ROAD ACCIDENT DATABASE (iRAD) Android ॲप चे प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यात आलेबाबत</u>**

रस्ते अपघाताचे विश्लेषन करण्यासाठी केंद्र शासनाच्या MORTH कडून INTEGRATED ROAD ACCIDENT DATABASE (iRAD) Android ॲप IIT चेन्नई च्या सहकार्याने विकसीत करण्यात आले असून हा प्रकल्प संपुर्ण भारतात सुरू करण्यात आलेला आहे.

पोलीस मुख्यालय, नागपूर शहर स्थित अलंकार सभागृह येथे INTEGRATED ROAD ACCIDENT DATABASE (iRAD) Android ॲप चे प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यात आले होते. प्रशिक्षणा करीता पोलीस आयुक्तालय नागपूर शहर येथील एकुण ३३ पोलीस स्टेशन मधील एकुण १०७ पोलीस अधिकारी/अंमलदार हजर होते. National Informatics Centre (NIC) चे अधिकारी श्री हरीश अय्यर आणि श्री नितेश तायवाडे यांनी पोलीस स्टेशनला दाखल होणारे प्राणांतिक/गंभीर/किरकोळ/विनादुखापत चे गुन्हे iRAD Android ॲप मधे कसे भरावे याबाबत प्रशिक्षण दिले. प्रशिक्षण सत्रात नागपूर शहराचे मा. पोलीस उपायुक्त(वाहतुक) श्री सारंग आवाड यांनी सुध्दा मार्गदर्शन केले.

आजपावेतो नागपूर शहर पोलीस दलातील एकुण १९२ पोलीस अधिकारी/अंमलदारांनी iRAD Android ॲप चे प्रशिक्षण घेतलेले आहे. प्रशिक्षण घेतलेल्या पोलीस अधिकारी/अंमलदारांकडून अद्यापावेतो एकुण १०२ रस्ते अपघाताची माहिती iRAD Android ॲप मध्ये भरण्यात आलेली आहे.

iRAD Android ॲप मध्ये प्राणांतिक/गंभीर/किरकोळ/विनादुखापत रस्ते अपघाताची माहिती भरण्यात येणार असुन भविष्यात ॲप मधील डाटा चे विश्लेषण करून रस्ते अपघातास आळा बसविण्यात मदत होईल. जेणेकरून नागरिकांचे प्राण वाचविण्यास व गंभीर जखमी होण्याचे प्रमाण सुध्दा कमी होण्यास मदत होईल.



<u>दिनांक २१.०६.२०२१ सोमवार</u>

<u>१) पो.स्टे. पारडी पोलीसांची कामगीरी — वाहन चोरीचे दोन गुन्हे उघडकीस आणल्याबाबत :</u>

दिनांक १९.०६.२०२१ चे १८.३० वा चे सुमारास पोलीस स्टेशनचा दिवसपाळी स्टॉफ हा आरोपीतांच्या शोधात पो. ठाणे हद्दीत पोट्रोलिंग करीत असतांना प्रकाश कृषी विद्यालय पो.स्टेशन पारडी बाजुस असलेल्या रोडवर दोन ईसम दुचाकीवर संशयास्पद स्थितीत जातांनी दिसुन आले त्यास थांबण्यास सांगितले असता त्यातील एक ईसम हा दुचाकी गाडी सोडुन पळून गेला व एका ईसमास स्टॉफच्या मदतीने ताब्यात घेण्यात आले. तो विधीसंघर्ष बालक होता. त्यास येण्याचे कारण विचारले असता उडवाउडविचे उत्तर देवु लागला. त्यास वाहनासोबत ताब्यात घेवुन पोलीस ठाणे ला आणुन सखोल विचारपुस केली असता त्यांनी नमुद अॅक्टीवा वाहन क्र. एम.एच/४९/ए.एम/६७८७ हे दिनांक १३/०६/२०२१ रोजी पोलीस ठाणे कळमणा हद्दीतुन व होन्डा डिवो वाहन क्र. एम.एच/४९/ए. झेड/३३८५ ही दिनांक १७/०६/२०२१ रोजी पोलीस ठाणे नंदनवन हद्दीतुन त्याचा मित्र १७ वर्षीय विधीसंघर्ष बालक सोबत चोरी केल्याचे सांगितले याबाबत ची माहीती पोलीस नियंत्रण कंक्षा मार्फत प्रसारित करण्यात आली होती. पोलीस स्टेशन कळमणा व नंदनवण येथे विचारपुस केली असता नमुद वाहन चोरी बाबत गुन्हे दाखल असल्याची माहीती मिळाली.

पो.स्टे. पारडी येथील नमुद कर्मचारी यांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली सदर गुन्हयाचे तपासात एक विधीसंघर्ष बालक यांना ताब्यात घेवुन त्यांच्या जवळुन १) होन्डा अॅक्टीवा क्र. एम. एच/४९/ए.एम/६७८७ कि.अ.रू ३०,०००/—, २) होन्डा डिवो क्र एम.एच/४९/ए.झेड/३३८५ कि. अ. रू २०,०००/— अश्या प्रकारे एकुण दोन दुचाकी वाहन ताब्यात घेवुन एकुण रू ५०,०००/— चा मुददेमाल जप्त केला आहे.

सदरची कामगीरी मा. पोलीस उपायुक्त परि क्र. ५ श्री निलोत्पल नागपूर शहर, मा. सहा. पोलीस आयुक्त कामठी विभाग श्री रोशन पंडीत यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि श्री सुनील गांगुर्डे, सपोउपनि श्री सुरेंद्र तिवारी, नापोशि नरेंद्र तिडके, विश्वनाथ कुथे, राजेश नाईक, पोशि रूपेश थुल, मनोज रेहपाडे यांनी केली आहे.

<u>२) पो.स्टे. कळमना पोलीसांची कामगीरी — दुखापत करून जबरी चोरी व दोन वाहन चोरी असे तीन गुन्हे उघडकीस आणल्याबाबत :</u>

दिनांक २९/०५/२०२१ रोजी फिर्यादी रिंकु उर्फ चंदन अरून खैरकर वय ४१ वर्षे रा. प्लॉट नं. ९५, शिवकृपा हाऊसिंग सोसायटी, हस्तीनापुर विटाभट्टीचे जवळ, पो.स्टे.कळमणा, नागपुर यांनी पोलीस स्टेशन कळमना येथे येवुन फिर्याद दिली की, फिर्यादी हे २९.०५.२०२१ चे १४.०० वा चे सुमारास आपल्या मालकीच्या बकऱ्या विटा भट्टीचे जवळ चारत असतांना एका मोटार सायकल वर ट्रिबल सिट तिन मुले आलेत. त्याचेपैकी एका मुलाने बकरी उचलुन मोटार सायकलवर बसुन निघाले. फिर्यादीने त्यांचे पॅशन प्रो मोटार सायकलने पाठलाग केला असता त्यांचा श्री. मोहन माकडे यांचे डुप्लेक्स स्कीम हस्तीनापुर जवळ तोल जावुन ते मोटार सायकलसह खाली पडले. त्या तिन मुलांमध्ये चेतन ठाकुर, शोहेब नावाचा मुलगा व त्याचे साथीदार यांना पकडण्याचा प्रयत्न केला असता त्यांनी फिर्यादीस मारहाण करून शोहेब नावाच्या मुलाने त्याचे जवळील चाकु काढुन फिर्यादीवर वार केला असता फिर्यादीस त्या चाकुचा नोक लागुन जखमी केले. फिर्यादीची पांढऱ्या रंगाची बकरी मोठे सिंग असलेली कि.अं. रू १०,०००/— जबरदस्तीने चोरून नेली. अशा फिर्यादीचे रिपोर्टवरून गुन्हा कलम ३९४ भा.दं. वि. प्रमाणे दाखल करण्यात आला आहे.

सदर गून्हयाच्या तपासामध्ये प्राप्त संशयीत आरोपीताच्या मोबाईल लोकेशन वरून आरोपी क्र. १) चेतन उर्फ करण कमलसिंग ठाकुर वय २० वर्षे रा. कळमना वस्ती, आदर्श शाळेचे समोर, आजरी माजरी पो.स्टे. कळमना, नागपुर, २) दिनेश उर्फ बाबु गजबलाल पाचे वय १८ वर्षे रा. प्लॉट नं. १२, चित्रशाळा नगर, मानसी ले आऊट, कळमना गांव, पो.स्टे. कळमना, नागपुर, ३) राकेश श्रीरंग रंगारी वय २८ वर्षे रा. कळमना वस्ती हनुमान मंदीर जवळ, पोलीस चौकीचे बाजुला, कळमना गांव, पो.स्टे. कळमना नागपुर, ४) तौसीफ उर्फ शोहब खान वल्द आसीफ खान वय २७ वर्ष रा.चित्रशाळा नगर, अजहरी मस्जीद जवळ, कळमना वस्ती, नागपूर, पो.ठाणे कळमना, नागपूर शहर त्यांना ताब्यात घेवून वर नमूद आरोपीतांना अटक करून त्याच्याकडून पो.स्टे. कळमना येथील एक जबरी चोरी व वाहन चोरीचा गुन्हा व पो.स्टे. नवी कामठी येथील वाहन चोरीचा गुन्हा उघडकीस आणून आरोपींकडून एक बकरी व दोन मोटारसायकल असा एकूण रू ५५,०००/— चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे व नमूद आरोपी हे न्यायालयीन कोठडीमध्ये नागपूर मध्यवर्ती कारागृह येथे बंद आहे.

सदरची कामगीरी मा. पोलीस उपायुक्त परि क्र. ५ श्री निलोत्पल नागपूर शहर, मा. सहा.

पोलीस आयुक्त कामठी विभाग श्री रोशन पंडीत यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि श्री विश्वनाथ चव्हाण, पोनि (गुन्हे) श्री नरेंद्र निस्वादे, सपोनि श्री उल्हास राठोड, पोहवा किशोर देवांगण, रामेश्वर कोहळे, नापोशि मनीष बुरडे, पोशि मनोज बहुरूपी, मनीष झरकर, अशोक तायडे यांनी केली आहे.

## दिनांक २२.०६.२०२१ मंगळवार

### १) मा. पोलीस उपायुक्त परि क्र. १ यांचे पथकाची कामगीरी —

दि. २१/०६/२०२१ रोजी १७: १० वा. नागपूर शहर पोलीस येथील मा. पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. १ श्री. नूरूल हसन यांना माहिती मिळाली की, पो.स्टे. वाडी हद्दीत अमरावती रोड, एच.पी. पेट्रोल पंपचे मागे, गोडावून क्र. ४० येथे सुगंधीत व प्रतिबंधीत असलेला तंबाखु साठवून ठेवला आहे.यावरून पोलीस उपायुक्त श्री. नूरूल हसन यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपायुक्त परि क्र. १ पथकातील पोउपनि. अविनाश जायभाय, नापोशि रितेश मलगुलवार, फहीम खान व प्रविण फालके यांनी सदर गोडवूनमध्ये जावून गोडवूनची तपासणी केली असता त्यात प्रतिबंधीत असलेला विविध कंपनीचा सुगंधीत तंबाखु मिळून आला. सदर मुददेमाल अन्न व औषध प्रशासन, नागपूर यांचे अधिकारी समक्ष मोजणी केली असता तेथे एकुण २३४ किलो सुगंधीत तंबाखु किंमत रू. १,२६,०००/— चा मुद्देमाल आढळुन आल्याने तो पंचा समक्ष जप्त करण्यात आला. श्री. नूरूल हसन यांच्या आदेशाने प्रतिबंधीत असलेला सुगंधीत तंबाखुची गोडवूनमध्ये अवैधरित्या साठा करून ठेवणारे मालक महेश गुलाबमल रेवतानी, रा. सिंधी कॉलनी, खामला, नागपूर यांचेवर कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे.

### २) पो.स्टे. पारडी पोलीसांची कामगीरी — चोरीचा गुन्हा उघडकीस आणून आरोपीस अटक केल्याबाबत :

पो.स्टे रात्रपाळी चे स्टॉफ हे रात्रपाळी कर्तव्यावर हजर आले व पो. ठाणे मधी दाखल अप क्र. ३४७/०२१ कलम ३७९ भादवि मधील दिनांक १५.०६.२०२१ चे १८.३० वा ते दिनांक १६.०६. २०२१ चे ११.३० वा चे दरम्यान फिर्यादी अमित वसंतराव गोडे वय ४५ वर्ष रा. प्लॉट नं. ९, बजरंग नगर, जादुमहल चौक, नागपूर यांची चोरीस गेलेली मायनींग ॲण्ड ड्रिलींग कंपनीची लाल रंगाची ब्रेकर मशीन कि. रू १४,०००/— चा मुद्देमाल बाबत माहीती घेवुन आरोपीतांच्या शोधात पो. ठाणे हद्दीत पेट्रोंलिग करीत असतांना नाका नं. ०५, भंडारा रोंड, पो.ठाणे पारडी येथे एक संशईत ईसम हा पोत्यामध्ये काही तरी वस्तु गुंडाळुन घेवुन जातांना दिसुन आला. तो संशईत वाटत असल्याने त्यास स्टॉफच्या मदतीने ताब्यात घेवुन नाव, पत्ता विचारले असता त्यांनी आपले नाव धनपाल कांताप्रसाद सोनवाने वय २४ वर्ष रा. गांव चिमनाखरी, तह. बरघाट जि. शिवनी, म.प्र., ह.मु. मेहरबा मंदीर जवळ, शेष नगर, हुडकेश्वर, नागपूर असे सांगितले त्यास पोत्यात काय गुंडाळले आहे, याबाबत विचारले असता उडवाउडवीचे उत्तर देवु लागला. स्टॉफच्या मदतीने पोत्यातील गुंडाळलेली वस्तु तपासली असता पोत्यात ०१ मायनींग ॲण्ड ड्रिलींग कंम्पनीची लाल रंगाची ब्रेकर मशीन दिसुन आली त्यास सदर मशीन बाबत विचारपुस केली असता समाधानकारक उत्तर न दिल्याने त्यास पो.स्टे. ला आणुन विश्वासात घेवुन सखोल विचारपुस केली असता त्यांनी सदर मशीन ही भंडारा रोड, कापसी, हल्दीराम कंम्पनीच्या बाजुला सुरू असलेल्या कामा वरून चोरी केल्याचे सांगितले.

पो.स्टे. पारडी येथील नमुद कर्मचारी यांनी वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली सदर गुन्हाचे तपासात एक आरोपी यास अटक करून त्याच्या जवळुन ०१ मायनींग ॲण्ड ड्रिलींग कंम्पनीची लाल रंगाची ब्रेकर मशीन कि.अ. रू १४,०००— चा मुददेमाल गुन्हा दाखल झाल्या पासुन ०६ तासाच्या आत जप्त केला आहे.

सदरचे कामगीरी मा. पोलीस उपायुक्त परीमंडळ कं. ०५ श्री. निलोत्पल, मा. सहायक पोलीस आयुक्त (कामठी विभाग) श्री. रोशन पंडीत नागपुर, पोनि. श्री सुनिल गागुर्डे, पोउपनि. श्री मुकेश ढोबळे, सफौ. श्री सुरेन्द तिवारी, नापोशि नरेंन्द्र तिडके, विश्वनाथ कुथे, राजेश नाईक, विजय लांडे, पोअं. शरद राघोर्ते, मनोज रेहपाडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पाडली आहे.

### ३) कुख्यात गुंड व धोकादायक व्यक्ती सुरज उर्फ मुच्या वल्द आनंद मुरमुर, महाराष्ट्र झोपडपट्टीदादा, हातभट्टीवाले, औषधी द्रव्य विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, व्हीडीयो पायरेटस्, वाळु तस्कर आणि अत्यावश्यक वस्तुंचा काळा बाजार करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालणे संबंधी अधिनियम सन् १९८१ (सुधारणा २०१५ चे) (महा. एल.व्ही. १९८१) अंतर्गत स्थानबध्द् :

नागपुर शहराचे मा. पोलीस आयुक्त श्री अमितेश कुमार यांनी दिनांक २२/०६/२०२१ रोजी जारी केलेल्या आदेशान्वये पोलीस ठाणे गिट्टीखदान, नागपूर चे हद्दीत शरीराविरूध्द व मालमत्तेविरूध्द गुन्हे करणारा कुख्यात गुंड नामे सुरज उर्फ मुन्या वल्द आनंद मुरमुर, वय २६ वर्षे, रा. आझादनगर, डॉ. आंबेडकर पुतळयाजवळ, पो.स्टे. गिट्टीखदान, ह.मु. रा. लुंबीनीनगर, पो.स्टे. जरीपटका, नागपूर शहर यास महाराष्ट्र झोपडपट्टीदादा, हातभट्टीवाले, औषधी द्रव्य विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, व्हीडीयो पायरेटस्, वाळु तस्कर आणि अत्यावश्यक वस्तुंचा काळा बाजार करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालणे संबंधी अधिनियम सन् १९८१ (सुधारणा २०१५ चे) महा. एल. व्ही. १९८१) अंतर्गत दिनांक २२/०६/२०२१ रोजी स्थानबध्द आदेश पारीत केला. त्यास दिनांक २२/०६/२०२१ रोजी आदेशाची बजावणी करून नागपूर मध्यवर्ती कारागृहात ठेवण्यात आले आहे.

सुरज उर्फ मुन्या वल्द आनंद मुरमुर याचेविरूध्द पोलीस स्टेशन गिट्टीखदान येथे खून करने, खूनाचा प्रयत्न करने, अपहरण करने, अज्ञात मुलगी अनैतीक कृत्यासाठी मिळवणे, त्याच महीलेवर वारंवार बलात्कार करणे, खूनासह दंगा करणे, फौजदारीपात्र कट रचने, अपराध्याला वाचविण्यासाठी गुन्हयाचा पुरावा नाहीसा करण्याची तजवीज करणे किंवा खोटी माहीती देणे, बेकायदेशीर जमावाचा घटक असणे, प्राणघातक हत्यारानिशी सज्ज होऊन बेकायदेशीर जमावात सामील होणे, प्राणघातक हत्यारांसह सज्ज होऊन दंगा करणे, समान उद्दीष्ठ साधण्यासाठी केलेल्या अपराधाबद्दल बेकायदेशीर जमावाचा प्रत्येक घटक दोषी असणे, सरकारी नोकराने जारी केलेल्या आदेशाची अवहेलना करणे, घातक हत्यार जवळ बाळगणे, मनाई आदेशाचे उल्लंघन करणे, अवैध दारूचा अवैध कब्जा करने, प्राणी क्रुरता अधिनियम, जुगार खेळणे, इत्यादी मालमत्तेविरूध्दचे तसेच शरीराविरूध्दचे गंभीर स्वरूपाचे अनेक गुन्हे दाखल आहेत.

सदर स्थानबध्द इसमाविरूध्द सन २०१९ व २०२० मध्ये अंबाझरी पोलीसांकडून त्याच्याविरूध्द ११० (ई),(ग) फौ.द.प्र.सं अन्वये प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती. तरीही त्याने प्रतिबंधक कारवाई उल्लंघन करून गैरकायदेशीर व धोकादायक गुन्हे करण्याची प्रवृत्ती निरंतर सुरूच ठेवली आहे. अलीकडील काळात त्याने पोलीस स्टेशन गिट्टीखदान हद्दीत खुनाचा प्रयत्न करणे, घातक हत्यार जवळ बाळगणे, मनाई आदेशाचे उल्लंघन करने, इत्यादी अशा स्वरूपाचे गुन्हे केलेले आहेत.

अशाप्रकारे धोकादायक व्यक्ती नामे सुरज उर्फ मुन्या वल्द आनंद मुरमुर याची अपराधीक कृत्ये निरंतर वाढत असल्याने आणि त्यामुळे सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण होत असल्याने मा. पोलीस उपायुक्त परिमंडळ क्रं. २ श्रीमती विनीता साहू यांचे मार्गदर्शनाखाली व.पो.नि. श्री गजानन कल्याणकर, पोलीस स्टेशन गिट्टीखदान, नागपूर शहर यांनी नमुद आरोपीतास स्थानबध्द करण्याकरिता गुन्हे शाखेस प्रस्ताव सादर केला होता. मा. अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रादेशीक विभाग) श्री नविनचंद्र रेड्डी नागपूर शहर यांचे मार्फतीने सादर केला असता नागपूर शहराचे मा. अपर पोलीस आयुक्त(गुन्हे) श्री सुनिल फुलारी यांचे निर्देशान्वये व मा. पोलीस उपायुक्त (प्रभारी डिटेक्शन) श्री सारंग डी. आवाड यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हेशाखेतील एम.पी.डी.ए. विभागाने नमुद आरोपीला स्थानबध्द करण्याकरीता प्रस्ताव सादर केला. त्याअन्वये स्थानबध्द प्राधिकारी नागपूर शहराचे मा. पोलीस आयुक्त श्री. अमितेश कुमार यांचे समक्ष सादर केले असता त्यांनी वर नमुद गुंडाविरूध्द स्थानबध्दतेचा आदेश पारित करून त्यास नाशिक मध्यवर्ती कारागृह, नाशिक येथे ठेवण्याबाबत आदेश दिलेत. त्याअन्वये स्थानबध्द प्राधिकारी नागपूर शहराचे मा. पोलीस आयुक्त श्री. अमितेश कुमार यांनी वर नमुद इसमाविरूध्द स्थानबध्दतेची महत्वपुर्ण कारवाई करून त्यास सध्या नागपूर मध्यवर्ती कारागृहात ठेवण्यात आले आहे.

<u>४) सायबर पोलीस स्टेशन यांचे सायबर गुन्हे व त्यांबाबत जनजागृती या विषयावर वेबीनार —</u>

सायबर पोलीस स्टेशन, नागपूर शहर यांचे कडून **सायबर गुन्हे व त्यांबाबत जनजागृती** या विषयावर **Post Graduate Teching Department Of Law (Rastrasant Tukadoji Maharaj Nagpur University.Nagpur)** यांनी दि. २२/०६/२०२१ रोजी ०९.०० वा ते ११:०० वा पर्यंत ऑनलाईन वेबेक्स मिंटीग या ॲपच्या आणि युटयुब व फेसबुक लाईव्ह च्या साहाय्याने वेबीनार घेण्यात आला. सदरचे वेबिनार हे खालील महत्वाच्या विषयावर घेण्यात आलेला आहे.

1) Importance of cyber Crime
2) Identity Theft (fake facebook ,insta id )
3) Psychological Tricks
4) SocialMediaFrauds (facebook,instagram,whatsapp,online friendship )
5) Mobile Application Frauds (small loan app, phone pe, paytm etc)

6)	Online Banking frauds
7)	Virus Attack on Personal Computer
8)	General Tips to Keep you safe
9)	Incident Reporting

सदर ऑनलाईन जनजागृती कार्यक्रमात Honble **Vice-Chancellor** Shri.Subhash Choudhary (RTM Nagpur University) व इतर २,५०० ते ३,००० प्राध्यापक व विदयार्थी यांनी ऑनलाईन उपस्थित राहुन वेबीनार चा लाभ घेतला. यापुढेही लाखो लोक लाभ घेउ शकतील. यापूर्वी सायबर पोलीस स्टेशन नागपूर शहर तर्फे वरीष्ठ पोलीस निरीक्षक डॉ. अशोक बागुल पोलीस स्टेशन नागपूर शहर यांनी आता पर्यंत ७० **वेबिनार** तसेच प्रत्यक्ष जाऊन सेमिनार घेऊन नागरीकांमध्ये सायबर गुन्हयाविषयी जनजागृती केली आहे व नागरीकांना या सायबर गुन्हयापासून कशा प्रकारे सुरक्षित राहता येईल याची सुध्दा माहिती दिली आहे. तसेच आतापर्यंत लाखो नागरीकांना सदर आनलाईन जनजागृती कार्यक्रमाचा लाभ घेतला आहे.

सदरचे वेबिनार हे नागपूर शहराचे मा. पोलीस आयुक्त श्री अमितेशकुमार, मा. अपर पोलीस आयुक्त(गुन्हे) श्री सुनिल फुलारी, यांचे आदेशान्वये मा. पोलीस उपायुक्त (प्रभारी आर्थिक/सायबर गुन्हे) डॉ. बसवराज तेली यांचे मार्गदर्शनाखाली डॉ. अशोक बागुल वरिष्ठ पोलीस निरीक्षक सायबर पोलीस स्टेशन, नागपूर शहर यांनी घेतले असून याकामी नापोशि श्रीमती रिता ठाकुर यांनी या कामात मदत केली आहे.

## दिनांक २३.०६.२०२१ बुधवार

### १) पो.स्टे. सक्करदरा पोलीसांची कामगीरी —

फिर्यादी मनिष देवीदास घोटकर, वय ५२ वर्षे, रा. प्लॉट नं. ८३२, राजे रघुजीनगर, छोटा ताजबाग, पोस्टे सक्करदरा, नागपूर हे आपल्या परिवारासह राहत असुन दिनांक ०४/०६/२०२१ रोजी दुपारी फिर्यादी यांच्या पत्नीने आलमारी मध्ये ठेवलेले सोन्याचे दागीने व रोख रक्कम ४०,०००/—रू चेक केले होते त्यानंतर दिनांक ११/०६/२०२१ रोजी चे १२:३० वा. फिर्यादी हे त्यांच्या दुकानाच्या कामाने त्यांना पैशाची आवश्कता असल्याने त्यांनी त्यांच्या पत्नी सुवर्णा घोटकर यांना घरातील वरील माळयावरील बेडरूममधील लोखंडी आलमारीचे लॉकर मध्ये ठेवलेले पैसे आणावयास सांगितले वरून त्या पैसे घेणे कामी गेल्या असता त्यांना त्यांच्या आलमारीतील रोख रक्कम व सोने दिसुन आले नाही. यावरून दिनांक ०४/०६/२०२१ चे १२:०० वा. ते दिनांक ११/०६/२०२१ चे १२:३० वा. चे दरम्यान फिर्यादी यांच्या राहते घरी उघडया दाराने प्रवेश करून घरातील वरच्या माळयावरील बेडरूम मधील लाकडी टेबलचे ड्रावर मध्ये ठेवलेली चावी काढुन त्या चावीने लोखंडी आलमारी उघडून आमलारीतील लॉकर मध्ये ठेवलेले सोने ४२.५३० ग्रॅम व २०.६०० ग्रॉम दोन्ही सोन्याचे लगडीची अंकि. १,२६,०००/—रू व रोख रक्कम ४०,०००/—रू व पुजेचे साहीत्या किअ. ४०००/—, एक सोन्याचे मंगळसुत्र ३०:०० ग्रॅम अं.कि. ५०,०००/—रू असा तसेच एक एकुण २,२०,२६०/—रू चा मुद्देमाल कोणीतील अज्ञात इसमाने चोरी करून घेवुन गेल्याने त्याचा विरूध्द फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरून सदरचा गुन्हा दाखल केला आहे.

मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक पो.स्टे. सक्करदरा, नागपुर शहर यांचे आदेशाने पोस्टे डिटेक्शन पथकाचे प्रमुख सपोनि सागर आव्हाड तसेच पथकातील स्टाफसह पो.स्टे. हददीत गुन्हयातील आरोपी व मुद्देमालाचा शोध घेत असताना सिसिटीव्ही फुटेजची बारकाईने पाहणी केली असता त्यामध्ये एक संशयीत इसम दिसुन आला असता त्याचा शोध घेणे करिता गुप्त बातमीदार नेमुन याबाबत माहीती घेतली असता एक गुप्त बातमीदारा कडुन मिळालेल्या माहीती वरून त्याठिकाणी स्टाफसह जावुन शिताफीने सापळा लावुन यातील आरोपीतांचा शोध घेतला व ते दिसुन येताच त्यांच्या स्टॉफचा मदतीने पाठलाग करून त्यांना पकडुन त्यांचे नाव विचारले असता त्याने त्याचे नाव **महेंद्र रतनलाल रंगारी, वय २८ वर्षे, रा. विठ्ठल नगर, नाल्या जवळ, दिघोरी नाका, पोस्टे हुडकेश्वर, नागपूर,** असे सांगीतले. त्यास ताब्यात घेवुन त्यांच्याकडे सदर गुन्हयाच्या अनुषंगाने तपास केला असता त्याने नमुद गुन्हा केल्याचे कबुल केले व ते निष्पन्न झाले असता त्यास सदरील गुन्हयात अटक करण्यात आली आहे.

नमुद अटक आरोपीने पोलीस कस्टडी मध्ये दिलेल्या कबुली निवेदनामध्ये पंचनाम्या अंतर्गत अटक आरोपीने चोरी केलेला १) कि.अ. रू. १,७०,०००/— ची एक सोन्याची लगडी सॅम्पल वेट ४२.५३० मीली.ग्राम, २) कि.अ. रू. ८४,०००/— ची एक सोन्याची लगडी सॅम्पल वेट २०.६००

मीली.ग्राम , ३) कि.अ. रू. ९२०००/– सोन्याचे मंगळ सुत्र ३०.०० ग्राम, ४) रोख रक्कम रू ४००० /– ५) कि.अ. रू ५००/– एक जुनी वापरती लालसर रंगाची सायकल ६) एक रेडमी चा मोबाईल कि.अ. रू १०,०००/– **असा <u>एकुण ९३.१३० ग्रॉम सोने व रोख रक्कम एकुण रू. ३,६०,५००/–</u>** चा मुद्देमाल गुन्हयात जप्त करण्यात आला आहे.

सदरची कामगीरी नागपूर शरहराचे मा. पोलीस उपायुक्त परि. क्र. ०४ श्री अक्षय शिंदे, मा. सहा. पोलीस आयुक्त(सक्करदरा विभाग) श्री निलेश पालवे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सत्यवान माने, पोलीस निरीक्षक (गुन्हे) चंद्रकांत यादव यांचे मार्गदर्शनामध्ये सपोनि सागर आव्हाड, पोउपनि विजय मसराम, नापोअ. संदिप बोरसर, नितीन राउत ,पो.अ. हेमंत उईके,निलेश शेंदरे, शेरू,मपोअ आरती सर्व नेमणुक पो.स्टे. सक्करदरा नागपुर पो.शि दिपक नेमणुक– सायबर शाखा,पोउपआ परि–४ नागपूर शहर यांनी केली.

<u>२) पो.स्टे. पारडी पोलीसांची कामगीरी –</u>

दिनांक २१.०५.२०२१ चे २१.०० वा ते दिनांक २२.०५.२०२१ चे ०८.३० वा दरम्यान पो.स्टे दिवसपाळी स्टॉफ हा आरोपीतांच्या शोधात पो.स्टे हददीत पेट्रोलिग करीत असतांना नविननगर बाजार चौक भागात एक ईसम हा ॲक्टीवा गाडीवर संशईत रित्या जातांना दिसुन आला त्यास थाबण्यास सांगितले असता तो पळु लागला त्यास स्टॉफच्या मदतीने पाठलाग करुन ताब्यात घेवुन नाव पत्ता विचारले असता त्याने आपले नाव प्रदीप उर्फ दादु देवधर ठाकुर वय २१ वर्ष रा. डिप्टी सिग्नल शितला माता मंदीर जवळ, पो.स्टे. कळमना नागपूर सांगितले सदर वाहनाबाबत विचारपुस केली असता उडवाउडविचे उत्तर देवु लागला त्यास पो.ठाणे येथे आणुन सखोल विचारपुस केली असता नमुद वाहन हे पो.स्टे हुडकेश्वर हददीतुन दि. २१/०५/२०२१ चे रात्री चोरी केल्याचे सांगितले पो ठाणे हुडकेश्वर येथे विचारपुस केली असता सदर वाहना बाबत अप क्र २८२/२०२१ कलम ३७९ भा.द ंवि.प्रमाणे गुन्हा दाखल असल्याचे सांगितले.. पो.स्टे. पारडी येथील कर्मचारी यांनी वरिष्ठाच्या मार्गदर्शनाखाली सदर गुन्हाचे तपासात एक आरोपीतास ताब्यात घेवुन त्यांच्या जवळुन १) ॲक्टीवा गाडी क्र एम.एच./३१./ई. टी/४६६३ कि.अ. रु २०,०००/– चा मुददेमाल जप्त केला आहे.

सदरची कामगीरी मा. पोलीस उपायुक्त परीमडळ क्र ०५ श्री. निलात्पल, मा. सहायक पोलीस आयुक्त श्री. रोशन पंडीत(कामठी विभाग) नागपुर याच्या मागदर्शनाखाली वपोनि सुनिल गांगुर्डे, पोउपनि कृष्णा वाघ, नापोशि विजय लांडे, पोशि मनोज रेहपांडे, रूपेश थुल, हेमंत चकोले यांनी पार पाडली आहे.

<u>३) पो.स्टे. यशोधरानगर पोलीसांची कारवाई</u> :

दिनांक २१.०६.२०२१ रोजी गुन्हे प्रतिबधंक पो.स्टे यशोधरानगर हद्दीत गस्त करीत असता गुप्त बातमीदार कडुन माहीती प्राप्त झाली की कुंदनलाल गुप्ता नगर येथे राहणारा सोनु पठाण नावाचा इसम हा आपल्या घरी गोरगरीबांना वाटप करण्यात येणारे सरकारी धान्याची काळाबाजारी करुन साठवणुक केली आहे व तो माल हा इतर मोठया व्यापाऱ्यानां विकण्याच्या तयारीत आहे अशा गुप्तबातमीदारा कडुन मिळालेली माहीती मा. वरिष्ठ पोनि यांना सांगुन दोन प्रतिष्ठीत व्यक्तीनां बोलवुन त्यानां घटनेबाबत सविस्तर माहीती सागुन त्यांना पंच म्हणून घेवून पचं व स्टाफ सह खाजगी वाहनाने गुप्त बातमीदाराच्या प्राप्त माहीतींच्या ठिकाणी कुंदनलाल गुप्तानगर यथे ील बंडु किराणा स्टोर्स जवळील गल्लीमध्ये १८:५५ वा.सुमारास रेड कामी गेलो असता काही अंतरावर दोन इसम आम्हाला पाहुंन पळतांना दिसुन आल्याने आम्ही त्यांच्या पाठलाग केला असता ते गल्ली बोळाचा फायदा घेवून पळून गेले ते दोन्ही इसम इसम ज्या घरासमोरुन पळाले त्या घरात स्टाफ व पंचासह प्रवेश केला असता वेगवेगळया तीन खोलीमध्ये अवैद्य स्वरूपाचा अन्यधान्य साठा अंदाजे १४ टन तादंळाचे व इतर धान्य वगे वगे ळया वजनाचे पोते बाजारभाव किं. अंदाजे ३४/– रु एकुन किमती अंदाजे ४,७६,००० रु.चा मुददेमाल व ०३ इलेक्ट्रीक वजन काटा, व १ मॉनिटर कि.अंदाजे २०,०००/रू तसेच घराबाहेर दारासमोर ऑटो रजि.क्र. MH49-AR-2175 किं.रु.१,४०,०००/–व त्या मध्ये तांदळाचे ५० किलो वजनाचे ०५ पोते किं.रु. ८,५०० असा एकुण ६,४४,५००/– चा मुददेमाल पंचासमक्ष सविस्तर पचंनामा करुन जागीच जप्त करण्यात आला.

नमुद ऑटोच्या मालकी हक्काबाबत आजुबाजुला परिसरात विचारणा केली असता कोणीही प्रतिसाद दिला नाही. तात्काळ मा. वरिष्ठ पो.नि. यांना सविस्तर माहीती सागीतली असता मा. वपोनि

घटनास्थळावर हजर येवून त्यांच्यामार्फत अन्नधान्य पुरवठा अधिकारी क्र. ०२ श्रीमती गायकवाड मॅडम यांच्याशी संपर्क साधुन त्यानां प्राप्त माहीती सांगीतली असता नमुद घटनास्थळी श्रीमती रागीणी गायकवाड, परिमंडळ अधिकारी, उत्तर विभाग, नागपूर श्री धिरज पुरी, पुरवठा निरीक्षक, श्री एम एस ठाकुर, पुरवठा निरीक्षक हे हजर येवून नमुद धान्याची बारकाईने पाहणी केली व तसा पंचनामा केला. सदर घराच्या मालकीहक्काबाबत आजुबाजुला परिसरात बारकाईने विचारणा केली असता सदरचे घर सलमान उर्फ सोनू शम्मी खान पठाण वय अं. ३३ वर्ष रा. कुंदनलाल गुप्तानगर, नागपूर याचे असल्याचे सांगीतले. तसेच सदरचा अवैद्य धान्य साठा हा रा. कुदनलाल गुप्ता नगर ह्याने व इतर साथिदारानी गरीबानां सरकार तर्फ देण्यात येणारा तांदुळाची साठेवाजी करून आपल्या स्वताचे आर्थिक फायद्या करीता मोठे व्यापाऱ्यास विक्री करण्यास साठवुन ठेवल्याची माहीती मिळाली. आरोपी नामे सलमान उर्फ सोनु शम्मीखान पठाण रा. कुदंनलाल गुप्तानगर याने इतर साथीदारासंह मिळून त्याची कुठलीही धान्य दुकान नसुन व धान्य साठा करण्याच्या कुठलाही परवाणा किवा कोणतेही सरकारी स्वस्त धान्याचे दुकान नसतांना सुध्दा त्याने गोरगरीबानां शिधापत्रिकावर वाटप करण्यात येणारा तांदुळ, गहु, दाळ याची काळाबाजारी करुन अवैध स्वरुपाने अन्न धान्यसाठा याची साठवणुक केली असल्याने त्यांचे कृत्य जिवनावश्यक वस्तु अधिनियम कलम ३,७ अन्वये हाते असल्याने त्यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला.

सदरची कारवाई नागपूर शहराचे मा. पोलीस उपायुक्त(परि. क्र. ५) श्री निलोत्पल मा. सहाय्यक पोलीस आयुक्त(जरिपटका विभाग) श्री रोषन पंडीत, वरीष्ठ पोलीस निरीक्षक अशोक मेश्राम यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि जितेंद्र भार्गव, पोहवा दिपक धानोरकर, नापोशि गजानन गोसावी, नापोषि संतोष यादव, नापोशि निलेश घायवट, नापोशि लक्ष्मीकांत बारलिंगे, पोशि प्रफुल चिंतले यानी केली आहे.

४) पो.स्टे. गिट्टीखदान पोलीसांची कामगिरी :

पोलीस स्टेशन गिटटीखदान, नागपूर शहर हददीत दिनांक १९.०६.२०२१ रोजी सकाळी ०८.०० वा. पावेतो एकुण तिन विविध ठिकाणावर चोरी व घरफोडीचे गुन्हे घडले. त्यामध्ये प्रथम गुन्हयात अनोळखी आरोपीतांनी कोव्हीड हॉस्पिटल मध्ये प्रवेश करून सिक्युरिटी गार्ड यांचे सोबत मारपिट करून तेथुन लॅपटॉप, वायफाय, सिसिटिव्ही कॅमेरे तसेच मोबाईल फोन चोरी केला. गुन्हयाची तिव्रता बघता जलद गतीने अनोळखी आरोपीताचे मिळालेल्या वर्णनावरून गोपनिय बातमीदारांना सर्तक करून मिळालेल्या माहीतीवरून ताब्यात घेण्यात आले.

आरोपी १) सद्दाम अस्लम खान वय २५ वर्ष, रा. गवलीपुरा, गिटटीखदान, नागपूर २) आदीत्य विजेन्द्र वरखेडे वय १९ वर्ष, रा. आदीवासी कॉलोनी, गिटटीखदान, नागपूर यांचे ताब्यातुन पो. स्टे. गिट्टीखदान मध्ये दाखल पाच गुन्हयातील चोरी गेलेल्या मुददेमालापैकी एकुण रू.१,१३,०००/— चा मुददेमाल जप्त करून पो.स्टे. दाखल पाच गुन्हे उघडकिस आणण्यात आले. आरोपी पिसिआर वर असुन गुन्हयाचा तपास सुरू आहे. यातील दोन्ही आरोपीवर घरफोडी, जबरीचोरी, चोरीचे गुन्हे नोंद आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस उपायुक्त(परि.क्रं.०२) नागपूर शहर श्रीमती विनिता साहु, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त(सदर विभाग) श्री सुधिर नंदनवार, वरिष्ठ पोलीस निरिक्षक गजानन कल्याणकर याचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरिक्षक सुहास चौधरी(गुन्हे), पोउपनि देवेन्द्र पटले, पोहवा दिपक रिठे, नापोशि बलजित ठाकुर, नापोशि निलेश इंगोले, नापोशि इंशाक आटे, पोशि दिपक लाकडे यांनी केली आहे.

## दिनांक २४.०६.२०२१ गुरूवार

१) गुन्हेगार संदिप ज्ञानदास डोगरे यास मा. पोलीस उपायुक्त परि क्र. ५ यांनी हद्दपार केल्याबाबत :

पोलीस स्टेशन पारडी येथील गुन्हेगार नामे संदिप ज्ञानदास डोगरे वय ३६ वर्षे रा. प्लॉट न. ३६, गोकलानी हाउसिग सोसायटी, नविननगर, छोटु सायकल स्टोर्सजवळ, पारडी, नागपुर शहर यांचे विरूध्द पोस्टे पारडी येथे अवैध दारु बाळगणे, जुगार खेळणे असे गुन्हे दाखल आहेत. त्यामुळे त्यास लोक घाबरून तसेच दहशतीमुळे पारडी परीसरातील लोक हे त्याचे विरूध्द उघडपणे समोर येत नव्हते. त्यामुळे त्याची दहशत कमी करण्यासाठी तसेच त्याचे गुन्हेगारीकृत्यांना आळा घालणे करीता व नागरीकामध्ये पोलीसाविषयी विश्वास निमार्ण व्हावा म्हणुन त्यास मा. पोलीस उपायुक्त परी क्र ०५ श्री. नित्लोपल यांनी ०१ वर्षा करीता नागपुर शहर व नागपुर जिल्हयातुन हददपार केले आहे.

सदरची कार्यवाही वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सुनिल गांगुर्डे, पो.स्टे. पारडी, स.फौ. सुरेन्द तिवारी, पो हवा छगन राउत, नापोशि राजेश नाईक, विजय लांडे, पोशि रुपेश थुल, मनोज रेहपाडे यांनी केली आहे.



संदीप डोंगरे

**२) पो.स्टे. पाचपावली पोलीसांची कामगीरी —**

दिनांक २३.०६.२०२१ चे १२.१५ वा चे सुमारास फिर्यादी आदर्श भानुदास सहारे, रा. डॉ. आंबेडकर कॉलनी समता मैदानजवळ, लष्करीबाग, नागपूर हे त्यांचे घरी हजर असतांना त्यांचे घरासमोर स्क्रॅप मोबाईल खरेदी करणारा इसम अभिशेक भैय्याजी शेंडे वय २४ वर्ष रा. डॉ आंबेडकर कॉलनी समता मैदानजवळ, लष्करीबाग, नागपूर आल्याने फिर्यादीने त्याचेजवळ असलेले मोबाईल स्क्रॅप विक्रेत्याला दिले. सदर मोबाईल मधील मदरबोर्ड काढते वेळी मोबाईलचे स्क्रिन डिसप्ले तुटल्याने त्यांचेत शाब्दिक वादविवाद झाला, त्यावर मोबाईल स्क्रॅप खरेदी करणारा याने नवीन डिसप्ले आणुन देतो असे फिर्यादीस सांगितले. स्क्रॅप खरेदी करणारा इसम हा जातेवेळी बडबड करित असल्याने फिर्यादी त्यास स्क्रिन डिसप्ले आणुन तु माझेकडे ठेवलेला मोबाईल परत घेवुन जा असे म्हटले असता, त्या ठिकाणी गुन्ह्यातील आरोपीत याने काहीही कारण नसतांना फिर्यादीस व स्क्रॅप खरेदी करणाऱ्या इसमास म्हटले की, '' तेरेको ज्यादा मस्ती आयी क्या, असे म्हणुन अश्लिल शिवीगाळ करून तेरे को अभी टपकाता हु,'' असे म्हणुन धावत घरी जावुन एक मोठा लोखंडी चाकु घेवुन अंगावर धावुन आला. तेथे असलेल्या लोकांनी बिचबचाव केला. त्याचवेळी घटनास्थळी पोलीस तात्काळ दाखल झाले. व आरोपीतांस पोलीसांनी तात्काळ शस्त्रासह ताब्यात घेतले. अशा फिर्यादीचे रिपोर्ट वरून आरोपी विरूध्द पोस्टे पाचपावली येथे कलम २९४, ५०६(ब) भादवि सहकलम ४+२५ भा.ह.का. प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला. गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे.

पाचपावली पोलीस हे हद्दित सतर्क पेट्रोलिंग करित असतांना लष्करीबाग बिट अंतर्गत वर नमुद गुन्ह्याची माहिती मिळाल्याने तात्काळ घटनास्थळी पोहचुन आरोपी अभिषेक भैय्याजी शेंडे वय २४ वर्ष रा. डॉ आंबेडकर कॉलनी समता मैदानजवळ, लष्करीबाग, नागपूर यास निशस्त्र करून ताब्यात घेतले, पाचपावली पोलीसांनी नमुद घटनेची तात्काळ दखल घेतल्याने खुनासारखा गंभिर गुन्हा होण्यास प्रतिबंध केला आहे. आरोपीच्या ताब्यातून एक लोखंडी मोठा धारदार चाकु कि. अं. रू २००/— चा जप्त केला. पाचपावली हद्दितील नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, त्यांचे परिसरामध्ये अवैध धंदे, असामाजिक तत्वाचे लोक, गुन्हेगार यांचे बद्दल पोलीसांना माहिती देण्यात यावी. पाचपावली पोलीस नक्कीच अशा गुनहेगारांवर आपल्या सहकार्याने योग्य कायदेशिर कारवाई करतील.

सदरची कारवाई मा. पोलीस उपायुक्त परिमंडळ क्रमांक ०३ श्री. लोहीत मतानी नागपूर शहर, सहा. पोलीस आयुक्त (लकडगंज विभाग) सचिन थोरबोले नागपूर शहर यांचे मार्गदर्शनात वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. संजय मेंढे, पोनि गुन्हे रवि नागोसे, पोउपनि विजय नेमाडे, पोहवा राहुल बढिये, नापोशि जितेंद्र खरपुरिया, विनोद बरडे, पोशि सिताराम चव्हाण, अनुरथ यादव, सुमीत बावणगडे, राहुल चिकटे, नितीन लोखंडे यांनी केलेली आहे.

**३) आर्थीक गुन्हे शाखा यांनी अर्जचौकशीवरून फसवणुकीचा गुन्हा दाखल केल्याबाबत —**

आरोपी संजय पेंढारकर यांनी त्यांच्या मालकीच्या ०.९५ हे.आर. (अडीच एकर) जागेपैकी ०.४० हे आर. जागेवर सन २००९—१० साली शाळा बांधली. आरोपीने उर्वरीत ०.५५ हे.आर. जमीनीवर एकुण १९ वेगवेगळया क्षेत्रफळाचे प्लॉटस् पाडलेले होते. त्यापैकी एकुण १ ते १८ प्लॉटस् वेगवेगळया प्लॉटधारकांना विकले व प्लॉट क्र. १९ हा मंदिराकरीता आरक्षीत करून त्यावर मंदिराचे बांधकाम केले आहे. त्या १८ प्लॉटधारकांपैकी फिर्यादी व इतर प्लॉटधारकांना विक्रीपत्र/ॲग्रीमेंट टू सेल/पॉवर ऑफ अटर्नी/कब्जापत्र करून दिले. त्याबदल्यात आरोपीने प्लॉट धारकांकडुन रू २,२१,४९,५००/— घेतलेले

आहे. आरोपी संजय पेंढारकर याने प्लॉट धारकांना १ ते १८ प्लॉटची विक्री करून त्यांच्याकडुन पुर्ण रक्कम घेतली असतांना सुध्दा दि. २३/०२/२०१६ रोजी सदर जमीनीची पॉवर ऑफ ॲटर्नी कमलेश नागपाल, दादूमल नागपाल व त्याची पत्नी सौ. रिमा नागपाल यांच्या नावे करून दिली. श्री. कमलेश हरीचंद नागपाल यांना सदर जमीनीवर पाडलेल्या प्लॉट ची विक्री झाल्याचे माहित असून सुध्दा त्यांनी पावर ऑफ अटर्नीचा दुरूपयोग करून सन २०१९ मध्ये ०.९५ हे.आर. जमीनीपैकी २२,००० स्के.फुट जागेचा विक्री करारनामा करून स्वत:च्या नातेवाईकांच्या नावे करून दिला व दि. १६/०८/२०१९ रोजी दुय्यम निबंधक कार्यालय नागपुर ग्रामीण १० यांचे कार्यालयात स्वत:च्या नातेवाईकांच्या नावे विक्रीपत्र लावुन दिले. अशाप्रकारे आरोपी नामे संजय पेंढारकर व कमलेश नागपाल यांनी फिर्यादी व इतर १७ प्लॅटधारकांचा विश्वासघात करून कट कारस्थान करून फिर्यादी व इतर प्लॉटधारकांची रू २,२१,४९,५००/— (दोन कोटी, एकविस लाख, एकोनपन्नास हजार, पाचशे रूपये) रूपयांनी आर्थिक फसवणुक केली आहे.

नागपुर शहराचे मा. पोलीस आयुक्त श्री अमितेश कुमार यांच्या आदेशाने मा. अपर पोलीस आयुक्त(गुन्हे) श्री. सुनिल फुलारी यांचे निर्देशान्वये मा. पोलीस उपायुक्त(प्रभारी आर्थीक गुन्हे) डॉ. बसवराज तेली यांचे मार्गदर्शनाखाली अर्ज चौकशी पथकातील पोलीस निरिक्षक श्री बबन येडगे त्यांचे सहकारी महिला पोलीस उपनिरिक्षक श्रीमती किर्ती वाघधरे, पोलीस हवालदार मनोज सोनवणे, नापोशि भुषण उध्दार, गजानन गिरी यांनी चौकशी पुर्ण करून आरोपी १) श्री. संजय श्रीराम पेंढारकर, वय ५२ वर्षे, (व्यवसाय—एस.पी. पब्लीक स्कुल चे अध्यक्ष) रा. प्लॉट नं. ५५९, हिवरी ले आऊट, देशपांडे ले आऊट, पो.स्टे. नंदनवन नागपुर २) श्री. कमलेश हरीचंद नागपाल, वय ५० वर्षे, (धंदा — कॉस्मॅटीक चा व्यवसाय) रा. प्लॉट नं. ७३०/७ व ८, देशपांडे ले आऊट, वर्धमाननगर, अलाहबाद बॅकेचे वर, नागपूर यांच्याविरूध्द पोलीस स्टेशन वाठोडा येथे आज दिनांक २४/०६/२०२१ रोजी अप. क्र. २२०/२१ कलम ४२०, ४०६, ४६७, ४७१, १२०(ब) भादवी अन्वये गुन्हा दाखल करून पुढील तपास पोलीस निरिक्षक राजेश पुकळे आर्थीक गुन्हे शाखा, नागपुर हे त्यांचे पोलीस स्टॉप सपोउपनि श्री सुरेश वानखेडे, श्री रमेश चिखले, पोहवा श्री गजानन मोरे व मपोशि श्रीमती सुनीता यादव यांचेसह करीत आहेत.

४) पो.स्टे. पाचपावली पोलीसांची कामगीरी —

दिनांक २३.०६.२०२१ चे २२.३० वा ते दिनांक २४.०६.२०२१ दरम्यान फिर्यादी नापोशि सुनील ठाकुर (नेमणुक पो.स्टे. पाचपावली, नागपूर शहर) हे स्टाफसह पोस्टे हद्यीत पेट्रोंलिग करीत असतांना पो.स्टे. पाचपावली हद्दीत सिध्दार्थ नगर, जयभीम पार्क, नागपूर येथून संशयावरून यातील नमुद आरोपी क्र. १) मोहम्मद इमरान उर्फ इम्मा वल्द मोहम्मद याकुब वय २५ वर्ष, रा. टेका नई बस्ती, अशरफ अली यांचे घरी किरायाने, आझाद नगर, अशरफ किराणा जवळ, पोस्टे पाचपावली, नागपुर. यांची एन.डी.पी.एस ॲक्ट तरतुदीचे तंतोतंत पालन करून आरोपी क्रं. १ याची झडती घेतली असता त्याचे जवळुन घटनास्थळ जप्ती पंचानाम्याप्रमाणे त्याचे ताब्यातुन एक फिक्कट निळ्या कापडी थैलीमध्ये १ किलो २०० ग्रॅम गांजा कि.अं. रू १२,०००/ — चा मुद्देमाल मिळुन आला तसेच आरोपी क्रं. २) शेख अनिस उर्फ डम्प वल्द शेख युनुस, वय ३५ वर्ष रा. महेंद्र नगर, पाण्याचे टाकी जवळ, पोस्टे पाचपावली, नागपुर हा संधीचा फायदा घेवुन घटनास्थळावरून पळुन गेला व आरोपी क्रं. १) यास अटक करण्यात आली करीता नमुद दोन्ही आरोपीताविरूध्द अप.क्र. ४०९/२१ कलम ८(ब) २० (ii) (ब), २९ एन.डी.पी.एस कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला.

सदरची कारवाई मा. पोलीस उपायुक्त परिमंडळ क्र. ३ श्री. लोहीत मतानी, मा. सहा. पोलीस आयुक्त (लकडगंज विभाग) श्री. सचिन थोरबोले नागपूर शहर यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. संजय मेंढे, पो.नि. रवि नागोसे, सपोनि एस.एस.मोले. पोउपनि प्रमोद खंडार, पोहवा, नंदकिशोर वालदे, छगन सिंगणे, नापोशि सुनिल ठाकुर, संजय मिश्रा, पोशि रोशन फुकट, संजय बरेले यांनी केलेली आहे.

५) पो.स्टे. तहसील पोलीसांची कामगीरी —

दिनांक २४.०६.२०२१ चे ०६.३० वा चे सुमारास फिर्यादी सपोउपनि संजय दुबे (नेमणुक पो.स्टे. तहसील, नागपूर शहर) हे आपले सोबतील पोलीस स्टाफसह पोलीस स्टेशन हद्यीत एरीया पेट्रोलींग करत असता अंदाजे ०६.३० वा. सुमारे त्यांना टिमकी श्री. मोबाईल शॉपीच्या समोर मेन रोडवर संशईतरित्या एक लाल रंगाची टवेरा गाडी क्र. एम.एच/४१/सी/१०८१ ही उभी दिसली. यावरून

फिर्यादी हे आपले पोलीस स्टाफसह गाडीची पाहणी करणे कामी जात असता त्या गाडीतुन दोन ईसम पळुन गेले व एक ईसम हा गाडीत बसलेला मिळुन आला त्याने आपले नाव समीर खान वल्द रहेमान खान वय २६ वर्ष रा. भालदारपुरा, हज हाउस हसीना आप्पा यांचे घरी किरायाने, पो.स्टे. गणेशपेठ, नागपूर सांगीतले. गाडीच्या डॅशबोर्डवर एक पांढऱ्या रंगाचे प्लॅस्टीक पिशवित झाडपत्ती सारखा हिरवट रंगाचा कळीदार उग्र वास येणारा गांजा दिसून आला. यावरून दोन पंचासमक्ष २१० ग्रॅम गांजा कि.अ. रू २१००/— व त्याचे अंगझडतीत नगदी रू ४००/— व त्याचे ताब्यात असलेली फोरव्हीलर लाल रंगाची टवेरा गाडी वाहनाची कि.अ. रू २,८०,०००/— असे एकुण रू २,८२,०००/— चा मुद्देमाल घटनास्थळ जप्ती पंचनाम्या प्रमाणे आरोपीच्या ताब्यातुन जप्त केला व अटक आरोपी यांच्या विरूध्द कलम २० (ब)(ii), २९ एन.डी.पी.एस ॲक्ट प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपीस अटक करण्यात आली व सदर गुन्हयाचा तपास चालु आहे.

सदरची कामगीरी मा. पोलीस उपायुक्त परिमंडळ क्र. ०३ श्री लोहीत मतानी, मा. सहा. पोलीस आयुक्त(कोतवाली विभाग) श्री संजय सुर्वे यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि जयेश एम. भांडारकर, पोनि (गुन्हे) बळीराम परदेशी, सपांनि श्री संदीप बागुल, सपोउपनि श्री संजय दुबे, नापोशि सचिन टापरे, पुरूषोत्तम जगनाडे, पोशि रंजीत बावणे, रूपेश सहारे, नितीन राठोड, युनुस खान यांनी केली आहे.

## दिनांक २५.०६.२०२१ शुक्रवार

### १) कुख्यात गुन्हेगार रोहीत उर्फ पंडीत संतोश तिवारी यास मा. पोलीस उपायुक्त परि. क्र. ४ यांनी हद्दपार केल्याबाबत :

मा. पोलिस उपायुक्त परिमंडळ क्रं. ४ डॉ अक्षय शिंदे नागपुर शहर यांनी पारीत केलेला हद्दपार आदेश क्रं. २१/२०२१ दिनांक २२/०६/२०२१ म.पो.का. १९५१ कलम ५६(१)(अ)(ब) अन्वये पोलिस आयुक्तालय नागपुर शहर आणि जिल्हा हददीतुन शरीराविरुध्द गुन्हे करणारा कुख्यात गुन्हेगार नामे रोहीत उर्फ पंडीत संतोश तिवारी वय २८ वर्ष रा. प्लॉट नं. ११, राकेश ले आउट नं. ०५, पोस्टे बेलतरोडी नागपुर शहर यास ६ महिण्याकरीता नागपुर शहर आणि जिल्हयातुन हददपार करण्यात आले आहे.

नमुद हददपार इसम रोहीत उर्फ पंडीत संतोश तिवारी वय २८ वर्ष रा. प्लॉट नं. ११, राकेश ले आउट नं. ०५, पोस्टे बेलतरोडी, नागपुर शहर हा लोकांना दुखापत करने, शांतता भग करण्याचे उददेश्याने बुध्दीपुर्वक अपमान करने, मारण्याची धमकी देने, खंडणी अपहरण, जंबरी संभोग लोकांचे मालमत्तेचे नुकसान करने, नेहमी जवळ शस्त्र बाळगणे असे गंभीर स्वरुपाचे गुन्हे करण्याचे सवईचा असुन त्याचेविरुध्द नागपुर शहरात पोस्टे बेलतरोडी, अजनी, सिताबर्डी आणि धंतोली येथे गंभीर स्वरुपाचे गुन्हयाची नोंद आहे. त्याचे विरुध्द वेळोवेळी प्रतिबंधात्मक कारवाई करुन सुध्दा त्याचे वर्तणुकीत कोणत्याही प्रकारची सुधारना न झाल्याने नमुद इसमाविरुध्द हद्दपारी ची कार्यवाही करण्यात आली आहे.

सदरची महत्वपुर्ण कारवाई मा. पोलीस उपायुक्त परी. क्रं. ०४ डॉ अक्षय शिंदे नागपुर शहर, मा. सहा पोलिस आयुक्त (अजनी विभाग) डॉ निलेश एस. पालवे नागपुर शहर यांचे निर्देशाप्रमाणे वरीष्ठ पोलिस निरिक्षक श्री विजय प्र. आकोत, पोउपनि श्री विकास अ. मनपिया, सपोउपनि श्री सुशील धमदर, पोहवा तेजराम देवळे, रितेश ढेगरे, रंणधीर दिक्षीत, नापोअं. प्रशांत सोनुलकर, मपोशि वर्षा चंदनखेडे यांनी केली आहे.



रोहीत तिवारी

### २) मालुबाई कृष्णराव धार्मिक हीला मा. पोलीस उपायुक्त परि. क्र. ३ यांनी हद्दपार केल्याबाबत :

पोलीस स्टेशन तहसिल हद्दीत सन २०१८ पासुन सौ. मालुबाई कृष्णराव धार्मिक वय ३५ वर्षे रा. टिमकी, चिमाबाई रंभाजी रोड, नागपूर ही अवैध रित्या दारूचा बिनापरवाना साठा करणे, अवैद्य मोहफुलाची गावठी हातभट्टी दारूचा साठा करूण जवळ बाळगुन टोपऱ्याचे विहरी जवळ टिमकी परीसरात सार्वजनिक ठिकाणी दारू विक्री करणे तिच्या दारू विक्रीच्या व्यवसायामुळे अनेक नागरिक दारूच्या आहारी गेले यामुळे तिच्यावर वारंवार रेड कारवाई तसेच प्रतिबंधक कारवाई करण्यात आली असुन तिचा वर्तणुकीत काहीही सुधारणा होत नसल्यानें सदर महिलेचा गुन्हेगारी प्रवृत्तीस वेळीच आळा बसावा. तसेच पो.स्टे. हद्दीतील शांतता भंग होवु नये म्हणुन मा.पोलीस उपायुक्त परिमंडळ क्र. ३ श्री लोहीत मतानी नागपूर शहर यांचे मंजुरी हद्दपार आदेशाने सदर महिलेस नागपूर शहर व नागपूर (जिल्हा) या भागातुन सहा (६) महिणे करीता हद्दपार करण्यात आले. सदर महिलेस दिनांक २३/०६/२०२१ रोजी राजनांदगाव येथे तिचे नातेवाईक चुलत भावा कडे हद्दपारीतचा कालावधी पुर्ण करण्या करीता सोडण्यात आले.

सदरची कामगिरी मा.पोलीस उपायुक्त परिमंडळ क्र. ३ श्री लोहीत मतानी नागपूर शहर, मा. सहा. पोलीस आयुक्त (कोतवाली विभाग) श्री संजय सुर्वे नागपूर शहर यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री जयेश भांडारकर, पोलीस निरीक्षक(गुन्हे) श्री बळीरामजी परदेशी, पो.हवा आनंद दिक्षीत, नापोशि प्रविण मानापुरे, मनापोशि रूपाली खापरे, मपोशि दिव्या घरडे, अश्विनी यांनी केली.

<u>३) गुन्हे शाखा युनीट क्र. ५ पथकाची कामगीरी – घरफोडाचा गुन्हा उघडकीस आणल्याबाबत :</u>

दिनांक १९.०६.२०२१ चे १८०० वा ते दिनांक २०.०६.२०२१ चे १२०० वा दरम्यान फिर्यादी देवा आनंदराव येरणे वय ४३ वर्ष (अध्यक्ष) रा. विनोबा भावे नगर, शितला माता मंदीर जवळ, नागपूर यांनी त्यांची पो.स्टे. यशोधरानगर हद्दीत बारानल चौक, इंदिरा गांधी नगर, कांजी हाउस चौक, नागपूर येथील मागासवर्गीय समता पत सहकारी संस्था बंद करून घरी गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने शटर तोडून आत प्रवेश करून लॉकर मधून सोन्याचे दागिने व नगदी ४,७८,९९८ रू असा एकुण ४,८७,७३४ रू. चा मुद्येमाल चोरून नेला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. यशोधरानगर येथे आरोपीविरूध्द कलम ४५४,४५७,३८० भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

गुन्हयाचा तपास करीत असतांना नापोशि श्रीकांत नेमणुक गुन्हे शाखा युनीट क्र. ५ यांना मिळालेल्या गुप्त बातमीदाराव्दारे मिळालेल्या माहीतीवरून आरोपी क्र. १) प्रदीप उर्फ दादु देवधर ठाकुर वय २० वर्ष रा. डिप्टी सिग्नल, पुजाराम वाडी, गल्ली नं. ११, पो.स्टे. कळमना, नागपूर शहर, २) अजय ईश्वर बंजारे वय १८ वर्ष रा. डिप्टी सिग्नल, पुजाराम वाडी, गल्ली नं. ०८, पो.स्टे. कळमना, नागपूर शहर यांना ताब्यात घेवून त्यांचेजवळून नगदी रू १,३०,४००/– व सोन्याचे दागीने असा एकुण रू २,०१,३००/– चा मुद्येमाल जप्त करण्यात आला.

सदरची कामगीरी मा. पोलीस उपायुक्त (प्रभारी डिटेक्शन) श्री सारंग आवाड, मा. सहा. पोलीस आयुक्त गुन्हे श्री नलावडे यांचे मार्गदर्शनाखाली पोनि विनोद पाटील, सपोनि श्री निलेश गोसावी, नापोशि श्रीकांत साबळे, पंकज लाडे, पोशि सचिन आंधळे, हिमांशु ठाकुर, प्रफुल पारधी यांनी केली आहे.

## <u>दिनांक २६.०६.२०२१ शनिवार</u>

<u>१) पो.स्टे. लकडगंज पोलीसांची कामगीरी – वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणल्याबाबत :</u>

दिनांक १४.०१.२०२१ चे १७.३० वा ते १८.०० वा चे दरम्यान फिर्यादी रितीक भिमराव गजभीये वय २२ वर्ष रा. प्लॉट नं. ८२, सुगत बौध्द विहार जवळ, बाबुलवन, गरोबा मैदान, नागपूर हा आंबेडकर गार्डन सि.ए.रोड जैस्वाल देशी दारूच्या भट्टी समोर पो.स्टे.लकडगंज नागपुर शहर येथे आपली स्प्लेंडर मोटार सायकल गाडी क्र. एम.एच/४९/ए.एफ/९६०८ ही उभी करून दारू पिण्याकरीता जैस्वाल देशी दारूच्या भट्टी च्या आत गेला व दारू पिवुन बाहेर आला व मोटार सायकल उभी करून ठेवलेल्या ठिकाणी पाहिली असता दिसुन आली नाही. आजु बाजुला व परीसरात मोटार सायकल चा शोध घेतला मिळुन आली नाही. म्हणुन दि. १७/०१/२१ रोजी पो.स्टे. लकडगंज येथे येवुन त्यांची गाडी कोणीतरी अज्ञात चोराने चोरी करून नेली आहे. अशा फिर्यादीच्या तक्रारी वरून अप क्र. २७/२१ कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल आहे.

दिनांक २४/०६/२०२१ रोजी पो.स्टे. परीसरात अवैद्य धंदे करणारे गुन्हेगारांच्या शोधात पेट्रोलींग करीत असता हिरवी नगर चौकात गोपनीय बातमीदारा कडुन विश्वासनीय बातमी मिळाली की, जयभिम चौक हिरवी नगर येथे राहणारा शाकीब शेख अब्दुल कलाम शेख वय २० वर्ष रा. जयभिम चौक, हिवरी नगर, आर.एस. किराणा च्या बाजुला, पो.स्टे. नंदनवन, नागपूर हा मोटर सायकल चोरी करीत असल्याबाबत माहीती मिळाल्या वरून जयभिम चौक, हिवरी नगर, येथे जावुन शोध केला असता माहीती मिळाली की, सदर इसम हा गोपालकृष्ण लॉन जवळ, रामटेके च्या घरी किरायाने, वाठोडा, नागपूर येथे राहत असल्याचे माहीती मिळाल्यावरून तेथे जावुन त्यास राहते घरून ताब्यात घेवुन पो.स्टे. लकडगंज दाखल क्र. २७/२१ कलम ३७९ भा.द.वि. मधील चोरीस गेलेल्या हिरो स्प्लेंडर मोटार सायकल बाबत विचारले असता त्याने सदर ची गाडी घटना दि. १४/०१/२०२१ रोजी सायंकाळी ४/०० ते ५/०० वा दरम्यान आंबेडकर गार्डन, छापरू नगर चौक, येथील जैस्वाल दारू भट्टी समोरून चोरी केल्याचे व सदर ची गाडी क्र. एम.एच/४९/ए.एफ/९६०८ ही याचे परीचयाचा इसम नामे शकील बब्बु बानवा वय ३५ वर्ष रा. सावरगाव, ता. नरखेड, जि. नागपुर, पो.स्टे. नरखेड, यास विकल्याचे सांगीतल्यावरून याचे सह सावरगाव ता. नरखेड येथे जावुन तेथील स्थानीक पोलीसांचे मदतीने ताब्यात घेवुन त्याचे कडे सदर गाडी बाबत विचारपुस केले असता त्याने शाकीब शेख रा. हिवरी नगर नागपुर याचे कडुन विकत घेतल्याचे सांगतीले. त्यास ताब्यात घेवुन सदर ची मोटार सायकल वर एम. एच/४०/बि.पी/६२४८ असा नंबर टाकुन चालवित असल्याचे सांगीतले वरून त्यास ताब्यात घेवुन गाडी सह पो.स्टे. ला आणुन त्यांची वैद्यकीय तपासणी करून गुन्हयात अटक करण्यात आली.

दिनांक २५/०६/२१ रोजी दोन्ही आरोपीतांचा मा. न्यायालयातुन पी.सी.आर. मंजुर करून त्यांना पुन्हा विचारपुस केली असता त्यांन नागपुर शहरातील विविध पोस्टे हददीतील वाहने चोरी केल्याचे कबुल केले. वरून त्याचे घराची झडती घेतली असता खालील प्रमाणे वाहणे जप्त करण्यात आले.

१) ज्युपीटर मोपेड गाडी नंबर प्लेट नसलेली ग्रे कलर ची तिचा चेचीन नं. MD626EG54M1B02645 इंजिन नं. GG5BM1302692 कि. अं रू ५०,०००/—, २) शाईन गाडी काळया रंगाची क्रमांक एमएच/४९/ए.सी/६४४९ कि. अं. रू ४५,०००/—, ३) स्प्लेंडर गाडी काळया केसरी रंगाचे पट्टे नंबर अस्पष्ट असलेली चेचीन uaMBLHA10ADBHM35227 इंजिन नं. HA10EHBHM33957 कि. अं. रू २५,०००/—, ४) राहुल नगर सोमलवाडा येथुन चोरी केलेली सुझुकी जिक्सर गाडी चेचीन नं. MB8ED11WGL8104029 इंजिन नं. BGA31007308 कि. अं. रू ५०,०००/— वरून हे वाहने नमुद पोलीस स्टेशन हददीतील आहे व त्या गाडया बददल चोरीचे गुन्हे दाखल आहे.

सदरचा कारवाई मा. पोलीस उपायुक्त परि क्र. ३ श्री.लोहीत मतानी नागपुर शहर, मा.सहायक पोलीस आयुक्त लकडगंज विभाग श्री. थोरबोले नागपुर शहर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. पराग पोटे यांचे मार्गदर्शनात तपास पथकाचे पोउपनि सुनिल राउत पोहवा राजु काळे, भोजराज बान्ते प्रकाश सिडाम, नापोशि मनोज घोडे, जयंता शंभरकर, प्रदिप सोनटक्के, प्रकाश मोहने, विनोद गवई, महेश जाधव, पोशि फिरोज खान, मंगेश लोही यांनी केली आहे.

<u>२) २६ जुन आंतरराष्ट्रीय अंमली पदार्थ विरोधी दिवस साजरा केले बाबत —</u>

दिनांक २६.०६.२०२१ आंतराष्ट्रीय अंमली पदार्थ विरोधी दिनानिमीत्त नागपूर शहरातील विविध पोलीस स्टेशन हद्दीत जनजागृतीपर विविध कार्यक्रमाचे आयोजन अंमली पदार्थ विरोधी पथक गुन्हे शाखा, नागपुर शहर याचे तर्फे खालीलप्रमाणे कार्यक्रम आयोजीत करण्यात आले आहेत. नागपूर शहरातील जुना काटोल चौक, सविधान चौक, मिठानिम दर्गा, बस स्टॅड, हसनबाग चौक, मोठा ताजबाग, मोमीनपूरा, अश्या गर्दीचा ठिकाणी मोठे बॅनर लाऊन, हॅन्डबिल व स्टिकर वाटप करूण अंमली पदार्था पासून होणाऱ्या दुष्परीनामा बाबत लोकांमध्ये व्यसनाबाबत जनजागृती करण्यात आली. मेराकी थेअटर्स ॲण्ड हिडण मॅसेज फिल्म मेकरचे रोहीत बडगुजर नागपूर, यांचे मार्फत मदर इंडिया पथनाटय याचे गणेशपेठ बस स्टॅाप, कमाल चौक, सदर व्हीसीए ग्राउड, हसनबाग चौक येथे अंमली पदार्थाचे मनुष्याचे शरीरावर होणारे व्यापक दुष्परीणाम व व्यसनमुक्तीपर उपाययोजना यासंबंधाने प्रबोधन करण्यात आले आहे लोकांमध्ये जन जागृती करण्यात आली.

नागपूर शहरातील मानेवाडा येथील मधूर व्यसन मुक्ती केंद्र, नवजीवन व्यसनमुक्ती केद्रं, अजनी चौक, नवचैतन्य व्यसनमुक्ती केद्रं कोराडी रोड, मैत्री व्यसनमुक्ती केद्रं, हिंगणा रोड या ठिकाणी

भेटी देऊन सभा आयोजीत करून मनुष्याचे शरीरावर होणारे व्यापक दुष्परीणाम व व्यसनमुक्तीपर प्रबोधन करून जनजागृती करण्यात आली.

सदर कार्यवाही नागपूर शहराचे मा. पोलीस आयुक्त श्री. अमीतेश कुमार, मा. अपर पोलीस आयुक्त(गुन्हे) श्री. सुनिल फुलारी यांचे निर्देशान्वये मा. पोलीस उपायुक्त (प्रभारी डिटेक्शन) श्री. सारंग आवाड, मा. सहायक पोलीस आयुक्त(गुन्हे) श्री. भिमानंद नलावडे नागपुर शहर यांचे मार्गदर्शनात पोलीस निरीक्षक श्री विशाल काळे, पोलीस निरीक्षक श्री किशोर पर्वते व इतर युनिटचे अधिकारी व अंमलदार यांनी केलली आहे.




३) <u>पो.स्टे. तहसील पोलीसांची कामगीरी – वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणल्याबाबत :</u>

फिर्यादी सपोउपनि राजेश ठाकुर (नेमणुक पो.स्टे. तहसील, नागपूर शहर) हे दिवसपाळी तपास पथक कर्तव्यावर हजर असताना व.पो.नि. श्री जयेश भंडारकर यांनी पो.स्टे.हददीतील गस्ती दरम्यान त्यांना संशयित रित्या होन्डा ॲक्टिव्हा क्र. एमएच/४९/बी.ए/३८९० या गाडीवर दोन ईसम संशयित रित्या फिरताना दिसले लागलीच व.पो.नि. श्री जयेश भंडारकर यांनी तपास पथकाला माहीती दिली.

यातील अधिकारी व कर्मचारी मिळालेल्या माहीती प्रमाणे घटनास्थळी खाजगी वाहनाने रवाना होवुन पोहचली असता भानखेडा छोठी रेल्वे लाईन पटरीजवळ दोन ईसम सिल्वर रंगाच्या ॲक्टीव्हा गाडीवर हातात लोखंडी पाईप घेवुन येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना शिवीगाळ करित असताना समक्ष मिळुन आल्यावरून त्यांना स्टॉफच्या मदतीने निशस्त्र करून ताब्यात घेवुन त्यांना पो.स्टे.ला आणले. त्यांना त्यांचे नाव विचारले असता त्यांनी आपले नाव १) दिलदार खान उर्फ दिल वल्द सरदार खान वय २८ वर्ष रा. हसनबाग बडी मस्जिद जवळ, गुफार भाई यांचे घरी किरायाने पो.स्टे. नंदनवन, नागपूर शहर, २) सलीम खान वल्द मुस्ताफा खान वय ३४ वर्ष रा. गंजीपेठ, काजीपुरा, पो.स्टे. गणेशपेठ, नागपूर शहर असे सांगीतली. मा व.पो.नि श्री जयेश भंडारकर यांना माहीती देवुन त्यांच्याविरूध्द अप क्र ५३२/२०२१ कलम ४+ २५ भा.ह का सह कलम १३५ मपोका प्रमाणे गुन्हा दाखल करून सदर गुन्हयाचे संदर्भाने विचारपुस केली असता त्यानी पो.स्टे.दाखल अप क्र ४८५/२१ कलम ३७९ भा.द.वी मधील गाडी क्र एमएच/४९/ए.जी/४१२१ कि अं रू २०,०००/– गाडी त्याने चोरल्याचे तसेच अप क्र ४८६/२१ कलम ३७९ भा.द.वी मधील गाडी होन्डा अक्टिव्हा क्र. एमएच/४९/बी.ए/३८९० कि अं. रू २५,०००/– ही गाडी त्याने चोरल्याचे कबुल केले .तसेच पो.स्टे. गणेशपेठ अप. क्र. २३२/२०२१ कलम ३७९ भा.द.वि. मधील मो.सा. क्र. होन्डा अक्टिव्हा क्र. एमएच/३१/ईएच/७७१० कि.अं. रू ३०,०००/– .असा एकुन रू ७५,६००/– चा मुद्देमाल आरोपी कडुन हस्तगत करण्यात आला.

सदरची कामगीरी मा. पोलीस उपायुक्त परि क्र. ३ श्री लोहीत मतानी नागपूर शहर, मा. सहा पोलीस आयुक्त कोतवाली विभाग श्री संजय सुर्वे यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि श्री जयेश भंडारकर,

पोनि श्री बलीरासिंग परदेशी, पोउपनि स्वप्नील वाघ, सपोउपनि राजेश ठाकुर, पोहवा आनंद दिक्षीत, रविंद्र, नापोशि प्रवीण, नाझीर शेख, पोशि हेमंत पराते, सचिन नितवणे, प्रविण लांडगे, मंगेष, मुकुंद यांनी केली आहे.

**४) पो.स्टे. अंबाझरी पोलीसांची कारवाई –**

अंबाझरी पोलीस स्टेशन येथील हद्दपार इसम नामे सुरज अजय हावरे वय २४ वर्ष रा जयनगर, पांढराबोडी, पो.स्टे.अंबाझरी, नागपूर याने सन २०१७ पासून त्याच्या कृती व हालचालीमूळे पो. स्टे. अंबाझरी अंतर्गत वस्त्या मध्ये व त्यालगतच्या परिसरातील रहिवासी लोकांचे मालमत्तेस, जिवितास धोका व भय निर्माण होवून त्याच्या मनात असुरक्षितेची भावना निर्माण केली होती. दिनांक २५/०५/२०२१ रोजी नमुद प्रस्तावित इसमाचा एक वर्ष कालावधी करीता हद्दपारी आदेश निर्गमित करण्यात आले होते. तेव्हापासुन नमुद हद्दपार इसम परिसरात वास्तव्यास नव्हता.

दिनांक २५/०६/२०२१ रोजीचे २०.४० वा. पो.स्टे हददीत पेट्रोलींग करीत असतांना अजय नगर, पांढराबोडी, संघदिप बौध्द विहाराजवळ, नागपूर नमूद वर्णनाचा इसम हातामध्ये लोखंडी सत्तूर घेवून धूमधाम करतांना आढळला. त्यास स्टाफचे मदतीने पकडून वेळीच निशस्त्र केले. सदर हद्दपार इसमास नागपूर शहरात येण्याचे मनाई आदेश जारी असून सूध्दा, सक्षम अधिकारी यांची परवानगी न घेता नागपूर शहर पोलीस स्टेशन अंबाझरी हद्दित येवून अजयनगर, पांढराबोडी, बौध्द विहार जवळ, नागपूर येथे स्वत:चे हातात सत्तूर सारखे प्राणघातक हत्यार घेवून धूमधाम करतांना मिळून आला. याबाबत अंबाझरी पोलीसांनी कार्यवाही करीता अबांझरी पोलीस स्टेशन येथे अपराध क्रमांक २२९/२१ सहकलम ४/२५ भा.ह.का १३५ म.पो.का सह. कलम १४२ म.पो.का अन्वये गुन्हा नोंदविला. सदर प्रकरणी आरोपीस अटक करण्यात आली असुन मा. न्यायालयात हजर केले असता मा. न्यायालयाने आरोपीस जिल्हा कारागृह नागपुर येथे न्यायालयीन कोठडीत रवाना केले आहे.

सदरची कारवाई मा. पोलीस उपायुक्त परि. क्र. २ श्रीमती विनिता साहु नागपुर शहर, मा. सहायक पोलीस आयुक्त (सिताबर्डी विभाग) श्रीमती तृप्ती जाधव, वपोनि. नरेंन्द्र हिवरे, यांचे मार्गदर्शनात सपोनि श्री अचल कपुर, सपोउपनि श्री आशिष कोहळे, नापोशि संतोष वानखडे, पोशि अंकुश, रोमित, प्रशांत, आशिष यांनी केली आहे.

## दिनांक २७.०६.२०२१ रविवार

**१) पो.स्टे. कळमना पोलीसांची कामगीरी –**

दिनांक २७/०६/२०२१ रोजी रात्री २१:३० वा शुभम अनिल रामटेके वय २४ वर्ष रा. प्लॉट नं ३५, निर्मल कॉलनी, शंभु नगर, नारा रोड, पो.स्टे. जरीपटका, नागपुर हे अजनी चौक येथे भाड्यासाठी थांबले असता ओला कॅब (टॅक्सी) माध्यामातुन आरोपी नामे जावेद याने फिर्यादीची कार बुक केली व त्याप्रमाणे फिर्यादीस बुकींग मिळाल्या नंतर मोक्षधाम येथुन पिकअप असल्यामुळे फिर्यादी हे आपले कार घेवुन जात असताना जावेद या व्यक्तीने मोक्षधाम येवजी रामबाग येथे बोलविले वरुन फिर्यादीने भाडा रद्द केले त्यानंतर पुन्हा आरोपी नामे मोहम्म्द यांने रामबाग ची बुंकींग केल्याने फिर्यादी हे रामबाग येथे जावुन तीन अनोळखी इसमाना पिकअप केले.

अनोळखी तीन इसम यांनी फिर्यादीस सांगेले त्या दिशेने कार चालविण्यास सांगितले रात्री ०३:०० ते सकाळी ०५:३० वा पर्यत फिर्यादीस चाकू चा धाक दाखवुन कार फिरवत राहत फिर्यादीचे गळयाला चाकू लावुन वारंवार धाक दाखविले व मानेवाडा बेसा चौक मनीशनगर प्राईड हॉटेलचे पाठी मागे निर्जीन परिसरात चोरी करण्यास फिरवत असल्यामुळे फिर्यादीने मनाई करुन सोडून देण्यास सांगितले असताना सुध्दा अनोळखी इसमाने फिर्यादीला मारहाण करुन फिर्यादीस पाठीमागे बसवुन स्वत: फिर्यादीचे कार चालवुन वाठोडा रिंग रोड पारडी हायवे रसत्याने फिरवुन एच.बी.टाउन येथे जबरीदस्तीने फिर्यादीचे खिश्यातुन रु १०००/– काढुन घेवुन जिवेठार मारण्याची धमकी देवुन फिर्यादीला कारचे खाली उतरवुन त्याचे कार क्रमांक एम.एच/३१/ई.क्यु/०७३९ कि.अं. रू ०५,००,०००/– ची पांढ्या रंगाची कार घेवून पळून गेले.

कंट्रोल रुम कॉलप्रमाणे फिर्यादीस संपर्क साधुन तात्काळ अनोळखी इसमाचे वर्णन व वाहनाचे वर्णन घेवुन प्राप्त मोबाईल क्रमांकाचे नंबर वरुन लोकेशन काढुन जबरी ने चोरी केलेले कार

क्रमांक एम.एच./३१/ई.क्यु./०७३९ तसेच आरोपी नामे १) मोहम्मद दानीश मोहम्मद मतीन वय २१ वर्ष रा. आझाद कॉलनी, पठान पेट्रोल पंप चे मागे, ताजबाग, पोस्टेसक्करदरा, नागपुर २) मोहम्मद जावेद वल्द मोहम्मद आमीद वय १८ वर्ष रा. चामट चौक, क्युरेट हॉस्पीटल जवळ, दिघारी, पोस्टे हुडकेश्वर, नागपुर व एक विधीसंघर्षीत बालक यांचे तीन तासाच्या आत शोध घेवून तांत्रीक तपास करुन ताब्यात घेतले.

सदरची कामगीरी मा. मा. पोलीस उपायुक्त परीमंडळ क्र. ०५ श्री निलोत्पल, मा. सहायक पोलीस आयुक्त श्री. रोशन पंडीत(कामठी विभाग) यांचे मार्गदर्शनामध्ये वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री विश्वनाथ चव्हाण, पोउपनि अनिल इंगोले, मुकुंद जाधव, दिंगबर दहीफळे, विवेक झिंगरे, मनोज राउत पोहवा दिलीप जाधव, चंदशेखर यादव, नापोशि प्रशांत गभने, प्रफुल यांनी केली.

## दिनांक २८.०६.२०२१ सोमवार

### १) मा. पोलीस उपायुक्त परि क्र. ४ यांनी कुख्यात गुन्हेगार शेख मुबारक शेख हयात यास हद्दपार केल्याबाबत :

मा.पोलीस उपायुक्त परि क्र. ४ डॉ. अक्षय शिंदे नागपूर शहर यांचे कडील आदेश क्र. २२/२०२१ दिनांक २५.०६.२०२१ अन्वये पोलीस स्टेशन सक्करदरा हद्दीत मोठा ताजबाग, ठाकुर प्लॉट, एकमिनार मस्जिद समोर, नागपूर येथे राहणारा कुख्यात गुन्हेगार शेख मुबारक शेख हयात वय ३० वर्ष यास नागपूर शहर व नागपूर जिल्हयातून ग्रामीण ६ (सहा) महीण्याकरीता दिनांक २७.०६.२०२१ रोजी हद्दपार करण्यात आले असून हद्दपार कालावधीत तो त्याचा भाऊ फिरोज खान बाबा खान वय ४१ वर्ष रा. हबीब नगर नं. २, गाडगे नगर, पोलीस स्टेशन अमरावती यांचेकडे सोडण्यात आले आहे.



शेख मुबारक

### २) पो.स्टे. पाचपावली पोलीसांची कारवाई —

फिर्यादी **नापोशि रोशन सहारे नेमणुक पो.स्टे. पाचपावली नागपूर शहर** हे दिनांक २८/०६/२०२१ रोजी **सकाळी पोस्टे पाचपावली, बिट मार्शल** क्रमांक ०१, वरून पेट्रोलिंग करित असतांना बाबा बुध्दाजी नगर येथे मक्का मस्जिद समोर चारचाकी वाहन क्रमांक **एमएच/३०/ए. जी**/४२०१ २) चारचाकी वाहन **एमएच/३७/जे/३०४ ची** तपासणी केली असता, त्यामध्ये **गोवंश** जातीचे जनावरे कोंबुन व डांबुन ठेवल्याचे दिसुन आले. **तसेच कुरेशी** मदरसा येथील कंपाउंड मध्ये सुध्दा गोवंश जातीची जनावरे आखुड दोरीने मानेला निर्दयतेने बांधुन चारा पाणी न देता ठेवल्याचे दिसुन आले. **त्यांनी तात्काळ पोलीस स्टेशन** येथील स्टाफ बोलावुन कारवाई केली असता, **एकुण ५४ गोवंश** जातीचे गाय वासरू कि. अंदाजे **रू** ५,३०,०००/— दोन चार चाकी वाहन किमती अंदाजे **रू** १०,००,०००/— असा एकुण **रू** १५,३०,०००/— चा मुद्येमाल जप्त करण्यात आला. **यातील एकुण ५४ गोवंश** जातीचे जनावरांची सुटका करून **गोरक्षण केंद्रात जमा करण्यात** आले. व अज्ञात आरोपीतांविरूध्द **कलम ५(अ) १(ब), ९ (अ) गोवंश हत्याबंदी सुधारणा अधिनियम व महाराष्ट्र** प्राणि संरक्षण अधिनियम १९९५, सहकलम ११ (ई)(ख) प्राण्यांना क्रूरतेने वागविण्यास प्रतिबंध अधिनियम, सहकलम ८३,१७७ मो. वाहन कायदा अन्वये पोस्टे पाचपावली येथे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कारवाई मा पोलीस उपायुक्त परिमंडळ क्र. ३ श्री. लोहीत मतानी नागपूर शहर, मा. सहा. पोलीस आयुक्त (लकडगंज विभाग) श्री सचिन थोरबोले नागपूर शहर यांचे मार्गदर्शनात, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. संजय मेंढे, पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री. रवि नागोसे, सपोनि श्री चंद्रकांत कोसे, श्री विवेक लामतुरे, पोउपनि श्री प्रमोद खंडार, श्री अर्जुन राउत, पोहवा सगिर शेख, नंदकिशोर वाल्दे, नापोशि रोशन सहारे, अमीत सातपुते, शैलेष चौधरी, विनोद बरडे, बाळकृष्ण राठोड, पोशि नितीन धकाते, नितीन

वर्मा, कमलकिशोर चव्हाण, संतोश शिवणकर, राहुल चिकटे, सुमीत बावनगडे, सचिन जयपुरकर, नितीन लोखंडे यांनी केलेली आहे.

**३) सायबर पोलीस स्टेशन कडून वेबीनारबाबत —**

सायबर पोलीस स्टेशन, नागपूर शहर यांचे कडून **सायबर सुरक्षा, सायबर साक्षरता आणि नविन प्रकार सायबर गून्हे (सेक्सटॉर्शन,ऑनलाईन फ्रॉड) या विषयावर** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर शहर यांनी दि. २८/०६/२०२१ रोजी १०.०० वा ते १३:३० वा पर्यंत राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ दिक्षांत सभागृह नागपूर शहर येथे स्वत: हजर राहुन व तसेच ऑनलाईन वेबेक्स मिंटीग या ॲपच्या साहाय्याने वेबीनार घेण्यात आला. सदरचे वेबिनार हे खालील महत्वाच्या विषयावर घेण्यात आलेला आहे.

1) Importance of cyber Crime
2) Identity Theft (fake facebook ,insta id )
3) Psychological Tricks
4) SocialMediaFrauds (facebook,instagram,whatsapp,online friendship )
5) Mobile Application Frauds (small loan app, phone pe, paytm etc)
6) Online Banking frauds
7) Virus Attack on Personal Computer
8) General Tips to Keep you safe
9) Incident Reporting
10) Sextortion

सदर ऑनलाईन जनजागृती कार्यक्रमात (1) Shri Dr.Subhash Choudhary (Vice-Chancellor RTM Nagpur University) (2) Shri Sandip Patil (Deputy Inspector Genral Of Police Gadchiroli) (3) Shri Dr.Sanjay Dhudhe(Pro-Vice-Chancellor RTM Nagpur University) आणि इतर ८,००० विदयार्थी आणि शिक्षक यांनी फेसबुक व युटयुब लाईव्ह च्या माध्यमाने जनजागृती कार्यक्रमाचे लाभ घेतला. यापुढेही लाखो लोक लाभ घेउ शकतील. यापूर्वी सायबर पोलीस स्टेशन नागपूर शहर तर्फे वरीष्ठ पोलीस निरीक्षक डॉ. अशोक बागुल पोलीस स्टेशन नागपूर शहर यांनी आता पर्यंत **७१ वेबिनार** तसेच प्रत्यक्ष जाऊन सेमिनार घेऊन नागरीकांमध्ये सायबर गुन्हयाविषयी जनजागृती केली आहे व नागरीकांना या सायबर गुन्हयापासून कशा प्रकारे सुरक्षित राहता येईल याची सुध्दा माहिती दिली आहे.

सदरचे वेबिनार हे नागपूर शहराचे मा. पोलीस आयुक्त श्री अमितेशकुमार यांचे आदेशान्वये मा. अपर पोलीस आयुक्त (गुन्हे) श्री सुनिल फुलारी यांचे निर्देशान्वये मा. पोलीस उपायुक्त (प्रभारी आर्थिक /सायबर गुन्हे) डॉ. बसवराज तेली यांचे मार्गदर्शनाखाली आम्ही घेतले व सामान्य नागरीकांमध्ये सायबर गुन्हयासंबधाने वेबीनारच्या माध्यमाने जनजागृती केली. यामुळे सायबर पोलीस स्टेशन व एकुणच पोलीसांची प्रतिमा जनमानसात सुधारण्यास मदत झाली.

**४) पो.स्टे. तहसिल पोलीसांची कामगिरी :**

दिनांक २८.०६.२०२१ चे ०१.२० वा चे सुमारास फिर्यादी पोहवा लक्ष्मण शेंडे, नेमणुक पोस्टे. तहसिल हे स्टाफ सह पो.स्टे. तहसिल हद्दीत गस्त करीत असतांना गुप्त बातमीदारा मार्फत माहिती मिळाली की, मोमीनुपरा फुटबॉल ग्राउड सार्वजनिक ठिकाणी मो. फैयाज नावाचा इसम हा उभा असुन त्याच्या जवळ अग्निशस्त्र आहे अशा विश्वसनीय माहीती वरून मा. वपोनि पो.स्टे. तहसिल यांना माहिती देवून तात्काळ घटनास्थळी जावून पाहणी केली असता एक इसम फिर्यादींना पाहुण पळून जाण्याचे बेतात असतांना त्यास स्टाफच्या मदतीने घेराव घालुन ताब्यात घेवून त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता त्याने आपले नाव मो. फैयाज वल्द मोहम्मद नियाज वय २१ वर्ष रा. मोमीनपुरा गरीब नवाज मस्जिद समोर बोरीयापुरा नगापूर असे सांगितले त्यांची अंगझडती घेतली असता त्याचे नाईट पॅन्ट च्या कमरेला उजव्या बाजुस एक पितळी देशी कट्टा लोखंडी बॅरल असलेला किं. अंदाजे १५,००० रू व नाईट पॅन्टचे डाव्या बाजुच्या खिशात दोन जिवंत कारतुस कि. २,००० रू असा एकुण १७,००० रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. नमुद आरोपी हा पोस्टे तहसिल येथील अभिलेखावरील शरीराविरूध्दचे गंभीर स्वरूपाचे दखलपात्र गुन्हे करण्याचे प्रवृत्तीचा असल्याने त्याने अग्निशस्त्र एखादा गंभीर स्वरूपाचा दखलपात्र गुन्हा करण्याचे उद्देशाने संपादन करून आपल्या कब्जात ठेवून जवळ बाळगतांनी मिळून

आल्याने नमुद आरोपीतांस ताब्यात घेवून पोस्टेला आणुन त्याचे विरूध्द गुन्हा कलम ३,७(अ),२५ भाहका सहकलम १३५ मपोका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

सदरची कारवाई मा. पोलीस उपायुक्त परिमंडळ क्र. ३ श्री. लोहीत मतानी नागपूर शहर, मा. सहा. पोलीस आयुक्त (कोतवाली विभाग) श्री संजय सुर्वे नागपूर शहर यांचे मार्गदर्शनात, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. जयेश भंडारकर, पोउपनि गुन्हे श्री बलीरामसिंग परदेसी, पोहवा लक्ष्मण शेंडे, शैलेश दोबोले, नोपाशि किशारे गरवारे, पोशि नझीर शेख, ईकबाल शेख यांनी केलेली आहे.

## दिनांक २९.०६.२०२१ मंगळवार

### १) आर्थीक गुन्हे शाखा पोलीसांची कामगीरी — फसवणुकीतील गुन्हयातील आरोपीस अटक केल्याबाबत

आरोपी सुदत्ता रामटेके, लोकेश वाघमारे यांनी ई गेम एशिया ऑनलाईन या नावाची कंपनी सुरु करुन. नमुद कंपनीमार्फत लुडो, क्रिकेट, फूटबॉल, टेबल पुल, कॅरम, तीन पत्ती असे विविध १८ खेळ असून यामध्ये ई गेम एशिया ऑनलाईन कंपनीकडून लोकांकडुन खेळल्या जातो व त्यांनी गेम खेळल्यानंतर त्यांची १० टक्के रक्कम कंपनीला मिळणार व त्या रक्कमेतुन सर्व गुंतवणुकदारांना गुंतवणुकी प्रमाणे रक्कम वाटप केली जाणार, तसेच नमुद कंपनीमध्ये रू ३,३००/— ते रू ५ लाखापर्यतची गुंतवणूक केल्यास १० महिने, १ वर्षात गुंतवणुकीवरील रक्कम दुप्पट करण्याचे प्रलोभन देवुन गुंतवणुकदारांचा विश्वास संपादन केला व त्यांचे कडुन रक्कम स्विकारुन देय प्रमाणे गुंतवणुकदारांची मुळ देय असलेल्या रक्कमवरील लाभांश अगर मुळ गुंतवणुकीची रक्कम परत न करता फसवणुक केल्याने पोस्टे धंतोली येथे अप क्रमांक ११७/२०२१ कलम ४०६, ४०९, ४२०, ४१९, १२० (ब) भादवी सहकलम ३ एम.पी.आय.डी.ॲक्ट १९९९, कलम ६६ (क) माहिती तंत्रज्ञान कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला

नमुद गुन्हयातील मुख्य आरोपी सुदत्ता प्रमोद रामटेके वय ४६ वर्ष रा. लक्ष्मी नगर, नागपूर हा गुन्हा दाखल झाले पासुन नागपूर येथुन पसार झालेला होता. नमुद आरोपीचा गोपनियरित्या शोध घेतला असता तो गोवा राज्यात असल्याची माहिती प्राप्त झाली. पो.नि.महेन्द्र आंभोरे, पोहवा प्रंशात किंदर्ले, नापोशि भरत ठाकुर, धिरज गायकवाड यांनी त्यास गोवा येथुन नमुद गुन्हयात अटक कारवाई करुन त्याचा दिनांक ०१.०७.२०२१ पावेतो पोलीस कोठडी रिमांड घेण्यात आला असुन गुन्हयाचा तपास नागपूर शहराचे मा.पोलीस आयुक्त श्री अमितेशकुमार, मा. अपर पोलीस आयुक्त(गुन्हे) श्री सुनील फुलारी यांचे निर्देशान्वये मा.पोलीस उपायुक्त (आर्थिक गुन्हे) श्री विवेक मसाळ नागपूर शहर यांचे मार्गदर्शनाखाली पो.नि श्री महेन्द्र आंभोरे आर्थिक गुन्हे शाखा, नागपूर शहर हे करित आहेत.

तरी याव्दारे आम जनतेला आवाहन करण्यात येते की, ई गेम एशिया ऑनलाईन या कंपनीचे संचालक सुदत्ता रामटेके, लोकश जनार्धन वाघमारे तसेच कंपनीचे एंजट यांचे विरुध्द तक्रार असल्यास त्यांनी गुंतवणुकीचे संपुर्ण उपलब्ध कागदपत्रासह आर्थिक गुन्हे शाखा, कार्यालय प्रशासकिय ईमारत क्रमांक १, चौथा माळा, उद्योग भवन च्या बाजुला, सिव्हील लाईन, नागपूर येथे तपासी अधिकारी पो.नि. श्री महेन्द्र आंभोरे संपर्क क्रमांक ९८९२६७५५६३ वर संपर्क साधावा.

### २) आर्थीक गुन्हे शाखा पोलीसांचे नागरीकांना आवाहन —

मा. सहकार आयुक्त, पुणे यांचे आदेशान्वये १ एप्रिल २०१५ ते दि. ३१ मार्च २०१७ या कालावधीतील नवोदय अर्बन को ऑप. बॅक लिमी. या बॅकेचे लेखा परीक्षण करून अहवाल सादर करणेबाबत जिल्हा विशेष लेखा परीक्षक, भंडारा, श्री श्रीकांत एस. सुपे यांची नेमणुक करण्यात आली होती. जिल्हा विशेष लेखा परीक्षक, भंडारा, श्री श्रीकांत एस. सुपे यांचा लेखा परीक्षण अहवाल प्राप्त झालेला होता. नमुद अहवाला मध्ये नवोदय अर्बन को ऑप बॅक लिमी. चे सन २०१० ते २०१७ दरम्यान कार्यरत संचालक मंडळ, बॅकेतील पदाधिकारी इसमांनी बॅकेच्या ठराविक कर्जदार इसमांसोबत अन्यायाचे संगनमत करून ठरावीक कर्जदारांना कर्जासाठी पात्र नसतानाही कर्ज वाटप करण्यात आले, काही कर्जदारांकडे कर्ज थकबाकी असतांना त्यांच्या तारण मालमत्तेचे मुळ कागदपत्रे त्यांना परत करण्यात आली त्यामुळे त्यांनी नंतर थकबाकी भरली नाही, याशिवाय कर्जदारांकडे कर्ज थकीत असतानाही कर्ज शिल्लक नसल्याचे ना हरकत प्रमाणपत्र देण्यात आले. काही प्रकरणात कर्जदारांचे नावे बनावट कर्ज वाटप करतांना बनावट नोंदीचे कागदपत्र तयार करून ते खरे असल्याचे भासविण्यात आले व संगणकात मागिल तारखेच्या बनावट नोंदी केल्या, तसेच काही प्रकरणात कर्जदारांच्या वादग्रस्त मालमत्ता तारण ठेवुन

कर्ज वाटप करण्यात आले. या शिवाय बॅकेच्या व्यवस्थापकीय संचालक व इतर पदाधिकारी यांनी स्वत:च्या फायदयासाठी पदाचा गैरवापर करून बॅकेतुन बेकायदेशिररित्या रकमा उचल केल्या. रिझर्व बॅकेमार्फत बॅकेवर आर्थिक निर्बंध लावण्यात आल्यानंतर देखील बॅकेचे आर्थिक व्यवहार सुरूच ठेवुन नोकरी सोडून गेलेल्या कर्मचाऱ्यांचे नावाने लबाडीने बॅकेच्या संगणकामध्ये लॉगीन करून संगणकातील नोंदींमध्ये फेरफार करण्यात आली. या आशयाच्या बाबी लेखा परीक्षणात नमुद असल्याने त्याची पडताळणी करण्यात येवुन सदर प्रकरणी जिल्हा विशेष लेखा परीक्षक, भंडारा, श्री श्रीकांत एस. सुपे यांनी दिलेल्या तक्रारी वरून नवोदय अर्बन को ऑप बॅक लिमी. चे तत्कालीन अध्यक्ष श्री अशोक शंकरराव धवड, संचालक मंडळ, बॅकेतील काही पदाधिकारी यांनी ठराविक कर्जदार इसमांशी संगनमत करून बॅकेतील सुमारे रू ३८,७५,२०,६४१/— च्या रकमांचा वेगवेगळया प्रकारे अपहार केला व ठेवीदार यांची फसवणूक केली असल्याची तक्रार दिल्याने त्यांच्या फिर्यादी वरून पोलीस स्टेशन धंतोली, नागपुर येथे गु. र. क्र. १८१/२०१९ कलम ४०६, ४०९, ४२०, १२०(ब), ४६५, ४६७, ४६८, ४७१, ४७७(अ) भा. दं.वि. सहकलम ३ एम.पी.आय.डी. ॲक्ट सहकलम ६५, ६६(ब) माहिती व तंत्रज्ञान कायदा अन्वये गुन्हा नोद करण्यात येवुन गुन्हयाचा पुढील तपास वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली आर्थिक गुन्हे शाखा, नागपुर शहर यांच्या मार्फत सुरू आहे.

ज्या ठेवीदारांनी नवोदय अर्बन को ऑप बॅक नागपूर या बॅकेत ठेवी ठेवल्या आहेत परंतु मुदतपुर्ती नंतर त्यांना मिळणारी रक्कम मुद्दल, व्याज व इतर लांभाश अशाप्रकारे कोणताही फायदा बॅकने न देता त्यांची फसवणुक केली आहे. परंतु ते ठेवीदार अदयाप पर्यत आर्थिक गुन्हे शाखा नागपूर शहर येथे त्यांची झालेले फसवणुक बद्दल तक्रार नोंद करण्यास आलेले नाहीत, त्यांनी सदर बाबत तात्काळ पोलीस निरीक्षक श्री प्रशांत रा. माने यांचा संपर्क क्रमांक ८४१९९१९५२४ वर संपर्क साधुन जबाब नोंद करण्याकरीता आर्थिक गुन्हे शाखा कार्यालय, चवथा माळा, प्रशासकीय इमारत क्र १, सिव्हील लाईन, नागपूर येथे हजर राहणेबाबत आवाहन करण्यात येत आहे

**<u>३) कुख्यात गुंड व धोकादायक व्यक्ती अक्षय उर्फ चिंटु वल्द अनिल मरसकोल्हे, महाराष्ट्र झोपडपट्टीदादा, हातभट्टीवाले, औषधी द्रव्य विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, व्हीडीयो पायरेटस्, वाळु तस्कर आणि अत्यावश्यक वस्तुंचा काळा बाजार करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालणे संबंधी अधिनियम सन् १९८१ (सुधारणा २०१५ चे) (महा. एल.व्ही. १९८१) अंतर्गत स्थानबध्द् :</u>**

नागपुर शहराचे पोलीस आयुक्त श्री अमितेशकुमार यांनी दिनांक २९/०६/२०२१ रोजी जारी केलेल्या आदेशान्वये पोलीस ठाणे राणाप्रतापनगर, नागपूर चे हद्दीत शरीराविरूध्द व मालमत्तेविरूध्द गुन्हे करणारा कुख्यात गुंड नामे अक्षय उर्फ चिंटु वल्द अनिल मरसकोल्हे, वय २७ वर्षे, रा. प्लॉट नं. ०५, जुगल किशोर ले आऊट, गोपालनगर, तिसरा बस स्टॉप, पो.स्टे. राणाप्रतापनगर, नागपूर शहर यास महाराष्ट्र झोपडपट्टीदादा, हातभट्टीवाले, औषधी द्रव्य विषयक गुन्हेगार, धोकादायक व्यक्ती, व्हीडीयो पायरेटस्, वाळु तस्कर आणि अत्यावश्यक वस्तुंचा काळा बाजार करणाऱ्या व्यक्ती यांच्या विघातक कृत्यांना आळा घालणे संबंधी अधिनियम सन् १९८१ (सुधारणा २०१५ चे) महा. एल.व्ही. १९८१) अंतर्गत दिनांक २९/०६/२०२१ रोजी स्थानबध्द आदेश पारीत केला. त्यास दिनांक २९/०६/२०२१ रोजी आदेशाची बजावणी करून नागपूर मध्यवर्ती कारागृहात ठेवण्यात आले आहे.

अक्षय उर्फ चिंटु वल्द अनिल मरसकोल्हे, याचेविरूध्द पोलीस स्टेशन राणाप्रतापनगर, सेलू जि. वर्धा, येथे घातक हत्यारांनी किंवा साधनांनी इच्छापूर्वक दुखापत पोचवणे, शांतता भंग घडवून आणण्याच्या उद्देशाने अपमान करणे, मारपीट करणे, जबरी चोरी करतांना इच्छापूर्वक दुखापत करणे, अश्लील भाषेत शिवीगाळ करणे, नुकसान करणे, अपनयन करणे, मालमत्ता नष्ट करण्याच्या उद्देशाने विस्तव किंवा स्फोटक पदार्थ याद्वारे आगळीक करणे, अपराधीक धमकी देणे, अपराधीक जिवे मारण्याची धमकी देणे, बेकायदेशीर जमावाचा घटक असणे, प्राणघातक हत्यारानिशी सज्ज होऊन बेकायदेशीर जमावात सामील होणे, प्राणघातक हत्यारांसह सज्ज होऊन दंगा करणे, समान उद्दीष्ठ साधण्यासाठी केलेल्या अपराधाबद्दल बेकायदेशीर जमावाचा प्रत्येक घटक दोषी असणे, घातक हत्यार जवळ बाळगणे, मनाई आदेशाचे उल्लंघन करणे, अग्नीशस्त्र विक्रीचा कोणताही परवाना नसणे, इत्यादी मालमत्तेविरूध्दचे तसेच शरीराविरूध्दचे गंभीर स्वरूपाचे अनेक गुन्हे दाखल आहेत.

सदर स्थानबध्द इसमाविरूध्द सन २०१६ मध्ये राणाप्रतापनगर पोलीसांकडून त्याच्याविरूध्द १०७, ११६(३) फौ.द.प्र.सं अन्वये प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली होती. परंतु त्याचेवर केलेल्या प्रतिबंधक कारवाईचा कोणताही परिणाम झाला नाही. त्यामुळे त्याला ऑक्टोंबर २०१७ मध्ये हद्दपार केले. परंतु त्याने हद्दपार आदेशाचे उल्लंघन करून आपले गैरकायदेशीर व धोकादायक गुन्हे करण्याची प्रवृत्ती निरंतर सुरूच ठेवले. पुन्हा सन २०२० मध्ये राणाप्रतापनगर पोलीसांकडून त्याच्याविरूध्द ११० (ई)(ग) जाफौ अन्वये प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात आली. परंतु तरीही त्याने प्रतिबंधक कारवाई उल्लंघन करून गैरकायदेशीर व धोकादायक गुन्हे करण्याची प्रवृत्ती निरंतर सुरूच ठेवली आहे. अलिकडील काळात त्याने पोलीस स्टेशन राणाप्रतापनगर हद्दीत गंभीर प्रक्षोभकारण नसतांना हमला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग करणे, लोकसेवकाला त्याचे कर्तव्य पार पाडण्यापासून धाकाने परावृत्त करण्यासाठी हमला किंवा फौजदारीपात्र बलप्रयोग करणे, लोकसेवकाला त्याच्या कर्तव्यापासून धाकाने परावृत्त करण्यासाठी इच्छापूर्वक दुखापत पोचवणे, लोकसेवक सार्वजनिक कार्य पार पाडीत असता त्याला अटकाव करणे, मारपीट करणे, अश्लील भाषेत शिवीगाळ करणे, नुकसान करणे, शांतता भंग घडवून आणण्याच्या उद्देशाने अपमान करणे, अपराधीक धमकी देणे, बेकायदेशीर जमावाचा घटक असणे, दंगा करणे, प्राणघातक हत्यारांसह सज्ज होऊन दंगा करणे, समान उद्दीष्ठ साधण्यासाठी केलेल्या अपराधाबद्दल बेकायदेशीर जमावाचा प्रत्येक घटक दोषी असणे इत्यादी अशा स्वरूपाचे गुन्हे केलेले आहेत.

अशाप्रकारे धोकादायक व्यक्ती नामे अक्षय उर्फ चिंटु वल्द अनिल मरसकोल्हे, याची अपराधीक कृत्ये निरंतर वाढत असल्याने आणि त्यामुळे सार्वजनिक सुव्यवस्थेस बाधा निर्माण होत असल्याने मा. पोलीस उपायुक्त परिमंडळ क्रं. १ श्री नूरूल हसन, नागपूर शहर यांचे मार्गदर्शनाखाली व.पो.नि. श्री दिनकर ठोसरे, वरिष्ठ पोलीस स्टेशन राणाप्रतापनगर, नागपूर शहर यांनी नमुद आरोपीतास स्थानबध्द करण्याकरिता गुन्हे शाखेस प्रस्ताव सादर केला होता. मा. अपर पोलीस आयुक्त (दक्षिण प्रादेशीक विभाग) श्री दिलीप कृ. झळके नागपूर शहर यांचे मार्फतीने सादर केला असता मा. अपर पोलीस आयुक्त(गुन्हे) श्री. सुनिल फुलारी नागपूर शहर यांचे निर्देशान्वये मा. पोलीस उपायुक्त(डिटेक्शन) श्री. गजानन शिवलींग राजमाने यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हेशाखेतील एम.पी.डी.ए. विभागाने नमुद आरोपीला स्थानबध्द करण्याकरीता प्रस्ताव सादर केला त्याअन्वये स्थानबध्द प्राधिकारी नागपूर शहराचे मा. पोलीस आयुक्त श्री. अमितेश कुमार यांचे समक्ष सादर केले असता त्यांनी वर नमुद गुंडाविरूध्द स्थानबध्दतेचा आदेश पारित करून त्यास येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे येथे ठेवण्याबाबत आदेश दिलेत. त्याअन्वये स्थानबध्द प्राधिकारी नागपूर शहराचे मा. पोलीस आयुक्त श्री. अमितेश कुमार यांनी वर नमुद इसमाविरूध्द स्थानबध्दतेची महत्वपुर्ण कारवाई करून त्यास सध्या नागपूर मध्यवर्ती कारागृहात ठेवण्यात आले आहे.

<u>४) पो.स्टे. पारडी पोलीसांची कामगीरी — वाहन चोरीचे गुन्हे उघडकीस आणल्याबाबत :</u>

पो.स्टे. पारडी येथील पोलीस कर्मचारी हे गुन्हेगाराच्या शोधात पो.स्टे. परिसरात पेट्रोलींग करीत असतांना नागेश्वर नगर पोल्ट्रीफार्म जवळ ०१ विधीसंघर्ष बालक संशायास्पद रित्या एक्टीवा गाडीवर जातांना मिळुण आला त्यास आवाज दिले असता तो येथुन पळुन लागला असता त्यास स्टाफ च्या मदतिने ताब्यात घेतले. व त्याचे जवळील वाहनाबाबत विचारना केली असता ते वाहन पोस्टे. पारडी हद्दीतुन चोरी केले असल्याचे समजले त्या वाहनाचे चोरी बाबात अप क्र. ३५८/२०२१ कलम ३७९ भादवी प्रमाणे गुन्हा दाखल आहे. नमुद विधी संघर्ष बालक यास आधिक विचारपुस केली असता त्याने पो.स्टे पारडी येथुन चोरी गेलेले ०२ दुचाकी वाहन व पो.स्टे. कळमना हद्दीतुन ०१ दुचाकी वाहन चोरी केल्याचे कबुल केले व नमुद विधी संघर्ष बालकाचे ताब्यातुन नमुद ०३ पो.स्टे. पारडी हद्दीतुन चोरीस गेलेले वाहन व पो.स्टे. कळमना हद्दीतुन ०१ दुचाकी वाहन असे एकुण ०४ दुचाकी वाहने किंमती रू ०१,३०,०००/— मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कामगीरी मा. पोलीस उपायुक्त परि क्र. ५ श्री निलोत्पल, मा. सहा पोलीस आयुक्त कामठी विभाग श्री रोशन पंडीत, वपोनि श्री सुनील गांगुर्डे यांचे मार्गदर्शनाखाली सपोउपनि श्री सुरेंद्र तिवारी, नापोशि नरेंद्र तिडके, विश्वनाथ कुथे, रूपम टेंभेकर, पोशि शरद राघोर्ते यांनी केली आहे.

<u>दिनांक ३०.०६.२०२१ बुधवार</u>

<u>१) गुन्हे शाखा, युनिट क्र. ४ पोलीसांची कामगिरी :</u>

गुन्हेशाखा, युनिट क्रमांक ०४, नागपूर शहर चे पथक दिनांक २९/०६/२०२१ रोजी पथक प्रमुख वरीष्ठ पोलीस निरीक्षक शिवराम कुमरे यांचे मार्गदर्शनात, नागपूर शहरामध्ये पेट्रोलिंग करीत असतांना माहिती मिळाली की उंटखाना येथे एका मुलीचा गळा कापला आहे. अशा माहिती वरून लगेच घटनास्थळ गाठुन माहिती घेण्यात आली. फिर्यादी निर्मला बालगोविंदा निशाद वय २१ वर्षे हिचा नमुद आरोपी निखील प्रताप दमके, वय २२ वर्ष रा. मेडिकल चौक, उंटखाना, प्लॉट नं. १०८, नागपूर हा पती असुन जुण्या भांडणाच्या कारनावरून फिर्यादीला जिवे मारण्याच्या उद्देशाने चाकु सारखा टोकदार हत्याराने फिर्यादीच्या गळयावर वार करून जख्मी केले अशा फिर्यादीचे रिपोर्ट वरून गुन्हा दाखल झालेला होता. नमुद आरोपीचा लगेच शोध घेणे सुरू केले. खाजगी तसेच शासकीय वाहनाने इमामवाडा परीसरात पेट्रोलिंग केली.

युनिटचे पोहवा रविन्द्र पानबुडे याचे गुप्त बातमीदाराने सुमारे २०.०० वाजताचे सुमारास माहिती दिली की आरोपी हा मेडीकल हॉस्पीटल चौक येथे गणगौर हॉटेल चे बाजुला उभा आहे. मिळालेल्या माहितीची पक्की खात्री करून गणगौर हॉटेल येथे शोध घेतला असता आरोपी उभा दिसला. आरोपी पोलीसांना पाहुन तो पळुन जाण्याचे बेतात असतांना आम्ही त्यास स्टाफचे मदतिने ताब्यात घेवुन विचारपुस केली असता त्याने गुन्हा केल्याचे कबुल केले. त्याचे कडुन गुन्हयात वापरलेला छोटा चाकु ताब्यात घेण्यात आला. त्यास पोलीस स्टेशन इमामवाडा यांचे ताब्यात पुढील कारवाही कामी देण्यात आलेले आहे. अश्याप्रकारे मिळालेले माहीतीचे आधारे आरोपी इसमास गुन्हा घडल्या नंतर अवघ्या काही तासात आरोपीचा शोध घेवुन गुन्हा उघडकीस आणुन पो.स्टे. इमामवाडा यांचे ताब्यात दिले वरून सदर पथकाने प्रशसंनीय कामगीरी केलेली आहे.

सदरची कारवाई नागपूर शहराचे मा. पोलीस उपायुक्त(डिटेक्शन) श्री गजानन शिवलींग राजमाने, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त(डिटेक्शन) श्री भिमानंद नलावडे, यांचे मार्गदर्शनाखाली पोनि श्री प्रदिप रायण्णावर, सपोनी विजय कसोधन, पोउपनिरी अतुल इंगोले, पोहवा. रविंद्र पानबुडे, नाअंमलदार दिपककुमार चोले, सतिश ठाकरे, पोअंमलदार विलास चिंचुरकर, चालक नरेंद्र बान्ते, लिलाधर भेंडारकर यांनी केली आहे.

<u>२) मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ क्रमांक ०५, नागपुर शहर यांनी गुन्हेगार नामे रजत उर्फ प्रियांन्शु अनिल सहारे, यास ०१ (एक) वर्षाकरीता हद्दपार केल्याबाबत :</u>

नागपूर शहराचे मा. पोलीस उपायुक्त(परि. क्र. ०५), श्री नीलोत्पल यांनी गुन्हेगार ईसम नामे रजत उर्फ प्रियांन्शु अनिल सहारे, वय २८ वर्षे, राह. समता नगर, उन्नती कॉलनी, यादव ले आऊट, पो.स्टे. जरिपटका, नागपूर शहर याने पो.स्टे. जरीपटकाचे हद्दीत लोकांना दमदाटी व मारहाण करणे, अवैधरित्या देशी जवळ बाळगणे व विक्री करणे, अवैधरित्या मोहफुलाची हातभट्टीची गावठी दारू जवळ बाळगणे व विक्री करणे, अवैधरित्या देशी दारू जवळ बाळगणे, अवैधरित्या मोहफुलाची हातभट्टीची गावठी दारू व देशी दारूजवळ बाळगणे व विक्री करणे, अवैधरित्या देशी दारू जवळ बाळगणे, अवैधरित्या देशी दारूजवळ बाळगणे व विक्री करणे, ईच्छापुर्वक दुखापत पोहचविणे, शांतताभंग घडवुन आणण्याचे उद्देशाने अपमान करणे, अवैधरित्या मोहफुलाची हातभट्टीची गावठी दारू जवळ बाळगणे, घातक हत्याराने ईच्छापुर्वक दुखापत करणे, नुकसान करून आगळीक करणे, बेकायदेशीर जमाव गोळा करून प्राणघातक हत्यारानिषी दंगा करणे, अवैद्यरित्या प्राणघातक शस्त्रेजवळ बाळगणे, मनाई आदेशाचे उल्लंघन करणे, अशा प्रकारे गंभीर गुन्हे केलेले असुन त्याचे या कृत्यामुळे परिसरातील लोकांच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण झालेली आहे. सदर ईसमावर वारंवार प्रतिबंधक कारवाई करून देखील त्याचे प्रवुत्तीत कुठलीही सुधारणा झाली नाही. त्याचे गुन्हयांना आळा बसावा व परिसरात शांतता व सुव्यवस्था रहावी या हेतुने मा. पोलीस उप—आयुक्त, परिमडंळ क्रमांक ०५, नागपुर शहर, यांनी गुन्हेगार ईसमाविरूध्द हद्यपार आदेश क्रमांक ०९/२०२१ दिनांक २९/०९/२०२१ अन्वये पारीत केला असता सदरचा हद्यपार आदेश त्यास दिनांक २९/०६/२०२१ रोजी बजावणी करण्यात आलेला असुन त्यास नागपूर शहर पोलीस आयुक्तालय व पोलीस स्टेशन जरीपटका हद्यीला लागुन असलेल्या नागपूर ग्रामीण हद्यीतील पोलीस स्टेशन कन्हान, खापरखेडा व मौदा हद्यीतुन ०१ (एक) वर्षाकरिता हद्दपार करण्यात आलेले आहे. तसेच तो त्याचे हद्दपारीचा कालीवधी त्याचे नातेवाईक आजी नामे संगीता सुर्यभान धमगाये, वय ४५ वर्ष, राह. देवलापार, वार्ड नं. ०५, पो.स्टे. देवलापार, जिल्हा नागपुर, या ठिकाणी राहुण पुर्ण करेल.

सदरची कामगीरी मा. श्री. नीलोत्पल, पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०५, नागपुर शहर, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. रोशन पंडीत, सहाय्यक पोलीस आयुक्त, जरीपटका विभाग, नागपुर शहर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. नितीन फटांगरे, पो.हवा. जवानसिंग पडवाल, नापोशि विनोद मेश्राम यांनी केली.

**३) मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ क्रमांक ०५, नागपुर शहर यांनी गुन्हेगार नामे श्रावण उर्फ सावंत वल्द शरद जोगणे, यास ०२ (दोन) वर्षाकरीता हद्यपार केल्याबाबत :**

मा. श्री. नीलोत्पल, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ क्रमांक ०५, नागपुर शहर यांनी गुन्हेगार ईसम नामे श्रावण उर्फ सावंत वल्द शरद जोगणे, वय २५ वर्षे, राह. एन.आय.टी. क्वॉर्टर नं. २०७, मिनी माता नगर, गंगाधर किराणा दुकानाजवळ, कळमना गाव, पो.स्टे. कळमना, नागपूर शहर याने पो.स्टे. कळमना, पो.स्टे.वाडी, तसेच पो.स्टे. राणा प्रतापनगरचे हद्दीत लोकांना दमदाटी व मारहाण करणे, ईमारतीचे आतील मालमत्ता असलेले पात्र अप्रामाणिकपणे फोडुन उघडुन घरफोडी करणे, चोरटे गृह अतिक्रमण करून घरफोडी करणे, रात्रीचे वेळी चोरटे गृह अतिक्रमण करून घरफोडी करणे, संगनमत करून गुप्तपणे व गैरपणे एखादया व्यक्तीला परिरूध्द करण्याकरीता तिचे अपहरण करणे, रात्रीचे वेळी चोरटे गृह अतिक्रमण करून घरफोडी करणे, संगनमत करून चोरटे गृह अतिक्रमण करून घरफोडी करणे, रात्रीचे वेळी चोरटे गृह अतिक्रमण करून घरफोडी करणे, अशा प्रकारे गंभीर गुन्हे केलेले असुन त्याचे या कृत्यामुळे परिसरातील लोकांच्या मनात असुरक्षिततेची भावना निर्माण झालेली आहे. सदर ईसमावर वारंवार प्रतिबंधक कारवाई करून देखील त्याचे प्रवुत्तीत कुठलीही सुधारणा झाली नाही. त्याचे गुन्हयांना आळा बसावा व परिसरात शांतता व सुव्यवस्था रहावी या हेतुने मा. पोलीस उपायुक्त, परिमडंळ क्रमांक ०५, नागपुर शहर, यांनी गुन्हेगार ईसमाविरूध्द हद्यपार आदेश क्रमांक ०८/२०२१ दिनांक २५/०६/२०२१ अन्वये पारीत केला असता सदरचा हद्यपार आदेश त्यास दिनांक २८/०६/२०२१ रोजी बजावणी करण्यात आलेला असुन त्यास नागपूर शहर पोलीस आयुक्तालय व नागपूर जिल्हा (ग्रामीण) हद्यीतुन ०२ (दोन) वर्षाकरिता हद्दपार करण्यात आलेले आहे. तसेच तो त्याचे हद्दपारीचा कालीवधी त्याचे नातेवाईक नामे गजानन दशरथ जोगणे, वय २४ वर्ष, राह. जयस्थंभ मागे, दारू भट्टीजवळ, पो.स्टे. पांढुर्णा, जिल्हा छिंदवाडा, राज्य मध्य प्रदेश या ठिकाणी राहुण पुर्ण करेल.

सदरची कामगीरी मा. श्री. नीलोत्पल, पोलीस उपायुक्त, परिमंडळ क्र. ०५, नागपुर शहर, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. रोशन पंडीत, सहाय्यक पोलीस आयुक्त, कामठी विभाग, नागपुर शहर, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. विश्वनाथ चव्हाण, सपोउपनि धर्मेंद्र, नापोशि प्रविण लांडे, पोशि सचिन दुबे, म.पो. शि. ललीता, म.पो.शि. गिता यांनी केली.

**४) गुन्हे शाखा, डिटेक्शन येथे नेमणुकीस असलेले अधिकारी व कर्मचारी यांचे निरोप समारंभाबाबत :**

गुन्हे डिटेक्शन शाखा नागपूर शहर येथे नेमणुकीस असलेले १) श्री शिवराम कुमरे पोलीस निरीक्षक गुन्हे प्रकटीकरण पथक क्र. ४, २) सहायक पोलीस उपनिरीक्षक श्री संदीप शर्मा, वाचक शाखा, ३) सहायक पोलीस उपनिरिक्षक श्री प्रभाकर नांदे एमओबी, ४) सहायक पोलीस उपनिरीक्षक श्री सितानाथ पांडे, गुन्हे प्रकटीकरण पथक क्र. २, ५) सहायक पोलीस उपनिरिक्षक श्री निनाजी तायडे गुन्हे प्रकटीकरण पथक क्र. २, हे पोलीस अधिकारी/कर्मचारी आज दिनांक ३०.०६.२०२१ रोजी नियत वयोमानाने सेवानिवृत्त होत असल्याने सकाळी १००० वा त्यांचा निरोप समारंभ गुन्हे डिटेक्शन शाखा कार्यालय येथे कोव्हीड नियमांचे तंतोतत पालन करून साजरा करण्यात आला.

निरोप समारंभाचे वेळी मा. पोलीस उपायुक्त(डिटेक्शन) श्री गजानन शिवलिंग राजमाने, मा. सपोआ(गुन्हे शाखा) श्री बी.एन. नलावडे व इतर अधिकारी व कर्मचारी यांचे उपस्थितीत सर्व सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांचा प्रथम पुष्पगुच्छ देवून सत्कार करून त्यांचा शाल, श्रीफळ व भेट वस्तू देवून गौरविण्यात आले. निरोप समारंभाचे शेवटी अल्पोहाराचा छोटेखानी कार्यक्रम आयोजित करण्यात आला. निरोप समारंभ संपन्न झाल्यावर सर्व सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांचे वर उपस्थितांकडुन फुलाचां वर्षव करण्यात आला. तसचे मा. पोलीस उपायुक्त(डिटेक्शन) श्री गजानन शिवलिंग राजमाने यांनी स्वत: फुलांनी सजविलेले वाहन चालवून फुलांनी सजविलेल्या वाहनातुन सेवानिवृत्त झालेले सर्व पोलीस अधिकीर व कर्मचारी यांना सन्मानाने निरोप दिला.

सर्व सेवानिवृत्त अधिकारी व कर्मचारी यांची गुन्हे डिटेक्शन शाखा येथील कामगिरी अतिशय चांगली असून यामध्ये मुख्यत्वे सपोउपनि श्री संदपी मनोहरलाल शर्म यांनी सर्व संबधीत

शासकीय यंत्रणातील वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी याचेंशी सौर्हादपूर्वक व सलोख्याचे संबध जोपासले आहे. त्याची सहकार्याची भावना, काम करण्याची जिद्द व चिकटी ही उच्च कोटीची व वाखणण्याजोगी आहे. त्यांनी नागपूर शहर पोलीस दलासाठी, सामाजिक सुरक्षिततेचे भान ठेवून अविरतपणे मेहनतीने आपले कर्तव्य निष्कलंक व चोखपणे बजाविलेले ओ. पोलीस विभागात काम करीत असतांना त्यांनी प्रत्येक क्षणी दाखविलेली कार्यतत्परता ही गौरवास्पद व अभिमानास्पद आहे.



नागपूर शहर पोलीस
NAGPUR CITY POLICE
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

<u>(नागपूर शहर पोलीसांची उल्लेखनिय कामगीरी)</u>

<u>दि. 21.03.2017</u>

<u>पोस्टे एमआयडीसी पोलीसांची कामगीरी</u>

दिनांक 20/03/17 रोजी पोस्टे.एमआयडीसी.नागपूर हद्दीतील नोगा कंपनी हिंगणा नाका येथे काही इसम विषारी सापाचे तस्करी करण्याकरीता येणार असल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्याने आम्ही सपोनि. एस.एस.गायकवाड, व सोबत स्टाफ सहा.पो.उपनि रमेश तायडे, पो.हवा पप्पु यादव, पोशि आशिष दुबे, सुशिल श्रीवास्तव, दिनश जुगनाहाके असे सदर ठिकाणी गेले असता काही वेळाने तेथे एक पांढ–या रंगाची ईनोव्हा गाडी संशयास्पद स्थितीत उभी राहील्याने गाडीला घेराव घातला असता गाडी मधून दोन इसम बाहेर आले त्यांना त्यांचे नाव व पत्ता विचारले असता त्यांनी आपले नाव 1) गोपाल सिंग रेन सिंग गौर, वय 33 वर्ष, रा.स्वास्तीक अपार्टमेंट, स्टेट बॅंक ऑफ इंडीयाचे बाजुला, हुडेकेश्वर नागपूर. 2) रोशन गिरधर अमृतवार, वय 19 वर्ष, रा. तडोदी बाळापूर, ता. नागभिड, जि. चंद्रपूर असे सांगीतले त्यांनतर त्यांची अंगझडती घेण्यात आली त्यांनतर त्यांच्या ताब्यातील ईनोव्हा गाडी एमएच/31/सिव्ही/7319 पांढ–या रंगाच्या गाडीची झडती घेतली असता गाडीचे पुढील दोन सिटच्या मध्ये हॅंड ब्रेक जवळ एका पांढरा रंगाच्या बॉक्स मध्ये पाच काचेच्या टेस्ट ट्युब सारख्या बॉटल मध्ये पांढरा व चॉकलेटी रंगाचे चिकट द्रव्य भरलेले असुन सदर बाबत नमुद दोन्ही इसमांना टेस्ट ट्युब काचेच्या बॉटल मध्ये असलेले पांढरा व चॉकलेटी रंगाचे चिकट द्रव्याबाबत विचारपूस केली असता त्यांनी सदरचे द्रव्य हे विविध सापांचे विष असल्याचे त्यांनी सांगून सदरचे द्रव्य हे सॅम्पल स्वरूपात विकत घेण्या–या पार्टीला दाखविण्याकरीता असल्याचे सांगितले. यावरून सदरचे सापाचे विषारी सॅम्पल हे नमुद दोन्ही इसमांनी अनाधिकृतपणे अवैद्यरित्या तस्करी करण्याकामी त्यांनी सोबत बाळगले वरून नमुद पंचासमक्ष पाच काचेच्या टेस्ट ट्युब सारख्या बॉटल मध्ये पांढरा व चॉकलेटी रंगाचे चिकट द्रव्य भरलेले अंदाजे 25 एम.एल. जप्त केले तसेच नमुद इसमांनी गुन्हयामध्ये वापलेली एक पांढ–या रंगाची ईनोव्हा गाडी कि.अं. 10 लाख रूपये असे घटनास्थळ जप्ती पंचानाम्या प्रमाणे जप्त केले असुन नमुद दोन्ही आरोपीतांना सिआरपीसी. 41 (1)(अ)(ड) प्रमाणे ताब्यात घेतले आहे.

सदरचा गुन्हा वन परिक्षेत्रांचे अधिकार क्षेत्रात येत असुन गुन्हया मधिल आरोपीतांविरोधात केलेले कार्यवाहीचे कागदपत्र तसेच जप्त केलेला मुद्देमाल पुढील तपासाकामी मा. वन परिक्षेत्र अधिकारी, त.हिंगणा, जि. नागपूर यांचे ताब्यात देण्यात आले. सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त परि. क्र 1, नागपूर शहर व मा. सपोआ, एमआयडीसी विभाग नागपूर यांचे मार्गदर्शनाखाली वपोनि श्री महाडीक, सहा.पो.उपनि रमेश तायडे, पोहवा पप्पु यादव, पोशि आशिष दुबे, सुशिल श्रीवास्तव, दिनश जुगनाहाके यांनी केली.








## (नागपूर शहर पोलीसांची उल्लेखनिय कामगीरी)
## दि. 19.03.2017

**वाहतुक शाखा कं. 4 कडुन घेण्यात आलेल्या समुपदेशन कार्यक्रमाबाबत.**

होळी व धुलीवंदन सणानिमीत्त वाहतुक पोलीसांनी मद्यार्काचे सेवन करून वाहन चालविणा–या विरूध्द मोहीम राबवुन कार्यवाही केली. वाहतुक शाखा कं. 4 तर्फे ही मोहीम राबविण्यात येवुन मद्यार्काचे सेवन करून वाहन चालविणा–या 307 वाहन चालकांन विरूध्द कार्यवाही करण्या आली. अश्या मद्यार्काचे सेवन करून वाहन चालविणा–या चालकांनी भविष्यात वारंवार वाहन चालविणा–यांचे मन परिवर्तन करावे याकरीता होळी व धुलीवंदनाचे दिवशी कार्यवाही झालेल्या वाहन चालकांना बोलावुन समुपदेशन करावे असा मा. पोलीस आयुक्त नागपुर शहर यांनी निर्देश दिल्यावरून वाहतुक शाखा कं. 4 तर्फे आज दि. 18.03.2017 रोजी सकाळी 1000 वाजता शाखेचे प्रांगणात मिटींग बोलावण्यात आली.

सदर कार्यक्रमामध्ये मा. पोलीस उप आयुक्त वाहतुक शाखा श्रीमती स्मार्तणा पाटील, तसेच श्री राजाभाऊ चिटणीस, डॉ. श्री रमाकांत कापरे, जन आक्रोशचे श्री रवि कासखेडीकर, श्री घाटोडे, डॉ. लाड, सहा. पोलीस आयुक्त अशफाक शेख, वपोनि श्याम सोनटक्के, वाहतुक शाखा, कं. 4 चे अधिकारी व कर्मचारी तसेच सुमारे 150 ते 200 वाहन चालक हजर होते. या वाहन चालकांना श्री राजाभाऊ चिटणीस यांनी समुपदेशन करून या नंतर दारू पिणार नाही अशी शपतच घ्यायला लावली. तर डॉ. रमांकात कापरे, यांनी दारूमुळे शरीरावर होणारे दुष्परीनाम कुंटुबांवर होणारे दुष्परीनाम या बाबत सविस्तर माहीत देवुन समुपदेशन केले. शेवटी मा. पोलीस उप आयुक्त वाहतुक यांनी दारू पिवुन वाहन चालविल्यामुळे होणारे अपघात इतर गुन्हे वाहन चालविणा–यांचे व दुस–या वाहतुक दारांचे कसे नुकसान होते. याबद्दल समजावुन सांगुन आपण का दारू पिता, कश्या करिता दारू पिता, दारू न पिल्यास आपल्यावर काही परिणाम होईल का असे प्रश्न विचारून दारू पिवुन वाहन चालवु नका असा संदेश दिला. सदर कार्यक्रम यशस्वी व्हावा याकरीता मैत्रीपरीवाराचे श्री सुहास खरे, सपोनि पाटील, भोसले, सपोउपनि नरेन्द्र रघटाटे, पोहवा रवि भोस्कर, नापोशि अरून सातपुते, यांनी परिश्रम घेतले.

वाहतुक पोलीसांनी मद्यार्काचे सेवन करून वाहन चालवण्यात येवु नये या करीता जन जागृती व्हावी एक सामाजीक बांधीलकी निर्माण व्हावी अश्या सामाजिक उद्देशाने सदर कार्यक्रम घेण्यात आला.

## (नागपूर शहर पोलीसांची उल्लेखनिय कामगीरी)

## दि. 14.03.2017

**पो.स्टे. सदर पोलीसांची उल्लेखनीय कामगीरी :**

आपला एखादा आवडता व्यक्ती लहान मुल, मुलगी, किंवा कुटुंबातील कोणतीही व्यक्ती आपल्यापासुन जर हरवली किवां घरातुन निघुन गेली तर त्या कुटुंबावर नक्कीच दुःखाचा डोंगर कोसळतो त्यांच्या जीवनात पुर्ण अंधकार पसरतो आपली हरवलेली व्यक्ती कुंठ राहत असेल काय खात असेल त्यावर काय संकट कोसळत असतील या भितीने तर त्या कुटुंबातील सदस्यांचा जीव चर करतो आणि त्याचा शोध लागावा म्हणुन दाही दिशा फिरतो पण एखादा देवदुत आपल्या घरी आपल्या मानसाला आपल्या घरापर्यंत सुखरूप पोहोचवत असेल तर त्या कुटुंबाच्या आनंदाला परावर राहत नाही त्यांच्या जीवनात अशी रोशनी व वैशाली येते की त्यांचे मन त्या दुवदुताच्या कृतज्ञतेने ओसंडुन वाहते, आणि हा वर्दीतल्या देवदुतांना आपण कोणाच्या चेह—यावर हसु अनु शकलो त्याचीच धन्यता असते.

असेच देवदुत नागपुर शहरातील पोलीस स्टेशन सदर येथे "मिसींग" पथक आहे आणि त्यातील कर्मचारी ख—या रूपाने समाजसेवेचे वृत घेतलेले देवदुतच आहेत यामध्ये महिला पोलीस शिपाई रोशनी ही नेहमी पॅशन प्रो. दुचाकीवर स्वार होवुन चेह—यावर काळा गॉगल्स परीधान करून पोलीस खात्यातील सळसळता उत्साह तिच्या वागण्याने तिच्या आजुबाजुला नेहमी संचारलेला असतो आणि तेवढयाच तत्परतेने ते गरजुंच्या मदतीला धावुन जाते. याचा पथकातील दुसरी महिला पोलीस कर्मचारी म्हणजे वैशाली या दोघींचा हरवलेल्या मुली शोधुन काढण्यात खुपच हातखंडा असुन त्यांनी आतापर्यंत अनेक हरवलेल्या व्यक्तींचा शोध राज्यात व राज्याबाहेर घेवुन त्यांच्या कुटुंबाच्या सुखरूप स्वाधीन केले आहे, यातील त्यांच्या अभ्यासाचे तोंडभरून कौतुक मा. पोलीस आयुक्त साहेबांनी देखील केले आहे, ते देखील त्यांच्या या कार्याने भारावुन गेले आहेत.

अशीच एक घटना दि. 09.03.2017 रोजीची आहे, रात्री 2100 वाजता पोलीस नियंत्रण कक्ष येथुन कॉल आला की एक वयोवृध्द महिला गड्डीगोदाम परीसरात बेवारस अवस्थेत फिरत आहे. तात्काळ कर्तव्यावर हजर असलेली महीला पोलीस उप निरीक्षक, शेंडे मॅडम या पोहचल्या त्या वयोवृध्द महिलेस मायेची उब देवुन मेयो हॉस्पीटल येथे नेऊन उपचार केला व तिची विचारपुस केली तेव्हा तिने आपले नाव व्यवस्थीत सांगु शकत नव्हती पण तिच्या जवळ असलेल्या आधार कार्ड वर तिचे नाव रेणुका संपत गेडाम, वय 71 वर्ष, रा. महारोगी सेवा समिती, महिला आश्रम आनंदवन, तहसील वरोरा, जि. चंद्रपुर असे दिसुन आले. तेव्हा चंद्रपुर पोलीस नियंत्रण कक्षाला संपर्क साधुन माहिती मिळवण्यात आली तर सदर महिला ही मागील 07 महिण्यापुर्वीच त्या आश्रमातुन निघुन गेल्याचे सांगण्यात आले व तिला तिच्या नातवाने या आश्रमात दाखल केले होते. अशी माहीती मिळाली रात्र असल्याने तिच्या नातेवाईकांचा शोध लागु शकला नाही. पण आल सदर पोस्टेच्या पथकातील कर्मचारी नापोशि विलास, मनोज, मपोशि, रोशनी, वैशाली, यांनी वपोनि सिडाम यांच्या मार्गदर्शनाखाली त्या वृध्द महिलेच्या घराचा अथक प्रयत्न करीत शोध घेतला तेव्हा तिचा नातु राजु गेडाम, वय 30 वर्ष, रा. गौरी तलाव, वार्ड नं. 16, बाबुपेठ चंद्रपुर हा मिळाला सदर पत्यावर पो.स्टे. सदरच्या या पुर्ण चमुने त्या वृध्द महिलेला भरपोट जेवन देवुन तिला पुर्ण विश्वास देवुन तिला एस.टी. बसने स्वखर्चाने चंद्रपुर येथे घेवुन गेले व त्यांच्या नातेवाईकांच्या ताब्यात दिले तेव्हा त्यांच्या आनंदाला पारावार नव्हता, त्यांना शोधुन ही आपली जिवलग व्यक्ती मिळत नव्हती पण या वर्दीतील देवदुतांने त्यांच्या अंधारलेल्या जीवनात एक नवी रोशनाई आणली होती आणि त्याने या वर्दीतील देवतांचे खुप आभार व धन्यता मानली. खरच या सर्व टीम ने केलेले काम हे कौतुकास पात्र असे असुन नागपुर शहर पोलीसांची अभिमानाने मान उंचावणारे आहे.





**<u>मा. पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) नागपूर शहर श्री सुहास बावचे यांचा मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, श्री देवेंद्रजी फडणवीस यांनी सत्कार केल्याबाबत :</u>**

प्रा. साईबांबाना अटक करणारे नागपूरचे मा. पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) नागपूर शहर श्री सुहास बावचे यांचा मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, श्री देवेंद्रजी फडणवीस यांनी गौरव केला. नक्षलांना मदत करीत असल्याचे कारणावरून गडचिरोली जिल्हा व सत्र न्यायालयाने दिल्ली विद्यापीठाचे प्राध्यापक जी.एन. साईबाबा यांच्या सह पाच जनांना जन्मठेप तर एकास 10 वर्षाचा सक्षम कारावासाची शिक्षा ठोठावली. प्रा. साईबांबाना अटक करून संपुर्ण प्रकरणाचा तपास करणारे अहेरीचे तत्कालीन उप विभागीय पोलीस अधीकारी श्री सुहास बावचे यांचा आज मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, श्री देवेंद्रजी फडणवीस यांनी नागपूरात गौरव केला.

गडचिरोली जिल्हा व सत्र न्यायालयाने 7 मार्च 2017 रोजी प्रा. जी.एम. साईबाबा, हेम मिश्रा, प्रशांत राही, महेश तिरकी, व पांडू नरोटे यांना आजन्म कारावासाची शिक्षा ठोठावली यातील सहावा आरोपी विजय तिरकी यास 10 वर्षाचा सक्षम कारावासाची शिक्षा ठोठावण्यात आली. सुहास बावचे यांनी प्रा. साईबाबा सारख्या नक्षलांची थिंक टॅक असणा–या मोठया व्यक्तीला अटक करून व नंतर अतिशय बारकाईने तपास करून संपुर्ण पुरावे गोळा केल्यामुळे न्यायालयाने आरोपींना जन्मठेपेची शिक्षा ठोठावली. विशष म्हणजे इलेक्ट्रॉनीक साहीत्यांना पुरावे माणुन जन्मठेपेची शिक्षा सुनावण्याचा गडचिरोली न्यायालयाचा निर्णयही ऐंतीहासीक आहे. त्यामुळे मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, श्री देवेंद्रजी फडणवीस यांनी आज नागपूर विमानतळावर सुवास बावचे यांचा गौरव केला. यावेळी नागपूरचे पोलीस आयुक्त, डॉ. के. व्यकटेशम, व अन्य अधिकारी उपस्थित होते. उपरोक्त सहाही आरोपींच्या अटकेची काहाणी चित्तथरारक आहे.


या प्रकरणाचा तपास करणारे व सध्या नागपूर शहर येथे पोलीस उप आयुक्त असलेले सुहास बावचे 2013 मध्ये अहेरीचे पोलीस उप विभागीय अधिकारी होते. अहेरी उप विभागातील भामरागड, एटापल्ली, अहेरी, व सिरोंचा हे चार तालुके नक्षलग्रस्त असल्याने या तालुक्यामध्ये नक्षल कारवाया नेहमी होत असतांत त्या अनुशंगाने सुहास बावचे यांचे प्रत्येक संशयास्पद हालचालींवर बारीक लक्ष होते. अशातच 28 ऑगस्ट 2013 रोजी अहेरीच्या बस स्थानकावर महेश तिरकी पांडू नरोटे, व हेम मिश्रा हे तीघेजन संशयास्पद स्थितीत आढळले. तपासा दरम्यान हेम मिश्रा कडे असलेल्या पेन ड्राईव्हमध्ये नक्षल्यांशी संबंधीत दस्ताऐवज सापडले. चौकशी दरम्यान सर्वप्रथम उत्तराखंड मधील पत्रकार प्रशांत राही सांगलीकर, याचे नाव समोर आले. नंतर हेम मिश्रा व प्रशांत राही यांच्या चौकशी दरम्यान दिल्ली विद्यापीठाचा प्रा. जी.एन. साईबाबा यांच्यासी त्यांचा संवाद होत असल्याचे लक्षात आले. आणी तपास अधिकारी सुहास बावचे यांनी कान टवकारले. आता साईबाबाला अटक करण्याचा चंग बावचे यांनी बांधला. पण त्यासाठी वरिष्ठांचे मार्गदर्शन आणी परवानगीची गरज होती. त्यावेळी श्री रविंद्र कदम हे विशेष पोलीस महानिरीक्षक तर मोहम्मद सुवेज हक हे पोलीस अधिक्षक होते. दोघांच्या मार्गदर्शनाखाली सुहास बावचे यांनी 12 संप्टेंबर 2013 रोजी न्यायालयाची परवाऩगी घेवून थेट दिल्ली गाठली. तेथील प्रा. साईबाबाच्या घराची झडती घेवून तेथून कॉप्युटर हार्डडिक्स व अन्य लिखीत साहीत्य ताब्यात घेतले. हार्ड डिक्स मधील व्हिडीओ रेकॉर्डींगवरून साईबाबाचे नक्षल्यांच्र्या केंद्रीय नेतृत्वाशी संबंध असल्याचे स्पष्ट झाले. साईबाबाचे नक्षल्यांशी संबंध असल्याचे सर्व पुरावे प्राप्त केल्यानंतर आठ महीन्यांनी 9 मे 2014 रोजी सुहास बावचे यांनी संपुर्ण तयारीनिशी दिल्ली गाठली. त्यांच्या समवेत त्यावेळचे अतिरीक्त पोलीस अधिक्षक श्री शशीकुमार मीना, व अन्य चार अधिकारी होते. गडचिरोली पोलीस दिल्लीला येणार असल्याची पुर्वसुचना दिल्ली पोलीसांना देण्यात आली होती. दिल्लीला पोहचताच. पोलीसांनी सकाळपासून प्रा. साईबाबाचे लोकेशन मिळविले. त्यावेळी प्रा. साईबाबा हा दिल्ली विद्यापीठातील त्याच्या घरापासून दोन किलोमीटर अंतरावर असलेल्या एक ठिकाणी पेपर तपासण्यासाठी गेला होता. अशावेळी प्रा. साईबाबा घाईघाईने अटक केल्यास दिल्लीत साईबाबाच्या समर्थनार्थ मोठा जमाव उभा ठाकण्याची शक्यता होती. त्यामुळे सुहास बावचे व त्यांच्या सहका–यांनी अत्यंत गुप्तता बाळगुन पेपर तपासण्याचे ठिकानाबाहेर पाळत ठेवली. साईबाबा बाहेर पडताच काही अंतरावर असलेल्या चौकात त्याला पोलीसांच्या वाहनांनी चहुबाजुंनी घेरले. नंतर पुन्हा पोलीसांनी हुशारी करून साईबाबांच्या घराजवळचे पोलीस ठाणे सोडून दहा किलोमीटर अंतरावर असलेल्या पोलीस

ठाण्यात नेले. तेथे अवघ्या पाच मिनीटात साईबाबाच्या अटकेची कारवाई पुर्ण करून दुरध्वनीव्दारे साईबाबाची पत्नी वसंताकुमारी हीला अटकेची माहीती देण्यात आली. यावेळी गडचिरोली पोलीसांनी तत्काळ साईबाबाला घेवून गडचिरोलीला येणे अगत्याचे होते. त्यामुळे दिल्लीच्या विमानतळावर पोहचण्यासाठी दिल्ली पोलीसांनी ग्रिन कॅरीडोअर तयार करून दिला. आणी गडचिरोली पोलीसांनी दिड तासाचा रस्ता अवघ्या अर्ध्या तासात पार करून विमानतळ गाठले. इकडे विमानतळावर पोहचताच साईबाबाच्या समर्थनात हजारो लोकांचा जमाव झाला होता. विमानतळावर पोहचण्यात थोडासाही उशीर झाला असता तर दिल्लीतून बाहेर पडणे पोलीसांना कठीण झाले असते. त्यामुळे गडचिरोली पोलीसांनी मोठया शिताफीने संपूर्ण प्रक्रीया पार पाडून रात्री 9 वाजता विमानतळ गाठले. तेथून शेकडो पोलीसांच्या गराडयात साईबाबाला घेवून पोलीस रात्री 2 वाजता अहेरीला पोहचले. अटकेच्या कारवाईची संपुर्ण प्रक्रीया आव्हानात्मक आणि जोखीमेची होती. ती सुहास बावचे यांनी अतिशय कौशल्याने पार पाडली. अखेर संपुर्ण पुराव्याच्या आधारावर जिल्हा व सत्र न्यायालयाने प्रा. साईबाबा व अन्य पाच आरोपींना आजन्म कारावास व एका आरोपीस 10 वर्ष कारावासाची शिक्षा ठोठावली. जोखीम पत्करून साईबाबा सारख्या मोठया व्यक्तीला पकडून दिल्याबद्दल आज मा. मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य, श्री देवेंद्रजी फडणवीस यांनी मा. पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) नागपूर शहर श्री सुहास बावचे यांची पाठ थोपटली. यांनी यापुर्वी आंतरिक सेवा सुरक्षा पदकानेही सन्मानीत करण्यात आले आहे.



# पोलीस निरीक्षक संजय पांडे यांच्या काव्यसंग्रहाचे प्रकाशन

नागपूर शहर पोलीस दलात पोलीस स्टेशन सोनेगांव येथे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, या पदावर कार्यरत असलेले श्री संजय पांडे, यांच्या "गीताई" या प्रथम काव्यसंग्रहाचे प्रकाशन दिनांक 5 मार्च 2017 रोजी थाटात सम्पन्न झाले. याप्रसंगी डॉ. पंकज चांदे माजी कुलगुरू, साहीत्य विहार च्या अध्यक्षा आशा पांडे यांच्या उपस्थीतीत ईतर 28 काव्यसंग्रहाचे प्रकाशन सुध्दा पार पडले. प्रसिध्द समीक्षक डॉ. श्यामकांत कुळकर्णी यांनी गीताई काव्यसंग्रहाची समीक्षा करतांना कवि संजय पांडे यांनी त्यांचे अनुभव मोजक्या शब्दात प्रभावीपणे मांडले असल्याचे सांगीतले. पावसाची व्यथा या कवितेत पाऊस आणि लहाण मुलांची सुरेख सांगड घालून कविता रंगली असल्याचे सांगत आधारकार्ड या विनोदी कवितेचे वाचन करतांना प्रेक्षकांनी भरभरून दाद दिली. नियमाचे पालन या कवितेत वाहतुक नियमांचे पालन करावे हा संदेश देत त्यांनी जनजागृती करण्याचा योग्य प्रयत्न केला आहे. असे डॉ. कुळकर्णी म्हणाले. पोलीस विभागात कार्यरत असूनही कवितांचा छंद जोपासतात हे कौतुकास्पद आहे असे गौरवोदगार उपस्थीतांनी काढले. सिध्दारूढ शिवमंदीर रामनगर येथील या कार्यक्रमाचे सुत्र संचालन रेखा घिया व केतकी सिरास यांनी केले.



पो.स्टे. तहसील पोलीसांची व समाज सेवकांची प्रशसंनिय कामगीरी :–

श्रीमती कमलाबाई देविलाल जैस्वाल, वय 67 वर्षे, रा. इंदौर, मध्यप्रदेश ही वयोवृध्द महिला मागील एक महिन्यापासून मेयो हॉस्पीटल, नागपूर येथे उपचाराकामी भरती असल्याची माहिती मिळाल्यावरून तिला विचारपूस केली. परंतू तिच्या वास्तव्याच्या ठिकाणाची माहिती मिळून येत नसल्याने नमूद महिला हिच्या संबंधाने मेयो हॉस्पीटल येथे समाज सेवकाचे काम करणारे चेतन मेश्राम, व केदार किशोर आंबोकर, यांच्या (मल्हार ग्रुपच्या) मदतीने पो.स्टे. तहसिल, नागपूर शहर येथील पोहवा दिलीप, संजय, नापोशि हर्षदीप यांनी अथक परिश्रम करून नमूद महिलेचा नातू अश्वीन सुरजसिंग जैस्वाल, वय 25 वर्षे रा. उज्जैन रोड मरीमाता मंदीर, इंदौर मध्यप्रदेश यांचा शोध घेवून संपर्क करून त्यांच्या ताब्यात दिले.

श्रीमती कमलाबाई देविलाल जैस्वाल, वय 67 वर्षे, रा. इंदौर, मध्यप्रदेश या वयोवृध्द बेपत्ता महिलेला तिच्या नातेवाईकांशी मिळवून देण्यात समाज सेवक चेतन मेश्राम, केदार आंबोकर, व पो.स्टे. तहसिल येथील पोहवा दिलीप, संजय, नापोशि हर्षदीप, यांनी वपोनि श्री खांडेकर यांच्या मार्गदर्शनात प्रशसंनिय कामगिरी केली.



ना.पो.शि. मधुकर भावसिंग राठोड, नेमणुक पो.स्टे. अंबाझरी यांची उल्लेखनिय कामगीरी :–

पोलीस स्टेशन अंबाझरी येथे नेमणुकीस असलेले ना.पो.शि. मधुकर राठोड, बनं. 5266 यांनी दि. 03/03/2017 रोजी 10:00 वा ते 22:00 वाजता पावेतो बिट मार्शल–3 म्हणुन कर्तव्यावर हजर असतांना 21:45 वाजताचे सुमारास अंबाझरी तलाव भागात पेट्रोलीग करीता असतांना तलाव जवळ हजर असणारे नागरीक हे आरडा ओरड करीत होते. ना.पो.शि मधुकर यांनी त्या ठिकाणी जावुन पाहीले असता एका मुलीने तलावात उडी घेतली आहे असे तेथे हजर असलेल्या लोकांनी सांगीतले ती मुलगी तलावाच्या पाण्यात गटांगळया खात होती हे पाहुन क्षणाचाही विचार न करून ना.पो.शि मधुकर यांनी त्याचेजवळ असलेली वॉकीटॉकी व पीस्टल सह जिवाची पर्वा न करता तलावात उडी घेवुन तीला सुरक्षीत बाहेर काढुन प्राण वाचवुन आपले कर्तव्य प्रामाणीक पणे पार पाडले.

सदरहु पोलीस कर्मचारी यांने आपल्या जिवाची पर्वा न करता त्या मुलीचा प्राण वाचविला. मा. पोलीस आयुक्त, डॉ. श्री के. व्यकटेशम यांनी कौतुक केले. तसेच नागपूर शहर पोलीस दलातील सर्व वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी यांनी ना.पो.शि. मधुकर राठोड यांनी केलेल्या कामाचे कौतुक केले आहे.



पो.स्टे. कळमना,नागपुर शहर
दिनांक :–18/08/2016

प्रति,

मा. पोलीस उप आयुक्त, (गुन्हे शाखा)
नागपूर शहर

विषय :– भटकलेल्या अमेरीकन मुली बाबत.

महोदय,

उपरोक्त विषयांन्वये सविनय सादर आहे कि, दि. 07/06/2016 रोजी 11.00 वा च्या सुमारास माहीती मिळाली कि, पारडी बाजार चौक, हनुमान मंदीरजवळ भंडारा रोड, पो.स्टे. कळमना नागपूर शहर येथे एक विदेशी मुलगी असल्याने तिची भाषा समजत नाही व ती भरकटलेली आहे. अशा माहितीवरून पो.स्टे. कळमना येथे दिवसपाळी अधिकारी यांनी स्वता: भेट देवुन घटनेची पाहणी केली. सदर मुलगी नामे लुसी जेम्स चॅन वय अंदाजे 20 वर्ष रा. कॉलिफोर्निया, अमेरिका नॅश्नल ही तुमसर–नागपूर बसने नागपूर करीता येत असतांना ती चालत्या महाराष्ट्र शासनच्या बसमधुन पारडी बाजार चौक येथे उडी मारली त्यामुळे ती जख्मी झाली. तिला किरकोळ मार लागल्याने व ती आजारी असल्याचे दिसत असल्याने तिचेवर तारांगण हॉस्पीटल येथे वैद्यकिय उपचार करण्यात आला. सदर महिलेस तिच्या वैयक्तीक माहितीबाबत विचारपुस केली असता अज्ञात कारणामुळे सदर महिलेचे मानसीक संतुलन ढासळलेले असल्याची शंका वाटत होती. सदर मुलीच्या ताब्यात असलेल्या मोबाईलच्या साहयाने तीचे आई–वडीलांना संपर्क करण्यात आला व त्यांचे मनोधर्य टिकवुन ठेवले. भटकलेल्या विदेशी मुलीकडुन मिळालेल्या त्रोटक माहितीवरून अमेरिकेच्या दुतावासा सोबत संपर्क साधुन भटकलेल्या मुलीस आपले मायदेशी परत पाठविण्याकरिता लागणा–या कागदपत्राची पुर्तता केली. याकरीता भटकलेल्या मुलीस खाजगी निवासस्थानाची सोय करून योग्य त्या सर्व सोई सुवीधा पुरविण्यात आल्या. व देखभालीकरीता 24 तास महिला पोलीस कर्मचारी उपलब्ध करून दिले. भटकलेल्या मुलगी व तिचे पालक हे मायदेशी परत गेल्याची खात्री केली. यामध्ये सदर मुलीस सुखरूपणे मायदेशी परत करण्यासाठी मोलाची कामगिरी पो. ठाण्याचे सपोनि धर्मेंद्र आवारे, पोहवा/3535 प्रंशात लाडे, नापोशि/4380, पोशि/5722 रूपम टेंभेकर, मपोउपनि/छाया गुजर, पोशि/6775 राजु जाधव, मपोशि/ प्रिती यादव यांनी पार पाडली. या संदर्भात कॉन्सलेट जनरल ऑफ द युनाटेड स्टेट् ऑफ अमेरिका, मुबंई, भारत यांच्या कार्यालयाकडुन दि. 20/06/2016 रोजी पत्र प्राप्त झाले असुन सोबत संल्गन करण्यात आले आहे.

करीता वरील माहिती वर्तमान पत्रात प्रसीध्दी व्हावी हि विनंती.

स्वा/–
(सुनील एस.बोंडे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
पो.स्टे. कळमना,नागपुर शहर

CONSULATE GENERAL OF THE
UNITED STATES OF AMERICA
MUMBAI, INDIA

June 20, 2016

Senior Police Inspector
Nagpur Police Station, Kalamna
Nagpur City
Nagpur 440 035
Maharashtra, India

Dear Sir:

Thank you very much for the service you and your office provided to U.S. citizen, Ms. Lucy Chen. We would like to mention that Inspector Dharmendra Aware (API) and Ms. Priti Yadav (SB/FRO) were instrumental in ensuring Ms. Chen's safety until her mother could arrive from the United States. We also appreciate that you secured an exit permit for her, ensuring her timely departure to the United States.

The U.S. Consulate General, Mumbai is thankful to your office for your continued support in assisting U.S. citizens.

Sincerely,

Thomas Vajda

Thomas L.Vajda
Consul General





पोस्टे सोनेगाव

१) अप.क्र.०४/१६ कलम ३६३,३६४,१२०ब३४ भादंवि :–

दिनांक ०७/०१/२०१६ रोजी फिर्यादी नामे श्री.सुभाष आष्टनकर त्यांचा मुलगा नामे चैतन्य सुभाश आष्टनकर वय १४ हा त्याचे मॉन्टफोर्ट शाळेतुन घरी येत असताना दुपारी अंदाजे ०२.४५ वा. मनिषनगर येथुन एका सिल्व्हर रंगाच्या ईको मारोती कार मध्ये चार ते पाच ईसमाने त्याचे अपहरण केले आहे अशा रिपोर्टवरून अज्ञात आरोपीविरूध्द नमुद गुन्हा दाखल करण्यात आला सदर गुन्हयामध्ये कोणताही पुरावा नसताना गुन्हा घडल्यापासुन गाडीचे वर्णनावरून व फिर्यादीला आलेल्या खंडणी संबधाने आारोपींनी केलेल्या एका फोन कॉलवरून तांत्रीक कौशल्याची मदत घेवून अपहरण झालेल्या मुलास आरोपीकडुन कोणतीही इजा न होवु देता सोडवुन पाच आरोपींना अटक करण्यात यश मिळविले आहे व सदर गुन्हा उघकडीस आणला आहे

::अधिकारी/कर्मचारी::

१) एस.ए.तोरे सहायक पोलीस आयुक्त, सोनेगांव विभाग

२)अरूण आर.जगताप वपोनि

३)सुभाष ए.काळे दुयम पोलीस निरीक्षक ४) पी.बी.पाटील सपोनि ५) नितीन पगार सपोनी ६) एस.जे.येळे सपोनि ७) बाळराजे दराडे पोउपनि ८)एन.जी.बंसोड मपोउपनि९)पोहवा/किशोर सातोकर/३३९२ १०)पोहवा/सुभाष चव्हान/४७९६ ११)नापोशी/राजेश धाकडे/१४३९ १२)पोशी/विदयाधर पवनीकर/५०२९ १३)पोशी/निलेश बारबोले /७२६९१४)पोशी ज्ञानेश्वर बांते/२९५० १५) पोशी/ प्रशांत गभने/२७९२ १६) पोशी/ललीत तितरमारे/२९४६

२) अप.क्र. ७८/१६ कलम ३६४(अ),३६५,३४२,५०४,५०६,३२३,३४ भादंवि

विवरण असे की, दि.०१/०४/२०१६ रोजी पर्यावरण नगर येथील कैन्हैया बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स यांचे कार्यालयातुन हेमंत झाम यांचे अपहरण झाल्याचे रिपोर्टवरून पो.स्टे.सोनेगांव येथेअप.क्र.७८/१६ कलम ३६४(अ),३६५,३४२,५०४,५०६,३२३,३४ भादंवि चा दाखल करूनअवघ्या दोन तासात सदर गुन्हयातील अपहरण झालेल्या व्यक्तीला सोडवुन चार आरोपींना अटक करण्यात आली.

::अधिकारी/कर्मचारी::

१) एस.ए.तोरे सपोआ सोनेगांव विभाग २) अरूण आर. जगताप वपोनि पोस्टे सोनेगांव ३) सुभाष गो.काळे दुपोनि पो.स्टे.सोनेगांव ४)सतिश मेश्राम पोउपनि पोस्टे.सोनेगांव ५)पोहवा/किशोर सातोकर/३३९२ ६)पोहवा/वसंता नारखेडे /३४४,७) नापोशी/राजेश धाकडे/१४३९ ८) पोहवा/संजय गुप्ता/३६७५ ९) पो.शी विदयाधर पवनीकर /५०२९ १०) पोशी/ज्ञानेश्वर बांते/२९५०

३) अप.क्र.७०/१६ कलम ३७६ (२)(न),४१७,१९९,५०६ ३४ भादंवि सहकलम ६६(सी) आय. टी.ॲक्ट

विवरण असे की, पोलीस स्टेशन सोनेगांव नागपूर येथे दाखल अप.क्र अप.क्र.७०/१६ कलम ३७६ (२)(न),४१७,१९९,५०६ ३४ भादंवि सहकलम ६६(सी) आय.टी.ॲक्ट मध्ये फरारआरोपी विशाल गजानन अल्लेवार वय २८वर्ष रा. प्लॅट नं.२०१ साईनाथ हॉस्पीटल जवळ भोसरी पुणे मुळ रा. प्लॉट नं.एन/११४ नागोमाळी ले आऊट रेशीमबाग नागपूर याचा गुप्त माहितीवरून सापळा लावुन पुणे सिंहगड येथुन शिताफीने पकडुन दि.१८/०४/१६ रोजी अटक करण्यात आली असुन सदर आरोपी मध्यवर्ती कारागृह येथे दाखल करण्यात आले आहे सदर आरोपीतावर पोलीस स्टेशन खडक, पुणे शहर येथे १८ लाख रूपयाची फसवणुक केले बाबत गुन्हा दाखल असुन तो त्यामध्ये पाहिजे आरोपी आहे तसेच सदर आरोपी विरूध्द नागपूर शहरात पो.स्टे. अंबाझरी,अजनी,कोतवाली,सिताबर्डी येथे फसवणुक,रॉबरी व वाहनचोरीचे गुन्हे दाखल आहेत.

::अधिकारी/कर्मचारी::

अशोक एस.बागुल, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस निरीक्षक श्री.सुभाष काळे,सहायक पोलीस निरीक्षक श्री.संदीप येळे, पोहवा/किशोर सातोकर ब.नं.३३९२, पोहवा/वसंता नारखेडे/३४४ पो. कॉ.विदयाधर पवनिकर ब.नं. ५०२९, यांनी महत्वपुर्ण कामगीरी बजावली आहे.

४) अप.क्र.०४/१६ कलम ३६३,३६४,१२०ब ३४ भादंवि सहकलम ३ मकोका

वरिल नमुद गुन्हयातील पाहिजे आरोपी नामे मुकेश किशोर तायवाडे वय २७ वर्ष रा.नविनवस्ती खापा ता.सावनेर जि.नागपूर हा सदर गुन्हयात जानेवारी २०१६ पासुन पाहिजे होता. सदर आरोपीच्या शोधात गुप्त बातमीदारामार्फत सदर आरोपी हा इंदोर मध्यप्रदेश येथे त्याचे नातेवाईकांकडे जावु शकतो अशी माहिती प्राप्त झाल्याने मा.सहायक पोलीस आयुक्त, श्री.ए.एस. तोरे यांचे मार्गदर्शनाखाली सदर ठिकाणी जावुन मार्तड नगर येथे सापळा रचुन आरोपी मुकेश हा रात्रीच्या सुमारास मार्तडनगर येथील कम्युनिस्ट हॉलजवळ आला असता त्यास ताब्यात घेवुन नमुद गुन्हयात दि.०६/०५/१६ रोजी अटक करण्यात आली आहे.

::अधिकारी/कर्मचारी::

१) एस.ए.तोरे सपोआ सोनेगांव विभाग २) अशोक एस.बागुल वपोनि पोस्टे सोनेगांव ३) सपोनि पी.बी.पाटील पो.स्टे.सोनेगांव ४) नापोशी/राजेश धाकडे/१४३९

➢ पो.स्टे. सिताबर्डी

१द्ध पो.स्टे. सिताबर्डी येथे दाखल अप क्र. ५१/१६ कलम ३९२, ४११, ३४ भादवी फिर्यादी महिला नामे श्रीमती शुभांगी वसंतराव दंतुलवार ही दि. ३१/०१/१६ रोजी

सकाळी मॉनिंगवॅक वरून पायदळ घरी येत असतांना अनोळखी दोन इसम मोटार सायकलने येवुन फिर्यादीच्या गळयातील २.५ तोळे सोन्याची चैन जबरीने हिसकावुन चोरून नेली. असा फिर्यादीने दिलेल्या रिपोर्ट वरून गुन्हा दाखल करण्यात आला होता.

नागपूर शहर आयुक्तालय हद्दीत सध्या सोनसाखळी चोरानी थैमान घातले असुन महिलानां सोन्याचे दागिणे घालणे हे धोकादायक झाले होते. पो.स्टे. सिताबर्डी नागपूर शहर येथे चैन स्नॅचींगचे गुन्हे दाखल होत असल्याने पो.स्टे.सिताबर्डी नागपूर शहर येथे कार्यरत असलेले वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सत्यवीर बंडीवार यानी एक पथक तयार केले असुन त्यापथकाद्वारे चैन स्न्चींग करणा—या गुन्हेगारांचा शोध घेणे सुरू असतांना पो.स्टे. सिताबर्डी येथे दाखल अप क्र. ५१/१६ कलम ३९२, ४११, ३४ भादवी दाखल झाला. त्यामुळे पो.स्टे. सिताबर्डी नागपूर येथील मा.वपोनि यांचे मार्गदर्शनाखाली अधिकारी व तपास पथकातील कर्मचा—यांनी दि. ०६/०२/२०१६ रोजी नमुद गुन्हयातील आरोपीतांचा शोधात असतांना मिळालेल्या गाडी नं. MH ३१ BL ९०८८ च्या आधारावर आरोपीचा शोध घेणे सुरू केले. नमुद गाडी मालकाचा आरटीओ, कार्यालयातुन नाव पत्ता प्राप्त करून आरोपीचा शोध घेतला असता आरोपी हा मिळुन आला नाही. आरटीओ कडुन मिळालेल्या पत्ता हा चुकीचा असल्याचे कळुन आले. सदर पत्त्यावर आरटीओ कडुन मिळालेल्या नावाचा गाडी मालक राहत नसल्याची माहिति मिळुन आली. त्यामुळे पुन्हा तपासात खंड पडला. तरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सत्यवीर बंडीवार यानी एक पथक तयार केलेल्या पथकाने पुन्हा जोमाने व दुस—या प्रकारे तपास करणे सुरू केले. तसेच आरटीओ, कार्यालयातुन मिळालेल्या गाडी नं. MH ३१ BL ९०८८ च्या मालकाचा कोणी नातेवाईक आरटीओ कडुन मिळालेल्या पत्त्याच्या जवळपास राहते काय? याचा शोध घेतला असता तेथील नागरिकाकडुन माहिति मिळाली की, सात आठ वर्षापुर्वी नमुद इसमाचा कोणी नातेवाई हा सदर पत्त्यावर राहत होता पण नमुद इसमास गाडी चालविता येत नाही असे सांगितले तसेच नमुद इसम हा ताजबाग हद्दीत राहत असल्याचे समजले. त्यामुळे नमुद पथकाने नागपूर शहर आयुक्तालयातील ताजबाग परिसर गाठले सदरची वस्ती ही फार दाट असल्याने तसेच एकाच नावाचे अनेक व्यक्ती असल्याने आरोपीचा शोध घेणे कठीण झाले होते. तरी आरोपीच्या शोधात असतांना गाडी मालकाचा शोध लागला. पण गुन्हयात वापरलेली गाडी ही गाडी मालकाकडे नाही असे खब—याकडुन समजले तसेच खब—याने माहिती दिली की, गुन्हयात वापरलेली गाडी ही गाडी मालकाचा जावाई चालवितो वरून गाडी मालकाचा जावाईचा शोध घेणे सुरू केले असता त्यास पोलीस त्याचा शोध घेत असलयाचे माहिती मिळाल्याने गाडी मालकाचा जावाई हा पळुन गेला. त्यामुळे गाडी मालक नामे मोहम्मद अशपाक मोहम्मद युसुफ शेख वय ३४ वर्षे रा. सिंदीबन एन.आय.टी., प्लॉट नं. २२, ठाकुर प्लॉट, एक

मिणारा मस्जीदजवळ, मोठा ताजबाग, पो.स्टे. सक्करदरा नागपूर शहर ताब्यात घेवुन नमुद गुन्हयात अटक करण्यात आले. विचारपुस केली पण नमुद आरोपी हा गुन्हयात सहभाग करत नव्हता. गाडी मालकाचा जावाईचा शोध घेत असतांना माहिती मिळाली की, गाडी मालकाचा जावाई हा गुन्हयात वापरलेली गाडी सह पारडी नाका येथील एचबी टाउन समोर रोडाच्याकडेला असलेल्या चहाटपरीवर हजर आहे. अशा माहिती वरून लगेच पोउपनि मत्ते, पोउपनि मुंढे, पोहवा/१०१४ अजय काळे, पोहवा/४३१५ नारायण किराड, नापोशि/२१२७ प्रशांत निनावे, पोशि/५९१७ कमलेश गणेर, पोशि/२६६३ अतुल चाटे, पोशि/३७९० प्रेम पाटील हे आरोपीस ताब्यात घेण्याकरिता गेले व आरोपीस अत्यंत शिताफिने व चातुर्याने ताब्यात घेतले व आरोपी नामे मोहम्मद साजीद उर्फ बाबा फैज मोहम्मद सिद्दीकी वय ३२ वर्षे रा. मोठा ताजबाग, ठाकुर प्लॉट, एक मिनार मस्जीदजवळ, पो.स्टे. सक्करदरा नागपूर यास अटक केले. आरोपीस अटक केल्यानंतर समजले की, आरोपी मो.साजीद याने त्याच्यामित्र नामे अप्पु उर्फ शफीक खान याचेसह गुन्हयातील फिर्यादीचे गळयातीस सोन्याची चैन हिसकावुन पळुन गेले. आरोपी क्र. २) अप्पु उर्फ शफीक खान रफीक खान वय २५ वर्ष रा. राउत नगर, न्यु दिघोरी नाका, नागपुर हा फरार असल्याने त्यास दि. १०/०२/१६ रोजी कांकेर जि. उत्तर बत्तर कांकेर राज्य छत्तिसगढ येथुन ताब्यात घेतले. तसेच नमुद आरोपीतांनी फिर्यादीच्या गळयातील जबरीने हिसकावुन नेलेली सोन्याची चैन ही आरोपी क्र. ३) राकेश शरदचंद्र निनावे वय २७ वर्ष रा. ७०, भोतमांगे ले आउट, बहादुरा, नागपुर यास त्याच्या घरीच असलेल्या राकेश ज्वेलर्स या दुकानात विकले असल्याने, राकेश निनावे यास नमुद गुन्हयातील चोरीचा मुद्देमाल विकत घेतल्याने यास ताब्यात घेवुन अटक करण्यात आले व नमुद गुन्हयात चोरीस गेलेली सोंन्याची चैन २.५ तोळे किंमत ३०,०००/–रू चा मुद्देमाल जसाचा तसा हस्तगत केला. असा एकुण ६०,०००/– रू. चा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. तसेच आरोपी मोहम्मद साजीद उर्फ बाबा व अप्पु उर्फ शफीक खान यांनी नागपूर शहर आयुक्तालयात अनेक पो.स्टे. हद्दीत चैन स्नॅचींगचे गुन्हे केले असलयाने तसेच त्याची कुबली दिल्याने आरोपीतांकडुन एकुण १४ चैन स्नॅचींगचे गुन्हे उघडकीस आनले पो.स्टे. सिताबर्डी नागपूर दाखल२) अप क्र. ४४६/१५ कलम ३९२, ४१३, ४११, ३४ भादंवीचा ३) अप.क्र. ३३०/१५ कलम ३९२, ३४ भादंवि मधील तसेच नागपूर शहरातील पो.स्टे. हुडकेश्वर दाखल ४) अप.क्र. २५५/१५ कलम ३९२, ३४ भादंवि, ५) अप.क्र. ५५०/१५ कलम ३९२, ३४ भादंवि, ६) अप. क्र. ५६२/१५ कलम ३९२, ३४ भादंवि, ७) अप.क्र. ५७५/१५ कलम ३९२, ३४ भादंवि, ८) अप.क्र. २८/१६ कलम ३९२, ३४ भादंवि, ९) अप.क्र. ३५/१६ कलम ३९२, ३४ भादंवि मध्ये जबरीने हिसकावुन नेनेला मुद्देमाल, तसेच पो.स्टे. कळमना नागपूर दाखल १०) अप.क्र. ४२१/१५ कलम ३९२, ३४ भादंवि, ११) अप.क्र. ४५१/१५ कलम ३९२, ३४ भादंवि, १२) अप.क्र. २१/१६ कलम ३९२, ३४ भादंवि मध्ये जबरीने हिसकावुन नेनेला मुद्देमाल, तसेच पो. स्टे. लकडगंज नागपूर दाखल १३) अप.क्र. ४४७/१५ कलम ३९२, ३४ भादंवि मध्ये जबरीने

हिसकावुन नेनेला मुद्देमाल, तसेच पो.स्टे. सक्करदरा नागपूर दाखल अप क्र. १४) अप.क्र. ७६/१५ कलम ३९२, ३४ भादंवि मध्ये जबरीने हिसकावुन नेनेला मुद्देमाल हस्तगत केला.
वर नमुद गुन्हयात चोरीस गेलेला मुद्देमालापैकी मोटार सायकल सह एकुण गुन्हयातील मुद्देमाल किंमत ०१,३९,०००/—रू. चा मुद्देमाल हस्तगत केला.

अशाप्रकारे चैन स्नॅचींग करणारे आरोपीतांना व चोरीचा माल विकत घेणा—या सोनारास अटक करून चैन स्नॅचींग होणा—या गुन्हयास आळा घालण्यात आला.

वर नमुद गुन्हे हे पोउपनि मत्ते, पोउपनि मुंढे, पोहवा/१०१४ अजय काळे, पोहवा/४३१५ नारायण किराड, नापोशि/२१२७ प्रशांत निनावे, पोशि/५९१७ कमलेश गणेर, पोशि/२६६३ अतुल चाटे, पोशि/३७९० प्रेम पाटील यांनी उघडकिस आणले आहे.

गोषवारा

१) एकुण उघडकिस आणलेले गुन्हे — १४
२) जप्त करण्यात आलेला मुद्देमाल किंमती — ०१,९९,०००/— रू.

Ikkyhl LVs’ku vtuh

१) फिर्यादी आपले घरून मोटार सायकलने भाऊ नामे रामसिंग रा. चंदन नगर नागपुर येथे गॅस सिलेंडर घेवुन आपले घरी आल्यावर फिर्यादीची पत्नी हिने आपले पती फिर्यादीला आपला तिस-या नंबरचा मुलगा शबु अजय पांडे वय २ वर्ष रा. विश्वकर्मा नगर रोड नं ७, जितेंद्र सावळे च्या घरी किरायाने पो.स्टे.अजनी हा तुमच्या सोबत आला होता का? असे विचारणा केल्यावरून, फिर्यादीने पत्नीला माझे सोबत मुलगा आला नाही. तेव्हा पत्नीने आपला मुलगा घरात व घराबाहेर दिसुन येत नाही असे फिर्यादीला सांगितलेवर फिर्यादीने नमुद मुलाचा परिसरात शोध घेतला. रात्री उशिरा पर्यंत मिळुन न आल्यावर नमुद फिर्यादीचा मुलगा कोणीतरी अज्ञात व्यक्तीने अपहरण केल्याचे सांगितल्यावरून फिर्यादीचे रिपोर्ट वरून अप. कं. ४३/१६ कलम ३६३ भादवि प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे तपासामध्ये फिर्यादी यानेच यातील पिडित मुलाची आई साक्षीदार सौ खुशीनिसा रफिक अन्सारी यांचा मुलगा अपर्हृत शब्बु वय ०२ वर्ष याचे अपहरण करुन पोलिसांना व पिडिताचे आई व परीसरातील लोकांना अपर्हृत मुलगा शब्बु याचे अपहरणाची खोटी माहीती देवुन, अपर्हृत मुलगा शब्बु यांचे अपहरणाचे कारणास्थान रचले. सदर गुन्हयाचे तपासामध्ये प्राप्त फिर्यादीचे मोबाईल सिडीआर टावर लोकेशन व यातील साक्षीदार- कु. शंकुतला सातपुते यांनी पोलिसांना दिलेल्या माहीतवरुन सदर गुन्हयातील फिर्यादी हाच आरोपी असुन त्यानेच अपर्हृत मुलगा शब्बु याचे अपहरण केले आहे. आरोपी **रविप्रताप रामजीत दिवेदी (दुबे) उर्फ अजय पांडे वय २४ वर्ष यास** दि. ११/०२/२०१६ रोजी सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे. तसेच सदर गुन्हयामध्ये कलम ३६५ भादवि प्रमाणे वाढ करण्यात आली आहे.

सदर गुन्हयाचे तपासामध्ये नमुद आरोपी हा पोलिस कस्टडी मध्ये असतांना त्याने सदर गुन्हयाची कबुली देवुन, अपर्हृत मुलगा शब्बु वय ०२ वर्ष यास ज्या वाहनावर बसवुन अपहरण केले होते. सदर गुन्हयात आरोपीने वापरलेले वाहन एक दोन चाकी लाल काळया रंगाची मोटरसायकल कं. **MH-49-L-1863** हिरो पॅशन प्रो त्यावरील चेसिस नं **MBLJA12ADCGM00333** इंजिन नं. **JA12ABCGM06397**, किमती अं. २०,०००/-रु. मेमोरॅन्डम जप्ती पंचनामा प्रमाणे दोन पंचासमक्ष जप्त करण्यात आली आहे.

सदर गुन्हयात अटक आरोपी एम.सी.आर. अंर्तगत कारागृहात आहे. त्याचे विरोधात कोर्ट केस क्र. १६१५/२०१६ दि. ११/०४/२०१६ अन्वये दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे.सदर प्रकरणात पो.स्टे चे अधिकारी सपोनि धोबे कर्मचारी नामे पो हवा अनिल ११३ पोशि प्रशांत बं नं ५६६६ यांनी अपहरण झालेल्या मुलाचे जिवीताला धोका होउ नये याची काळजी घेउन अत्यंत गोपनिय रित्या माहिती प्राप्त करून सदरचा गुन्हा उघडकिस आणला या प्रकारे उत्कृ ठ कामगीरी केली आहे.

Ikksyhl LVs'ku vtuh

२½ फिर्यादी स्टार बस चालक हे आपलेताब्यातील स्टार बस चालवित घेवून जात असतांना यातील पल्सर मोटार सायकल वरिल दोन अनोळखी इसमांनी त्यांचे मोटारसायकल ला कट मारली या कारणा वरूननमुद आरोपीतांनी फिर्यादीची बस रस्त्यास अडवून शिवीगाळ करून फिर्यादीस गाडीमधुन खाली खेचुन धारदार शस्त्राने मारहाण करून गंभीर जख्मी करूनजिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला तसेच दुस—या स्टार बसचा चालक (यातील नमुद जख्मी) हा फिर्यादीस वाचविण्यास गेला असता नमुद आरोपींनी त्यास सुध्दा धारदार शस्त्राने मारून जख्मी केल्याने फिर्यादी यांचे लेखी रिपोर्ट वरून गुन्हा भा.द.वि. कलम ३०७,३४१,३२६,५०४,३४ प्रमाणे दाखल करण्यात आला होता.

तपासा दरम्याण सदर गुन्हयातील अज्ञात आरोपी बाबत काहीही माहिती नसतांना, कोणतेही सिसीटिव्ही फुटेज नसतांना मिळालेल्या माहिती वरून पोलीस स्टेशन अजनी येथील डिबी पथकातील पो.हवा. सुभाष ठाकरेब.नं. ३२४५ व पोशि अभिषेक ब.नं. २४४९ यांनी अतिशय मेहनतीने व बुध्दीकौशल्याने २४ तासाचे आत सदर गुन्हयातील १) पंकजज्ञानेश्वरखरकाटे वय २३ वर्षे रा. प्लॉटनं. ४५ वकीलपेठ हनुमान मंदिर जवळ, शासकिय आयुर्वेदिककॉलेज समोर पोस्टेइमामवाडा, २) संकेत मनोहर मेश्राम वय २२ वर्षे रा. वकीलपेठनिलेशकिराणा स्टोर्स जवळ हनुमान नगर पोस्टे ऑफिस मागे पोस्टेइमामवाडा,या आरोपीतांना निष्पन्न करून त्यांना अटक केली.

दाखल गुन्हयातील अटक आरोपीतांविरूध्द सबळ साक्ष पुरावे मिळून आल्याने सदर प्रकरणी दोषारोपपत्रक्र. ५६/१६ दि. २९/०३/१६ कोर्टकेसक्र. १६१६/१६ दि. ११/०४/१६ अन्वये मा. न्यायालयात सादरकरण्यात आले असुन सदरचे प्रकरण मा. न्यायालयात न्यायप्रविष्ठ आहे.

पोलीस स्टेशन अजनी येथील डिबी पथकातील पो.हवा. सुभाष ठाकरेब.नं. ३२४५ व पोशि अभिषेक ब.नं. २४४९ अतिशय मेहनतीने व बुध्दीकौशल्याने २४ तासाचे आत सदर गुन्हयातील आरोपींना अटक करून उत्कृष्ठ कामगीरी केलेली आहे.

## ikyhl LVs'ku lDdjnjk

पो.स्टे हिंगणघाट येथिल अप क 534/16 कलम 307,143,147,148,149 भा.द.वि सहकलम 3+25 आर्म ॲक्ट मधिल फरार आरोपी नामे अविनाश मनोहरराव नवरखेडे वय 30 वर्ष रा शास्त्री वार्ड हिंगणघाट,जि वर्धा हा दिनांक 27/04/2016 रोजी पो.स्टे सक्करदरा नागपूर शहर हददीत ईंदिरा गांधी सांस्कृतीक सभागृह येथे लग्न कार्यक्रमाकरिता आला असल्याची माहिती पो.स्टे हिंगणघाट येथिल पोलीसांना मिळाल्याने ते नागपूर येथे आले होते. सदरचे ईंदिरा गांधी सभागृह हे पो.स्टे सक्करदराचे हददीत येत असल्याने त्यांनी पो.स्टे सक्करदरा येथे मदतीसाठी पोलीस स्टाफची मागणी केल्याने त्यांना पो.स्टे सक्करदरा येथिल पोशि अमर प्रेमदास काळे बं.नं 6131 व पोशि प्रेमकुमार पंजाबराव ढोके बं.नं 5710 यांना त्यांचे सोबत पाठविले होते. सदर ठिकाणी गेलेनंतर संयुक्त सापळा रचण्यात आला, दरम्यानचे काळात सदर ठिकाणी गणवेशातील बीट मार्शल पोशि प्रफुल निळकंठ जांभुळकर,बं.नं 2384 यांनाही घटनास्थळी बोलावुन घेतले होते असे सर्वांनी मिळुन सापळा लावला होता. मिळालेल्या माहिती प्रमाणे आरोपी अविनाश मनोहरराव नवरखेडे वय 30 वर्ष हा त्याचा साथीदार शुभम रमेश लोंढे रा डांगरी वार्ड हिंगणघाट जि वर्धा असे दोघे 13.30 वाचे सुमारास आले.त्यांची व पोलीसांची नजरानजर होताच आरोपी अविनाशा नवरखेडे याने कमरेला लपवुन ठेवलेले दोन माउजर दोन होतात घेउन लग्न समारंभातुन लोकांचे गर्दीतुन ते पळुन जाण्याचा प्रयत्न करू लागले पोलीसांनी त्यांचा पाठलाग करून त्यांना पकडण्याचा प्रयत्न केला असता आरोपी अविनाश नवरखेडे याने त्यांचे जवळ असले दोन माउजर पैकी एका माउजर ने पकडण्यास गेलेल्या कर्मचा–यावर गोळीबार केला परतु जिवाची पर्वा न करता सक्करदरा पोलीस स्टेशनचे वरिल तीन कर्मचारी व हिंगणघाट पोलीस कर्मचा–यांनी यातील दोन्ही आरोपीतांना पकडुन जेरबंद केले तसेच त्यांचे कडुन दोन माउजर, 8 जिवंत काडतुस,एक खंजर, एक ईनोव्हा गाडी असा मुददेमाल जप्त केला. सदर घटनेबाबत सक्करदरा पोलीस स्टेशन येथे हिंगणघाट पोलीस स्टेशनचे सहा.पोलीस उप निरीक्षक श्री विवेक जानराव लोणकर यांनी दिलेल्या फिर्यादवरून भाग 5 गु.र.नं.91/16 भा.द.वि कलम 307,353,34 भारतीय हत्यार कायदा कलम 3+25,27 मुपोका कलम 37(1)135 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आलेला असुन सदर गुन्हयात वरिल आरोपींना अटक केलेली असुन सदर गुन्हयाचा तपास चालु आहे.

यातील सक्करदरा पो.स्टे चे 1)पोशि अमर प्रमोदराव काळे बं.नं 6131 2)पोशि प्रेमकुमार पंजाबराव ढोके बं.नं 5710 3)बीट मार्शल पोशि प्रफुल निळकंठ जांभुळकर बं.नं 2384 यांनी आपले प्राणाची पर्वा न करता आरोपीने त्यांचेवर अग्निशत्राने गोळीबार केलेला असतांनाही धाडसाने सदर आरोपी व त्याचा साथिदार यांना पकडून उत्कृष्ठ कामगीरी बजावली आहे.

Ikkyhl LVs'ku bekeokMk

दिनांक 26/04/2016 चे मध्यरात्री भारत पेट्रोलपंपं उंटखाना चौक ईमामवाडा नागपूर याठकाणी काम करणारे कामगार सदरचा पेट्रोलपंपं बंद करून पेट्रोलपंपा जवळ एकत्र जेवायला बसले असता रात्रीचे 00.30 वा चे सुमारांस 3 ईसम मोटरसायकलवर आले व मोटर सायकलमध्ये पेट्रोल मागु लागले त्यावेळी कामगारांनी पेट्रोलपंपं बंद झाला आहे जेवण करित आहे जेवण झाल्यावर मदत करतो असे सांगितले परंतु त्या तीन ईसमांना घाई होती व त्वरीत पेट्रोल त्यांचे मोटार सायकल मध्ये भरून देण्यास सांगितले त्यांना तेथ्लि कर्मचारी यांनी नकार दिला नकार देताच त्या तीन ईसमांनी तेथिल कामगारांसोबत भांडण करून त्यापैकी एकाने तेथे पडलेले एका डब्याचे झाकण त्या कामगारांना फेकुन मारले याला घाबरून पेट्रोलपंपांवरचे कामगार तेथुन पळुन जाउ लागले त्यावेळी त्या तीन ईसमांपैकि एका ईसमाने तेथेच पडलेल्या रॉड ने तेथून पळणा—या कामगाराचे पायावर फटका मारला त्यानंतर ते तिघेही एकत्र मोटरसायकलवर बसुन तेथुन पळुन गेले पायावर लोखंडी राडॅने फटका मारल्याने जखमी झालेला ईसम नामे दिपक रामजी मंडलीक वय 28 वर्षे हा इमामवाडा पो.स्टेला हजर आला असता प्रथम त्याचे मेडीकल हास्पीटल येथे उपचार करण्यात आले आणी त्याने दिलेल्या तक्रारी वरून पोउपनि वैद्य यांनी अप क्र 64/16 कलम 326,34, भादवि प्रमाणे अनोळखी ईसमांविरूध्द गुन्हा दाखल केला.

गुन्हा नोंदकरतांना फिर्यादी यांनी आरोपी व मोटरसायकल बाबत कुठलिही माहिती दिलेले नव्हती सदर अरोपी हे अनोळखी असल्याचे सांगितले होते.

सदर भारत पेट्रोलपंपांचे आवारात सीसीटिव्हिी कॅमेरे असल्याने सदर सीसीटिव्हि फुटेज मिळविली व तेथिल संषईत मारहाण करणा—या ईसमांचे चेहरे दिसतील अष्या रितीने त्यांचे फोटो तयार केले.सदर आनोळखी आरोपीतांपैकि एक आरोपी हा रामबाग पाचनळ चौक येथिल असल्याची माहिती पोषि वामन ब नं 5604 यांनी दिली त्यावरून रामबाग पाचनळ परिसरात जाउन परिचयाचे काहि लोकांना सदर सीसीटिव्हि फुटेज दाखविले असता नमुद तिनही ईसमांबाबत माहिती मिळाली त्यानंतर पोउपनि बी.एम वैद्य पोहवा षंकर जाधव बंनं 3796 पोहवा कुपाषंकर 4688 नापोषि अतिष 2825 पोषि पुरूषोत्तम ब नं 5909 यांनी तिनही ईसमांचा त्यंचे घरी षोध घेउन पो.स्टे ला आणून त्यांना अटक केली तसेच त्यावेळी गुन्हयात वापरलेली मोटर सायकल क्रमांक एम एच 31 डीबी 3012 होंडा डॉन हि देखील ताब्यात घेण्यात आली.

नमुद ईसमांनी सदरचा गुन्हा केल्याचे मान्य केले सद्या तिनही ईसम न्यायालयीन कोठडीत असुन त्यांची फिर्यादीकडुलन ओळखपरेड घेतली असता फिर्यादिने त्यांना ओळखल आहे.

पोउपनि बी.एम वैद्य पोहवा षंकर जाधव बंनं 3796 पोहवा कुपाषंकर 4688 नापोषि अतिष 2825 पोषि पुरूषोत्तम ब नं 5909 पोषि वामन ब नं 5604 यांनी फक्त सीयीटिव्हि फुटेज वरून संषईत ईसमांचा चेहरा पाहुन त्याव्दारे आपल्या वैयक्तीक संपर्कामधून नमुद आरोपीतांबाबत माहिती प्राप्त करून सदरचा गुन्हा उघडकिस आणुन उत्कृ"ठ कामगीरी केलेली आहे

Ikkyhl LV'ku gMd'oj

१) पो.स्टे.हुडकेश्वर हद्दीत दि. ०७/०२/२०१६ चे २०.०० वा. चे सुमारास **सहा.पोउपनि अरूण प्रचंड/९९९, पोशि आनंद काबंळे/५३७६, पोशि संजय पडधान/५१११** सर्व नेमणुक पो.स्टे. हुडकेश्वर हे पो.स्टे. हुडकेश्वर हद्दीत पेट्रोल व्हॅन ने पेट्रोलींग करीत असतांना वायरलेस संचावर नंदनवन पो.स्टे. चे हद्दीत चार इसमांनी दुचाकीवरून येउन जबरी चोरी केल्याचा संदेश प्रसारीत झाल्यांने यातील नमूद कर्मचारी यांनी पो.स्टे. हुडकेश्वर व नंदनवन हद्दीतील सामाईक भागात गस्त घालीत असतांना म्हाळगीनगर रिंगरोड वर एक काळया मोटार सायकल वर चार इसम संशईत पणे जातानां दिसुन आले. त्यांना थांबविण्याचा प्रयत्न केला असता ते भरधाव वेगाने पळुन जाउ लागले. त्यांचे वरील संशय बळावल्यांने त्यांचा पाठलाग करून त्यांना बेसा पावर हाउस मागे झोपडपट्टी येथे शिताफीने पकडुन ताब्यात घेतले. सदर संशईत इसम नामे १) शेख सलमान शेख शकिल वय १९ वर्षे धंदा घोडे नाचवणे रा. आजाद कॉलनी,लेडीस मदरशाजवळ मोठा ताजबाग,पोलीस स्टेशन सक्करदरा नागपुर २)शेख शफीक शेख शब्बीर वय २१ वर्षे,धंदा.भाजीपाला विक्री. रा.खरबी,बाबा फरीदनगर,गुलशनबाग मस्जिद, सुफी ताजकिराणा स्टोअर्स नंदनवन,नागपुर ३)गुरूदयाल पंचम तांडेकर वय २३ वर्षे,धंदा.हातमजुरी रा.बाराखोली निराला सोसायटी,केअरटेक हॉस्पीटलचे मागे,हमीद गॅरेजवाले यांचे घरी किरायाने नागपुर ४)प्रफुल्ल ताराचंद चौधरी वय २१वर्षे,रा. जामूगाव कोमठी,तहसिल चिमुर जिल्हा चंद्रपुर पोलीस स्टेशन भिसी सध्या मुक्काम दिघोरी उडाण पुलाखाली नागपुर पो स्टे हुडकेश्वर त्यांना पो.स्टे. हुडकेश्वर येथे चौकशी करीता आणले. त्यांचे कडे चौकशीतुन त्यांनी पो.स्टे नंदनवन हद्दीत गुन्हा केल्याचे कबुल करून ते पो.स्टे. हुडकेश्वर अप.क्र. ४४/१६ कलम ३९५, ३४१ भादवी, अप.क्र. ४६/१६ कलम ३९२, ३४ भादवी, तसेच अप.क्र. ४९/१६ कलम ३९२, ३४ भादवी या गुन्हयातील आरोपी असल्याचे निष्पन्न झाले. सदर गुन्हयात त्यांना अटक करण्यांत आली. चौकशीत त्यांचे दोन साथीदार १) राजु उर्फ जवाई पॅरेलाल शेंडे वय ४० वर्षे,रा. लतीफ लिडर यांचे घरी किरायाने विसाबाबा दर्गाजवळ निराला सोसायटी सक्करदरा नागपुर २)गुलरेज नासिर बक्स वय २० वर्षे प्लॉट नं ८५, निराला सोसायटी, मुनीरभाई टायरवाले यांचे घरासमोर, सक्करदरा नागपुर यांना ताब्यात घेउन अटक करण्यांत आली. अशाप्रकारे पो.स्टे. हुडकेश्वर व नंदनवन येथील एकुण ५ गंभीर गुन्हयांची उकल झाली.तसेच तपासात हिगणा पो स्टे हददीत आउटर रिंग रोड येथे देखील एका लहान पिकअप टेम्पो चालविणा—या इसमाला चाकुचा धाक दाखवुन ५९,५००/— रूपये काढुन घेतल्याचे कबुल केले व त्यामध्ये सहभागी असणारे अन्य तीन आरोपींचा शोध घेतला त्यांची नावे अनुक्रमे १)फईम मेबुब शेख वय १९ वर्षे रा. मोठाताजबाग,निराला सोसायटी,नागपुर २)मोहसिन शेख हसन वय १८ वर्षे.रा आजाद कॉलनी,निराला सोसायटी,नागपुर ३)मुहम्मद मतीन दानिश वय १६ वर्षे रा आजाद कॉलनी,निराला सोसायटी,नागपुर अशी असुन त्यांना हिंगणा पोलीस स्टेशनचे ताब्यात देणेत आले आहे तेथ अप क्र १०/१६ कलम ३९२,३४ प्रमाणे दोखल आहे तसेच त्यांचे कडुन अधिक गुन्हे उघडकीस येण्यांची दाट शक्यता आहे.

त्या गुन्हयातील चोरीचा काही मुद्देमाल त्यांचे कडुन हस्तगत करण्यात आला आहे. **त्यामध्ये दोन मोटार सायकल त्यामध्ये होंडा स्टर्नर व ॲक्टीव्हा कि. ६०,००० रू., ७ मोबाईल एकुण किं. १७,५०० रू, २ चाकु एकुण कि. २०० रू. व नगदी २०४० रू. असा एकुण ७९,७४० रू चा मुददेमाल हस्तगत करण्यात आला**. सध्या आरोपी कडुन अधिक तपास सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा. पोलीस उपआयुक्त, परिमंडळ क्र.४ श्री. इशु सिंधु व मा.सहा.पोलीस आयक्त, सक्करदरा विभाग, श्री. निलेश राउत यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. श्री. आर.एस. पवार, दुपोनि श्री. एस. के. झावरे, सपोनि. के.व्ही. चौगले, कर्मचारी संदिप गुंडलवार, गुरूदेव कुंभलकर, नितीन आकोते, पंकज तांबडे, सतिश ठाकरे, विलास चिंचुलकर, देवेंद्र शर्मा, निलेश ढोणे, नरेश तुमडाम हे पुढील तपास करीत आहे.

२) तसेच नागपूर ग्रामीण येथील पो. स्टे. कुही अप. क्रं. ४८/२०१६ कलम ३०२, २०१ भादवि अन्वये अज्ञात आरोपी विरूध्द गुन्हा दाखल आहे. पो. स्टे. हुडकेश्वर येथे तपास पथका मध्ये काम करणार **नापोशि नरेश तुमडाम, ब. नं. ४५२५** यांना पो. स्टे. हद्दित राहणार गुन्हेगार नामे ज्ञानेश्वर उर्फ नाना रायसिंग नेताम, वय ४०, राह. आदिवासी नगर झोपडपटटी, जम्बुव्दिप नगर, नागपूर हा गुन्हेगार शस्त्रानिशि मिळून आल्याने त्यास अप. क्रं. ३१६७/२०१६ कलम ४ + २५ श्शस्त्र कायदान्वये दाखल करून अटक केली. दरम्यान त्यास अधिक विचारपुस केली असता त्याने पोलीस स्टेशन कुही येथे खुन केल्याची माहिती दिली. सदर बाबत शाहणिशा करण्यात आली असता पोस्टे कुही येथे सदर गुन्हा दहा दिवसा अगोदर दाखल होता व मृतकाची ओळख पटली नव्हती व गुन्हा अउघडकिस होता.

गुन्हेगार ज्ञानेश्वर नेताम बाबत पो. स्टे. कुहि येथे माहिती देण्यात आली त्यांनी त्याला प्रोडक्शन वॉरंट वर अटक केली आहे. सदरचा गुन्हयातील मुख्य आरोपी ज्ञानेश्वर नेताम हाच असल्याचे निष्पन्न झाले आहे.

गुन्हा अज्ञात आरोपी विरूध्द पो. स्टे. कुहि येथे दि. १०/३/२०१६ रोजी दाखल होता अज्ञात आरोपीचा शोध नागपूर ग्रामीण पोलीस सतत सात दिवसां पासुन करित होते. सदर दोन्ही प्रकरणात नमुद अधिकारी/कर्मचारी यांनी अंत्यंत उत्कृष्ठ कामीरी केलेली आहे.